B 1,694,965

Digitized by Google

UNIV. OF MICH.
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

—The poet

period.

Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

Digitized by Google
Original from
UNIVERSITY OF MICHIGAN



Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

BHĀRATA

Vol. X.

DS
403
.B4
v.1
No.

भारत-

१० वर्ष] चै

दत्तो

गंगाधर

वार्षिक वर्गणी

Annual Subscri

Printed by An
House No. 93
Messrs. Dat
Muj

Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

Traimasikas

BHĀRATA ITIHĀSA SANSHODHAKA MANDALA.

Vol. X. **QUARTERLY.** [No.1

YCRAD
DS
403
.B48
V.10
No.1

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

त्रैमासिक.

१० वर्ष] चैत्र ते ज्येष्ठ श. १८५१ (मार्च-जून१९२९) [अं. १

UNIV of MICH.
JAN 1? 2003
STACKS

संपादक व प्रकाशक :

दत्तो वामन पोतदार, बी. ए.

गंगाधरराव नारायणराव मुजुमदार, एम. एल. सी.

चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. हं वगैरे निराळें. फुटकळ अंक १२ आणे

Annual Subscription Rs. 3. Postage &c. Extra. Each No. As. 12

Printed by Anant Vinayak Patvardhan at the Aryabhushan Press House No. 936/2 Bhamburda Peth, Poona City and published by Messrs. Datto Waman Potdar and Gangadharrao Narayanrao Mujumdar at 314- Sadashiv Peth, Poona City.

Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

विषयानुक्रमणिका.

अनु.	निबंध.	लेखक.	पृष्ठ.
१	रामगुप्तराजाबद्दल अधिक चर्चा	प्रो. अ. स. अळतेकर, बनारस	१
२	चालुक्य विक्रमादित्य २ रा याचा श. ६६४ मधील नरवण येथील ताम्रपट	श्री. ग. ह. खरे, वांई	९
३	राक्षसतंगडीच्या रणांगणाचा स्थलानिर्णय	श्री. ना. श्री. राजपुरोहित—चिट. क. इ. सं. मं. धारवाड ...	१७
४	बाजीनाईक जेधे यांची जन्मपत्रिका (श. १५५०)...	श्री. ज. स. करंदीकर	२३
५	श्रीशिवछत्रपतींचीं तांब्याचीं नाणीं	श्री. रा. ह. गाडगीळ,... मुंबई...	२६
६	राज्याभिषेककलपतरु	श्री. का. ना. दीक्षित व श्री. द. वि. आपटे—	२९
7	Muhamad-Name and Busatin-u's-salatin	Prof. B. D. Varmā M. A. M. F. A. F. Poona...	41
8	Sources of the Busatin-ū's-salatin	Prof. Shaikh Abdul-Kadir Surfraz Poona.	49
९	दादाजी कोंडदेवाची मृत्युतिथी	श्री.दि.वि. काळे एम्.ए.-तळेगांव	५२
१०	श्रीमुक्ताबाईचें समाधिस्थल	आ. ना. रा. गुंजाळ- ...	५५
	ऐ. सं. साहित्य खं १-बेदनूरचे राजे— ...		९७-१०४
	भेट व अभिप्राय म्हणून आलेल्या ग्रंथांची यादी,— ...		
	श. १८५० व १८५१ मधील नूतन सभासद, १७ वें संमेलन व १९ वा वाढदिवस- कार्यक्रम, कारभारीमंडळ, दुःखवटा. ...		१-१५
	निवेदन	चिटणीस...	१६
	त्रिशत सांवत्सरिक श्रीशिवराज जन्मादिन महोत्सव- ...	श्री. न. चिं. केळकर व श्री द. वि. आपटे	१-८

Digitized by Google

Original from UNIVERSITY OF MICHIGAN

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें.

वर्ष १० वें] त्रैमासिक [अं. १ ला.

१ रामगुप्त राजाबद्दल अधिक चर्चा

(प्रो.– अ. स. अळतेकर, बनारस)

‡गुप्त घराण्यांतील समुद्रगुप्त राजानंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र रामगुप्त हा गादीवर बसला व त्यानंतर त्याचा धाकटा भाऊ दुसरा चंद्रगुप्त हा आपल्या भावास मारून तख्ताधिपति झाला; आणि त्यानें आपल्या विधवा भावजईबरोबर लग्न लाविलें इत्यादि सर्व गोष्टी साधार सिद्ध करणारा लेख मीं बिहार व ओरिसा सोसायटीच्या त्रैमासिकामध्यें (जून इ. १९२८) प्रसिद्ध केला होता [भाग १४ पृष्ठें २२३–२५३]. उपरि निर्दिष्ट नवीन सिद्धांताबद्दल जी गेल्या वर्षीं चर्चा झाली आहे तिचा विचार आज करून त्यास पोषक असा आणखी पुरावा जो आतां उपलब्ध झाला आहे तो येथें मांडीत आहे.

एक अशी शंका मांडण्यांत आली आहे कीं, ज्याअर्थीं रामगुप्ताचें नांव गुप्त घराण्याच्या वंशावळींत आढळत नाहीं त्या अर्थीं तो सम्राट नसून राजवंशीय प्रांताधिपति असावा. गुप्तांच्या राजवटींत राजघराण्यांतले प्रांताधिपती पुष्कळदां नेमीत असत. पहिल्या कुमारगुप्ताचा भाऊ गोविंदगुप्त वैशाली प्रांतावर राज्य करीत होता; इ.स. ४३५ सालीं माळव्याचा सुभेदार घटोत्कच गुप्त हा होता. समुद्रगुप्ताला बरेच बंधु होते, व त्याचें साम्राज्य जसें अधिक अधिक विस्तृत होऊं लागलें तसें त्यांपैकीं कांहीं प्रांताधिपती नेमले गेले असतील. देवीचंद्रगुप्तम् नाटकामध्यें ज्या रामगुप्त व चंद्रगुप्त यांचा उल्लेख केला आहे ते सम्राट् नसावेत तर समुद्रगुप्ताचे बंधु किंवा पुतणे असावेत; व त्यानें त्यांना बुंदेलखंडाचे सुभेदार नेमले असावेत. रामगुप्त बादशहास नव्हे तर रामगुप्त सुभेदारास शकराजानें आपली राणी पाठविण्यास भाग पाडलें. देवीचंद्रगुप्तम् नाटकावरून रामगुप्त हा बादशहाच होता व सुभेदार नव्हता असें

‡ १७ वें संमेलन.

निःसंशय सिद्ध होत नाहीं; व ज्याअर्थीं रामगुप्ताचीं नाणीं सांपडत नाहींत त्या अर्थींही तो सुभेदारच असावा. नाणीं पाडण्याचा अधिकार बादशहास असल्यामुळें सुभेदारास तीं पाडणें शक्य नव्हतें.

वरील विचारसरणी वाटते तितकी निर्दोष नाहीं. देवीचंद्रगुप्तम् नाटकामधील आज उपलब्ध झालेले सर्व उतारे चंद्रगुप्त हा सुभेदार होता या विचारसरणीस विरुद्ध नाहींत. हर्षचरित्रामधील

' अरिपुरे च परकलत्रकामुकं कामिनीवेषगुप्तश्चन्द्रगुप्तः शकपतिमशातयत् '

हें वाक्य हि चन्द्रगुप्त बादशहाच होता हें सिद्ध करीत नाहीं. पण शंकरार्यानें वरील हर्षचरित्रांतील विधानावर जी टीका लिहिली आहे तीवरून रामगुप्ताची जी राणी शकराजानें मागितली होती, व जिच्याशीं अखेर चंद्रगुप्तानें लग्न केलें तिचें नांव ध्रुवदेवी हें होतें असें दिसून येतें. आतां सुभेदार चंद्रगुप्त हा जर बादशहा दुसरा चन्द्रगुप्त याजहून निराळा मानावयाचा तर आपणास असें कबूल करावें लागेल कीं, बादशहा दुसरा चंद्रगुप्त व सुभेदार चंद्रगुप्त या दोघांच्या राण्या समाननामधारक होत्या. कारण बादशहा दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या राणीच्या नांवाचा जो ठसा वैशालींत सांपडला आहे; त्यावरून तिचेंहि नांव ध्रुवदेवीच होतें असें सिद्ध होतें. एखाद्या बादशहाचे व त्याच्या मांडलिकाचें नांव कदाचित् एक असूं शकेल; पण त्यांच्या राण्यांचीं हि नांवें त्यांच्या पतीप्रमाणें एकच असावींत ही गोष्ट बरीच असंभवनीय दिसते. प्रस्तुत विचारसरणीप्रमाणें सुभेदार चंद्गुप्त व बादशहा चंद्गुप्त हे बंधु किंवा पुतणे होते ही गोष्ट ध्यानांत ठेवली म्हणजे त्यांच्या पत्नींचें एकनामधारकत्व हें असंभवनीयच दिसून येईल. कारण, एकत्र हिंदु कुटुंबामध्यें दोन भावांच्या अगर चुलत भावांच्या अगर चुलत्यापुतण्यांच्या स्त्रियांचीं नांवें समान कधींच नसतात.

अमोघवर्षाच्या संजान ताम्रपटामध्यें [ए. इं. भा. १८]

> हत्वा भ्रातरमेव राज्यमहरद्देवींच दीनस्तथा ।
> लक्षं कोटिमलेखयत् किल कलौ दाता स गुप्तान्वयः ॥

असा श्लोक आहे. ह्या श्लोकामध्यें जो एका गुप्त राजाचा उल्लेख आला आहे त्यावरून रामगुप्त व चंद्गुप्त हे बादशहा होते व सुभेदार नव्हते हें सिद्ध होतें. माझ्या पहिल्या लेखामध्यें उपरिनिर्दिष्ट श्लोकांत देवीचंद्रगुप्तम् मधील रामगुप्तचंद्रगुप्तांचाच उल्लेख केला आहे हें मीं सिद्ध केलेंच आहे. ते सुभेदार असणें संभवनिय नाहीं. कारण अमोघवर्षाच्या दरबारीं कवीच्या हातून निखिल दक्षिणाधिपतीच्या औदार्याची तुलना एखाद्या क्षुल्लक सुभेदाराशीं घडणें संभवनीय नाहीं. छोट्याश्या प्रांता-

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

धिपर्सास लाखो किंवा कोट्यवधी रुपये दान करणेंहि शक्य नव्हतें. तेव्हां संजान ताम्रपटावरून चंद्रगुप्त हा बादशहा होता, सुभेदार नव्हता हेंच सिद्ध होतें.

समुद्रगुप्ताच्या कारकीर्दीमध्यें साक्षात् गुप्त अंमलाखालीं मुलूख फार नव्हता. समुद्रगुप्त व चंद्रगुप्त हे दोघेही कर्ते व स्वकुलाभिमानी पुरुष होते; आणि त्यांनीं राजघराण्यांतील सुभेदारावर आपली पट्टराणी शत्रूच्या महालीं पाठवण्याचा प्रसंग गुदरूं दिला नसता.

देवीचंद्रगुप्तामधील जे उतारे आज उपलब्ध आहेत त्यांवरून आपल्यावरील लांछनास्पद संकट निवारण्याकरतां रामगुप्त अगर त्याचा बंधु चंद्रगुप्त या दोघांपैकीं एकाच्याहि डोक्यामध्यें सम्राट समुद्रगुप्त किंवा पहिला चंद्रगुप्त यांची मदत मागवावी अशी कल्पनाहि आलेली दिसत नाहीं. सम्राटाच्या मदतीची कल्पना त्यांना सुचली नाहीं यास एकच कारण संभवतें तें हें कीं, त्यांच्यावर कोणी सम्राट नव्हते, तर ते स्वतः सम्राट होते.

रामगुप्त हा गुप्त सम्राट असून त्याचीं नाणीं अद्याप उपलब्ध होऊं नयेत हें चमत्कारिक दिसतें. पण प्राचीन हिंदुस्थानांतील पुष्कळ ज्ञात राजांचीं नाणीं आज मिळत नाहींत. रामगुप्ताची कारकीर्द फार लहान होती;. त्यामुळें त्याचीं नाणीं फारशीं पाडलींच नसावींत, म्हणून तीं हल्लीं उपलब्ध होत नाहींत.

अहमदाबादचे दि. ब. के. ह. ध्रुव यांनीं **पुरातत्त्वमंदीर** मासिकामध्यें या विषयावर एक लेख लिहिला आहे. समुद्रगुप्ताचा उत्तराधिकारी रामगुप्त होता हें माझें म्हणणें त्यांनीं मान्य केलें आहे; पण दुसऱ्या चंद्रगुप्तानें आपला भाऊ रामगुप्त यास मारून त्याच्या विधवा पट्टराणीशीं लग्न लाविलें हें माझें म्हणणें त्यांना मान्य नाहीं. माझें मत ज्या पुराव्यावर अधिष्ठित आहे तो त्यांनीं खोडून टाकण्याचा प्रयत्न केला नाहीं. त्यांचें एवढेंच म्हणणें आहे कीं, संजान ताम्रपटांतील ४७ वा श्लोक खालीलप्रमाणें वाचला म्हणजे भ्रातृजायाविवाहपातकापासून चंद्रगुप्ताची मुक्तता होते.

हत्वा भ्रातरमेव राज्यमहरद्रव्यं (देवीं नव्हे) च दीनस्तथा ।
लक्षं कोटिमलेखयत् किल कलौ दत्तं (दाता नव्हे) स गुप्तान्वयः ॥
येनात्याज्य (जि नव्हे) तनुस्वराज्यमसकृत् बाह्यार्थके (बाह्यार्थकैः नव्हे)
का कथा ।
ह्रीस्तस्योन्नतराष्टकूटतिलको दातेति कीर्त्यामपि ॥

एपिग्रॅफिआ इंडिकाच्या १८ व्या विभागांत संजान ताम्रपटाची प्रतिच्छाया facsimile छापलेली आहे. त्यामध्यें वरील श्लोकाचा सर्व अक्षर अगदीं स्पष्ट

आहेत, व त्यावरून दिवाण बहादुरांनीं सुचविलेले पाठभेद मुळामध्यें मुळींच संभवत नाहींत; हें कोणाहि लिपिशास्त्रज्ञांस कबूल करावें लागेल. बरें, दिवाणबहादुरांनीं वर सुचविल्याप्रमाणें मूळ श्लोक होता, व खोदणाऱ्याच्या चुकीमुळें त्यास हल्लींचें विकृत स्वरूप प्राप्त झालें म्हणावें तर तेंहि संभवनीय नाहीं. कारण, तांबटाच्या हातून समानबाह्याकाराचीं अक्षरें बदलतात. ताम्रपटामध्यें 'देवीं' अशीं अक्षरें स्पष्ट आहेत. तेव्हां गुप्तराजानें आपल्या बंधूस मारून त्याच्या पत्नीचें हरण केलें होतें, द्रव्याचें नव्हे हें सिद्ध होतें.

ज्या शकराजानें गुप्त सम्राटास नामोहरम केलें होतें तो पश्चिम हिंदुस्थानांतला होता, उत्तर हिंदुस्थानांतला नव्हे, हें माझें मत दि. ब. ध्रुव यांना मान्य आहे. त्यांनीं असें सुचविलें आहे कीं हर्षचरित्रामध्यें

अरिपुरे च परकलत्रकामुकं शकपतिम्... अशातयत् ।

असा जो पाठ आहे त्या ऐवजीं

गिरिपुरे च परकलत्रकामुकं...

असा मूळचा पाठ असावा. देवीचंद्रगुप्तम् नाटकांतील हकीकत गिरिनगरामध्यें घडून आली असावी असा त्यांनीं सिद्धांत काढिला आहे.

दि. ब. ध्रुवांनीं सुचविलेला हा पाठभेद मला संभवनीय दिसत नाहीं. पहिल्या शतकामध्यें जी लिपी होती तिजमध्यें अ [ㅂ] व गि [✕] यांची अदलाबदल शक्य होती, सातव्या आठव्या शतकांतील लिपीमध्यें तशी अदलाबदल होणें शक्य नव्हतें; कारण त्यावेळीं वरील अक्षरांचीं रूपें अगदीं परस्पर विसदृश झालीं होतीं. अक्षरांचा घोटाळा हर्षचरित्राच्या हस्तलिखितांमध्येंच झाला एवढें गृहीत धरूनही चालत नाहीं. कारण शृंगाररूपकामध्येंहि

स्त्रीवेषनिह्नुतश्चन्द्रगुप्तः शत्रोः स्कंधावारमरिपुरं शकपतिवधायागमत् ।

येथें 'अरिपुरं' असाच पाठ आढळतो (इंडियन् अँटिक्वेरी १९२३ पा. १८१) देवी चंद्रगुप्तम्‌वरून शकाधिपतीनें गुप्त साम्राज्यावर स्वारी केली होती व त्यामुळें पौरजन भयभीत झाले होते असें दिसून येतें. शकराजाच्या सैन्याचा तळ गुप्तमुलुखांत असतांना रामगुप्तास दंतीं तृण धरावयास लाविल्यावर राणीस तावडींत परत जाण्यापूर्वीं स्वाधीन करण्याची अट त्यानें घातली असणें स्वाभाविक आहे. वर उद्धृत केलेल्या शृंगाररूपकांतील उताऱ्यावरूनहि चन्द्रगुप्त स्त्रीवेष धारण करून शत्रूच्या शिबिरामध्यें गेला—राजधानीमध्यें नव्हे—असाच निष्कर्ष निघतो. शकराजाचा खून करून आपली स्वतःची सुटका शिताफीनें करून घेणें ही गोष्ट शक-

Google Original from

राजाच्या गिरिनगर राजधानीमध्यें फार कठीण होतीं; राजवाड्यांतील सैनिकांनीं चंद्रगुप्तास लगेच पकडलें असतें; त्यांच्या हातून सुटल्यावरहि राजधानींतील शिपाई व सैनिक यांनीं त्याचा पाठलाग केला असता; मूठभर सैन्याच्या मदतीनें गिरनगराहून पाटलीपुत्रापर्यंतचा पल्ला चंद्रगुप्तास शत्रुसैन्य पाठलाग करीत असतांना गांठणें शक्य झालें नसतें. तेव्हां समोरासमोर विरुद्ध सैन्यें तळ देऊन पडलीं असतांनाच शत्रुशिबिरामध्यें जाऊन चंद्रगुप्तानें शकवध केला, गिरिनगरामध्यें नव्हे, हेंच जास्त संभवनीय दिसतें.

इलियटच्या हिस्टरी ऑफ इंडिया भाग १ मध्यें पृष्ठ ११०–२ मध्यें बाराव्या शतकातील प्रथमार्धात लिहिलेल्या **मुज्मलुत्तवारीख** नांवाच्या इतिहास ग्रंथामध्यें आढळून येणारी **रव्वाळ व बर्कमारीस** यांची गोष्ट दिलेली आहे. सदरहू गोष्ट म्हणजे देवी चंद्रगुप्तम् नाटकांतील इतिहासाचा प्रतिध्वनिच होय असें भासतें व त्यामुळें रामगुप्ताबद्दल जी मीं मागें माहिती प्रसिद्ध केली आहे तीस दुजोरा मिळतो. तिचा सारांश खालीलप्रमाणें आहे.

रव्वाळ व बर्कमारीस हे बंधु होते. यांमध्यें रव्वाळ थोरला होता व म्हणून राज्य करीत होता. त्यावेळीं एक सुंदर राजकुमारी होती, हिचा पती चक्रवर्ती बादशहा होईल असें भाविष्य केलें होतें. तिनें स्वयंवरामध्यें बर्कमारीस यांस वरिलें व तिला घेऊन तो घरीं आला. माझें मन या कुमारीनें मोहून घेतलें आहे असें म्हणून रव्वाळनेंच तिच्याबरोबर लग्न केलें. बिचाऱ्या बर्कमारीसास चुरमुरे खात बसावें लागलें. त्यानें विद्याभ्यासंगास सुरवात केली व तो विद्वान् म्हणून प्रसिद्धीस आला. पुढें कांहीं दिवसांनीं रव्वाळच्या बापाचा जो शत्रू होता अशा एका राजानें त्याच्यावर स्वारी केली. रव्वाळच्या सैन्याचा पराभव झाला व त्यास आपल्या सरदारांसह एका उंच पर्वतावर किल्ल्यांत आश्रयार्थ जावें लागलें. पण तेथें हि अखेर शत्रूस शरण जाण्याशिवाय गत्यंतर उरलें नाहीं. तहाची वाटाघाट सुरू झाली. शत्रूनें अशी अट घातली कीं रव्वाळनें आपली सुंदर पट्टराणी आपल्या शत्रूच्या महालांत कायमची पाठवावी; रव्वाळच्या सरदारांनीं एकेक स्त्री शत्रुपक्षांतील सरदारांना द्यावी; असें झाल्यास वेढा उठऊं असें आश्वासन देण्यांत आलें. रव्वाळ या अटी मान्य करण्याच्या बेतांत असतांना त्याचा भाऊ बर्कमारीस त्याला म्हणाला " राणीस पाठऊं नका. मला व सैन्यांतील अधिकाऱ्यांना स्त्रीवेष द्या; आम्ही प्रत्येकजण वेणीमध्यें एक सुरा व लुगड्यामध्यें एक तुतारी दडवून ठेवूं. आम्हांला शत्रुसैन्यांत नेल्यावर शत्रुराजास, पट्टराणी म्हणजे मी असें सांगण्यांत यावें, म्हणजे तो मला आपल्याकरितां ठेऊन घेईल व बाकीच्यांना आपल्या सरदारांच्या महालांत पाठवील. रात्रीं जेव्हां तो मजजवळ येईल तेव्हां मी

सुऱ्यानें त्याचें पोट भोंसकीन व तो मेल्याबरोबर तुतारी वाजवीन. तुतारी ऐकण्या-बरोबर शत्रुसरदारांच्या महालांत गेलेल्या आपल्या स्त्रीवेषधारी सरदारांनीं त्या त्या सरदाराचाही सुऱ्यांनीं खून करावयाचा, व आपल्या सैन्यानें लगेच वेढा देणाऱ्या सैन्यावर चाल करावयाची. राजा व सरदार मेल्यामुळें शत्रूचा लगेच सहज पराभव होईल.

बर्कमारीसाचा वरील बेत राजानें मान्य केला व तो निर्विघ्न सिद्धीसहि गेला. शत्रूचा संपूर्ण पराभव झाला व तो वाताहत होऊन परत गेला. पण बर्कमारीसाचें कौतुक करण्याऐवजीं रव्वाळ आतां त्याचा द्वेष करूं लागला. त्याच्या वझिरानें त्याचें मन बर्कमारीसाचे उलट कलुषित केलें व त्यामुळें आपला जीव बचावण्याकरितां बर्कमारीसास वेडेपणाचें पांघरूण घ्यावें लागलें. अनवाणी तो वेड्यासारखा राजधानीमध्यें भीक मागत हिंडूं लागला. एके दिवशीं भीक मागत भटकत असतां त्यानें राजवाड्यांत युक्तीनें प्रवेश करून घेतला. त्यावेळीं रव्वाळ व त्याची राणी हीं ऊंस खात बसलीं होतीं. त्यांना बर्कमारीस ओळखला नाहीं, व त्यास भिकारी समजून राजानें एक ऊंसाचें कांडें दिलें. अंगणांत पडलेल्या एका शिंपेच्या तुकड्यानें बर्कमारीस जेव्हां तें कांडें साफ करून सोलण्याचा प्रयत्न करूं लागला, तेव्हां रव्वाळानें त्यास एक सुरी सदरहू काम करण्यास राणीकडून देवविली. सुरी मिळाल्यावर बर्कमारीसानें ऊंसाचें कांडें सोललें, व राजा जरा बेसावध असतांना त्यावर उडी टाकून त्याचें पोट फोडून त्यास ठार मारलें व त्याचे पाय धरून सिंहासनावरून खालीं ओढलें. नंतर त्यानें लगेच वजीर व पौरजन यांना बोलाविलें व सर्वांच्या संमतीनें सिंहासनावर तो अधिष्ठित झाला. त्यानें रव्वाळास अग्निसंस्कार दिला व त्याच्या बायकोबरोबर— जिनें याला स्वयंवरांत वरिलें होतें— पुन्हां लग्न केलें. बर्कमारीसाचें राज्य वाढत गेलें व तो सर्व भरतवर्षाचा चक्रवर्ति झाला.

बर्कमारीसचे विरुद्ध रव्वाळाचें मन ज्या साफर नामक वजिरानें कलुषित केलें होतें त्याच्या मनांत रव्वाळच्या चितेवर आरोहण करावयाचें होतें. पण बर्कमारीस त्यास तसें करूं देईना. साफर जेव्हां आत्महत्या करण्याचा निर्धार सोडीना तेव्हां बर्कमारीसानें त्यास राजनीतिशास्त्रावर एक उत्तम ग्रंथ लिहून झाल्यावर आपल्या मनाप्रमाणें वागण्यास परवानगी दिली. साफरनें तें मान्य करून एक राजनीतिशास्त्रावर ग्रंथ लिहिला. त्याची सर्वांनीं फारच स्तुति केली. मग साफरनें चिताप्रवेश केला.

मजमल्हूत तवारीखे मध्यें दिलेल्या वरील गोष्टींत व मीं आधीं विवेचन केलेल्या रामगुप्त—ध्रुवदेवी कथानकामध्यें बरेंच साम्य दिसतें. फरक नाहीं असें

नाहीं, पण तो फार थोडा आहे. उदाहरणार्थ, तवारीखेमध्यें रव्वाळाच्या बापानें त्याच्या मूळ राज्यांतून हाकलून लावल्यावर त्यानें दक्षिणेंत नवें राज्य स्थापिलें होतें असा मजकूर आहे. समुद्रगुप्ताबद्दल असें विधान करणें मुळींच शक्य नाहीं. पण या तवारीखेमध्यें पांडव वगैरेसंबंधीं जो इतिहास दिला आहे त्यामध्यें हि मधून मधून कांहीं चुका आढळून येतात. पण त्यावरून तवारीखकारास सर्वस्वी विश्वसनीय माहिती नव्हती एवढेंच सिद्ध होतें, त्याची सर्वच माहिती चुकीची ठरत नाहीं.

रव्वाळ व रामगुप्त यांच्या नांवांत विशेष साम्य नाहीं; पण बर्कमारीस हा विक्रमादित्य (चंद्रगुप्त) याचाच अपभ्रंश आहे हें उघड आहे. स्त्रीवेष स्वतः धारण करून व आपल्या अनुयायांसहि तो देऊन शत्रू बेसावध असतां त्याचा निःपात करण्याची कल्पना तवारीख व संस्कृत ग्रंथ या दोहोंमध्येंहि आढळतें. देवीचंद्रगुप्तम् वरून चंद्रगुप्तास वेडेपणाचें पांघरूण घ्यावें लागलें असें आढळून येतें; तर तवारीखमध्येंहि बर्कमारीसास त्याच उपायानें स्वसंरक्षण करणें भाग पडलें असें दिसून येतें. दोनहि पुस्तकांत बर्कमारीस ऊर्फ विक्रमादित्य हा आपल्या भावास मारून त्याच्या बायकोबरोबर लग्न करून त्याच्या तख्तावर बसतो असें आढळून येतें. तवारीखवरून बर्कमारीस हा विद्याप्रेमी होता हें सिद्ध होतें. संस्कृत पुराव्यावरून विक्रमादित्य हा स्वतः विद्वान् व विद्वानांचा परामर्ष घेणारा होता हें उघड दिसतें. बर्कमारीस हा हिंदुस्थानचा चक्रवर्ति झाला हें तवारीखकाराचें विधान अलंकारिक भाषेंत चंद्रगुप्तविक्रमादित्याबद्दल संभवतें.

वरील अर्थपूर्ण साम्यावरून तवारीखकारानें सांगितलेली रव्वाळ–बर्कमारीस ही गोष्ट गुप्त घराण्यांतील रामगुप्त–चंद्रगुप्ताच्या कथानकावरूनच घेतली आहे हें उघड दिसतें. देवीचंद्रगुप्तम् नाटक अद्याप संपूर्ण उपलब्ध नसल्यामुळें चंद्रगुप्त कसा राज्यावर आला हें सर्व आपणास माहीत नाहीं, पण तवारीखकाराच्या वृत्तांताचा उपयोग करून मागें मीं त्रोटकपणें मांडलेला इतिहास जास्त सविस्तर देतां येतो. उज्जयिनीच्या शकराजानें रामगुप्तास एका किल्ल्यामध्यें किंवा शहरामध्यें वेढा देऊन कोंडून ठेविलें होतें असें दिसतें. शत्रूस शरण जाण्याशिवाय गत्यंतर जेव्हां उरलें नाहीं तेव्हां ध्रुवदेवीस महालांत पाठविली तरच वेढा उठवतो असा निर्वाणीचा खलिता आला असावा. जर ही अट मान्य केली नाहीं तर सर्व देश उध्वस्त करण्याची भीति शकराजानें घातली असावी, असें मानिलें म्हणजे नाट्यदर्पणकार

प्रकृतीनामाश्वासनाय ध्रुवदेवीसंप्रदानेऽभ्युपगते ।

असें कां म्हणतात याचा सहज उलगडा पडेल. सर्वस्वाचा नाश डोळ्यापुढें स्पष्ट दिसत

असल्यामुळें पौरजनांनीं राजास लज्जास्पद अटी मान्य करण्यास भाग पाडिलें असावें. शकांच्या शिबिरांतून चंद्रगुप्ताची सुटका कशी झाली व शकांचा पराभव कसा करण्यांत आला हेंहि आतां स्पष्ट दिसतें. चंद्रगुप्तानें तुतारी वाजविल्याबरोबर सर्वस्वीं बेसावध असलेल्या शकसैन्यावर गुप्तसैन्यानें हल्ला केला; व सेनानायक मेल्यामुळें हतप्रभ झालेलें सैन्य धैर्य खचून पळत सुटलें असावें.

मज्मूलत्तवारीख मध्यें जो वृत्तांत आहे त्यावरून रामगुप्तास चंद्रगुप्तानें अखेर कसें मारिलें हें आपणास कळून येतें असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. नाट्यदर्पणकारांनीं

बहुविहकज्जविसेस अइगूढं जिण्हवेइ मयणादो ।
निक्खलइ खुद्दचित्ता उरन्ना...... त्तं ममो रिउणो ।

हा श्लोक देतांना त्यास 'इयमुन्मत्तस्य चंद्रगुप्तस्य मदनविकारगोपनपरस्य मनाक् शत्रुभीतस्य राजकुलगमनार्थं निष्क्रमसूचिकोति' अशी जी पुस्ती जोडली आहे तिजवरून देवीचंद्रगुप्तम् नाटकामध्यें चंद्रगुप्त हा उन्मत्तवेशांत राजवाड्यांत जातो हें उघड दिसतें. जेव्हां सर्व नाटक उपलब्ध होईल तेव्हां तवारीखकारांनीं सांगितल्याप्रमाणें पुढें लवकरच चंद्रगुप्त रामगुप्तास मारतो असें बहुतकरून आढळून येईल असें मला वाटतें.

रम्यां चारतिकारिणीं च करुणाशोकेन नीतां दशाम् ।
तत्कालोपगतेन राहुशिरसा गुप्तेव चान्द्री कला ॥
पत्युः क्लीबजनोचितेन चरितेनानेन पुंसः सतः ।
लज्जाकोपविषादभीत्यरतिभिः क्षेत्रीकृता ताम्यते ॥

या देवीचंद्रगुप्तम् नाटकांतील श्लोकावरून ध्रुवदेवीला आपल्या क्लीब पतीबद्दल लज्जा, कोप व विषाद वाटत होता हें उघड आहे. तवारीखकाराचा वृत्तांत जर आपण खरा मानला तर ध्रुवदेवीची वरील मनःस्थिति आपणास चांगलीच समजेल. ध्रुवदेवीनें प्रथम चंद्रगुप्त विक्रमादित्यास वरलें असावें व रामगुप्तानें मग तिच्याशीं तिच्या मनाविरुद्ध लग्न लाविलें असावें. आपल्या पतीस मारणारा जो चंद्रगुप्त याजबरोबर तिनें पुन्हां कसें लग्न लाविलें याचा आतां चांगलाच उलगडा होतो. तिनें प्रथम चंद्रगुप्तास वरिलें होतें; व आपल्या इच्छेविरुद्ध लग्न करणाऱ्या व आपल्या अब्रूची होळी करण्यास तयार झालेल्या आपल्या नादान पतीला मारल्याबद्दल चंद्रगुप्ताविषयीं तिला मुळींच वाईट वाटलें नसावें. तिचें मन प्रथम त्याजवरच बसलें होतें, व आपली अब्रू वांचविण्यास चन्द्रगुप्तानें जेव्हां स्वतःचा जीवही धोक्यांत घातला; तेव्हां त्यांजबद्दल तिचा आदर व अनुराग फारच वाढला असावा.

Digitized by Google Original from

चंद्रगुप्तानें आपला जीव धोक्यांत घातला त्यासहि कारण म्हणजे ध्रुवदेवीबद्दल यास वाटत असणारें प्रेमच असावें.

रव्वाळचा प्रधान साफर याजबद्दल तवारिखेमध्यें जो मजकूर आहे तो जर खरा असला तर आपणास पुढें मागें गुप्तकालामध्यें लिहिलेलें एखादें राजनीति-शास्त्रावरचें पुस्तक सांपडेल अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं.

---

२ चालुक्य विक्रमादित्य २ रा याचा शक ६६४ चा नरवण येथील ताम्रपट

(ले.- ग. ह. खरे, शिक्षक-राष्ट्रीयशाळा सातारा.)

उपलब्धि:- हा ताम्रपट श्री. दिनकर लक्ष्मण कानडे यांजकडून श्री. द. वि. आपटे यांजकडे वाचनार्थ आला. मीं श्री. आपटे यांजपाशीं मागितला व त्यांनीं तो मला मोठ्या प्रेमानें दिला. मला जसा वाचतां आला तसा तो मीं वाचला व त्यांतील स्थलकालादींचे उल्लेख निश्चित केले. नंतर श्री. कानडे यांजकडून असें कळलें कीं, त्यांचे नातलगास हा ताम्रपट चिपळूण ता. पैकीं नरवण गांवीं एका जुन्या घरठाणाजवळच्या गटारांत अर्धवट गाडलेला असा आढळला. त्यांनीं तो श्री. कानडे शास्त्री यांजपाशीं दिला व वर म्हटल्याप्रमाणें माझे हातीं आला.

ताम्रपटवर्णन:- ताम्रपटाचे एकंदर ५ पत्रे असून ते एका जाड कडींत ओविलेले आहेत. प्रत्येक पत्र्याची लांबी, रुंदी व जाडी अनुक्रमें ९॥, ४॥, व $\frac{१}{८}$ इंच असून कडीचा व्यास ३॥ इंच आहे. पांच पत्र्यांपैकीं पहिल्या व पांचव्या पत्र्याच्या वरच्या बाजू अलिखित असून राहिलेल्या ८ बाजूंवर प्रत्येकीं सामान्यतः ९।९ ओळी आहेत. प्रत्येक ओळींत २५ ते ३० अक्षरें आहेत व एकंदर ओळी ७३॥ आहेत. कडीवर वराहाची मुद्रा असून तिजवरून ताम्रपट चालुक्य कुलांतील आहे हें स्पष्ट ठरतें.

अक्षरवटिका:- अक्षरांचें स्वरूप सामान्यतः ७ व्या शतकांतील चालुक्यांच्या इतर ताम्रपटशिलालेखांप्रमाणेंच आहे. अनुस्वार व विसर्ग प्रायः गळले आहेत. ऋ व र यांमधील फरक स्पष्ट सांगतां येण्यासारखा नाहीं. कित्येक

ठिकाणीं ळबद्दल रि तर कित्येक ठिकाणीं ळ घातला आहे. ऱ्हस्व व दीर्घ ई यांमधील फरक नेहमींच स्पष्ट झालेला नाहीं. तसेंच ए, ऐ आणि ओ, औ यांमधील फरकही व्यवस्त होणारा आहे. उ व ऊ यांमधील फरक मात्र स्पष्ट आहे. कांहीं ठिकाणीं अक्षरें खोदावयाचीं राहिलीं आहेत तर कांहीं ठिकाणीं जास्त अक्षरें खोदलीं आहेत. एके ठिकाणीं अक्षर खोदावयाचें राहिलें होतें. मागाहून आठवण झाली म्हणून दोन अक्षरांमध्यें वरच्या बाजूस काकपदवाचक अधिक चिन्ह केलें आहे; आणि अक्षर कोरलें आहे. एकंदरींत कोरणारा मनुष्य बराच अडाणी असावा असें दिसतें. ताम्रपट बहुतेक लागला आहे. ज्या ठिकाणीं अक्षरें वाचतां आलीं नाहींत त्या ठिकाणीं शंका प्रदर्शित केली आहे. ११२ ठिकाणीं अक्षरें स्पष्ट असून अर्थबोध मात्र होत नाहीं.

ताम्रपटांतील माहिती:— ६६४ च्या वर्षी उत्तरायणाच्या आरंभीं या ताम्रपटांत उल्लेखिलेलें दान दिलें. दान देणारा राजा विक्रमादित्य २ रा आहे, हें ताम्रपटांत आलेल्या खालील वंशावळीवरून दिसून येईल.

पुलकेशी—कीर्तिवर्मा—सत्याश्रय—विक्रमादित्य—विनयादित्य—विजयादित्य—विक्रमादित्य

अर्थात् हा विक्रमादित्य २ रा होय हें स्पष्ट आहे. ही वंशावळ वोक्केलरीचा कीर्तिवर्मा २ रा याच्या ताम्रशासनांत दिलेल्या वंशावळीशीं तंतोतंत जुळत आहे. दानकाळीं विक्रमादित्याच्या सैन्याचा तळ **आदित्यवाट** या गांवीं होता. आदित्यवाट म्हणजे हल्लींचें ऐतवडें. हें गांव सातारा जिल्ह्यांत वाळवें तालुक्यांत आहे. दान दिलेलें गांव **नरवण**. हल्लींहि या गांवास नरवणच म्हणतात. नरवण हें गांव चिपळूण तालुक्यांत समुद्रकांठीं आहे. ताम्रपटांत नरवण गांव **चिप्ररुलन** विषयांत आहे असें म्हटलें आहे. चिप्ररुलन म्हणजे हल्लींचें चिपळूण हें गांव होय. ताम्रपटांत सोत्ते नांवाची नदी व अंबाट नांवाचें गांव नरवणच्या शिवेवर असल्याचा उल्लेख आहे. पैकीं सोत्ते नदी म्हणजे नरवणच्या दक्षिणेस असलेली शास्त्री नदी असावी. अंबाट गांवाचा मात्र पत्ता लागला नाहीं. जवळच अवेड नांवाचें गांव आहे असें कळतें. ज्या ब्राह्मणांना दान दिलें त्यांपैकीं एकाचें नांव कौन्तल नारायण नन्न स्वामी असें आहे. कुन्तल म्हणजे कृष्णातुंगभद्रा ह्या नद्यांमधील प्रदेश; व कौन्तल म्हणजे तद्देशीय कोणी ब्राह्मण असावा. आइतवड्यापासून कुंडल फारसें लांब नाहीं. ज्या ब्राह्मणांना दान दिलें त्यांचीं नांवें—

(१) कौशिक गोत्र दुर्गनाग स्वामि पुत्र देग्गुलि स्वामि
(२) कौशिक गोत्र टोणस्वामी पुत्र नागडि दीक्षित
(३) कौन्तल नारायण नन्न स्वामि

(४) भूभुंस गोत्र धनंजय दुग्गु

(५) आत्रेय + + वत्सपुत्र देवुगो

दानपत्र राष्ट्रकूट शिवराजपुत्र गोविंदराज याच्या विनंतीवरून दिलें आहे. गोविंद शिवराज हा हल्लींच्या राष्ट्रकूटांच्या वंशावळींत सांपडत नाहीं. राष्ट्रकूटांनीं प्रस्तुत विक्रमाच्या मुलाच्या कारकीर्दींत चालुक्यांचें राज्य जिंकलें. तत्पूर्वी राष्ट्रकूट बरेच बलिष्ठ झाले असले पाहिजेत. व ह्याचें निदर्शक म्हणजेच गोविंद शिवराज याची शिफारस करण्याजोगी व ऐकली जाण्याजोगी सरदारकी होय.

पश्चिम चालुक्यांचे जे लेख प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, बदामीचे चालुक्य व कांचीचे पल्लव यांचें हाडवैर होतें व परस्परास साफ बुडविण्याचा प्रयत्न प्रत्येक जण करीत होता. विक्रमादित्याच्या सुद्धं बापानें आपल्या आजास व बापास अनुक्रमें दक्षिणेकडील व उत्तरेकडील लढायांत मदत केली होती. पैकीं विक्रमादित्याच्या वेळीं उत्तरेकडे लढाई चालू नव्हती. राज्यावर आल्याबरोबर विक्रमादित्यानें कांचीचा राजा नन्दिपोत वर्मा किंवा नान्दिवर्मा २ रा यावरोबर जोरानें लढाई सुरू केली; ती इतकी कीं, थोड्याच अवकाशांत विक्रमादित्य थेट कांचीस जाऊन थडकला व तें शहर पादाक्रान्तहि केलें. तो एवढेंच करून थांबला नाहीं. त्यानें दक्षिण समुद्रापर्यंतचा सर्व प्रदेश आक्रमून समुद्रावर जणूं कांहीं जयस्तंभच रोविला. कांची त्याच्या हस्तगत झाली होती; ही गोष्ट कांजीवरम् येथील राजसिंहेश्वराच्या देवळांतील शिलालेखावरून स्पष्ट होत आहे. हा लेख कानडी असून त्यांत शक नाहीं तरी त्यांत विक्रमादित्यानें कांची जिंकली व देवळाची सर्व मिळकत देवळास परत दिली असें स्पष्ट म्हटलें आहे. धारवाड जिल्ह्यांत लक्ष्मेश्वर येथें एक शंखबस्ति आहे. तेथें विक्रमादित्य २ रा याचा एक शिलालेख आहे. त्याचा शक ६५६ आहे. त्या लेखांत विक्रमादित्याच्या कोणत्याही पराक्रमाचा उल्लेख नाहीं. प्रस्तुत ताम्रपटांत कांचीवरील स्वारीचें विस्तृत वर्णन आहे. तेव्हां कांचीवरील ही स्वारी शक ६५६ ते ६६४ याच्या दरम्यान केव्हां तरी झाली असली पाहिजे. धारवाड जिल्ह्यांत पट्टदकल्लू येथील लोकेश्वराच्या देवळांतील शिलालेखांत विक्रमादित्यानें तीन वेळ कांची जिंकल्याचें सांगितलें आहे. पण ही गोष्ट घडली कीं नाहीं याविषयीं शंका आहे. कारण विक्रमादित्याच्या पश्चात् त्याचा मुलगा कीर्तिवर्मा याच्या वोक्केलिरीच्या दानपत्रांत बरोबर हीच प्रशस्ति आहे. एक अक्षरही अधिक नाहीं. यावरून कांचीवरील आणखी दोन स्वाऱ्या झाल्या नसाव्यात असें वाटतें. तसेंच

असेंहि दिसतें कीं ६६४ नंतर विक्रमादित्यानें विशेष पराक्रमाचें कृत्य केलें नाहीं.

+ताम्रपत्र पुढील प्रमाणेंः–

पत्रा १ ला बाजू १ ली

१ स्वस्ति जयत्याविष्कि(कृ)तं विष्णोर्वाराहं क्षोभिता

२ र्णवं दक्षिणोन्नतदंष्ट्राग्रं विश्रांतभुवन(नं) वपुः श्री

३ मतां सकलभुवनसंस्तूयमानमानव्यसगोत्राणा(णां)

४ हा(री)ति पुत्राणां सप्तलोकमात्रु(तृ)भि(भिः) सप्तमात्र(तृ)

५ भि क(र) भि वद्धि(र्द्धि)तानां कार्त्तिकेयपरिरक्षणप्राप्त

६ कल्याणं(ण) परंपराणा(णां) भगवान्नारायणप्रसा

७ दात्समासादि(त)वराह लांछनेक्षणक्षणवशीक्र(कृ)

८ ताशेषमहिभि(भृ)तानां च(चा)लुक्य(क्या)नां कुलमलंकरिष्णोर

पत्रा १ बाजू २

९ श्वमेधावभृथस्नानपवित्रीकृतगात्रस्य श्री पोलिकेशिवल्लभम

१० हाराजस्य सूनुः पराक्रमाक(क्रा)न्तवनवास्यादिपरनृपतिमण्डलप्र

११ णिबद्धविशुद्धकीर्ति(र्तिः) श्रि(श्री)कीर्त्तिवर्म्मः(र्मा)प्रि(पृ)थिविवल्लभ महाराजस्तस्यात्म

१२ ज(जः) समरसंसक्तसकलोत्तरापथेश्वरश्रीहरिषवर्धनपराजयो

१३ पात्तपरमेश्वरशब्दस्य सत्याश्रय श्रीपृथिविवल्लभ

१४ महाराजाधिराजपरमेश्वरस्य प्रियतनयस्य प्रज्ञातनयस्य

१५ खङ्गमात्रसहायस्य चित्रकण्ठाभिदा(धा)नप्रवरतुंग मेणै(नै)केणे(ने)

१६ वोत्चारिताशेषविजिगिषोरवनिपतित्रितयान्तरि(त) स्वगुरो(रोः)श्रिया(य)

१७ मात्मसात्क्र(त्कृ)त्य प्रभावात्कुलिशदलितपाण्डयचोडकेरळकळभ्रत

पत्रा २ बाजू ३

१८ प्रभि(भृ)ति भूभ्रद्भ्र(भृ) विभ्रमस्यानन्यनवनत–काश्चि(ञ्ची)पति म(मु)कुट

१९ चु(चुं)बित–पादा(दां)बुजस्य विक्रमादित्य–सत्याश्रय–श्रीपृथिवीवल्लभ

२० महाराजाधिराज–परमेश्वर–भट्टारकस्य प्रियसूनो(नोः) बाले

२१ न्दुशेखरस्य तारा(र)कारातिरिव दैत्यबलमतिसमुद्धतत्रैराज्यकाञ्चीप

२२ तिबलमवष्टभ्य करज(दी)क्र(कृ)त कमेर–पारसियक–सिंहळादि द्वि(द्वी)पाधिप

२३ स्य सकलोत्तरापथनाथमथनोप(पा)र्जितोर्जितपालिध्वजादिसमस्त

२४ पारमैश्वर्यचिन्हस्य विनय(या)दित्य–सत्याश्रय–श्रीपृथिवी [व]ल्लभ महा

---

१ अधिक पडला आहे, + ताम्रपट अत्यंत अशुद्ध असल्यामुळें बरीच दुरुस्ती सुचविली तरी कांहीं अशुद्धें राहिलीं आहेत.

२५ राजादि(धि)राज परमेश्वर भट्टारकस्य प्र(प्रि)यात्मज(जः)शैशव एवाधिगताशेषा
२६ स्त्रशास्त्र(स्त्रः) दक्षिणाशा विजयिनि पितामहे समुन्मूलितनिखिलकण्टक
२७ संहातिर(रु)त्तरापथ विजिगीषोगु(र्गु)रोरग्रत एवाहवव्यापारं(र) माच
२८ रन्नरातिगज घठा(टा)—पाठ(ट)न विशीर्यमाणकृपाणधारास्समयवि
२९ महाप्रेसर(रः) सत्साहसरसिक(कः) पराङ्मुखीकृतशत्रुमण्डलो गंगाय
३० मुन(ना) पालिध्वजपटडकामहाशब्दाचिन्हमाणिक्यमदगजादीन् पित्र(तृ)
३१ सात्कुर्वन्परैर्पलायमानैरासाद्य कथमपि विधिवशादानीतोपि
३२ प्रतापादेव विषयप्रकोपमराजकं(क) मुत्सारयम्वच्च(त्स)राज इवानपेक्षिता
३३ परसहायकस्तदवग्रहान्निर्गत्य स्वभुजावष्टम्भप्रसाधिताशेष
३४ विश्वम्भरः प्रभुरखण्डितशक्तित्रयत्वाच्छत्रुमदभंजनत्वादुदारत्व(त्वा)न्निरव
३५ द्यत्वाद्य(द्यः) समस्तभुवनाश्रय(यः) सकल पारमैश्वर्य व्यक्तिहेतुपालिध्वजा
३६ द्य(द्य)ज्वल प्राज्यराज्य(ज्यः) विजयादित्यसत्याश्रयश्रीप्र(पृ)थिविवल्लभमहारा
३७ जाधिराज परमेश्वरभट्टारकैकस्य प्रियपुत्रः सकलभुवनसाम्रा(म्रा)ज्यल

पत्रा ३ बाजू ५

३८ क्ष्मिस्वयंबवराभिषेकसमयानन्तरसमुपजातमहोत्साहा(ह आ) त्मवंशज
३९ पूर्वनृपतिजयापहारिण(णः) प्रकृत्यामित्रस्य पल्लवस्य समुन्मूलना
४० य क्रि(कृ)तमतेरतित्वरया [२]तुण्डकविषयं प्राप्याभिमुखागतन
४१ न्दिपोतवर्म्मि(र्मा)भिधान(नं) पल्लव(वं) रणमुखे संप्रहृत्य प्रपलायकतु
४२ मुलवादित्रसमुद्रघोषाभिधानवाद्यविशेष खट्वांगध्वज
४३ प्रमत्तप्रभूतप्रख्यातहस्तिवराश्वकिरणनिकाशानिराक्रि(कृ)ति(त)तिमिर
४४ माणिक्यराशिमनेकनिक पवहनीय (!) महाहेमराशिश्च हस्ते क्रि(कृ)त्य
४५ कुलधनकनिलयमतरिरवाश्चितर (!) काञ्चीयमानकाञ्चीविना
४६ श्य सतत प्रव्रि(वृ)त्तदानान्धि(नन्दि)त द्विजादीना(न)नाथा(थ)जन(नः)
[४]नरसिंघपोतवम्म(र्म)णा

पत्रा ४ बाजू ६

४७ निर्म्मितशिलामयराजसिंहेश्वरादिदेवकुलप्रभूतसुवर्णरा
४८ शिप्रत्यार्पणोपाजि(र्जि)तोजि(र्जि)त पुण्य(ण्यः) अनिवारितप्रतापप्रसभ
४९ प्रसाधित—पाण्ड्य—चोळ—केरळ—कळभ्रप्रभृतिराजन्यक(कः) क्षुभित
५० करिमकरनिहतिसितशुक्तमुक्ताफलप्रकरमरीचिवेलाकु
५१ लोत्घूर्णमानार्णवनिधानदक्षिणार्णव शरदमलश

---

१ अधिक पडला आहे. २ तोंडमंडल. ३ कांचीचा राजा नन्दीपोत वर्मा २ रा.
४ नरसिंहपोतवर्मा २ रा– काञ्चीचा राजा. ५ कांची येथील एक प्रसिद्ध देवालय.

५२ शि(श)धरविशदयशोराशिमयं जयस्तमं अतिष्ठिपाद्विक्रमा

५३ दित्यसत्याश्रय श्री प्रि(पृ)थिविवल्लभमहाराजाधिराजपरमेश्वर

५४ भट्टारकः सर्व(र्वा)नेवमाज्ञापयाति विदितमस्तु वो स्माभि(भिः)

पत्रा ४ बाजू ७

५५ चतुषष्ठयुत्तरषट्छतेषु शकवरुषे(र्षे)ष्वतीतेषु प्रवर्द्धमानविजयरा

५६ ज्य सांवत्सरेष्टमे(?) आदित्यवाटमधिवसति विजयस्कन्धावारे उत्तरायणकाले

५७ राष्ट्रकूट–शिवराजपुत्र–गोविंदराज्ञो विज्ञापनया **चिप्ररुलन**विषये

५८ समुद्रतीरे सोत्तेनयंबाटग्रामादिपरिवृतचतु(तुः)सिमान्त नरवण

५९ ग्रामं चिन्द्रमाळसहितं(?) कौशिकगोत्र दुर्ग्गनागस्वामिपु

६० त्रदेग्गुलिस्व(स्वा)मी कौशिकगोत्र टोणम्व(स्वा)मिपुत्र नागडि दिक्षितावेतौब्राह्म

६१ णौ चारिकौ भूत्वा आराधितौ ग्रामं देग्गुलि स्वामि नागडि दि(दी)क्षि(तः) क्रौन्तळ नारा

६२ यणनन्नस्व(स्वा)मि भूर्भुतगोत्रधनंजयदुग्गु आत्रेय बो+मावु वब्बपु त्रदेवु

६३ गोविंदिमावुण नानागोत्रसमयवेदवेदांगपारगब्राह्मणेभ्यो[ः]द(दं)

६४ अचाटभटप्रवेशाभ्यन्तरसिद्धिसहितं सभोगो(गं)दत्तं यत्किञ्चिदण्य(?)

पत्रा ५ बाजू ८

+६५ अंबाट ग्रामदेयं(च) रुह्णादिराजपुरुषेभ्यो ददाति तदवन्नरव

६६ णदेयं तदागामिविभि[१]रस्मद्व(द्वं)श्यैराजभि राजपुरैश्वर्यादीनां विलसितम

६७ चिरादाशुचश्चलमवगच्छद्भिराचंद्रार्कताराणामवस्थितिसमकालयश

६८ चिकिरिषुभि(कीर्षुभिः)स्वदत्तिनिवि(र्वि)शेषेण परिपालनीयमुक्तश्च भगवता वेद

६९ व्यासेन व्यासेन बहुभिर्वसुधाभुक्ता राजभिः सगरादिभिः य

७० स्य यस्य यदा भूमिः तस्य तस्य तदा फलं स्वदातुं सुमहत्

७१ छक्यं दुःखमन्यस्य पालनं दानं वा पालनं वेत्ति(ति) दानाछ्रेयोनुपालनं

७२ स्वदत्तां परदत्तां वा यो हरोति(त) वसुंधरां षष्टिंवरिष(र्ष)सहस्राणि

७३ विष्ठायां जायते क्रि(कृ)मिः इति महासन्धिविग्रह[क] श्री अति(ती)वाति पुण्यवल्लभेन

७४ लिखितोयं(तमिदं) शासनं०

भाषांतर—

वरील ताम्रपटाचें खालील भाषान्तर शब्दशः नसून अर्थशः आहे.

स्वस्ति। ज्यानें समुद्रास क्षुब्ध केलें व ज्याच्या उंच अशा उजव्या दाढेवर पृथ्वी विश्राम पावली; त्या (विष्णूच्या) वराहरूपाचा जय असो. ज्यांची सर्व जग

---

१ वि अधिक पडली आहे. + या ओळीचा अर्थ नीट लागत नाहीं.

स्तुती करीत आहे, जे मानव्य गोत्रांत व हारिती पासून जन्मले आहेत, सात लोकांच्या सात मातांनीं वाढविलेल्या कार्तिकेयानें रक्षण केल्यामुळें ज्यांस कल्याण-परंपरा प्राप्त झाली आहे; भगवान् नारायणाच्या प्रसादानें प्राप्त झालेल्या वराह चिन्हास पाहतांच ज्यास सर्व राजे तात्काल वश होतात; अशा चालुक्यांच्या कुलांत उत्पन्न झालेला व अश्वमेधांतीं अवभृथ स्नान करून ज्याचे सर्व अवयव शुद्ध झाले आहेत असा महाराज **पुलकेशी**

त्याचा मुलगा—स्वपराक्रमानें वनवासी वगैरे ठिकाणच्या राजांना जेर केल्या-मुळें ज्यास विमल कीर्ति प्राप्त झाली आहे असा—पृथ्वीपति महाराज **कीर्तीवर्मा**

त्याचा मुलगा— अखिल उत्तर हिंदुस्थानचा राजा व युद्धप्रिय अशा हर्ष-वर्धनाचा पराजय करून ज्यानें परमेश्वर हें बिरुद मिळविलें आहे असा—महाराजा-धिराज परमेश्वर पृथ्वीपति **सत्याश्रय**

त्याचा मुलगा— नीति जाणणारा, केवळ तरवाररूपी मित्रच असणारा, चित्रकण्ठ नांवाच्या उत्कृष्ट घोड्यावर बसून ज्यानें एकट्यानेंच तीन राजांनीं पळविलेली आपल्या बापाची लक्ष्मी परत आणिली, आपल्या वज्रप्राय प्रभावानें ज्यानें पांड्य, चोल, केरळ, कळभ्र इत्यादि राजांना बुडवून दुर्दम अशा कांची-पतीसही आपल्या पायाशीं लोळण घ्यावयास लाविलें असा— सत्याश्रय, श्री पृथिविवल्लभ महाराजाधिराज, परमेश्वर भट्टारक **विक्रमादित्य**

त्याचा लाडका मुलगा—शंकरपुत्र कार्तिकेय यानें ज्याप्रमाणें दैत्यसेनेस कोंडलें, त्याप्रमाणें ज्यानें तीन राज्यांचा मालक जो कांचीपति त्यास अटकाव केला, ज्यानें कमेर, पारसियक, व सिंहलादि बेटें येथील राजांस करभार द्यावयास लाविलें; अखिल उत्तर हिंदुस्थानच्या राजास तुडवून ज्यानें पालिध्वजादि सर्व पार-मैश्वर्य चिन्हें मिळविलीं, असा—सत्याश्रय, पृथिविवल्लभ महाराजाधिराज परमेश्वर भट्टारक **विनयादित्य**—त्याचा प्रिय पुत्र ज्यानें बालपणींच सर्व अस्त्रविद्या संपविली, आपल्या आजानें जिंकलेल्या दक्षिण देशांतील कांटे ज्यानें पार उपटून टाकिले आहेत; उत्तर हिंदुस्थान जिंकणाऱ्या आपल्या पित्याच्या समक्ष ज्यानें युद्धकौशल्य दाखविण्यास सुरुवात केली आहे; शत्रुसमुदायरूपी हत्तींचीं गंडस्थळें फोडून फोडून ज्याची तलवार बोथट बनली आहे, जो लढाईंत नेहमीं पुढें, ज्यास चांगल्या साहसाची गोडी आहे, ज्यानें शत्रुसमुदायास पळवून लाविलें; गंगा, यमुना, पालि-ध्वज, नगारे, निशाणें, हीं पित्याच्या स्वाधीन करीत असतां दुर्दैवानें जो पळणाऱ्या शत्रूंच्या कैदेंत पडला, आणि तशा स्थितींतहि ज्यानें आपल्या प्रभावानें बंडाळी मोडली व जो दुसऱ्याच्या सहाय्याची अपेक्षा न करितांच वत्सराज उदयनाप्रमाणें शत्रूच्या कैदेंतून सुटला व स्वतःच्या आगमनानें ज्यानें सर्व जगास शांत केलें; अखंडित तीन्ही शक्तींनीं युक्त असल्यानें, शत्रूमदाचें खंडन केल्यानें, उदारपणामुळें व चांगुल-

पणामुळें जो सर्व जगाचा आश्रय बनला; आणि पालिध्वजादि चिन्हें ज्याचें सार्वभौमत्व व्यक्त करितात; असा–सत्याश्रय श्रीपृथि० महारा० परमे० भट्टा० **विजयादित्य**

त्याचा प्रिय पुत्र— साम्राज्यलक्ष्मीनें स्वतः वरल्यानें ज्याच्या ठिकाणीं महोत्साह उत्पन्न झाला आहे; आपल्या पूर्वजांच्या यशाचा अपहार करणाऱ्या व स्वभावतःच शत्रुभूत अशा पल्लवांना उखडण्याचा ज्यानें निश्चय केला आहे; मोठ्या वेगानें तुण्डक विषयांत जाऊन समोर आलेल्या नंदिपोतवर्मापल्लव यांवर रणयज्ञांत प्रहार करून पळणाऱ्या लोकांपासून ज्यानें विविध वाद्यें व समुद्रघोष नांवाचें विशिष्ट वाद्य, खट्वांगध्वज, प्रमत्त असे शेकडों उत्तम हत्ती, घोडे, अंधाराचा नायनाट करणारे मणिराशि व सोनें वगैरे हिसकावून घेतलें; कुलरिपूची राजधानी जी कांची तिचा नाश न करतां ज्यानें नेहमींच्या दानांनीं द्विज, दीन, अनाथ, यांस आनंदित केलें आहे; नरसिंहपोतवर्म्यानें बांधविलेल्या राजसिंहेश्वरादि देवळांस पुष्कळ सोनें अर्पण केल्यानें ज्यानें पुण्य जोडिलें आहे; ज्यानें आपल्या अनिवार प्रतापानें पांड्य, चोळ, केरळ, कळभ्र इत्यादींचें दमन केलें आहे; व दक्षिण समुद्रावर ज्यानें शरच्चंद्राप्रमाणें विमल यशाचा जणू जयस्तंभच रोविला; असा– सत्या० श्रीपृथ्वीव० महाराजा० परमे० भट्टा० **विक्रमादित्य** सर्वांना आज्ञा करितोः– तुम्हीं जाणावें कीं, ६०० वर ६४ शक वर्षें संपलीं असतां, वाढत्या व विजयी राज्याचें ८ वें वर्ष सुरू असतां, ऐतवडें गांवीं सैन्याचा तळ पडला असतां, उत्तरायण कालीं, राष्ट्रकूट शिवराज पुत्र गोविंदराज[1] याच्या विनंतीवरून चिपळूण परगण्यांतील, समुद्रतीरीं असलेलें, सोत्ते नदी व अंबाड गांव इत्यादि चतुःसीमांनीं परिवृत असें नरवण गांव शेजारील माळासह कौशिक गोत्री दुर्गनाग स्वामि पुत्र देग्गुलिस्वामि, कौशिक गोत्री टोण स्वामिपुत्र नागडि दीक्षित, कुंतलदेशीय नारायणनन्न स्वामि, भूभूर्स गोत्र धनंजय दुग्गु, आत्रेय + + + वत्सपुत्र देवुगो (!) नाना गोत्रांनीं युक्त वेदवेदांगपारग अशा ब्राम्हणांना अष्टाधिकारांसह दिलें आहे. तेव्हां आमच्या वंशांतील भावी राजांनीं व राजपुरुषांनीं, लक्ष्मीची चंचलता ध्यानांत आणून आचंद्रार्क यश इच्छिणाऱ्यांनीं हें दान जणूं स्वतः दिलेलें दानच असें समजून दानाचें पालन करावें. भगवान् वेदव्यास व्यासांनीं म्हटलेंच आहे कीं,(१) ही पृथ्वी पुष्कळांनीं उपभोगिली आहे. ज्या वेळीं ज्याकडे ही असते त्या वेळीं त्यास तिचें फल मिळतें. (२) स्वतः दान करणें फार सोपें; दुसऱ्यानें दिलेलें पालन करणें फार कठीण. दान व पालन यांमध्यें दानापेक्षां दानाचें पालन श्रेयस्कर (३) स्वतः किंवा दुसऱ्यानें दिलेली जमीन जो हरण करतो तो ६० हजार वर्षें विष्ठेंत किडा होऊन राहतो. महासांधि विग्रहक अशा पुण्यवलभानें हें शासन लिहिलें.

---

१ ह्या संबंधीं प्रो. अ. स. अळतेकर म्हणाले कीं, ह्या उल्लेखावरून राष्ट्रकूट हे उत्तर कर्नाटकांत होते, ही गोष्ट येथें नवीन लक्ष्यांत येते.

Digitized by Google	Original from UNIVERSITY OF MICHIGAN

३ राक्षसतंगडीच्या रणांगणाचा स्थलनिर्णय.

(ले.—ना. श्री. राजपुरोहित, धारवाड.)

विजयनगरचें साम्राज्य ज्या लढाईनें नष्टप्राय झालें त्या लढाईचें स्थळ तालिकोट नसून राक्षसतागडी हें आहे वगैरे माहिती एका जुन्या बखरीच्या आधारें धुळ्याचे के.रा.चांदोरकर यांनीं या मंडळापुढें शके १८३६ मध्यें संमेलनप्रसंगीं निबंधरूपानें सांगितली होती. आणि हें नांव कसें अन्वर्थक आहे व त्याचा ठावठिकाण काय इत्यादि विषयाचें विवेचन के. पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांनीं श. १८४५ मध्यें मंडळापुढें मांडलें व त्यांचा निबंध मंडळाच्या चौथ्या वर्षाच्या त्रैमासिकांत छापला आहे. याशिवाय ज्योतिर्विद् त्र्यं. बा. केतकर यांनीं यासंबंधीचा आपला अभिप्राय इ. १९२७ एप्रिलच्या चित्रमयजगतच्या अंकांत लोकांपुढें ठेवला आहे. परंतु ज्या बखरीच्या आधारावर या विवेचनाची मांडणी करण्यांत आली आहे, ती मराठी बखर त्रुटित आहे व त्या बखरीवरून स्थलनिर्णय करतांना के. श्री. पटवर्धन यांनीं रक्कसगी अगर तंगडगी हे गांव प्रत्यक्ष पाहिले नाहींत; आणि रा. केतकर यांनीं स्थूलमानानें हे गांव पाहिले तरी बखरींतील मजकुराचें मनन करून प्रत्यक्ष रणभूमि कोठें होती याचा निर्णय त्या स्थळाच्या आसपास हिंडून केलेला दिसत नाहीं. यामुळें माझ्या मतें या रणसंग्रामाविषयींच्या त्यांच्या विवेचनांत कांहीं महत्वाच्या चुका राहिल्या आहेत. बखरीच्या त्रुटितपणाचा दोष काढून टाकण्याचें काम म्हैसूरच्या कर्नाटक- ग्रंथमालेनें केलें आहे. कारण त्यांना या बखरीची संपूर्ण प्रत कानडी भाषेंत लिहिलेली सांपडली व ती त्यांनीं इ. स. १९२२ मध्यें छापली आहे. आणि ती हातीं घेऊन मीं या रणभूमीचा ठावठिकाण लावण्यासाठीं रक्कसगी, तंगडी व त्या आसपासचा प्रदेश हिंडून पाहिला; त्या ठिकाणच्या लोकांना विचारून माहिती मिळविली व शिलालेखादि साधनेंहि तपासून पाहिलीं आहेत. त्यावरून या संबंधीं माझ्या मतें होणारा निर्णय आज आपल्यापुढें मांडीत आहें.

वादग्रस्त मुद्दे पुढें मांडण्यापूर्वी या बखरींतील मजकुराचें तात्पर्य थोडक्यांत सांगितलें पाहिजे. मराठी प्रतीचा प्रारंभीचा भाग नष्ट झाला असल्यामुळें तिच्या सहायानें बखरीचें नांव अगर या युद्धाच्या बनावाचा पूर्वेतिहास लक्षांत येत नाहीं. या बखरीचें नांव 'रामरायन बखैरू' म्हणजे रामरायाची बखर असें असून ती रायाजी तिरुमल हरिकारे यानें लिहिली. ' आणि आपण कर्नाटक देशाधिपती रामराज याच्या पदरीं होतों ' असें हा लेखक प्रारंभीच्या वाक्यांत सांगतो. यानंतर या युद्धाचें कारण

Google Original from

सांगतांना या बखरकारानें दिलेली हकीकत अशी आहे:— विजापूरच्या अल्ली आदिलशहाचा एक महालदार कांहीं महत्वाचीं पत्रें घेऊन विजयनगरच्या रामराजाच्या भेटीसाठीं म्हणून गेला. त्याप्रमाणें दरबारांत भेट होऊन त्याच्याशीं बोलणें चालणें सुरू झालें. इतक्यांत कांहीं डोंबारी तेथें आले, व त्यांचा खेळ पाहण्यांत कांहीं तास गेले; शेवटीं त्यांना पानसुपारी देण्यांत आल्यावर त्यांनीं 'आम्हांस कांहीं डुकरें द्यावीं' अशी विनंति केली. व त्याप्रमाणें त्यांना १० उत्तम ग्रामसूकरें समक्ष देवविलीं. त्या वेळीं विजापूरचा महालदार तेथें बसला होता, त्यानें हा प्रकार पाहून "हिंदु लोक हे घाणेरडे प्राणी कसे खातात' असे उद्गार काढले. त्यावर नरपतींनीं "मुसलमान कोंबडी खातात म्हणजे ते मल भक्षण करतात" असें म्हटलें. तेव्हां महालदार पुनः म्हणाला "तुम्ही घाणेरडे प्राणी खाणारे हीन जातीचे लोक आहां." हें ऐकून नरपतींना फारच राग आला व त्यांनीं गांवांतील पुष्कळ डुकरें एका मोठ्या इमारतींत कोंडून त्यांना भरपूर जोंधळे खावयास घातले; तेव्हां रात्रभर त्या डुकरांनीं तेथें मलविसर्जन केलें. त्यांत जोंधळ्यांचे दाणे पडले. त्यानंतर सकाळीं त्या ठिकाणीं कांहीं कोंबडीं आणून सोडिलीं व तीं मलांतले जोंधळ्याचे दाणे टिपून खाऊ लागलीं. अशा वेळीं महालदारास हा दखावा दाखवून नरपती म्हणाले; "आम्ही डुकरें खातों. पण या डुकराच्या विष्ठेतील धान्य खाऊन उपजीविका करणारीं कोंबडीं तुम्ही खातां. अशा स्थितींत कोणाची जात मोठी?" हा प्रश्न ऐकून महालदारास फार वाईट वाटलें व तो तेथून निघून जाण्याच्या विचारास लागला. पण नरपतींनीं त्याचें समाधान करून तसलीम देऊन बसविलें; व निरोप दिला.

यानंतर महालदार विजापुरास अल्ली अदिलशहाकडे गेला; तेव्हां त्यानें डोक्यांचें पागोटें काढून गळ्या भोंवतीं गुंडाळलें व हुजुरास अर्ज केला कीं "आज मुसलमानी बादशाही बुडाली, नरपतींनीं मुसलमानी धर्माचा अपमान केला आहे व सर्व कर्नाटक हस्तगत केला आहे. याकरितां त्यांच्यावर स्वारी करून त्यांचा बंदोबस्त केला पाहिजे." परंतु अल्ली आदिलशहा त्या महालदाराला म्हणाला "मी नरपतींचा मुलगा म्हणवितों; तेव्हां त्यांच्यावर हात टाकणें हें योग्य नाहीं." हें ऐकून महालदार रागाऊन तेथून बादशहास न विचारतां निघाला आणि जहलनापुरास गेला. तेथें मेजवानीसाठीं जलालुद्दीन अकबर, कुतुबशहा व निजामुलमुल्क हे तिघे एकत्र जमले होते. त्या ठिकाणीं या महालदारानें आपली तक्रार मांडली. तेव्हां ते म्हणाले "तूं आदिलशहाचा नोकर असून त्याला न विचारतां आमच्याकडे कां आलास?" महालदार म्हणाला "मीं ही गोष्ट आदिलशहापुढें सांगितली. परंतु त्याचें म्हणणें असें आहे कीं, मी नरपतींचा मुलगा आहें; त्याअर्थीं मला त्याच्या विरुद्ध जातां येत नाहीं;

Digitized by Google Original from

याकरितां मी तुमच्याकडे दाद मागण्यासाठीं आलों आहें." हें ऐकून तीनहि बादशहा कोपाविष्ट होऊन त्यांनीं कर्नाटकावर स्वारी करण्याचा निश्चय केला. तिघांनींहि आपल्या अष्टप्रधानांना व सेनानायकांना सैन्याची तयारी करण्याविषयीं हुकूम दिला. राजभुवराचा हेजीब तिमाजी भिमाजी हा जालनापुरास होता. त्यानें तीनही बादशहांचीं सैन्यें कर्नाटकावर चालून येत आहेत असें पत्र लिहून जासुदाकडुन नरपतीकडे कळविलें. तेव्हां नरपतींनीं विजयादशमीच्या दिवशीं मनोहरवनांतरांत सदर तयार करवून सर्व वजीर व अष्टप्रधान, दळवाई वगैरे ७२ नियोगी (!) व सर्व मांडलीक यांना बोलावून युद्धाची तयारी करण्यास सांगितलें व शत्रूशीं शौर्यानें लढण्यास प्रोत्साहन दिलें.

विजयनगर येथें चाललेली तयारी तिघां बादशहांस कळतांच त्यांनीं आदिलशहाकडे निरोप पाठविला कीं "आम्हीं तिघे विजयनगरच्या राज्यावर मुलुखगिरि करण्यासाठीं निघालों आहों. तरी तुमच्या मुलखांतून सैन्यासह जाण्यास आम्हांस वाट द्यावी. आपण सर्वांनीं मिळून कर्नाटकावर स्वारी केली पाहिजे." हेजिबामार्फत आदिलशहानें कळविलें कीं "राजभुवर हा मला वडिलाप्रमाणें आहे. म्हणून मला स्वामिद्रोह करतां येत नाहीं." ही बातमी विजयनगरच्या नरपतीस विजापूरच्या बातमीदारानें कळविली, तेव्हां नरपतीनें आदिलशहाच्या सन्मानार्थ सेनापति बिसलपनायक याच्या हस्तें बहुमानाचीं वस्त्रें, मोत्याचा तुरा आणि कडग कंठमाळा व घोडीं वगैरे पाठविलीं. तो सत्कार आदिलशहानें आनंदानें स्वीकारला.

यानंतर चारहि मुसलमानी सैन्यें चालून आलीं व शेवटीं रामराजा आदिलशहाच्या हस्तें मारला गेला, वगैरे हकीकत मराठी बखरींतहि आहे तेव्हां त्या भागाचा सारांश येथें देण्याचें कारण नाहीं.

आतां प्रस्तुत विषयासंबंधीं निरनिराळ्या इतिहासज्ञांनीं व्यक्त केलेल्या अभिप्रायांचें परीक्षण करूं.

१ फेरिस्ताः—कृष्णानदीच्या दक्षिणेस १२ मैलांवर हुकेरी नदीच्या आसपास हें युद्ध झालें असलें पाहिजे.

२ सीवेलः—थेट इंगळगीहून मुदगळला जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या बयापूर अथवा भोगापूर या नांवाच्या लहानशा खेड्याच्या आसपास असलेल्या मैदानावर हें निर्वाणीचें युद्ध झालें असावें असें वाटतें. (सीवेलकृत Forgotten Empire पा. १९९–२००)

३ पांडुरंग नरसिंह पटवर्धनः—

यांच्या मतें 'रक्कसगी' व 'तंगडगी' अशीं दोन गांवें मिळून 'राक्षस तांगडी' असा अपभ्रंश निर्माण झाला व नक्की लढाई 'रक्कसगी–तंगडगी' येथें झाली असावी.'

४ केतकरः— रक्कसगी, (कृष्णेच्या उत्तरेकडील) तंगडगी व नालत्वाड हीं तीन स्थळें जोडून एक त्रिकोण काढला तर त्यांमध्यें राक्षसतंगडीच्या समरभूमीचा समावेश होतो. (अ) या त्रिकोणांतील तंगडगी गांवाजवळ अल्ली आदिलशहा व वऱ्हाडाचा इमामुल्मुल्क यांचे तळ पडले होते. (आ) नालत्वाडाजवळ अहमदनगरचा निजामशाहा व तैलंगणाचा कुतुबशाहा व जालनाचा जलालुद्दीन यांचे तळ पडले होते. (इ) खुद्द रामराजा व त्याचें सैन्य रक्कसगीच्या आसपास उतरलें होतें. प्रथम लढाईस तोंड लागलें तें रक्कसगी व नालत्वाड यांच्या दरम्यान लागलें. तेथें दुपारपर्यंत एकसारखें घोर युद्ध होऊन कर्नाटकी व मुसलमानी हीं उभय सैन्यें हतवीर्य होऊन आपापल्या गोटाला परतलीं. वगैरे.

वरील अभिप्रायांत सर्व साधारण मुख्य दोष म्हटला म्हणजे प्रत्यक्ष रणभूमी डोळ्यांनीं न पाहतां निवळ तार्किक पद्धतीनें स्थळनिश्चय करण्याचा प्रयत्न केला आहे, हा होय. दुसरा दोष उपरिनिर्दिष्ट विद्वानांपैकीं ज्यांनीं हरकारे यांच्या बखरीचा उपयोग केला आहे (नं. ३ व ४) त्यांनीं ती बखर काळजीपूर्वक वाचण्याची तसदी घेतलेली नाहीं. आतां वरील अभिप्रायांचा अनुक्रमवार विचार करूं:—

१ बखरींत कृष्णेच्या उत्तर तीरावर तंगडगी व नालत्वाड यांचे दरम्यान ही लढाई झाली असा स्पष्ट उल्लेख असल्यामुळें ती कृष्णेच्या दक्षिणेस झाली असली पाहिजे हें फेरिस्ताचें मत मुळांतच चुकीचें ठरतें. लढाईनंतर २०–२५ वर्षांनीं फेरिस्तानें हिंदुस्थानांत येऊन इतिहासलेखन पत्करल्यामुळें त्याचे मतास समकालीन लेखक हरकारे यांच्याइतकें महत्व मुळींच देतां येत नाहीं.

२ सदर साहेबमजकुरांना बखर पाहण्याची संधी न मिळाल्यामुळें त्यांना निवळ निराधार तर्कावर अवलंबून रहावें लागलें आहे. अर्थातच त्यांचा अभिप्राय चुकीचा आहे.

३ राक्षसतंगडी हा शब्द ‘ रक्कसगी ’ व ‘तंगडगी’ या जोड शब्दांचा अपभ्रंश आहे हें मत संपूर्ण चुकीचें आहे. कै. रा. पांडोबा पटवर्धनांनीं म्हटल्याप्रमाणें दोन गांवें सांगण्याचा बखरकारांचा उद्देश असता तर त्यांनीं अनेकवचनी प्रयोग केला असता अगर ‘ रक्कसगी ’ व ‘ तंगडी ’ यांच्या दरम्यान असा शब्दप्रयोग केला असता. या बखरकारानें इतरत्र दोन गांवांचा उल्लेख करण्याचा प्रसंग पडल्यावेळीं ‘ दरम्यान ’ हा शब्द घालून खुलासा केलेला आढळतो. राक्षसतंगडीहून पांच कोसांवर असलेल्या नालतवाड गांवीं मुसलमानी सैन्य उतरलें होतें, असा उल्लेख बखरींत आहे आणि रक्कसगी गांवापासून नालतवाडगांव अवघे चार मैल आहे. त्यामुळें रक्कसगींवर रामराजाचें सैन्य उतरलें होतें असें मानणें बखरीशीं

विसंगत होईल. तेव्हां रामराजाच्या सैन्याचा तळ तंगडगीवरच होता असें सिद्ध होतें. कारण तंगडगी हा गांव नालतवाडपासून पांच कोसांवर आहे या तंगडगीला राक्षस-तंगडी कां म्हणतात हें खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. 'राक्षसभुवनासारखें राक्षस-तंगडी हें नांव आहे. उच्चारसौकर्यार्थ अहमदनगरचें 'नगर' हें जसें संक्षिप्तरूप तसें राक्षसतंगडी याचें 'तंगडी' हें समजावें.

४ यांनीं तर सगळाच घोटाळा केला आहे. 'तंगडगीस अली आदिलशहा' उतरला वगैरे विधानें केवळ स्वकपोलकल्पित आहेत. बखरींत अली आदिलशहा जमालपूर येथें उतरला होता असा स्पष्ट उल्लेख आहे. आपल्या विधानांस या विद्वानांनीं आधार कोठून काढला कोण जाणें!

सध्यांच्या विजापूर जिल्ह्यांतील मुद्देबिहाळ व हुनगुंद या तालुक्यांचा अनुक्रमें दक्षिण व उत्तर भाग हा लक्षांत आणावा. कृष्णानदी या दोन्ही तालुक्यांच्या सरहद्दीवरून वाहते. कृष्णा व मलप्रभा यांच्या संगमासच 'कूडलकप्पडी संगम' संक्षिप्त 'संगम' या नांवाचें गांव आहे. तेथून ईशान्येस सुमारें १ मैलावर कृष्णेच्या उत्तर तीरावर तंगडगी हें गांव आहे. कृष्णेच्या दक्षिणेस धनुर गांव असून तंगडगीहून दक्षिणेस (हुनगुंद तालुका) ८ मैलांवर रक्कसगी हें गांव लागतें. याच नांवाचें दुसरें गांव तंगडगीहून कृष्णातीरानें पूर्वेस गेलें असतां ७–८ मैलांवर लागतें. रक्कसगी या नांवाचीं दोन निरनिराळीं गांवें आहेत ही गोष्ट लक्ष्यांत ठेवावी. रक्कसगीहून ३–४ मैलांच्या अंतरावर व तंगडगीहून १२–१३ मैलांवर नालत्तवाड हें गांव लागतें. तंगडगीहून ईशान्येस ५–६ मैलांवर नालतवाड हें गांव लागतें. तंगडगीहून ईशान्येस ५–६ मैलांवर 'रायबाग' नांवाचें एक स्थळ लागतें. युद्धस्थळाच्या निर्णयासंबंधीं हीं एवढीं स्थानें नीट लक्ष्यांत ठेविलीं पाहिजेत.

माझ्या मतें राक्षसतंगडी या नांवाचा एकच गांव असून तो सध्यां 'तंग-डगी' या नांवानें संबोधिला जाणारा गांव असला पाहिजे. बखरींत राक्षस-तंगडीहून ५ कोशांवर नालतवाडच्या आसपास मुसलमानी सैन्य उतरलें होतें म्हणून जो उल्लेख आहे त्याशीं वरील विधान तंतोतंत जुळतें. तंगडगी व नालत्वाड यांच्या दरम्यान युद्ध झालें असलें पाहिजे व हिंदू सैन्य तंगडगीवरच उतरल्यामुळें या लढा-ईस राक्षसतंगडगीची लढाई हें नांव आलें असलें पाहिजे. या गांवास हल्लीं नुसतें 'तंगडगी' असें नांव आहे; पण याचाच उल्लेख बखरींत 'राक्षस तागडी' या शब्दानें केला आहे. पण हें जोड नांव कां रूढ होतें याविषयीं अनेक तर्क संभवतात. दुसरें एक तंगडी गांव अथणी तालुक्यांत आहे. त्यापासून व्यावृत्ती दाखविण्यासाठीं हा शब्द जोडला असेल किंवा हें महायुद्ध होऊन हिंदूंचा नाश झाला म्हणून त्याला राक्षस म्हटलें असेल.

Google Original from

परवां समक्ष रणभूमीच्या निरीक्षणानंतर वरील विधानास विशेष पुष्टी मिळाली आहे ती अशी.

रणभूमीचीं अवशिष्ट चिन्हें या गांवाच्या जवळील मैदानांत वर म्हटल्याप्रमाणें जशीं (नालत्वाडाभिमुख चाललें असतां) बरींच दिसून येतात; तसेंच बखरींतील एका वाक्याचा येथें अवश्य उल्लेख करावासा वाटतो. " राजभुवरानें आपण येऊन राक्षसतागडीनजीक उतरलें. रणथावा (रणस्तंभ) चौधार (चौथरे) राक्षस तागडीचे मैदानांमध्यें घातले. " बखरींत युद्धास तोंड ' रायबागा ' नजीक लागला असा उल्लेख आहे. (यामध्यें त्यामध्यें रायबागानजीक रोज रोज झगडा होऊं लागला.) शोधाअंतीं तंगडगीहून ईशान्येस ६ मैलांवर (कानडी लिपींत) 'रायन तोट' म्हणजे रायाची बाग नांवाचें एक उद्यान लागलें. तेंच वरील जागा असावी. येथें एका वीरपुरुषाचें स्मारक आढळतें.

रणस्तंभ— तंगडगीच्या मैदानांत पूर्वदिशेकडे दोन रणस्तंभ मला आढळले. या दोहींवरही गाय व वासरूं आणि तलवार यांचीं उठावाचीं चित्रें कोरलीं आहेत. रणांगणांत देह ठेवणाऱ्या वीरांचें स्मारक म्हणून स्तंभ उभारण्याची चाल कर्नाटकांत होती व अशा प्रकारचे अनेक ' वीरगल्ल ' (वीरांच्या स्मरणार्थ शिला) आजहि कर्नाटकांत ठिकठिकाणीं आढळतात. त्यावर कोरलेल्या लेखांत शत्रूचा पराभव करून गाई परत आणल्याचा उल्लेख आहे. यावरून गोग्रहण हें युद्धास आव्हान होतें व गाय सोडवून आणणें म्हणजे शत्रूवर जय मिळविणें असा संकेत असल्याचें ठरतें. महाभारतांत उत्तर व दक्षिण गोग्रहण यांची कथा प्रसिद्धच आहे. अश्वमेधप्रसंगीं घोडा धरून नेणें म्हणजे युद्धाचें आव्हान स्वीकारणें असा संकेत होता. त्यासारखा हा गाय धरण्याचा व सोडविण्याचा संकेत असावा. विजयनगरच्या साम्राज्याचें ध्येय ' गोदेवद्विजरक्षार्थ ' हें असल्याचा उल्लेख शृंगेरीच्या शिलालेखांत आहे. यावरूनहि रणस्तंभावर गाईची प्रतिमा कां कोरली याचा उलगडा होण्याजोगा आहे. आपल्या बखरींतहि ' रणथाबा ' असें मराठी प्रतींत व रणस्तंभ असें कानडी प्रतींत तंगडगीच्या मैदानांत उभारल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. याप्रमाणें तंगडगीच्या मैदानांत गांवापासून तीन मैलांवर हे रणस्तंभ आहेत. यावरून विजयनगरचें सैन्य उतरल्याची व प्रत्यक्ष युद्धाची हीच जागा असल्याचें निश्चित होतें. तंगडगीच्या दक्षिणेस गांवालगत तीन एकरांच्या प्रदेशांत भस्मराशी आहे. तेथें परशुरामाचा यज्ञ झाला व त्यावेळचें हें भस्म आहे असें समजून तिकडील स्मार्त ब्राह्मण हें भस्म लावतात. परशुराम व क्षत्रियांचा संहार या कल्पना निगडित आहेत व राक्षसतंगडगीच्या युद्धांत लढणाऱ्या हजारों क्षत्रियांचा संहार झाला यामुळें यास परशुरामाच्या यज्ञाचें नांव पडलें

असावें. देवगिरीचा यादव जैत्रपाल (११९१—१२१०) याच्या वर्णनांत रु रभूमि ही पुण्यभूमि समजून यज्ञकंकण बांधलें आणि त्यांत प्रतापाग्नि सिद्ध करून त्यांत शस्त्रें दर्भ करून अनेक राजांची आहुती देऊन नरमेध समाप्त केला असें म्हटलें आहे. तीच कल्पना परशुरामाचा यज्ञ म्हणजे रणक्षेत्र हें ठरविण्यास उपयोगी पडणार आहे. सुद्ध तंगडगी गांवास 'रुद्रभूमी' हें भयंकर नांव प्रचारांत आहे. जेथें अखिल हिंदभूस ललामभूत असणाऱ्या हिंदवी साम्राज्याची राखरांगोळी झाली त्या स्थळास हें नांव अन्वर्थकच पडलें असावें असा तर्क काढल्यास गैर नाहीं.

वरील आधारांमुळें हें युद्ध तंगडगी नालत्वाड यांच्या दरम्यान कृष्णेच्या उत्तरतीरावर झालें, असें माझें निश्चित मत झालें आहे.

---

४ कान्होजी जेधे यांचे चिरंजीव बाजी नाईक जेधे यांची श. १५५० मधील जन्मपत्रिका.

(ले.– ज. स. करंदीकर.)

"him Asadkhani, had become collected (and were with me). "Some friends of mine asked me to put the loose sheets "in order and compile them into a book. At first I avoided "it as being useless; but later on I agreed to do so. Be-"fore I could revise the work thus compiled, a few copies "were made and circulated. Thereafter I revised it and "removed those passages which appeared to be fit for "omission, made such additions as seemed to be desirable "and abridged some matter from Ferishta and Khafikhan." His sources therefore according to his own statement appear to be those loose and disordered sheets written as rough drafts by Shaikh Abul Hasan and Ibrahim Khan Asadkhani, and here and there Ferishta, Khafikhan etc.

Google Original from

९ दादाजी कोंडदेवाची मृत्युतिथि

(ले.- वि. वि. काळे एम्. ए.)

दादाजी कोंडदेव ह्या महत्त्वाच्या व्यक्तीचें चरित्र उपलब्ध होण्याचे दृष्टीनें त्याचा जन्म-दिवस व मृत्यूचा दिवस माहीत असणें इतिहासज्ञांना अत्यंत महत्त्वाचें वाटतें. त्यांतून शिवजन्मशकाचा अंदाज लागावा अशा तऱ्हेचें सापेक्ष महत्त्व दादाजीचे मृत्युतिथीला आलेलें असल्यामुळें तर बखरींचे अभ्यासकांना व शिवाजीच्या नव्या व जुन्या जन्मतिथींचे अभिमान्यांना दादाजीची मृत्युतिथि निश्चित करणें अधिक आवश्यक होऊन बसलें आहे. तपशीलवार तीथ उपलब्ध नाहीं, दादाजी कोंडदेवाचे नांवाचा अधिकृत उल्लेख अमुक तिथीचे पत्रांतच मृत्युतिथीचे अगदीं थोडया अंतरानें येतो असें अवांतर पुराव्यावरून म्हणतां येतें; अर्थात् उपलब्ध असलेली तिथी ही पत्राची मिती असून ती खरी मृत्युतिथि नव्हे इत्यादि माहिती, मंडळाचे बुद्धिमान् सदस्यांना आधींच पूर्णत्वानें ज्ञात आहे; तरी चर्चेकरतां आणि दूरचे अभ्यासकांचे नजरेस ह्या गोष्टी याव्या म्हणून येथें तीहि माहिती संकलित केली आहे.

भा. इ. सं. मंडळाच्या १८३३ च्या अहवालांत चिटणीसांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंत " दादो कोंडदेव यांचा मृत्यु आश्विन वा। १३ शके १५६९ रोजीं झाला हें सिद्ध करीत असलेलें पत्र " रा. वि. का. राजवाडे यांनीं मंडळापुढें वाचल्याबद्दल म्हटलें आहे. यानंतर चैत्र शके १८३७ मध्यें मंडळानें प्रसिद्ध केलेल्या ' मराठयांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० ' मध्यें राजवाडयांचें हें पत्र लेखांक २३७ (पृ. ३४९) म्हणून छापिलें आहे. हें पत्र म्हणजे सिवाजी महाराजांनीं मोरयाचे एका भगताचें इनाम कायम केल्याबद्दलचें निश्चयपत्र किंवा खुर्दखत आहे. १५६९ आश्विन वा। १३ ही या खुर्दखताची मिती असून त्यामध्यें असें वाक्य आहे.-' बा।।......खुर्दखत माहाराज साहेबु व सनद सुभा ता। सालगुदस्ता सन सबा चालिले आहे. साल मजकुराकारणे मा। दादाजी कोंडदेऊ सुभेदार यासी देवाज्ञा जाली म्हणऊनू माहाली कारकून ताज्या खुर्दखताचा उजूर करितातिे '. अवतरणांतील शब्द अर्जदाराचे आहेत. ते आश्विन वा। १३ चे आधीं अर्ज पोंचेल अशा वेळीं लिहिलेले आहेत. अर्थात् त्यापूर्वीं दादाजी कोंडदेव मेला असला पाहिजे. म्हणजे

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

खरी मृत्युतिथी याचे पूर्वींच असली पाहिजे; हें खास. किती पूर्वी हें निश्चित करणें या पत्रावरूनच केवळ कठीण आहे.

परंतु, आणखी आधींचें अशाच तऱ्हेचें पत्र उपलब्ध आहे. शके १५६९ तीलच आषाढ वा। १२ ला लिहिलेल्या शिवाजीचे खुर्द खतांत दादोजी कोंडदेवाचा वरच्या सारखाच उल्लेख आहे (सनदापत्रें पृ. १११). यामुळें ही तिथी अर्थात् तीनचार महिने मागें गेली. १५६९ आषाढ वा। १२ चे पूर्वी दादाजी कोंडदेव मृत्यु पावला एवढें यावरून खास म्हणतां येतें. ही अंतिम मर्यादा झाली. दादोजीचे मृत्यूची आरंभींचीही मर्यादा निश्चित केली पाहिजे.

दादाजी कोंडदेवानें प्रत्यक्ष लिहिलेलें पत्र शक १५६७ तील पौष शु॥ ४ चें आहे (म. इ. साधनें खंड १६ पृ. ३६). सुदैवानें शिवचरित्र साहित्य खंड १ (ले. ८२ पृ. ९५–९६) मध्यें दादोजीच्या हयातीची मर्यादा १५६८ चैत्र वा। १२ पर्यंत तरी वाढविणारा अस्सल उल्लेख उपलब्ध झाला आहे. १५६५ मध्यें (खं. २० ले. ५३) आपणच केलेला एक वाटणीचा महजर फिरविण्याबद्दलचा हा कागद निशाणी म्हणून अवतरिला आहे. या कागदानंतर दादाजी कोंडदेव लगेच वारलें असें या ले. ८२ मध्यें म्हटलें आहे. 'दादाजीपंतीं गोत जमा करून निवाडा करणें तिमाजीपाशीं महजर आहे त्यावरी नव जाणे' असा कागद करून दिला. 'तें पत्र घेऊन महालास आले निवाडा व्हावा तों महालींत धामधूम जाली' सवेंच दादाजीपंत मृत्यु पावले' इत्यादि हकीकतीवरून दादाजीपंतांचा मृत्युकाल १५६८ तच असावयास हरकत दिसत नाहीं.

म्हणजे शक १५६८ चैत्र वा। १२ पासून शक १५६९ आषाढ वा।१२ चे दरम्यान दादाजी कोंडदेवांचा मृत्यु झाला असला पाहिजे. ह्या १५ महिन्यांत खरी तिथी शोधिली पाहिजे.

श्री. स. मुझमदार यांनीं वाचलेल्या 'वेंसे तुकाराम नीरंजेन' या टिपणांत ॥ दादो कोंडदेव ।१ नारायेणरूप फाल्गुन शुा। ११ येकादशी 'निजेधाम पावले ॥' असें लिहिलें आहे. (इतिवृत्त १८३५ पृ. २२८) तेव्हां वरील मर्यादेंत ही मासतिथि नक्की बसविण्यास हरकत नसावी. शक १५६८ फाल्गुन शुा। ११ अशी तिथि समजून प्रचलित कल्पनेला किंवा अस्सल पत्राला विरोध कोठें येतो तें पाहूं.

Original from

या दृष्टीनें प्रथम उल्लेखिलेल्या दोन्ही किंवा कोणत्याही एका पत्रांतील भाषा नीट पाहावी लागते:– आपलें इनाम कोठपर्यंत चाललें हें अर्जदार सांगतो. ' ता। सालगुद्स्ता ' म्हणजे ' सन सबा ' भर चालिलें आहे. सुहूर साल हें मृगसाल आहे. सबा अर्बैन (हें खुर्द खत [३४१] समान अर्बैनांतील आहे) १५६९ वैशाख वा। ३० ला संपतें. तोंपर्यंत याचें इनाम सुरळीत चालू होतें. म्हणजे पुढील सालाकरितां बांधा उत्पन्न झाला. कशानें ? तर दादाजी कोंडदेव वारला यामुळें. यावरून दादाजी कोंडदेव सबा साल पूर्ण संपेपर्यंत हयात होता व समान साल सुरू होतांच परंतु आषाढाचे पूर्वीं म्हणजे या एकदोन महिन्यांत वारला; असें गृहीत धरण्याकडे प्रवृत्ति होते. हीच संशोधकांची येथें मान्य झालेली प्रवृत्ती गृहीत धरून सरकार मृत्युतारीख मे जून इ. स. १६४७ अशी देतात परंतु या म्हणण्याला तितका जोरदार आधार मिळत नाहीं.

माझें म्हणणें स्पष्ट करण्याकरितां शिवकालीन इनाम पद्धतीचा अल्प खुलासा करणें जरूर आहे. इनामदार हा खुद्द शेतकरी नसे. शेतकरी शेत कसून लागवड केल्यानंतर होणाऱ्या उत्पन्नांतून वरिष्ठ सरकार किंवा स्थानिक सरकार यांना जें सालांचें देणें देतो; त्याचा स्वीकार करण्याचा विशेष हक्क सरकारचे मोहबतीमुळें ज्याला प्राप्त होतो तो इनामदार. इनामें अमानत करणें म्हणजे हा द्रव्यौघ मुख्य सरकारकडे वळविणें व खुलीं करणें म्हणजे सरकारचे खजिन्यांत पडावयाची भर सोडून देऊन कोणाला तरी तें उत्पन्न घेण्याचा अधिकार देणें. यांपैकीं कोणतीही गोष्ट झाली तरी शेतकरी किंवा ' प्रज ' गांवचे मोकदम, ठाणेदार किंवा कारकून यांना पूर्वींसारखाच जबाबदार राही. व इनामरकमांची भरपाई देणें हें काम मोकदम वगैरे माणसांचे असे. आणि म्हणूनच हीं सर्व खुर्दखतें कारकून इत्यादींचे नांवानें निघत.

शेत कसण्याला सुरुवात या दृष्टीनें मृगसालाचें महत्त्व असलें तरी तें हिशेबाला किंवा खुद्द शेतकऱ्याला असणें शक्य आहे. इनामदाराची जागृति, चळवळ, वाटाघाट ही वर्षांतून केव्हांही चालू होई. परंतु विशेषतः उत्पन्न निघूं लागलें म्हणजे आश्विन–कार्तिकाला हे आपला हक्क वसूल करूं पहात. म्हणजे यावेळीं इनामदाराचे हक्कांत शंका काढण्यास जागा नसली म्हणजे पुढच्या दसरा-दिवाळीपर्यंत खुद्द इनामदार किंवा कारकून यांना गडबड करण्याचें कारण नव्हतें. थोड्याशा जमिनीचा वसूल व मोरया गोसाव्या सारख्या भक्तमंडळींचा वसूल बहुधा लवकर व बिनबोभाट होत असल्यास ते सरकारदरबार कशाला

Digitized by Google Original from

करितील ? परंतु दादाजी कोंडदेवा सारख्या अधिकारी पुरुषाचें निधन झालें म्हणजे इनामदार स्वतःच सावध राहून आधींच योग्य खुर्दखत आणवून ठेवीत असतील; म्हणजे हा पत्रव्यवहार आरंभींच म्हणजे वर्षारंभीं सुरू होईल. आणि महालीं कारकून ताज्या खुर्दखताचा उजूर करितात म्हणजे पुढल्या हंगामाची वेळ आली म्हणजे स्वभावानुसार करण्याची त्यांची पद्धति आहे; तरी आधींच सावध असावें म्हणून हा परवाना घेऊन ठेवीत असतील.

येथपर्यंत अनुमानिक सुचविलेल्या प्रमाणाला विशेष बळकटी येईल असाही एक अस्सल पत्राचा आधार देतां येतो. शि. च. सा. खंड १ ले. ६ पृ. ७ शके १५३२ आषाढ वा॥ २ चें पत्र. या पत्राचा विचार अधिक बारकाईनें व प्रत्यंतर पुरावे जमवून करणें इष्ट आहे तथापि वरील विचारपरंपरेला त्यांतील विधानें विरोधी नाहींत ही गोष्ट सहज लक्षांत येईल. विशेषतः ' दिवाळीपासून तुमचें सेत तुम्हीं करणें ' हें ह्या पत्रांतील वाक्य निर्णायक असेंच समजलें पाहिजे. नवीन व्यवस्था दिवाळीचे नंतर सुरू होते. म्हणजे त्या सालाची मर्यादा कीर्दीकरितां, उत्पन्नाकरितां, वहितीकरितां आणि बहुधा इनामाकरितांही दिवाळीपूर्व धरणें इष्ट वाटतें.

यावरून निष्कर्ष असा.— (१) दादाजी कोंडदेवांविषयीं वरील पत्रांतील सर्व विधानें खरीं होण्याकरितां दादाजी अगदीं मृग सालाच्या कडेवर वारणें अपरिहार्य आहे असें नाहीं. (२) सन सबाभर सुरळीत चाललें म्हणजे इनाम व वसूलीचा हंगाम म्हणजे आश्विनापासूनचे एकदोन महिने बिनतक्रार गेले असाच केला पाहिजे. म्हणजे १५६८ आश्विन—मार्गशीर्ष—पौष वाटेल तितकी वसूलीची मुदत लांबविली तरी त्यावेळीं दादाजीचे मृत्यूमुळें उद्भूत झालेली संशयित वृत्ति उत्पन्न झाली नव्हती एवढाच अर्थ ग्राह्य आहे. (३) फाल्गुनांत दादाजी मेल्यानें कोणत्याही विधानाला बाध येत नाहीं. तेव्हां अन्य कांहीं आधाराचे व विरोधी प्रमाणाचे अभावीं शक १५६८ फाल्गुन शु॥ ११ ही तीथ दादादींच्या मृत्यूची मान्य करण्यास हरकत नाहीं.

---

१० श्रीमुक्ताबाईचें समाधिस्थल.

(ले.— आ. ना. रा. गुंजाळ, पुणें.)

सुमारें साडे सहाशें वर्षांपूर्वी ब्रह्माविष्णवादींचे अवतार जे श्री निवृत्ती-ज्ञानदेवादि थोर संत ते प्रकट झाले; त्यांचा जन्मकाल व जन्मस्थल हें निश्चित

आहे. फक्त श्रीमुक्ताबाई यांच्या समाधिस्थानाविषयीं मतभिन्नता आहे. पण पुढील आधारानुसार त्याचा निर्णय होत आहे. मुक्ताबाईचें समाधिस्थल म्हणून आज बरींच वर्षें एदलाबाद हें चुकीचें गांव प्रसिद्ध असून तेथें यात्राहि भरत आहे. त्यावर आमचें म्हणणें एवढेंच कीं; प्रस्तुत यात्रेचें हें स्थळ, या संतभावंडांविषयीं ज्यांचा पुरावा सगळ्यांत विश्वसनीय मानिला जातो त्या श्रीनामदेवरायांनीं श्रीमुक्ताबाईचें समाधिस्थल म्हणून सांगितलेल्या स्थळाशीं विसंगत आहे.

स्वतः ह्या भावंडांनीं केलेल्या अभंगाचे खालोखाल दुसरा महत्त्वाचा पुरावा म्हणजे श्रीनामदेव यांचे अभंग हाच आहे. स्वतःविषयींचें वृत्त ह्या संतांनीं आपल्या अभंगांत फारसें सांगितलेंच नाहीं. म्हणून श्रीनामदेवराय यांनीं ह्या भावंडांचें जें विश्वसनीय वर्णन दिलें आहे त्यांत श्रीमुक्ताबाईच्या समाधिस्थळासंबंधानें पुढील उल्लेख आले आहेत.

"तापीचिये तीरीं महत् ग्राम थोर । असे सोमेश्वर पुरातन ॥
वद्य वैशाखमास दशमी निर्मळ । उष्णकाळ फार तापतसे ॥ ...
वद्य वैशाखमासीं दशमीचे दिवशीं । गेले ते स्नानाशीं तापी तीरीं ॥
...कडाडली वीज निरंजनीं जेव्हां । मुक्ताबाई तेव्हां गुप्त जाली ॥
...नामा म्हणे पूजा तापीतीर । पूजियेली तापी पूजिला सोमेश्वर ॥ " इ.

या उतार्‍यांतून जें वर्णन केलें आहे तें खानदेशांत तापीतीरीं असलेलें जें मेहुणग्राम त्याच्याशीं तंतोतंत जुळत आहे. हें आम्ही जाऊन प्रत्यक्ष पाहिलें आहे. ग्याझिटिअरमध्येंहि मेहुणग्रामींच्या सोमेश्वराचा उल्लेख आला आहे. तरी एदलाबाद हें ठिकाण श्रीमुक्ताबाईच्या समाधिस्थानाचें समजणें हें संतवचनाविरुद्ध आहे. श्रीमुक्ताबाई गुप्त होऊन एदलाबादेस प्रकट झाल्या; या समजुतीसहि वैष्णवसांप्रदायिक ग्रंथाचा पुरावा नाहीं. हीं सर्व भावंडें नाथपंथीय, यामुळें ह्यांपैकीं तिन्हीं बंधूंचीं समाधिस्थानें त्र्यंबक, आळंदी, सासवड ह्या शिवक्षेत्रांतच आहेत. मुक्ताबाईचेंहि चवथें स्थान शिवक्षेत्र असणेंच संभवनीय. एदलाबाद हें तापीतीरीं नाहीं, सोमेश्वर ह्या शिवलिंगाचें तें ठिकाणहि नाहीं; मुक्ताबाईच्या समाधीचे अभंगांत त्याचा उल्लेखहि नाहीं.

श्रीनिवृत्तिनाथांचा समाधिकाल खरा ज्येष्ठांत; पण यात्रा भरते पौषांत; श्रीसोपानकाकांचा समाधिकाल मार्गशीर्ष वद्य पक्षांत; आणि ७।८ वर्षांपूर्वींपर्यंत यात्रा भरत असे वैशाख शुद्धांत; त्याप्रमाणेंच श्रीमुक्ताबाईच्या समाधिस्थानाविषयीं झालें असावें. एवढ्याकरतां सांप्रदायिक पुढार्‍यांनीं व फडकरीमंडळींनीं श्रीनामदेव यांचे सांगण्याप्रमाणें ' मेहूण ' या गांवीं जमावें.

' मार्ग दावूनि गेले आधीं । दयानिधी संत ते ॥
तेणेंचि पंथें चालो जातां । न पडे गुंता कोठें कांहीं ॥ ' निळोबाराय.

[तर] आपणाजवल आसो म्हणोन समजावे यनजी नाईक हावनूर याचे मजकुराचे राजश्री रायचा यां सांगून पाठविले होते त्याणी येऊन सांगितल्या करोन बहुत आश्चर्य वाटलो प्रथम आपोशनात खडे आल सारख थोडक्यात आसे केल्यानंतर येकंदर बागव पडणार आपण काय वचन दिल्हे होत यादी पटी मसलाची करोन मोहर दसकत काय करोन दिल्ह होत स्वल्प दिवसात आसे जाहलवर बरोबर पडणार नाही सो याणी काय क्रियापूर्वक वचन दिल्हे होते ते पुर्ते ध्यानास आणोन हरएक विषयी आम्हास कलवीत जावे पुढेहि ते क्रिया स्मरण करोन त्या प्रमाणे वचन सत्य करोन सर्व काम बदोबस्त करोन दिल्हेया उतम नाही [तर] सर्व सोडून चरणाजवळ आसो म्हणोन समजावे हे कार्य स्वामीच्या आहे यात दुसरा योचिना न करावे याजवर मर्जी प्रधान आपले कडून बदोबस्त व्हावे यास्तव इतके लिहिले आसो. बहुत काय...इत्यादि.

ले. १००] ॥ श्री ॥

राजश्री सिवपा संस्थान बिदनूर गोसावी यांसि

छ सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष संस्थान मजकूरच्या संडणीचा करार रा॥ व्यंकटशास्त्री व तुको नरसिह व मुकुद आपाजी याचे विद्यामाने केला असे तरी तुम्ही खातरजमेनी सत्वर येणे जाणिजे रा॥ छ २२ साबान बहुत लिहिणे तर सुज्ञ असा* लेखन सीमा (वा. शि.)

ले. १०१] श्री [श. १६८८ कार्तीक व. ६
इ. १७६६ नोवें. २२

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री
रामचंद्र नारायेण गोसावी यांसि

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सु॥ सबा सितैन मया अलफ राजश्री सिवपा संस्थान बिदनूर हे हुजूर आले होते बकापुरास राहातात यास

---

* हें पत्र सोनेरी शिडकावाच्या कागदावर लिहिलें आहे. समास दोन बोटें सोडलेला असून प्रत्येक रेघेची प्रारंभीची एक बोट जागा सोडून मजकूर लिहिला आहे. पाठीमागें गोल शिक्का आहे. त्यांत श्रीकाराच्या डावीकडे चंद्र व उजवीकडे सूर्य आहे. शिक्यांतील मजकूर असा—

श्री । राजारामनरप । ती हर्ष निधान माध । व राव बल्लाळ मु । ख्य प्रधान ।
(न उलटा आहे.)

राव) श्रीनिवास संवस्थानीक क(डून) + + आपल्याकडे विनंती करावयास आले आहेत केंच नाईकास त्या प्रांतातील माहून माहिती आहे आज्ञा जाहली असतां हजार दोन हजार पर्यंत लोक देऊन आमलहि बसवीन असें म्हणणें आहे परंतु तूर्त पोटापुर्ते तेथे प्रांतात पोहचेपर्यंत सर्चाची सोय जाहाली पाहिजे येविसी राजश्री अंताजीपंत गद्रे यासी बोलिलो आहो तेहि विनंति करतील संवस्थानीकास स्वारी बरोबर घेतल्यास (उप)योगास (पडेल सेवटा ते मर्जी) प्राधान्य ब(हुत काये लिही)णे रूपा करावी हे विनंती

ले. १०६]

हू

अजम सिवपैया संस्थान बिदनूर दांम महबत हू

सरकाअत व अवाली पन्हां हिशमत व शौकत दस्तगाह्म अजिदील येजळास टामस बेफील इस्कोयेर मो जंजिरे मुबई बादज सलांम खेर अंज्याम आकी येथील खेर सला जाणोन आवाली पन्हाहीं आपली खैरयेत कलमें करीत असिले पाहिजे दिगर आ आवाली पन्हाहि पत्र पाठविले तें पोंहचोन गोविंदभट व सेनापा यांजसीं बोलीचालीहि जाहाली त्यास आं आवाली पन्हा सवेहत मालूंम आसे की आपले राज्याकडूंन केसीकाये वर्तणूक आमंसी करूनं घेतली आं शौकत पन्हाहीं तेव्हां कांहींच आमचे दोस्तीवर नजर दिली नाहीं असो जे बात गुजरली ते गुजरली परंतु हाली आम्ही बहुत कामाकाजांत असों ऐशास माफ केलें पाहिजे आं शौकत पन्हांचे आदमी यांसी बोलीचाली जाहाली असेती येकीन आसे कीं सर्व आं उ बहुत पन्हांस मालूंम करितील ज्यादा काये लिहिणे प्यार मो असें दीजे सा छ ९ रजब हे किताबती

ले. १०७]

श्री

राजश्रिया बिराजित राजमान्ये राजश्री
वेंकटराव व धर्मराव आणीगेरीकर यांसी

प्रती तमणाच्यार्य आसिरवाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असिल पाहिजे बिशेष पेशजी नवाब हैदरनाईक याणी बिदनूर संवस्थानचा उछेद करून संवस्थानीक हिरे सोमशेखर नाईक यास धरून मदगिरी

किल्यावर कैदेत ठेविले नंतर श्रीमंत कैलासवासी थोरले माधवराव साहेब यांची स्वारी कर्नाटकांत जाहली मदगिरी किला घेतला ते समई संवस्थानकि यास संवस्थान बहली करून देतो आसे वचन देऊन आपल्याजवल ठेऊन घेतले मसलत त्रिंबकराव मामा यास सागोन स्वारी परतली बरोबर संवस्थानीकाहि पुणेस आले माधवरावसाहेबांचा काल जाहला येकास येक सरकारांत गाठ न पडतां दिवस गेले संवस्थानकि सोमशेखर नाईक याचाहि काल जाइला तेसमई त्याचे वंसीक जवल होते यास संवस्थानी स्थापावे हा आभिमान सरकारांत धरून खर्चास देऊन ठेऊन घेतले आसता कैलासवासी भाऊसाहेब पटवर्धन व तात्या फडके यास कर्नाटकात स्वारी नेमिली संवस्थानिकास संवस्थानी स्थापावे यास आज्ञा होऊन बरावर दिल्हे ते स्वारी बरोबरच होते भाऊसाहेबानी तुमही माहीत आहा जपती दाखल सर करावा टिपूचा बदोबस्त करून तुम्हास सरकार आश्रो बाहाली करून संवस्थान दे(ई)लसे सागितले बराबर फौज दिली त्याचे निरोपावरून तालुका सर केला तव टिपूचा व सरकारचा तह जाहला स्वारी परतली स्वारीबरोबर संवस्थानिक निघोन आले आलीकड सरकारांत मबल पडला दक्षणस्थाचा तालुका कुंपनी सरकारांत आला संवस्थानीक नरगुंद संवस्थानी राहिले त्याची मातुश्री जाऊन धारवाडांत राहिली तेथ आपल्या हाताखाली यालकी सिदलिंग सेटीचा भाचा ठेऊन घेतला काही दिवसी तिचा काल जाहला सिदलिंग सेटीचा भाचा बिदरूर तालुकेंत जाऊन आपण संवस्थानीक आसे गैरवाका समजाऊन सरंजाम नेमून घ्यावा या उद्योगांत आहे व सरकारांतून सरजामहि नेमून देणार आसे कलले यहस्त तोतया मोडी व कुबीगूड येथ आहेसे आईकतो संवस्थानिक काही नव्हे संवस्थानचे वंसीक नरगुंद संवस्थानी आहेत श्रीमंताचा व कुपनी सरकारचा ऋणानबंद यास्तव हा मजकूर राजश्री रामराव यांस कलऊन दरबारातील आशय समजून आपले पत्र ये ते क्षणी सोमशेखर नाईक याकडून येणार येतील त्याचे मुखे वृतांत समजून घेऊन सवस्थानिकास कुंपनी सरकार याणी आपल पदरी ठेऊन घ्यावयाचे घडवणे आपलेकड तोतयाचा बदोबस्त होऊन संवस्थानच्या कारभारांत न येणे व न बोलत ते घडावे बहूत काय लिहिणे लोभ करावा ‡ लोभ असावा हा आशीर्वाद

---

‡ यापुढील मजकूर बालबोधींत असून तो निराळ्या वळणाचा आहे.

ले. १०८]

ता. २६।११।९१ मद्रपा-गणपत आनंदराव-बसपा बिदनुरकडे सोरबेस राहून काय करणार.

ता. २७।११।९१ बसपा-अमृतराव-यशवतराव चवाण हवनुर-सर्वांस पाठवा.

ता. १५।१२।९१ बसपा-सुबराव अनंत-लष्करास श्रीमंताकडे जाणार.

ता. १९।१२।९१ बसपा-केचनगोड नाडगोडा कुदगोळ मुा इकेरी-सिवराव व अनंत यास पाठविले.

ता. २४।१२।९१ बसपा- „ „ आपली स्वारी केलादीस होईल तेव्हां भेट होईल.

ता. ३।१।९२ बूदीबसपा-तिमाजी व्यंकाजी-सावकार पाहिजे व कांहीं जमाव घेऊन यावे म्हणोन लिहिलें उपया सुभेदार सवदतीस आहे.

ता. १।२।९२ बसपा-मडिवाळपा उगरगोळ-याईसाहेब येतात

ता. १।२।९२ चेनतीरकावा-मडिताळपा उगरगोळ-येथें लोक ४००।५०० पावेतो जमा होईल.

ता. ३।२।९२ बसपा-केंचणगोडानाडगीर-श्रीमंत भाऊसाहेबाचे पत्र आले तूर्त धोंडजी वाघ कोलीदुर्गास शह्य दिले.

ता. ५।२।९२ „ „ ईकरी येथें तुम्हाकडील लोक १०।१२ जण रयताच गुर ४।५ घेऊन गेले.

ता. १८।२।९२ राजाधिराज !—काशीराव वासुदेवराव वकील-श्रीमंताची आज्ञा व बिदनुरसरकारचे आज्ञा घेऊन लोक जमा करणेस लागलो.

ता. २५।२।९२ „ ! कोळीदुर्गाकडे जातो शत्रुचा आमचा मोकाबला होईल.

ता. २६।२।९२ धोंडजी वाग मो आनंतपूर- श्रीनिवास—गिरमाजी फाल्गु. शु. ५-हाली नगरच जमीयेत हणीगेरी कणवीस उतरले आहे कमरदीन फौजसुद्धां उतरला आहे.

---

१ ह्या लेखांतील सर्व मजकूर फारच त्रोटक व सारांशवजा आहे. कारण, सदर मजकुराचे कागद फारच अल्पवेळ हातीं राहणार असल्यामुळें असें करणें प्राप्त झालें. तारीख अथवा मुसलमानी 'छ' आरंभीं देऊन नंतर पहिले नांव कोणीं पाठविलें त्याचें, दुसरें नांव ज्याला पाठविलें त्याचें, त्यापुढें पत्राचा सारांश. ह्या तिन्हीची भिन्नता मध्यें डॅश घालून दर्शविली आहे.

Digitized by Google Original from

ता. १३।३।९२ धोंडजी वाग ठाणे आनंतपूर- श्रीनिवासराव ठाणे कुमसी फाल्गुन शु. ८ -लष्करातून जनार्दन पंताच पत्र आपल नावे आले ते पाठविले.

ता. २५।३।९२ बसपा नाईक-मुधवीरपा आदवनीकर मा। केलदी- हरसिंगास कैदेत ठेवलेच मजकूर समजला. आनंतपूरची कमावीस दुसऱ्यास दिली. हे योग्य नव्हे.

ता. २६।३।९२ बसपा-दाजी विठल का। केसकर-नगराचे फते पेठेंत जमाव आहे कोणते रोखे जातात न कळे धोंडजी वाघ जमाव सुधा बाहेर उतरले आहेत म्हणोन कळले.

ता. ४।४।९२ धोंडजी वाघ-पांडुरंगराव महादेव-चौक्या ठेवल्या आहेत पण तुम्हास अडथळ नाहीं. कोळी दुर्गाकडे आपला जमाव गेला होता.

ता. ४।४।९२ बसपा-रामचंद्र हिरमाजी (!) हुकेरी-काल पाहाटे तोफा ४-५ आवाज जाहाल आपल रोखेचा म्हणून समजतो कशा निमित्य उडाल्या

ता. ८।४।९२ बसपा-लक्ष्मण महादेव देशमुख ठाणे सिकारपूर- सरकारातून तह जाहल्याचे वर्तमान आहे. नगराकडील बार आपल्या ठाण्याजवळ आला आहे. भाऊसाहेब कधीं माघारा फिरणार.

ता. ७।४।९२ बसपा बिदनुर-रामचंद्रराव हिरमाजी १२ शाबान-शत्रूचा तह जाहला रयतेचा मुलाहिजा न पाहणें म्हणून लिहिले अशास ते गोष्ट खरेच आहे. सरकारचा कामापुढे कोणाचा मुलाहिजा पहात नाहीं.

ता. १०।४।९२ केशव नाईक नि॥ कलकेरी—बसपा नाईक चैत्र व. ३ मंगळवार आनंतपूर-पैशाची व्यवस्था करा.

ता. १५।४।९२ बसापा नाईक संस्थान बिदपूर ठाणें अनंतपूर-लक्ष्मण महादेव देशमुक आसारिवाद ठाणें शिकारपूर-निदसर तालुक्याच्या सोडचिठ्या श्रीमंतानी दिल्या असें ऐकतों.

जमादिलाखर१८—धोंडी वाग-श्रीनिवासराव गिरमाजी, ठाणे कुमसी- वेणुपुरात बसणा बाहेर निघाला म्हणोन बाजारी वर्तमान आहे.

धोंडजी वाग-हरिसिंग बयसपा-लष्कराच काम-महागाई फार आहे.

रजब११- अनंतया किल्ले अनंतपूर-धोंडजी वाग सं. सिरहट्टी मु॥ सिवेश्वरकाल रात्री तुम्ही किले दाखल जाहलेचे वर्तमान ऐकले.

जावल७-आनंत अपा मु॥ हुकेरी-धोंडजी वाग सं. सिरहट्टी-आज केलदीहुन कूच करून फौज सुधा येथें आलो. पुढें अनंतपुरास दौड गेले.

मार्गशीर्ष व. २–बापूसाहेब–बसपा नाईक मुा सोरब–आपला निरोप घेतांना मुक्ता (मुखतः, तोंडीं) विनंती करून घेतली.

बसपा नाईक संस्थान बिदनूर (बिदरूर)–बसें नाईक उद्री–तूं संस्थान नोकरीवर असिजे पाप्रेतो हिरवे निशान ताबे करून घेतले होते ते परत सरकारास दिले नाहीं.

बसपा–मुद्वीरपा आद्वानीकर–श्रीदेवीचा मोछाव आहे सोडून येता न ये उद्यां प्रातःकाली येतो.

जाखर१०– बसपा–रामचंद्रराव इकेरी–नगरकर भारी जमीयेत करून घेऊन येणार आहेत. गनीमच स्वारी आपणाकडे जाहल तरी येथून कुमक करणेस येईल.

बसपा–धोंडजी वाग मुा होससती बेल–स्वामीचा निरोप घेऊन आज येथें आलो. आनंतपुरास आमची स्वारी गेली आतील तोफा लागल्या दारुगोळा पाठवा.

बसपा–कासी बलाल–रटेहलीकर दिकत करतात त्यास ताकीदपत्र पाठविले.

साबान१३–पांडुरंगराव सुबेदार ता। उडगणी–बसपा बिदनूर–टिपूकडील तहनामा ठरला.

धोंडजी वाग सिरहटी मो आनंतपूर–पीर साहेब–इकेरीस जाण्याचा मनसुबा केला होता इतक्यांत वडगेरी ईटपा आम्हापासी आले.

बसपा बिदरूर– केंचणगोडा कुंदगोळ–आज दुपारपासून तोफाचे गोळा होतात कोठील काय

रजब१०— धोंडची वाग मुा अनंतपूर–कृष्णपा नाईक कलकेरी यास आम्ही फौजसुद्धा कवलीदुर्गाकडे स्वारीस गेलो होतो शत्रूकडे जमाव भारी सबब परतली.

बसपा बिदनूर–धोंडजी वाग सिरहटी–आपण हजार काम सोडून आले पाहिजे.

बसपा—जनार्दन अनंत सुबेदार–धोंडजी वाघ कोलीदुर्गाकडे स्वारीस गेले आहेत, ११४ रोजी मोकावला होईल उपरान्त्यास फौज पाहिजे ह्मणून लिहिले त्याप्रमाणें पाठवूं.

Digitized by Google Original from

शके १८५० सालचे तिसरे व चवथे तिमाहींत भा. इ. सं. मंडळास भेटीदाखल व अभिप्रायार्थ आलेल्या ग्रंथांची यादी

अनुक्रम	पुस्तकाचें नांव.	देणाराचें नांव.
(२४)	पिठापूर प्लेट्स् ऑफ भवदत्तवर्मन्	य. रा. गुप्ते
(२५)	प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियम ऑफ वेस्टर्न इंडिया (१) ब्रम्हेनिकल ग्यालरी (२) अरॅबिक् एन्ड् पार्शियन इन्स्क्रिप्शन्स (३) ए गाइड टू दि बुद्धिइस्टिक् सेक्शन	जी. व्ही. आचार्य
(२६)	कॅटलॉगू ऑफ् एन्शंट एण्ड मॉडर्न इंडियन् आर्ट	,,
(२७)	सोव्हनीर ऑफ दि एक्सिबिशन् ऑफ इंडियन् पेन्टिंग १९२८	,,
(२८)	विक्रमादित्य	ब. श्री. मालपे
(२९)	ए ट्रायनियल् कॅटलॉग ऑफ मॅन्युस्क्रिप्ट्स १९१९-२० (संस्कृत) भाग १।२।३	गव्हर्नमेंट ऑफ् मद्रास
(३०)	दि बाग केव्हस् इन् ग्वालियर स्टेट-विभाग १।२	ग्वालेर स्टेट गव्हर्नमेंट
(३१)	आर्किऑलॉजिकल् डिपार्टमेंट ऑफ ग्वालियर स्टेट (रिपोर्ट १९२३-२४)	,,
(३२)	ग्वालियर फोर्ट आल्बम्	,,
(३३)	दि ऑर्किऑलाजिकल म्युझियम् ऍट ग्वालियर	,,
(३४)	रिझ्यूम ऑफ वर्क ऑफ आर्कि-ऑलॉजिकल डिपार्टमेंट, ग्वालि-अर स्टेट १९१३-१९२५	,,
(३५)	अष्टागरांतील क्रमवंत घराण्याचा इतिहास	ग. दा. टिल्लू

Digitized by Google Original from

अनुक्रम.	पुस्तकाचें नांव.	देणाराचें नांव.
(३६)	कॅटलॉग, संस्कृत ग्रंथ (रामतीर्थ पुस्तकालय) जमखंडी	वा. त्र्यं. आपटे
(३७)	गणितकी परिभाषा	राष्ट्रीय विद्यामंदिर, साबरमती
(३८)	गीताधर्ममंडळ—चतुर्थ वार्षिक वृत्तांत (जुलै १९२७ ते जून १९२८)	चिटणीस, गीताधर्ममंडळ
(३९)	Novelle Biblisthejue des Voyages Ancieus et Mosernes Tome 1 et Tome VII	Imprimeurs Unis(paris)
(४०)	प्रोसीडिंग्स ऑफ् मीटिंग्स, व्हॉल्युम टेन्थ सन १९२७	इंडियन हिस्टॉरिकल् रेकार्ड्स् कमिशन
*(४१)	इस्राएल लोकांचा इतिहास (पॉल गुडमन्‌कृत)	श्री. न. शि. तळेगांवकर
(४२)	प्राकृत व्याकरण (बेचरदास जीवराज दोशीकृत)	गुजराथ पुरातत्त्वमंदिर अहमदाबाद
*(४३)	संमतितर्क प्रकरणम् (श्रीसिद्धसेन दिवाकरकृत) विभाग ४	,,
(४४)	प्रोग्रेस रिपोर्ट ऑफ दि आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया (१) वर्षे १८९१ ते १९०४ पुस्तकसंख्या १४ आणि (२) वर्षे १९०७ ते १९२१ पुस्तकसंख्या १५	नारायण महादेव ताटके
(४५)	दि केव्हस् ऍट नादसूर ऍण्ड करसंबला, बाय कझिन्स	
(४६)	बाँबे रिव्हाइज्ड लिस्टस	,,
(४७)	भावनगर प्राचीन शोधसंग्रह भाग १ ला.	,,

श. १८५१

१	देवनागरी लिपि (चांदोरकर गो. का.)	द. वा. पोतदार
२	आर्कीऑलॉजिकल ऍन्ड हिस्टॉरिकल रिसर्च इन् सातारा डिस्ट्रिक्ट—वाय्. वाय्. आर. गुप्ते.	वाय्. आर. गुप्ते.
३	येतें साहित्य संमेलन (द. वा. पोतदार)	द. वा. पोतदार
*४	संपूर्ण कौटिलीय अर्थशास्त्र (मराठी)	ज. स. करंदीकर

Digitized by Google

Original from

अनुक्रम	पुस्तकाचें नांव.	देणाराचें नांव
*५	कोंकण अभ्युदय विशेषांक.	ग. वि. पटवर्धन
*६	वेरूळ (भ. श्री. पंत प्रतिनिधि)	श्री.बाळासाहेब पंतप्रतिनिधि
७	Junnar and Fort Shivneri (R. D. Wadekar)	R. D. Wadekar
८	आमची परळीची यात्रा.	य. रा. गुप्ते
९	An Appeal for contributions towards the Mahabharata or the Great Epic of India.	भांडारकर रिसर्च इन्स्टिट्यूट
१०	शाहू छत्रपति (ग. चिं. वाड)	रा. सा. वि. अ. पटवर्धन
११	बाळाजी बाजीराव (,,) भाग १।२	,,
१२	पहिले माधवराव पेशवे (,,) भाग १।२।३	,,
१३	सवाई माधवराव पेशवे (,,) भाग १।२।३	,,
१४	दुसरे बाजीराव (,,)	,,
१५	अनेक कविकृत कविता भा. २।३।४ (संपादक ज. बा. मोडक)	,,
	मुक्तेश्वर, महाभारत– वनपर्व	,,
१६	'मोरोपंत' कविता– भा. २ रा.	,,
	अनेक कविता	,,
१७	ऐतिहासिक पोवाडे (आकवर्थ व शाळिग्राम)	,,
१८	ऐतिहासिक लेखसंग्रह (वा. वा. खरे) भाग ५ वा. आणि भाग ७	,,
१९	चिं. भि. डिकेकृत पर्वती संस्थान वर्णन	,,
२०	दिल्ली अथवा इंद्रप्रस्थ (द. ब. पारसनीस)	,,
२१	श्री महेंद्र स्वामी धावडशीकर यांचें चरित्र व पत्र-व्यवहार (द. ब. पारसनीस)	,,
२२	संस्कृत वाङ्मयाचा इतिहास (सी. वा. पेंडसे)	,,
२३	कै. न्या. महादेव गोविंद रानडे यांचें चरित्र	,,
२४	श्री ज्ञानदेव चरित्र (श्रीपति बुवा भिंगारकर)	,,
२५	अकबर बादशाहाचें चरित्र (मा. त्र्यं. लेले)	,,
२६	वराह मिहिरकृत बृहत्संहिता (मराठी भाषांतरासह)	,,

Digitized by Google Original from

अनुक्रम पुस्तकाचें नांव	देणाराचें नांव
२७ भारतवर्ष, वर्षे ११२ (द. ब. पारसनीस)	रा. सा विष्णु अनंत पटवर्धन
२८ लँड रेव्हिन्यू पॉलिसी ऑफ् दि इंडियन गव्हर्नमेंट	"
२९ ए ब्रिफ् हिस्टरी ऑफ इंडियन पीपल (डब्ल्यु. डब्ल्यु. हंटर)	"
३० एसेज एन्ड लेज् ऑफ् एन्शंट रोम (मेकाले)	"
३१ दि लेट जस्टिस एम्. जी. रानडे (मानकर जी. ए.) भाग १।२	"
३२ स्टूडन्टस् मॅन्युअल् ऑफ् एन्शन्ट हिस्टरी (टेलर)	"
३३ रत्नागिरी जिल्ह्याचा राजकीय इतिहास	द. वि. आपटे
३४ ऐतिहासिक लेखसंग्रह विभाग १२ वा. (वा. वा. खरे)	"
३५ गोमांतकांतील भट्ट प्रभुपद्ये प्रकरण (रा. द. किंजवडेकर)	"
३६ नाना फडणविसांचें चरित्र (वा. वा. खरे)	"
३७ दि कँपेन इन् बोहिमिया १८६६ (जी. जे. ग्ल्यूनिक)	"
३८ वेदिक इंडिया (ए फ्यू एक्स्ट्रॅक्टस्) बाय् एन. बी. पावगी.	"
३९ वेदिक क्रॉनॉलॉजी एन्ड वेदांग ज्योतीष. (बी. जी. टिळक)	द. वि. आपटे
४० ट्रायलीनियर कोऑर्डिनेटस् (डब्ल्यु. ए. व्हिटवर्थ)	"
४१ नारायण दीक्षित पाटणकर (वा. बा. दीक्षित,	"
४२ ऐतिहासिक पोवाडे (य. न. केळकर)	"
४३ समर्थांचा गाथा	अनंतदास रामदासी.

मि. वैशाख वद्य ७ श. १८५१ } दि. म. कोल्हटकर
ग्रंथगणक भा. इ. सं. मंडळ

---

* अभिप्रायार्थ

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

शके १८५० मधील सभासद

नों. क्र.	सभासद नांव.	वर्ग.	गांव.
१३८९	रा. के. द. टुमणे	४	पन्हाळघर
१३९०	रा. रा. बि. अधिकारी	४	गोरेगांव
१३९१	रा. वि. ग. भागवत	४	पुणें शहर
१३९२	डॉ. द. ब. खाडीलकर	४	नाशीक
१३९३	रा. बा. मो. कानिटकर	४	पुणें शहर
*१३९४	रा.वि. म. कोल्हटकर	२ तहाहयात	पुणें "
१३९५	रा. का. प. साने	४	राजुरी
१३९६	श्री. ठाकूर अ. स. सिसोदिया	४	पुणें शहर
*१३९७	रा. व. भ. कर्णिक	४ तहाहयात	" "
†१३९८	रा. प. शं. दरगो पाटील	२ तहाहयात	सोलापूर
**१३९९	रा. रा. गं. तेलंग	४ तहाहयात	पुणें शहर
१४००	प्रो. अ. स. अळतेकर	३	बनारस
**१४०१	रा. ह. वि. बेहरे	४ तहाहयात	पुणें शहर
१४०२	रा. स. ज. भागवत	४	पुणें "
**१४०३	रा. ब. शं. दावके	२ तहाहयात	मुंबई
१४०४	वे. नारायण शास्त्री मराठे	२	वाई
**१४०५	रा. त्र्यं. भा. खरे	४ तहाहयात	मुंबई
१४०६	प्रो. स. बा. हुदलीकर	२	पुणें
**१४०७	प्रो. शं. पु. आघारकर	४ तहाहयात	कलकत्ता
१४०८	रा. सं. वि. गोखले	२	उमरावती
**१४०९	रा. न. शि. तळेगांवकर	४ तहाहयात	पुणें शहर
१४१०	रा. ना. मो. सोमण	४	जळगांव
१४११	रा. य. न. केळकर	२	पुणें शहर
**१४१२	रा. अ. स. बाक्रे	४ तहाहयात	मुंबई
१४१३	प्रो. शं. दा. पेंडसे	४	नागपूर
१४१४	रा. वायू. पी. बेंद्रकर	४	बडोदें
१४१५	रा. र. ग्या. पायगुडे देशमुख	४	पुणें शहर
**१४१६	श्री.गो.वि. (बाबासाहेब) रानडे	१ तहाहयात	पुणें शहर
१४१७	सरदार दा. गं. गाडगीळ	२	सोलापूर
१४१८	रा. य. रा. फडके	३	कल्याण
१४१९	रा. ग. शि. रानडे	४	मुंबई
१४२०	रा. वा. ना. देशपांडे	४	सातारा

Digitized by Google Original from

नों. क्र	सभासद् नांव.	वर्ग.	गांव.
१४२१	प्रो. द. गो. मटंगे	२ श.१८५०[४	शके१८५१पा.]जबलपूर
१४२२	रा. ज. के. उपाध्ये	४	नागपूर
१४२	रा. ग. गो. पाध्ये	२	पुणें
**१४२४	रा. त्र्यं. ना. देशपांडे	४ तहाहयात	पुणें शहर
१४२	रा. र. गो. बहुलेकर	४	पुणें शहर
**१४२६	रा. वि. ह. डोंगरे	२ तहाहयात	महाड
**१४२७	रा. म. वि. डोंगरे	२ तहाहयात	महाड
१४२८	डॉ. ज. शं. नेरुरकर	२	मुंबई
१४२९	रा. डे. ए. तरणखोपकर	२	पुणें शहर
१४३०	रा. वा. ल. चिपळूणकर	३	आकोला
१४३१	रा. गो. रं. पेंढारकर	२	आकोला
१४३२	प्रो. म. रा. परांजपे	४	पुणें शहर
१४३	रा. वि. वि. देशपांडे	४	पुणें शहर
१४३४	रा. वि. गो. भिडे	४	भोर
१४३५	रा. रं. वि. रवडे	४	पुणें शहर
१४३६	डॉ. ना. म. वाडेगांवकर	२	रायपूर
१४३७	रा. ल. ग. राजेंद्र	४	पुणें शहर
१४३८	रा. वि. ग. ताम्हणकर	४	पुणें "
१४३९	रा. भा. द. खांडेकर	४	पुणें "
१४४०	प्रो. क. गि. कुंदनगार	३	कोल्हापूर
**१४४१	रा. मो. ना. परांजपे	१ तहाहयात	पुणें शहर
१४४२	श्री. शं. श्री. देव	२	धुळें

एकूण ५४

** तहाहयात वर्गणी पूर्ण आली.

* तहा. वर्गणी पूर्ण आली नाहीं.

† तहा. वर्गणी सर्व येणें आहे.

Google Original from

श्री

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें

सतरावें वार्षिक संमेलन श. १८५१

दिवस पहिला.

मिति वैशाख वद्य ९, रविवार, ता. २–६–२९

कार्यक्रम

(प्रसंग पडल्यास यांत बदल होईल.)

सकाळीं ७॥ ते १०॥

सभासदांचें व अभ्यागतांचें स्वागत– श्री. चिं. वि. वैद्य.

शुभसंदेशकथन– चिटणीस (नूतन सभासद प्रवेश, वर्ग बदली इ. कार्यक्रम तीनहि दिवस अधूनमधून चालेल.)

निबंधवाचन–

श्री. चिं. वि. वैद्यः– (१) शहाण्णव कुळीची यादी.

श्री. शं. ना जोशीः– (२) माझें संशोधनवृत्त.

श्री. कृ. वा. पुरंदरेः– (३) मोरगांवचे गोसावी इनामदार.

श्री. द. वि. आपटेः– (४) शिवचरित्र; साहित्य खंड २ रा– परामर्ष

श्री. ग. ह. खरेः– (५) चालुक्य विक्रमादित्य २ रा याचा शके ६६४ तील ताम्रपट.

ऐतिहासिक प्रदर्शनः–

प्रो. द. वा. पोतदार (१) भागवती चित्रसंग्रह, (२) ऐतिहासिक चित्रांच्या आधुनिक हस्तिदंती नकला.

दुपारीं ४॥ ते ६॥

निबंधवाचनः– (पुढें चालू)

श्री. कृ. वा. पुरंदरेः– (६) पुरंदर गडकऱ्यांची दंडेली.

Digitized by Google Original from

श्री. स. ग. जोशीः- (७) पंतसाचिवांच्या रामनवमी-उत्सवाचा प्रारंभकाळ.

श्री. दि. वि. काळेः- (८) सामाजिक व आर्थिक टिपणें-हप्ता ३ रा.

श्री. प्रो. द. वा. पोतदारः- (९) शेख महमंदाची रसाळ व उद्बोधक कविता.

श्री. द. वि. आपटेः- (१०) प्रो. जदुनाथ यांच्या शिवचरित्राचें परीक्षण.

प्रो. द. वा. पोतदारः- (११) कांहीं शिवकालीन व्यवहारपत्रें.

ऐतिहासिक प्रदर्शनः-

रा. शं. ग. दातेः- (३) एक पाषाणमूर्ति.

दिवस दुसरा

मिति वैशाख व. १० सोमवार (३-६-२९.)

सकाळीं ७॥ ते १०॥

निबंधवाचन (पुढें चालू)

श्री. वि. वि. देशपांडेः- (१२) प्रल्हाद निराजी व त्यांचा वंश.

श्री. शं. ना. जोशीः- (१३) वणीदिंडोरीचे युद्धासंबंधीं अस्सल पत्रव्यवहार व मुजुमदार घराणें.

प्रो. अ स. आळतेकरः-(बनारस)(१४) रामगुप्त राजाबद्दल अधिक चर्चा.

श्री. य. न. केळकरः- (१५) महादजी शिंदे यांचे मृत्यूविषयीं एक अप्रसिद्ध पोवाडा.

श्री. बाबासाहेब देशपांडेः-(१६) छत्रपति राजाराममहाराजांच्या वेळच्या स्वातंत्र्ययुद्धविषयीं पत्रव्यवहार.

श्री. य. खु. देशपांडेः- (१७) शके ११२८ मधील यादवकालीन मराठी शिलालेख.

ऐतिहासिक प्रदर्शनः—

श्री. कृ. वा. पुरंदरेः- (४) पेशवे, शाहू, सखारामबापू, पुरंदरे रामचंद्र नीलकंठ इ. चीं हस्ताक्षरें.

श्री. य. खु. देशपांडेः- (५) महानुभवी व इतर जुने ग्रंथ

दुपारीं ५॥ ते ७॥

निबंधवाचनः—

श्री. द. वा. पोतदारः– (१८) दासोपंतांबद्दल नवी माहिती व त्यांच्या ग्रंथप्रसिद्धीची योजना (हातीं आल्यास यावेळीं दासोपंतांची पंचीकरण पासोडी पाहण्यास मिळेल.)

रा. शं. ग. दातेः– (१९) बहुलीकर घराण्याची कुळकथा.

श्री. बाबासाहेब देशपांडेः–(२०) चैतन्यलीला (कृष्णदास बैरागीकृत)

श्री. कृ. वा. पुरंदरेः– (२१) सखारामबापूंची दिवाणगिरी.

श्री. य. खु. देशपांडेः– (२२) उत्तर चालुक्यांचा जयनंद येथील संस्कृत लेख.

(२३) राक्षसतागडीच्या युद्धमितीचा महानुभावीय ग्रंथांतील उल्लेख.

ऐतिहासिक प्रदर्शनः–

श्री. रा. ह. गाडगीळः– (६) जुनीं नाणीं, चित्रें.

दिवस तिसरा

मिति वैशाख व. ११ मंगळवार (४–६–२९.)

सकाळीं ७॥ ते १०॥

निबंधवाचनः– (पुढें चालू.)

चिटणीसः– शके १८५० चा कारभार– वृत्तांत; श. १८५१ चें आयव्यय-अपेक्षा-पत्रक.

श्री. य. रा. गुप्तेः– (२४) खेडचा इतिहास.

श्री. य. खु. देशपांडेः– (२५) शारदाश्रमाचे कार्याचा वृत्तांत व लीलाचरित्र, भानुविजय वगैरे महानुभावीय ग्रंथांतील देवगिरीच्या यादवाविषयीं अप्रसिद्ध ऐतिहासिक माहिती.

प्रो. बी. डी. वर्माः– (२६) महम्मद नामा– मुहम्मद आदिलशाहचा इतिहास.

श्री. का. ना. दीक्षित व श्री. द. वि. आपटेः– (२७) बर्वेकृत राज्याभिषेक कल्पतरु– (श्री शिवाजीमहाराजांचे दोन राज्याभिषेक.)

---

१ हा कार्यक्रम झाला नाहीं. २ हमा १ झाला.

दुपारीं ५ ते ७॥

प्रो. द. वा. पोतदारः– (२८) मुसलमान मराठ्यांचा एक अस्सल मुद्दा पत्ता.

श्री. ना. श्री. राजपुरोहित.

चिटणीस कर्नाटक इ.सं.मं.धारवाडः–(२९) तालिकोटची समरभूमी.

श्री. य. खु. देशपांडेः– (३०) भामचे भोसले.

श्री. स. ग. जोशीः– (३१) पेशवे यांचे पोतदारांची माहिती.

श्री. आ. ना. रा. गुंजाळः–(३२) मुक्ताबाईचें समाधिस्थान. ×

रा. सा. पां.ह्वा. कुलकर्णीः–(३३) पेशव्यांचे पोटीं तुळशीदास.

श्री. द. वा. परखुरेः– (३४) घळीं,दारीं, ठाणीं व दशमींगत वृद्ध

श्री. ज. स. करंदीकरः– (३५) कान्होजी जेध्यांच्या मुलाची जन्मपत्रिका श. १५५०.

रा. सा॓ ना. गो. चापेकरः–(३६) चिपळोणकरांचे कागदपत्र.

(३७) पेशव्यांच्या काळीं व्यापारी व गुमास्ता यांच्यामधील कायद्याच्या दृष्टीनें परस्परसंबंध.

प्रो. ओतुरकरः– (३८) इ. १६७० तील शिवाजीचें मोहाडीचें युद्ध.

श्री. बा. ल. शिंदेः–(ग्वालेर दरबार प्रतिनिधि)–(३९) शिंद्यांच्या इतिहासाचीं साधनें.

*प्रो. शेख अब्दुल कादिर सर्फराजः–(४०) Sources of Bosatin-i Salatin.

ऐतिहासिक प्रदर्शनः–

रा. स. म. जोशीः– (७) विश्वासराव पेशव्यांचें हस्ताक्षर.

× छापील प्रती वांटल्या. * चिटणिसांमार्फत.

Original from

एकोणिसावा वाढदिवस–समारंभ

मि. आषाढ शु. १ शके १८५१ रविवार ता. ७ जुलै १९२९

कार्यक्रम

सकाळ ७–१०॥

मंगलवाद्यः– चौघडा ७–७॥

श्री. चिं. वि. वैद्यः– प्रास्ताविक भाषण.

* नूतन सभासद प्रवेश, वर्गवारी इ. रीतसर कामें सकाळ दुपार चालतील.

निबंधवाचनः–

श्री. चिं. वि. वैद्यः– (१) कोंकणचे राष्ट्रकूट.

श्री. द. वि. आपटेः–
श्री. शं. ना. जोशीः– } (२) शिवशकावली.

श्री. ग. ह. खरे
प्रो द. वा. पोतदार } :— कल्याण चालुक्य जयसिंग याचा श. ९५५ मधील सोनवडचा (निजाम हैद्राबाद) ताम्रपट

चिटणीसः– १ कारभारी मंडळाची निवडणूक[1] (मतपत्रिकांवरून)
२ शोध,–लिखित,–ग्रंथालय,–नियमावलींस मंजुरीचा विचार (प्रती कचेरींत).

श्री. दि. वि. काळेः– (४) दादाजी कोंडदेव–मृत्यु.

श्री. शं. ना. जोशीः– (५) दोषपत्रें व शुद्धि–पत्रें.

श्री. कृ. वा. पुरंदरेः– (६) सखारामबापूंची दिवाणगिरी (सं. तील शिलकी निबंध).

दुपार ४–७॥

मोकळी चर्चाः– ४ ते ४॥

श्री. ग. ह. खरे
श्री. द. कृ. गोसावी } (७) आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर यांचीं शिवकालीन पत्रें.

---

१ पृ. १३ वर ह्या निवडणूक होऊन नियोजित कारभारीमंडळ दिलें आहे.

२ या नियमावली एकमतानें मंजूर झाल्या.

प्रो. द. वा. पोतदारः–(८) गारपीर–पुणें.
(९) दासोपंत–काव्याविषयीं नवीन माहिती.
(१०) कोंडे देशमुख.
(११) ठकार करिना.
(१२) गवांदे व सहस्रभोजनें.

चिटणीसः– (शिलकी कारभारी काम.)

श्री. ज. स. करंदीकरः–(१३) शके १६०२मधील ठकारांची जन्म-पत्रिका.
श्री. दि. वि. काळेः–(१४) पेशवाईतील लग्नसंबंधींचा जमाखर्च.
श्री. ग. ह. खरेः– (१५) सातारा जिल्ह्यांतील ४ शिलालेख.
श्री. स. म. दिवेकरः– (१६) रूपरामदासाचा बुद्धियोग.[1]
(१७) गीतासवाई.
डा. बाळकृष्णः– (१८) Shiwaji's Night attack on Sastakhan and interview with Afzul (from all Sources).
प्रो. द. वा. पोतदारः– (१९) दोन शिवकालीन छोटे शिलालेख.
(२०) मंडळांतील **नाणी–संग्रह** (रा. दाते एम्. ए. यांनीं लावून आणून तयार केलेली माहिती).

* या खेरीज रा. शं. गं. दाते, रा. स. गं. जोशी, श्रीमंत ग. गो. खांडेकर, इ. आपापले निबंध वाचतील.

ऐतिहासिक प्रदर्शनः– प्रो. द. वा. पोतदारः— (१) एका पेशवाई खाशाचें चित्र.
श्री.वारदः–(सोलापूर) ऐतिहासिक चित्रें.

आभार प्रदर्शन–समाप्ति.

---

१ हा कार्यक्रम झाला नाहीं.

कारभारी मंडळ, शके १८५१

अध्यक्ष

१ श्री. चिं. वि. वैद्य एम्. ए, एल्. एल्. बी. पुणें.

उपाध्यक्ष

२ श्री. सरदार खं. चिं. मेहेंदळे बी. ए. पुणें.

३ श्री. न. चिं. केळकर, बी. ए., एल्एल्. बी. पुणें.

चिटणीस

४ प्रो. द. वा. पोतदार, बी. ए. पुणें,

५ श्री. सरदार गं. ना. मुजुमदार एम्. एल्. सी. पुणें

खजिनदार

६ श्री. रा. अ. वि. पटवर्धन बी. ए., पुणें.

सभासद

७ रा. सा. ना. गो. चापेकर बी. ए., एल्एल्. बी. बदलापूर

८ श्री. रा. द. वि. आपटे बी. ए. पुणें

९ श्री. रा. स. म. दिवेकर, कल्याण.

१० श्रीमंत बाबासाहेब घोरपडे इचलकरंजीकर, इचलकरंजी.

११ ना. केशवराव कोरटकर, हैद्राबाद (दाक्षिण).

१२ श्री. सरदार चंद्रोजीराव संभाजीराव आंग्रे, ग्वाल्हेर.

१३ श्री. स. रा. बखले बी. ए. एल्. एल्. बी., मुंबई.

हिशेबतपासनीस— श्री. ग. स. मराठे, एम्. ए. ॲक्चुअरी, पुणें.

दुःखप्रदर्शन (शके १८५१)

रावसाहेब कृष्णाजी विनायक वझे हे भारतीय शिल्पशास्त्राचे अति कष्टाळु, बुद्धिमान, विवेचक आणि व्यासंगी असे संशोधक होते. त्यांच्या शोधाचें फल म्हणून पहिली व्याख्यानमाला पुण्यास मंडळानेंच करविली आणि पुढें हिंदीशिल्पशास्त्राचा पहिला ग्रंथहि मंडळाचे पुरस्कृत ग्रंथमालेंत प्रथम छापून निघाला. त्याचे पुढील खंड छापून निघणें अगत्याचें आहे. त्यांचा सर्व संग्रह मंडळांत ठेवण्यास त्यांचे आप्तांस विनंती करावी. रावसाहेब वझे यांचे मृत्यूमुळें (ता. ३१-३-२९) महाराष्ट्र संशोधनाचें मोठें नुकसान झालें आहे. त्यांची जागा तूर्त तरी भरून निघणें कठिण आहे. त्यांचे कुटुंबीयानीं जगरहाटीकडे पाहून समाधान मानिलें पाहिजे.

निवेदन

या अंकांत **श्री. न. चिं. केळकर** व **श्री. द. वि. आपटे** या उभयतांच्या सहीनें श्री छत्रपति शिवाजीमहाराजांच्या नूतनोपलब्ध जन्मतिथ्यनुसार व्हावयाच्या त्रिशतसांवत्सरिक महोत्सवाच्या वाङ्मयाविषयींची एक योजना प्रसिद्ध केली आहे. हें कार्य साक्षात् मंडळानें स्वतःचे अंगावर घेतलेलें नाहीं तरी शक्य तितक्या आत्मीयतेनें या कार्यास साहाय्य देण्याचें ठरविलें आहे; कारण या निमित्तानें श्री शिवचरित्रविषयक पुष्कळ नवीन साहित्य उपलब्ध होईल व खेरीज आजवर उपलब्ध झालेलें परंतु सूक्ष्म चिकित्सेच्या अभावीं उपेक्षिलें गेलेलें साहित्यहि परीक्षून कामीं लावितां येईल. श्री. आपटे व श्री. केळकर यांनीं पाठविलेली माहिती वाचून हें कार्य आजवर चांगलेंच रंगाला आलेलें आहे असें कोणासहि स्वच्छ दिसून येईल. उणीव असली तर एकच आहे कीं, या कार्यासाठीं जो कच्चा खर्च आधीं पाहिजे आहे तो जमविण्याची खटपट कोणा अधिकारी प्रचारकामार्फत होण्याची. संशोधन संपूर्ण होण्यासाठीं संदर्भग्रंथसंग्रह भरपूर पाहिजे आणि संचार झाला पाहिजे. तरी आमची सर्व सभासदांस व शिवेतिहासप्रेमी सज्जनांस अति कळकळीची विनंती आहे कीं **या कार्यासाठीं** अल्पस्वल्प देणगी त्यांनीं स्मरणपूर्वक पाठवावी. पुढें ग्रंथ घेण्याचीहि तयारी ठेवावी. हीं कामें पुनःपुनः होत नाहींत. शोधाचें काम म्हणजे आज कोणी संपवूं शकेल असें नाहीं, तरी संघटित बळानें आजच्यासारख्या निमित्तानें जो मेळ जमून आला आहे तशी अनुकूलता पुढें येईलच अशी खात्री नाहीं म्हणून आतांच **वेळ साधून** मदत पाठवावी. मदतीची रक्कम चिटणीस भारत इतिहास संशोधक मंडळ अ ३१४ सदाशिव पेठ या पत्त्यावर श्री शिवचरित्र वाङ्मयकार्यार्थ असें मुद्दाम लिहून पाठविली असतां आम्ही त्या मंडळाकडे पोचवूं किंवा श्री. न. चिं. केळकर यांचे नांवें वरीलप्रमाणें लिहून पाठविली तरीहि चालेल.

प्रो. अबदुल कादिर सर्फराज यांनीं चिटणीसांच्या विनंतीस मान देऊन मुद्दाम या अंकांतील बसातिने सलातीनवरील आपलें टांचण मंडळाकडे दिलें याबद्दल मंडळ त्यांचे आभारी आहे. प्रो. सर्फराज हे नेहमींच मंडळास करवेल तें सहाय्य करीत असतात हें त्यांस फार भूषणावह होय.

चिटणीस.
भा. इ. सं. मं. पुणें.

श्रीछत्रपती शिवाजी महाराजांचा

त्रिशत-सांवत्सरिक जन्मदिन-महोत्सव

(शके १८५१ फाल्गुन वा॥ ३, इ. स. १९३० मार्च १७)

इ. स. १९१६ मध्यें लोकमान्य टिळकांनीं जेधे शकावली प्रसिद्ध केल्या-पासून लोकांपुढें आलेल्या श्रीछत्रपतींच्या नव्या जन्मतिथीप्रमाणें पहिला सार्वजनिक जन्मोत्सव शिवनेरी येथें इ. स. १९२५ मध्यें (शके १८४६ फाल्गुन वा॥ ३) साजरा करण्यांत आला. त्यापुढें पांचच वर्षांत ह्या जन्मतिथीला तीनशें वर्षें होण्याचा सुयोग यावयाचा असल्यानें त्या दिवशीं त्रिशतसांवत्सरिक जन्मदिन-महोत्सव सर्व देशभर थाटानें साजरा करण्यांत यावा या उद्देशानें महाराष्ट्र, बृहन्महाराष्ट्र व निखिल भारतवर्ष यांतील सहानुभूति बाळगणाऱ्या प्रमुख व्यक्तींचें उत्सवमंडळ बनविण्याची खटपट श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या सहीनें करण्यांत आली. भावी उत्सवमंडळानें प्रसिद्ध करावयाच्या जाहीर विज्ञप्तिपत्रकाचा एक मसुदा नोव्हेंबर १९२८ चे सुमारास करण्यांत आला. त्यामध्यें सामान्यतः होणाऱ्या स्मारकविषयक कार्यक्रमाचे जोडीलाच शिवचरित्र विषयक साधनग्रंथ व निबंधग्रंथ छापवून काढण्याची योजना व्हावी अशी इच्छा प्रदर्शित केली होती. श्री. केळकर हे रायगड स्मारक मंडळाचे चिटणीस असल्यामुळें त्यांनीं त्या मंडळाकडे जमा होणाऱ्या निधीच्या व्याजाची अर्धी रक्कम म्हणजे सुमारें २५०० रु. या सुचविलेल्या वाङ्मयप्रकाशनाचे कामीं खर्च करण्याची परवानगी आपल्या सहकाऱ्यांकडे मागितली व त्यांनीं ती उदारपणानें दिली. यामुळें भावी उत्सव-मंडळाचे कार्याला प्रत्यक्ष सुरवात होऊन उत्सवमंडळ बनविण्याचेंही काम डिसेंबर पुढें झपाट्यानें चालू होऊन जानेवारी १९२९ अखेर सुमारें ८७ चे वर महाराष्ट्रीय व भारतीय पुढाऱ्यांच्या सह्या झाल्या. (पहा केसरी १९।२।२९, मराठा व इतर वर्तमानपत्रें). या पूर्वींच जानेवारी १९२८ पासून श्री. चिंतामणराव वैद्य-प्रभृति मंडळींनीं श्रीशिवचरित्रविषयक संशोधनाचेच कार्याकरितां विशेषनिधि म्हणून कांहीं संस्थानिक व उदार धनिकांकडून सुमारें सातशेंपंचवीस रुपये जमवून त्यांतून अस्सल कागदपत्रांचे संशोधनाकरितां प्रवासखर्च वगैरे करण्यास सुरवात केली होती. ही रक्कम भारत इतिहास संशोधक मंडळाचे कार्यकर्त्यांचे वतीनें किंबहुना श्री. वैद्य यांचे स्वतःचे आंकड्यापासून सुरवात होऊनच उभारली होती. व संशोधनाचें मुख्य केंद्र मंडळच असणें अपरिहार्य होतें. अडीच हजार रुपयांची

एवढी मोठी रक्कम एकदम उभारण्याचें काम हें रायगड स्मारक कमीटीचे सहानुभूतीमुळेंच झालें, नव्या तिथीप्रमाणें येणारा तीनशें वर्षांचा शिवजन्मदिवस मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचें महाकार्यहि त्यांच्याच नित्यक्रमानुसार व त्यांच्याच विद्यमानें व्हावयाचें जुळून आल्यामुळें उपरिनिर्दिष्ट वाङ्मयप्रकाशनाचें काम भारत इतिहास संशोधक मंडळ व रायगड स्मारक मंडळ यांच्याच सहकार्यानें होणें अत्यंत उचित आहे. तसें उभय संस्थांनीं ठरवून नवीन झालेल्या उत्सव मंडळाचें विशेष कार्य म्हणून वाङ्मय-प्रकाशनाचे पूर्वतयारीकरितां जानेवारी १९२९ पासून व्यवस्थितपणें कार्याला सुरवातही केली आहे.

श्री. न. चिं. केळकर रायगड स्मारक मंडळाचे चिटणीस हेच नव्या मंडळाचे चिटणीस आहेत. कचेरीचा पत्ता त्यांचेच घरचा असून संशोधन कार्य भारत इतिहास संशोधक मंडळाचे मंदिरात चालतें. तेथें शिवचरित्रोपयोगी उपलब्ध वाङ्मयाचा संग्रह करून तो अभ्यासाकरितां खुला ठेविला आहे. येथील संशोधनकार्याचे मुख्य मार्गदर्शक श्री. दत्तात्रय विष्णु आपटे हे असून त्यांचेबरोबर श्री. शंकरराव जोशी व श्री. ग. ह. खरे हे नित्य काम करितात. नवीन श्रीसमर्थ विद्यालयांतील श्री. दि. वि. काळे यांचीही नेमणूक गेल्या जानेवारीपासून या कामाकडे झाली आहे. त्याशिवाय श्री. पुरंदरे, देशपांडे, परांजपे आदिकरून मंडळी येथें राहून संशोधनकार्य करीत असतात. शिवचरित्रविषयक संशोधनांत लक्ष घालणाऱ्या विद्वानांचें साहाय्य ह्या वाङ्मय-प्रकाशनाचे कामीं किती आहे हें निबंधलेखकांची संपूर्ण यादी पाहिल्यानें लक्षांत येणारें आहे.

जानेवारींत कचेरीचें काम सुरू झाल्यापासून प्रथम उत्सवमंडळाचे जाहीर विनंतिपत्रकांवर सह्या मिळवून उत्सवमंडळ बनविणें, वाङ्मयप्रकाशनाची योजना अवलोकनार्थ पाठवून विद्वान् इतिहासभक्तांची सहानुभूति मिळविणें, विद्वानांकडून निबंधलेखन, साधनार्जन व ग्रंथसंपादन वगैरे बाबतींत सहकार्य प्राप्त करून घेणें व शिवाय ग्रंथलेखनाची पूर्व तयारी करण्याचे दृष्टीनें अभ्यासाचें पाऊल शक्य तितकें पुढें टाकणें इत्यादि कामें यावच्छक्य करण्यांत आलीं. या सर्व बाबतींत वर सांगितलेल्या मंडळीखेरीज पुण्यांतील विद्वानांचें फार साहाय्य झालें आहे. विशेषतः प्रो. वा. गो. काळे, प्रो. पोतदार, प्रो. दांडेकर, प्रो. कुंभारे, श्री. बाबासाो देशपांडे यांचा उल्लेख मोठ्या गौरवानें केला पाहिजे. या कार्यांत वरील विद्वानांशिवाय श्री. ज. स. करंदीकर, श्री. आबासाहेब मुजुमदार, श्री. वि. द. घाटे, श्री. रं. द. वाडेकर, श्री. स. म. दिवेकर, स. ग. जोशी प्रभृति मंडळीचेंहि सहकार्य नेहमीं मिळूं शकतें. ह्या वाङ्मय प्रकाशनाचे कार्याबद्दल पर्व विचार करण्याकरितां या मंडळींच्या एक दोन सभा होऊन त्यांत

निबंधाच्या विषयांची नामावळी, लेखनाचा कार्यक्रम, लेखकांना देतां येणारी मुदत वगैरे गोष्टींचा विचार होऊन लेखकांनीं आपले निबंध जुलै १९२९ अखेरपर्यंत तरी पाठवावे वगैरे, व स्वतंत्र लिखाणाचे बाबतींत जरूर तेथें एकसूत्रीपणा आणण्याकरितां श्री. न. चिं. केळकर, प्रो. वा. गो. काळे व श्री. ना. गो. चापेकर अशा तिघांचें संपादकमंडळ असावें असें ठरलें.

या मंडळाकडून आजपर्यंत झालेलीं कामें या स्वरूपाचीं आहेतः– बखरी व अस्सल साधन ग्रंथांच्या नाना प्रकारच्या सूची तयार करणें. अस्सल पत्रांची मितीवार व विषयवार जंत्री तयार करणें; विश्वसनीय पत्रांवरून व इंग्रजी, डच, पोर्तुगीज वगैरे साधनांवरून संपूर्ण व साधार शकावली व उतारे तयार करणें; कांहीं फारशी शिवकालीन पत्रांचा उलगडा करणें; शिवकालीन अस्सल कागदपत्र मिळविणें व नक्कलून घेणें, शिवकालीन पन्नास वर्षांची जंत्री तयार करणें; निबंध-लेखकांशीं पत्रव्यवहार करणें; जरूर ती ग्रंथसामुग्री मिळविणें व अभ्यासणें इत्यादि.

ह्या कार्याची जागृती राखण्याकरितां व येथें झालेला अभ्यास लोकांपुढें मांडण्याकरितां आठवड्यांतून दोन दिवस (बुधवार व गुरुवार सायंकाळीं) श्रीशिव-चरित्र--चर्चामंडळाच्या सभा भरविल्या जातात. बुधवारीं कांहीं तरी तात्विक चर्चा व गुरुवारीं ऐतिहासिक प्रसंगासंबंधीं चर्चा होत असते. या चर्चा-मंडळाची जाहिरात स्थानिक वर्तमानपत्रांतून येते. त्याशिवाय येथील कॉलेजें व हायस्कुलें यांचेकरितां आमंत्रणपत्रकें प्रथम पाठविलीं होतीं. आजपर्यंत चर्चामंडळाच्या सुमारें तीस सभा झाल्या. उपस्थित श्रोत्यांची संख्या १५ ते ४५ पर्यंत असे. पैकीं इतिहास, थोरव्यक्ति, शिवकालीन आर्थिक परिस्थितीचा अभ्यास, शिवकालीन संत, स्वराज्याकरितां स्वराज्य अशी कल्पना शिवकालांत होती काय ?, डच भाषेंतील शिवकालीन अस्सल साधनें, श्रीसमर्थ व शिवराय यांचे भेटीचें (१५७१) बलवत्तर भौगोलिक प्रमाण वगैरे तात्त्विक दृष्ट्या विचाराच्या १० सभा झाल्या; व राहिलेल्या २० सभांत शिवचरित्राचा एक एक भाग घेऊन साधार चर्चा झाली. या चर्चेमध्यें प्रो. काळे, श्री. स. तात्यासाहेब मेहेंदळे, श्री. नानासाहेब वैद्य, श्री. वा. सी बेंद्रे, प्रो. कुंभारे, प्रो. दांडेकर, प्रो. पोतदार, श्री. बाबासाहेब देशपांडे, वाडेकर, दा. वि. गोखले, ज. स. करंदीकर, श्री. भिडे-शास्त्री, श्री. शंकरराव देव इत्यादि प्रमुख मंडळींनीं भाग घेतला.

(१) अस्सल साधनांचा शोध केव्हांही पुरा व्हावयाचा नाहीं. श्री. कृष्णा-जीपंत पुरंदरे, श्री. शंकरराव जोशी व श्री. स. ग. जोशी ह्यांची मावळ, देश वगैरे प्रांतांत हिंडून उपयुक्त कागदपत्र मिळविण्याचे बाबतींत अखंड खटपट चालू आहे. बहुतांशीं यांनींच मिळविलेल्या कागदपत्रांचा शिवचरित्र साहित्य खंड २

१८ शिवकालीन टांकसाळी व नाणी — श्री. ना. गो. चापेकर.

१९ शिवकालीन अमलदार — श्री. शं. ना. जोशी.

विभाग ३–इतर

१ प्रो. चिं. गं. भानू–अफझुलखानावरील उदास याचा पोवाडा.

२ श्री. स. आबासाहेब मुझुमदार–फारशी फर्मानें.

३ श्री. वा. आ. देशप्रभु (गोवा)–शिवाजी राजा कीं बादशहा.

४ V. R. R. Dikshitar (मद्रास) तंजावर मधील तामील हस्तलिखितांवरून श्रीशिवचरित्रावर पडणारा प्रकाश (इंग्रजी लेख).

५ श्री. यशवंत खुशाल देशपांडे—शिवकालीन विदर्भ.

६ प्रो. पांडुरंग वामन काणे (मुंबई)–गागाभट्ट.

७ प्रि. गोविंद चिमणाजी भाटे–राजधानी रायगड.

८ श्री. यादव माधव काळे—शिवजन्मतिथि.

९ श्री. भास्कर वामन भट (धुळें)–१ छत्रपतींची तळकोंकणवरील स्वारी. २ स्मृतिधर्मांतर्गत शिवकालीन प्रायश्चित्त विधि–३ शिवकालीन महाराष्ट्रीयांच्या मनोरचनेच्या स्थित्यंतराचा इतिहास.

Digitized by Google — Original from UNIVERSITY OF MICHIGAN

. ना. गो. चापेकर.
श्री. शं. ना. जोशी.

िवाडा.

बादशहा.
ठ तामील हस्तलिखि-
लेख).

ोकणवरील स्वारी.
वकालीन महाराष्ट्री-

Digitized by Google
Original from UNIVERSITY OF MICHIGAN

BHĀRATA I

Vol. X.]

भारत-

१० वर्ष] आषा

दत्तो व

गंगाधर

वार्षिक वर्गणी

Annual Subscrip

Printed by Ana

House No. 936

Messrs. Datt

Muju

Tyaimasika

BHĀRATA ITIHĀSA SANSHODHAKA MANDALA.

Vol. X.] **QUARTERLY** [No. II

GCAD
DS
403
.B43
v.10
no.2

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

त्रैमासिक.

१० वर्ष] आषाढ ते भाद्रपद श. १८५१ (जुलै-सप्टेंबर १९२९) [अं. २

UNIV of MICH.

JAN 10 2003

STACKS

संपादक व प्रकाशक :

दत्तो वामन पोतदार, बी. ए.

गंगाधरराव नारायणराव मुजुमदार, एम. एल. सी.

चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

वार्षिक वर्गणी रु. ३   ट. हं वगैरे निराळें.   फुटकळ अंक १२ आणे

Annual Subscription Rs. 3.   Postage &c. Extra.   Each No. As. 12

Printed by Anant Vinayak Patvardhan at the Aryabhushan Press House No. 936/2 Bhamburda Peth, Poona City and published by Messrs. Datto Waman Potdar and Gangadharrao Narayanrao Mujumdar at 314- Sadashiv Peth, Poona City.

माहिती केवळ त्यांच्या नांवापुरतीच आहे. त्यापासून पुढील माहिती मात्र बरीच उपलब्ध आहे. पांचवी पिढी कृष्णाजी नानो यांची. कृष्णाजी नानो हे इ. स. १६६३ त वारले. त्या अगोदर ८।१० वर्षे ते आपल्या कर्त्या झालेल्या पुत्रावर लौकिक कामगिरीचा बोजा टाकून ते महायात्रेस गेले होते. यावरून कृष्णाजी नानो यांचा जन्म इ. स. १६०० च्या सुमारास झाला असावा असें माझें अनुमान आहे. व या अनुमानास धरूनच पहिलें अनुमान केलें आहे.

इ. स. १६३० च्या अगोदर कृष्णाजी नानो यांचे चिरंजीव हरी कृष्ण यांचा जन्म झाला. वर सांगितलेंच आहे कीं, पुत्र कर्ते झाल्यावर त्यांच्यावर देशपांडेपणाची कामगिरी सोंपवून कृष्णाजी नानो हे यात्रेस वाराणसीस गेले. मागें हरीपंत कारभार पाहूं लागले. कित्येक दिवसांनीं हिशेबाचा झाडा देण्यासाठीं रा. हरीपंत औरंगाबादेस गेले. हल्लींच्यासारखी व्यवस्था त्या काळीं नसल्यामुळें देशपांड्यांच्याकडे बाकया वर्ष वर्ष थकलेल्या असत. व बाकीच्या फेडीकरतां देशपांड्यांना कैद भोगावी लागत असे. हरीपंतांना औरंगाबादेस नेण्याचे बाबतींत, कागदांत दुमत आहे. एका हकीकतींत त्यांस कैद करून नेलें असें आहे तर दुसऱ्यांत त्यांना तेथें गेल्यावर कैदेंत टाकलें असें म्हटलें आहे. अवरंगाबादेस त्यांना जबर व्यथा जडली व तेथून देशीं परत येणें अशक्य झालें.

जुन्नरच्या देशपांड्यांच्या वतनावर यापुढें जो मोठा वाद माजला त्याला सुरवात रा. हरी कृष्ण यांच्या अवरंगाबादच्या दुखण्यापासून झाली. तेथें काय हकीकत घडली हें बिनधोकपणें प्रत्येकजण आपआपल्या पक्षाच्या हिताकांक्षेनें सांगतो. त्यांतून खरी कोणती हें ठरविणें अवघड आहे. तथापि साधक बाधक प्रमाणावरून पहातां सध्यां जो वंश जुन्नरला आहे त्यांच्या पक्षाची हकीकत जास्त विश्वसनीय असावी असें माझें मत आहे.

रा. हरी कृष्ण हें इ. स. १६५५ च्या सुमारास अवरंगाबादेस आजारी पडले. तेव्हां त्यांनीं गुमास्त्यांस जवळ बोलावून सांगितलें कीं, आमचा आतां भरंवसा धरवत नाहीं. केव्हां अंत होईल याचा नेम नाहीं. तुम्हीं वाडेकरांपैकीं (म्हणजे तर्फ वाडे येथील देशपांड्यांपैकीं; देशपांडे म्हणजे राघो नरसिंहाच[illegible] मुलाचा वंश.) दोनतीन मुलें चांगलीं पाहून त्यांपैकीं एक निवडून त्यास दत्त[illegible] द्यावा. अशी निरवानिरव स्वहस्तें केल्यावर ते अवरंगाबादेसच निवर्तले. हरिप[illegible] निवर्तल्याची हकीकत रा. कृष्णाजी नानो यांना वाराणसी येथें कळली. तेव्हां [illegible] जुन्नरास परत आले व आपल्या हातानें वाडेकर देशपांडे यांपैकीं नारो विठ[illegible] वाडेकर यांचा पुत्र त्रिंबक, सुमारें बारा तेरा वर्षांचा होता. त्यास, हरी कृ[illegible]

यांची वडील स्त्री गोमतीबाई ऊर्फ गोमाई इचे मांडीवर दत्तक दिला. व अवरंगाबादेस जाऊन त्याचे नांवानें म्हणजे त्रिंबक हरी या नांवानें सनदा, अधिकारपत्रें वगैरे करून आणिलीं. रा. हरी कृष्ण मेल्यानंतर कृष्णाजी नानो हे आठ वर्षे जिवंत होते. ते इ.स. १६६३ मध्यें मृत्यु पावले. (अशा सनदेची नक्कल कागदांत आहे.)

ही हकीकत वाडेकर देशपांडे यांच्या पक्षाच्या कागदांतील. आतां अफ-लाद देशपांड्यांची हकीकत देतों. प्रल्हाद निराजी प्रतिनिधींचा संबंध जुन्नरकरांचे अफलाद (म्हणजे मुलीचा वंश) म्हणून पोहोंचतो.

रा. कृष्णाजी नानो यांना सिऊबाई नांवाची एक कन्या होती. ती शंकराजी राउजी, निराजी राउजी यांचे सख्खे बंधु, यांस दिली होती. तिला एक पुत्र होता. त्याचें नांव माणकु असें होतें. तो या सुमारास ८।१० वर्षांचा होता. रा. हरीकृष्ण औरंगाबादेस आजारी पडले असतां त्यांनीं गुमास्त्याकडून सिऊबाईस पुत्रासह औरंगाबादेस आणविलें. व तिच्या पुत्रास आपले मांडीवर घेतलें. स्वतःचें पागोटें त्याच्या डोक्यास घालून त्याचें नांव त्रिंबक ठेविलें. येथें पुन्हां दोन पक्ष उद्भवतात. माणकूस दत्तक घेतलें कीं वतन अफलादीस बक्षीस दिलें ? दत्तक घेतलें म्हणावें तर त्यानें किंवा त्याच्या वंशजांनीं विष्णुवर्धन हें स्वतःचें गोत्र सोडून गौतम गोत्र कधीं लाविलें नाहीं. बरें, त्यांच्या घराण्यांत दत्तक बक्षीस दिलें म्हणावें तर माणकू नांव बदलून त्रिंबक नांव ठेवण्याचें कारण काय ? म्हणून या हकीकतींत विसंगतता दिसते. असो. ह्या हकीकतीप्रमाणें पुढें आठ दिवसांनीं रा. हरी कृष्ण वारले व सिऊबाई मुलास घेऊन जुन्नरास परत आली. वरीलप्रमाणेंच घडलेली हकीकत रा. कृष्णाजी नानो यांस वाराणसी येथें कळली तेव्हां ते परत आले, व त्यांनीं वतन मुलीच्या मुलास बक्षीस दिलें, याबद्दल आनंद प्रदर्शित करून त्यास वतनावर स्वहस्तें अधिष्ठित केलें; व लागणाऱ्या सनदा व अधिकारपत्रें अवरंगाबादेहून आणविलीं.

इ. स. १६६० च्या आरंभीं शाइस्तेखान दक्षिणेंत आला. शंकराजी राउजी हे शिवाजी राजे यांच्या पक्षाचे, तेव्हां सिऊबाईस जुन्नरांत राहणें धोक्याचें असें वाटून मुलास घेऊन ती नवऱ्याकडे गेली. पुन्हा तिचें किंवा मुलाचें जुन्नरास येणें घडलें नाहीं. तेव्हां रा. हरी कृष्ण यांची वडील स्त्री गोमाई इला गुमास्त्यानीं असें भासविलें कीं, वतनाचा वारस हा शिवाजी राजाचा चाकर आहे; असें पाहून मोगल वतन बुडविल्याखेरीज राहणार नाहीं. तेव्हां वतनास कोणी तरी तात्पुरता वारस उभा करावा. म्हणून गोमाईनें वाडेकराचा मुलगा त्रिंबक हा वतनाचा तात्पुरता वारस म्हणून पाहिल्या त्रिंबकास प्रतिमा उभा केला. पुढें कांहीं दिवसांनीं हा प्रतिमा त्रिंबकच वतन बळकावून बसला.

येथपर्यंत दिलेली हकीकत आफलाद पक्षाच्या कागदांतील. रा. कृष्णाजी नानो इ. स. १६६३ त वारल्यावर वतनावर अनेक घोटाळे माजले; त्याचें येथें थोडक्यांत दिग्दर्शन करतों.

रा. कृष्णाजी नानो यांची स्त्री बकाई इनें आपल्या धाकट्या सुनेच्या (रा. हरीकृष्ण यांची धाकटी स्त्री सोयराई इच्या) संमतीनें गोविंद विठल वाडेकर देशपांडे याचा पुत्र रायाजी यास आपल्या मांडीवर दत्तक घेतलें. अशा रीतीनें वाडेकरांपैकींच दोघे जण दत्तक वारसा म्हणून हक्क सांगूं लागले. यांपैकीं त्रिंबक हरी हा इ.स. १६७७ मध्यें वारला. त्यास औरस पुत्र एक. त्याचें नांव हरी. त्याची आजी गोमाई ही अजून जिवंतच होती. वसुलाच्या कारभारांत गोमाई व हरी त्रिंबक देशपांडे असें नांव चालूं होतें. रायाजी कृष्ण याविषयीं कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. त्याच्याकडे वतन किंवा त्याचा कांहीं हिस्सा चालला अथवा नाहीं याविषयीं निश्चित-पणें कांहीं सांगतां येत नाहीं.

रा. कृष्णाजी नानो यांनीं वाडेकरांचा मुलगा त्रिंबक यास रा. हरी कृष्ण दत्तक केला, याबद्दल तर्फ पाबळचे देशपांडेपण नारो विठल वाडेकर यास बक्षीस दिलें असल्याबद्दलचा उल्लेख एका कागदांत आहे.

या वेळेस कोणास किती जमीनी इनाम करून दिल्या याचा कांहींच मेळ बसत नाहीं. वतनावर वारस अल्पवयी व कारभार स्त्रियांच्या हातीं; यामुळें व वतन टिकेल असा भरंवसा बिलकूल नाहीं यामुळें निरनिराळ्या उपाध्यांना व अनेक गुमास्त्यांना वतनी जमीनी इनाम करून दिल्याचे दाखले अनेक आहेत. शिवाय वतनास कर्ज फार त्यामुळें निरनिराळ्या तर्फेचें देशपांडेपण ही सावकाराकडे गहाण पडलेलें होतें. प्रांत कर्डेनिंबोणें यांचे देशपांडेपणाचे हक्क तर या सुमारास गोमाईनें विकूनच टाकले होते. ते पुढें भगवंत कृष्ण देशपांडे यांनीं परत विकत घेतले.

याच सुमारास म्हणजे फसली सन १०९३ इ. स. १६८३ मध्यें शंकराजी विठल नगरकर प्रांत अहमदनगर याणें वतनावर बखेडा केला. मोगलाईमध्यें वतन आपलें म्हणून म्हणवूं लागला व वसूलवासलात स्वतः करूं लागला. तेव्हां त्यास खोटा ठरविण्याकरितां त्रिंबक हरीची स्त्री द्वारकाबाई नातवास घेऊन अवरंगजेब याच्या लष्करांत गेली व तेथें सुमारें पांच वर्षें खटपट करून तिनें आपला हक्क वतनावर शाबीत करून घेतला. नंतर फ. स. ११०९ मध्यें हरी त्रिंबक वारले. त्यांची स्त्री सखुबाई इजला गोमाई इनें दोन दत्तक पुत्र घेऊन दिले. एक कृष्णाजी हरी हा परगोत्री अकोळकरांपैकीं घेतला.त्यामुळें स्वगोत्री जे वाडेकर देशपांडे त्यांचा राग झाला. त्यामुळें त्यांचा त्रिंबक नांवाचा पुत्र सखुबाईच्या मांडीवर दत्तक म्हणून

दिला. वतनावर नांव सखाई व कृष्णाजी व त्रिंबक हरी असें चाललें. ही हकीकत इ. स. १७०० मधली आहे.

इकडे प्रल्हाद निराजी यांचा चुलत बंधु शंकराजी राऊजी यांचा पुत्र जो रा. हरी कृष्ण यांनी दत्तक घेतला होता, त्याचें वतनावर येणें पुन्हां घडलें नाहीं. एका कागदामध्यें रा. निराजी राऊजी हे शिवाजीमहाराजांच्या पूर्वी वारले असा उल्लेख आहे. पुढें त्यांचे चिरंजीव प्रल्हाद निराजी हे संभाजी राजे यांजपाशीं न्यायाधिशी करीत होते. रा. त्रिंबक हरी ऊर्फ त्रिंबक शंकर ह्मी राजश्री संभाजी राजे यांजपाशीं मातबर रोजगार करून होते. याबेळेस प्रल्हादपंत प्रतिनिधी व त्रिंबकपंत न्यायाधिशी करीत होते. पुढें संभाजी राजे यांचा काल झाल्यावर व मोगलांनीं सर्व महाराष्ट्र व्यापल्यावर राजाराम याजबरोबर प्रल्हाद निराजी व त्रिंबकपंत हे चंदीस गेले. इ.स. १६९८ च्या सुरवातीस राजाराम महाराज वेढ्यांतून पळून सिंहगडास आले. मागें जे लोक राहिले होते ते झुलफिकारखानानें पकडून औरंगजेब बादशहाकडे पाठविले. कैद केलेली मातबर एकंदर ४२ मंडळी होती. त्यामध्यें त्रिंबकपंत एक होते. त्यांचें वय त्यावेळेस सुमारें ४५ वर्षांचे होते. हे प्रल्हाद निराजीचे चुलत बंधु म्हणून सर्वांच्या बरोबर शके १६२० बहुधान्य संवत्सरीं आषाढ शु. १२ शनिवार ९ जुलै १६९८ स यांचीही गर्दन ब्रम्हपुरीस औरंगजेबानें मारिली. इकडे वेढा पडण्याचे सुमारास प्रल्हादपंत आपले चुलतबंधु त्रिंबकपंत यांस म्हणाले कीं, 'आपणा देखतां चंदीस वेढा पडला परिणाम उत्तम दिसत नाहीं. कोणची वेळ कसी येईल त्याचा भरंवसा नाहीं. त्यास आमचा पुत्र चिरंजीव रामचंद्र तुमचे वोटींत घातला. तर याचा व्रतबंध तुम्ही आपल्या मांडीवर करणें.' त्याप्रमाणें रामचंद्र प्रल्हाद याची मुंज त्रिंबकपंताचे मांडीवर प्रल्हाद निराजी यांच्या समक्ष जाली. प्रल्हाद निराजी यांचे शेवटीं डोळे गेले होते. ते पातशहानीं काढवले होते कीं काय याचा स्पष्ट खुलासा कागद फाटल्यामुळें होत नाहीं. प्रल्हाद निराजी जिंजी पडण्यापूर्वी रामेश्वर यात्रेस म्हणून गेले. तिकडेच ताम्रपर्णी नदीतीरीं शांत झाले. ही गोष्ट इ.स. सुमारें १६९७ च्या अखेरीस घडली.

त्रिंबक हरी यांना औरस पुत्र नव्हता; एक कन्या मात्र होती. तिचें नांव बयाबाई. ती रा. कृष्णाजी अनंत (सभासद?) हिरेपारखी गोत्र काश्यप हे प्रल्हाद निराजी यांची मुतालिकी करून होते त्यांचे पुत्रास दिली होती. त्या मुलाचें नांव सिद्धेश्वर. बयाबाईस विठलपंत उर्फ विठोबा नांवाचा एक मुलगा होता. ही बयाबाई व विठोबा हे त्रिंबक हरी यांची स्त्री पार्वतीबाई इजजवळच होते. तसेच पार्वतीबाईजवळ विष्णुवर्धन गोत्री म्हणजे स्वगोत्री रघुनाथ भोजराज म्हणून एक मुलगा पुत्रत्वेंकरून होता. त्यापैकीं विठोबा हा अफलादीचा अफलाद म्हणून त्यास

जुन्नरकर देशपांडे वतनापैकीं चौथी तक्सीम व कान्हेवाडी हा इनाम गांव त्रिंबक-पंतांनीं करून ठेविला होता. आतां बाकीच्या वतनावर हक्क सांगणारे असें अफ-लादी पैकीं दोघेजण निघाले. एक रामचंद्र प्रल्हाद व दुसरा रघुनाथ भोजराज. पैकीं आतां पहिल्याप्रथम रामचंद्र प्रल्हाद यांची तकरीर सांगतों.

अवलाद देशपांड्यासंबंधीं त्यांचें म्हणणें वर सांगितलेंच आहे कीं, वाडेकर हे देशपांड्याचे गुमास्ते असून त्यांचा मुलगा केवळ प्रतिमा म्हणून वारस उभा केला होता. त्याचा कोणच्याही प्रकारें वतनावर खरा हक्क नाहीं. रा. हरी कृष्ण यांनीं वतन अफलादीस बक्षीस दिलें व ते रा. कृष्णाजी नानो यांनीं मोकरर केलें. रघुनाथ भोजराज ह्यासंबंधीं रामचद्र प्रल्हाद ह्याचें म्हणणें असें. यास रामचंद्र प्रल्हाद त्रिंबक पंतांनीं स्वतः प्रल्हाद निराजी जिवंत असतां दत्तक घेतले. तदनंतर ते दोघे निवर्तल्यावर पार्वतीबाईनें रघुनाथ भोजराज यास केवळ अनाथ म्हणून जवळ केले. त्यास दत्तक म्हणून घेतल्याचा दाखला नाहीं. व त्याचा भाऊ गोपाळ भोजराज हा केवळ एक वतनावरचा गुमास्ता आहे. हे वतनाचे वारस नसून वतनाचे चाकर आहेत. इत्यादि.

रघुनाथ भोजराज किंवा त्याचा दत्तक पुत्र कृष्णाजी रघुनाथ यांचें म्हणणें कीं, रामचंद्र प्रल्हाद यांस त्रिंबकपंतांनीं दत्तक घेतले असेल तर आपल्यास पार्वतीबाईनें घेतलें आहे. आपला भोगवटा आज बहुत दिवसांचा आहे. रामचंद्र प्रल्हाद हे खरे वारस असते तर वतनाविषयीं इतके निष्काळजी न वागते. आपण वतनाचें संरक्षण करण्याकरितां कर्ज केलें आहे. म्हणजे कर्ज काढून वतन संरक्षिलें आहे. इत्यादि.

या दोघांनाही आक्षेप घेणारे तिसरे वाडेकरांचे दत्तकपुत्र होतेच. यावेळींहि घालमेल इतकी घोटाळ्याची झाली कीं, कोणाचाही हक्क शाबीत होण्याची गोष्ट दूरच राहिली; परंतु जो जो ज्या ज्या ठिकाणीं वतन उपभोगीत होता तो त्या ठिकाणीं बळकट होऊन बसला. गुमास्ते देखील स्वतः वतनास वारसदार होऊन बसले. गुमास्ते, मालक बलहीन झाल्यावर कसे बेगुमानपणें वागतात याचीं दोन उदाहरणें येथें देण्यासारखीं आहेत. रा. कृष्णाजी नानो यांनीं वाडेकराचा मुलगा आपल्या हस्तें वतनावर मुकरर केल्यावर ज्या गुमास्त्यानें सिऊबाईचा पुत्र माणकू यास वतनावर आणण्याचें ठरविलें होतें; त्यास सिऊबाई म्हणाली कीं, तुम्ही माझा उपहास केलात. माझ्या मुलास वतन मिळत नाहीं. तेव्हां गुमास्ता म्हणाला; या वृद्धानें आमचें ऐकलें नाहीं तर तो असा कितीक दिवस टिकणार आहे ! हा गेल्यावर त्याच्या वारसास उधळून देऊं. तुम्ही आपल्या मुलाचें नांव माणकू आहे ! तें त्रिंबक ठेवा म्हणजे साधन करण्यास उपयोगी पडेल.

दुसरें उदाहरण म्हणजे भोजराज महादेव यांचें. यांच्या दोन मुलांपैकी वडील रघुनाथ भोजराज यास पार्वतीबाईनें निराश्रीत म्हणून जवळ केला. दुसरा गोपाळ भोजराज यास खेड येथें वतनावर गुमास्ता म्हणून ठेविला. पुढें पार्वतीबाईचें म्हातारपण झालेसें पाहून व रामचंद्र प्रल्हाद वतनावर येत नाहीं असें पाहून, गोपाल भोजराज यानें आपला मुलगा कृष्णा हा रघुनाथ भोजराज याच्या मांडीवर देऊन रघुनाथ भोजराज हा मृत्यु पावल्यानंतर कृष्णाजी रघुनाथ सर्व वतनाचा वारस म्हणून जाहिर केलें व आपण त्यांचे गुमास्ते म्हणून काम पाहूं लागला.

शाहू महाराज हिंदुस्थानांतून स्वराज्यांत आल्यावर त्यांच्या दरबारांत रामचंद्र प्रल्हाद व त्यांचे चुलत चुलत बंधु रा. नरहर राऊजी निराजी राउजींचे सख्खे बंधु यांचे नातू बाबूराव शामराज यांची भीड मातबर होती. म्हणून त्यांनीं आपल्या मोगलच्या सनदा करून घेतल्या. येथें एक प्रश्न असा निघतो कीं, जुन्नरप्रांत सेव्हां स्वराज्यांत मोडत नसून त्याच्या सनदा शाहूनीं कशा दिल्या? याचें उत्तर असें कीं, प्रांत जुन्नर पैकीं खेड तर्फ स्वराज्यांत मोडत असे व त्या तर्फेच्या सनदा शाहूनें रामचंद्र प्रल्हादास करून दिल्या असाव्यात. असो.

अशा रीतीनें वाद न मिटतां जो तो आपआपल्या ठिकाणीं प्रबळ होऊन बसला व दुसऱ्या ठिकाणचें वतन त्यास कांहीं मिळेना.

पुढें मोगलांचा व शाहु छत्रपती यांचा सल्ला सयद हसन अलीखान व श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांच्या मदतीनें घडून आला. त्या समयीं जुन्नरकर वाडेकरांपैकीं हे सातान्यास गेले होते. त्या वेळीं त्यानीं हा वाद उपस्थित केला. पुढें तो वाद संपण्यास आणखी बरींच वर्षे लागलीं (त्यामध्यें शेवटीं वाडेकरांचा दत्तक हा खरा ठरून अफलादीस वतन बक्षीस दिलें नव्हतें असा निकाल झाला. रा. भगवंतराव कृष्ण व त्यांचे पुत्र अमृतराव भगवंत यासही आपल्या कैफीयती याव्या लागल्या आहेत).

मागें सांगितल्याप्रमाणें जुन्नरकर देशपांडे दोघे जण कृष्णाजी हरी व त्रिंबक हरी यांपैकीं त्रिंबक हरीचे पुत्र भगवंत त्रिंबक कृष्णाजी हरी यांनीं दत्तक घेतले. त्यावेळींहि वसूलाची बरीच अडचण असल्यामुळें कृष्णाजी हरी व त्रिंबक हरी यांस मोगलांनीं शिवनेरी किल्ल्यांत कैदेंत ठेविलं होते. रा. त्रिंबक हरी कैदेंतून सुटून फ. स. ११४५-४६ इ. स. १७३५-३६ मध्यें खेड येथें मृत्यु पावले. तेव्हां त्यांची क्रिया करण्यास फार अडचण पडली. भगवंत कृष्ण हे कैदेंत होते. त्यांनीं आपल्या बायकोस किल्ल्यांत ओलीस म्हणून ठेवून घेतली व वडिलांची क्रिया केली. तसेच श्रीमंत आपासाहेब वसईस जातांना यांना भेटण्याकरितां

म्हणून आले होते. परंतु भगवंत कृष्ण कैदेंत असल्यामुळें भेट होईना. तेव्हांही खीस किल्ल्यांत ओलीस ठेऊन त्यांनीं आपासाहेबांची भेट घेतली.

रा. भगवंत कृष्ण फ. स. ११७६ इ. स. १७६६ मध्यें वारलें. पुढें अमृतराव भगवंत काम पाहूं लागले. ह्यांच्या कारकीर्दींत फ. स. ११९० इ. स १७८० मध्यें बहुधा हा दत्तकाचा वाद मिटला असावा असें वाटतें. त्यापासून पुढें आतांपर्यंत रा. अमृतराव भगवंत यांचेच वंशज जुन्नरचे देशपांडे म्हणून आहेत. परंतु पूर्वीच्या चार प्रांताच्या देशपांडेपणापैकीं कोणते प्रांत कसकसे गेले याचा स्पष्ट खुलासा होत नाहीं. प्रांत पारनेर इंग्रजसरकारनें इ. स. १८६२ च्या दत्तविधानाच्या वेळेस खालसा केला व त्या अगोदरच प्रांत बेल्हे हा जुन्नर तक्षिमेंतून गेला असावा असा कयास आहे. इ. स १८६३ सालीं जुन्नरचे देशपांडेपण म्हणजे कामगिरी ती देशपांड्याच्या पासून काढून घेऊन वतन खालसा करून टाकलें व आतां जुडी घेऊन राहिलेलें उत्पन्न त्यांच्या वांट्यास येत असतें.

या निबंधांत ठिकठिकाणीं ज्या ज्या घराण्या विषयीं माहिती आली आहे, त्यांच्या उपलब्ध वंशावळी शेवटीं नोंदल्या आहेत.

शेवटीं हा निबंध लिहण्याला दत्तोपंत आपटे व कृष्णाजीपंत पुरंदरे यांनीं मदत केली याबद्दल त्यांचे आभार मानतो.

जुन्नर देशपांडे-वंश (गोत्र गोतम)

राघोजी नरसिंह (इ. १५०० जन्म)— १ माऊजी, २ गणेश.

१ माऊजी तान्हाजी—आपाजी—नानाजी—कृष्णाजी नानो.

कृष्णाजीनानाजी=यकाई (इ. १६००– १६६३)—हरि व सिऊबाई.

हरीकृष्ण[१] (ज. इ. १६२५–४० मृ. १६५५)–त्रिंबक[२]–हरी[३] (मृ.१६९९)

हरी त्रिंबक–कृष्णाजी[४] (द. आकोलकर मृ. १७३५–३६) व

त्रिंबक (द. वाडेकर मृ. १७३६)

२ गणेश राघोजी–पिलाजी–सुपरजी–राऊजी–दादाजी–गंगाजी.

(१) हरि कृष्णास ३ बायका. १ गोमतीबाई=गोमाई, २ सोयराबाई, ३ उमाबाई. (२) त्रिंबक हरीची बायको द्वारकाबाई. (३) हरि त्रिंबकाची सखुबाई. (४) कृष्णाजी हरीची बायको गिरमाबाई.

त्र्यंबक[1] हरीस-भगवंत.कृष्णाजी हरीस-भगवंत (=आबाई) द. भावाचा पुत्र मृ. १७६६. त्यांस पुत्र अमृतराव (भागिरथी) इ. १७६१-१८३०. त्यास पुत्र कृष्णाजी (राधाबाई) इ. १७९५-१८००. नारायण कृष्णाजी (लक्ष्मी मृ. १९००)- १८२२-४६.अमृतराव कृष्णाजी द. वाडेकर (यमुनाबाई) मृ.१८९१.

सिऊबाईस पुत्र शंकराजी राऊजी-इ. १६४२-४३-१६७७

प्रल्हाद निराजी-वंश (गोत्र विष्णुवर्धन).

गोविंदपंत-राऊजी व गोपालपंत.

राऊजी गोविंद-निराजी, शंकराजी व नरहर.

निराजी राऊजी-प्रल्हाद[2] (मृ. १६९७)-रामचंद्र-प्रल्हाद-शिवराम.

शंकराजी राऊजी=(सिऊबाई)-माणकू ऊर्फ त्रिंबक (पार्वतीबाई)-मृ. १६९८-रामचंद्र प्रल्हाद द. व रघुनाथ भोजराज द.

रघुनाथ माणकू-कृष्णाजी गोपाल द. (यांचा वंश सांप्रत खेड येथें आहे.)

नरहर राऊजी-शामजी-बाबुराव (हे दुर्जनसिंगाचे दिवाण.)

गोपाल गोविंद-महादाजी-भोजराज.

भोजराज महादेव-रघुनाथ (हे त्रिंबक शंकराचे मांडीवर) व गोपाल (हे रघुनाथ त्रिंबकास द.)

---

१२ ठकार घराण्यांतील एक पत्रिका.

(ले.- ज. स. करंदीकर).

भारत-इतिहास-मंडळाच्या संमेलनप्रसंगीं कान्होजी जेध्याचे चिरंजीव सर्जेराव जेधे यांच्या जन्मपत्रिकेवर एक टांचण वाचलें होतें. आतां यावेळीं पुण्यांतील कसब्याच्या गणपतीचे पुजारी वे. ठकार यांच्या घराण्यांतील एका जुन्या पत्रिकेवरील टांचण वाचणार आहें. सर्जेराव जेधे हे शिवाजीचे समकालीन व जोडीदार सरदार असल्यानें त्यांच्या पत्रिकेला एक प्रकारचें ऐतिहासिक महत्त्व होतें. ठकार यांच्या घराण्यांतील ज्या व्यक्तीची ही पत्रिका सांपडली आहे त्या व्यक्तीला ऐतिहासिक महत्त्व कांहीं नाहीं. तथापि या जन्मपत्रिकेची मिती शके

---

१ त्रिंबक हरि-बायका दोन उमाबाई व भवानीबाई.

२ प्रल्हाद निराजीस स्त्रिया ३- १ गोपिका, २ लक्ष्मी, ३ १ लक्ष्मीबाईपासून कन्या झाली. ती आबूराव अमात्य यांस दिली व गोपिकेचे पोटीं रामचंद्र.

१६०२ चैत्र व. ३ म्हणजे श्रीशिवाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर ३ च दिवसांनंतरची असल्यानें त्यावेळच्या पंचांगाप्रमाणें चैत्री पौर्णिमेस ग्रह कसे येत होते हें पहाण्याला ही पत्रिका एक साधन आहे, व त्या दृष्टीनें हिचा विचार शिवचरित्रप्रदीपांत केलाच आहे. तथापि जेधे यांच्या घराण्यांतील शके १५५० तील मुलाची जन्मपत्रिका आणि शके १६०२ मधील पुणें शहरांतील एका वैदिक घराण्यांतील मुलाची जन्मपत्रिका या दोहोंची तुलना करून त्या वेळच्या फलज्योतिषाच्या पद्धतीविषयींची कांहीं माहिती मिळण्याचा संभव असल्यामुळें हें तुलनात्मक टांचण तयार केलें आहे.

ठकार यांचे घराण्यांतील ही पत्रिका अत्यंत जीर्ण झाली असून कांहीं ठिकाणीं कसरीनें खाल्ल्यामुळें तेवढा भाग नाहींसा झाला आहे. पण जेधे यांची पत्रिका जशी अर्धवट आहे तशी ही अर्धवट नसून पूर्ण आहे. जेधे यांची पत्रिका जितकी अशुद्ध लिहिलेली आहे तितकी ही अशुद्ध लिहिलेली नाहीं. पण हिचा शेवटचा भाग निराळ्या अक्षरांत असून तो अशुद्ध आहे. जेधे यांच्या पत्रिकेपेक्षां ही पत्रिका अधिक आटपशीर आहे. दोहांतेंहि रव्यादि स्पष्ट ग्रह दैनिक गतीसह सारखेच मांडले आहेत. जेधे पत्रिकेंत जन्मकुंडली वर्तुळाकार पद्धतीनें लिहिली असून ठकारांच्या पत्रिकेंत ती हल्लींच्या चौकोनाच्या पद्धतीनें लिहिलेली आहे. प्रास्ताविक संवत्सरादि फलें दोहोंत सारख्याच रीतीनें लिहिलेलीं आहेत. ठकार यांच्या पत्रिकेंतहि चंद्र–काळानळ चक्र व सूर्य–काळानळ चक्र हीं दिलेलीं आहेत. अष्टकवर्गाची पद्धति दोहोंत सारखीच आहे. मात्र ठकार यांच्या पत्रिकेंत हीं फळें केवळ रेषा व टिंबें यांनींच दर्शविलेलीं असून जेधे यांच्या पत्रिकेंत त्या रेघांचें व टिंबांचें स्पष्टीकरण करून त्या त्या भावाचीं फलें अधिक स्पष्टतेनें निराळ्या कोष्टकांत लिहिण्यांत आलीं आहेत. जेधे यांच्या पत्रिकेंत **हिल्लाज** मताच्या पद्धतीनें फळें वर्तविलेलीं आहेत. तो भाग मात्र ठकारांच्या पत्रिकेंत नाहीं. त्याचप्रमाणें जेधे यांच्या पत्रिकेंत भावचलित कुंडलींत सगळे भाव स्पष्ट वर्तवून संधिसहित मांडलेले आहेत. ठकारांच्या पत्रिकेंत तसे ससंधिक भाव दिलेले नाहींत. ठकारांच्या पत्रिकेंत नवमांश कुंडलीहि दिलेली नाहीं. हल्लींच्या जन्मपत्रिकांतून जन्मलग्न कुंडलीप्रमाणेंच राशिकुंडलीहि दिलेली असते. या दोन्ही पत्रिकांतून राशिकुंडली कोठेंच दिलेली नाहीं. दोहोंतहि महर्दशा पद्धति अष्टोत्तरीचीच स्वीकारली आहे. विंशोत्तरीचा उल्लेख दोहोंतही नाहीं. त्याचप्रमाणें योगिनी वगैरे इतर विविध दशांचाहि उल्लेख दोहोंतहि नाहीं. जेधे पत्रिकेंत ग्रहांचें शत्रुमित्रत्व व उदासीनत्व पत्रिकेंत मांडून दाखविलें आहे. ठकारांच्या पत्रिकेंत शत्रुमित्रांचा विचार लिहिलेला आढळत नाहीं.

या दोहोंत सर्वांत मोठा फरक महर्दशा व अंतर्दशा यांच्या विचाराचे बाबतींत दिसून येतो. दोन्ही पत्रिकांतहि अष्टोत्तरी पद्धतीचाच स्वीकार केला आहे. पण जेधे पत्रिकेंत आधीं आयुर्दाय निश्चित करून नंतर अष्टोत्तरीच्या सर्व दशांचीं वर्षें आयुर्दायाच्या प्रमाणांत बसवून घेतलीं आहेत. आणि मग त्याच प्रमाणांत अंतर्दशांचेंहि गणित करून दशा व अंतर्दशा यांचीं फलें सांगितलीं आहेत. या पद्धतीनें प्रत्येक व्यक्तीच्या आयुर्मानांत सर्व ग्रहांच्या महर्दशा भोगल्या जातात. व त्या दृष्टीनें ही पद्धति शास्त्रशुद्ध दिसते. ढकारांच्या पत्रिकेंत अशा प्रकारानें आधीं आयुर्मान ठरवून त्या त्या प्रमाणांत दशा व अंतर्दशा बसविलेल्या नाहींत. व हीच पद्धति हल्लीं बहुतेक रूढ आहे.

जेधे पत्रिकेंतील आयुर्मानाच्या प्रमाणानें दशा व अंतर्दशा यांचा कालावधि धरण्याची पद्धति एका दृष्टीनें शास्त्रशुद्ध दिसत असली तरी तिला सर्वांत मोठी अडचण आयुर्मान निश्चित करण्यासंबंधाची आहे. आयुष्याच्या प्रमाणांत दशा कमीजास्त होणाऱ्या असल्यामुळें आयुष्याचा अंदाज चुकला म्हणजे दशा व अंतर्दशा यांचें सगळें गणित फुकट जाणार. व तशीं स्थिति जेध्यांच्या पत्रिकेंत प्रत्यक्ष घडली आहे. सर्जेराव जेधे यांचें आयुष्य ६१ वर्षें ११ म. २३ दि. ३८ घ. २६ प. असें ठरविलें असून त्या प्रमाणांत सर्व दशा सांगितल्या आहेत. पण या ज्योतिष्याचें हें भविष्य चुकीचें ठरलें व सर्जेराव ७५–८० वर्षेपर्यंत जगला असावा असें जेधे करीन्यावरून दिसून येतें. अर्थातच महर्दशा व अंतर्दशा यांचे कालावधि त्याप्रमाणानें सगळेच बदलले गेले असें म्हणणें प्राप्त आहे. पत्रिकेंत सांगितलेलें आयुर्मान कोणत्या पद्धतीनें ठरविलें आहे याचा खुलासा या पत्रिकेंत नाहीं. सारावली ग्रंथांत कांहीं ठोकळ पद्धति दिल्या आहेत, पण त्यांतील कोणती पद्धति येथें अनुसरली आहे तें समजण्यास मार्ग नाहीं. तथापि आपण ठरविलेलें आयुष्यमान चुकीचें ठरेल अशी शंका या ज्योतिषास आली होती, असें दिसतें. कारण आयुष्यवर्षें ६१ असें म्हणून त्याच्या पुढें लगेच मतांतरेण वर्षे ८५ असेंहि त्यानें लिहून ठेविलें आहे. त्यावरून एका पद्धतीनें ८५ वर्षें आयुष्य येत असून ती पद्धति या ज्योतिष्यास ग्राह्य वाटली नाहीं असें अनुमान निघतें. पण सर्जेरावाला जवळजवळ ८५ वर्षें आयुष्य लाभलें असून ही अग्राह्य ठरविलेली दुसरी पद्धतिच अधिक बरोबर ठरली असावी असें वाटतें. ढकारांच्या पत्रिकेंत आयुर्दाय अमुक असें सांगितलेलें नाहीं. पण अंतर्दशा देतांना त्या वय वर्षें ८० म. ३ दि. १० येथपर्यंत देऊन तेथेंच पत्रिकेची समाप्ति केली आहे. त्यावरून जास्तींत जास्त आयुष्य ८० वर्षें लाभावें असा तर्क करतां येईल. पण निश्चित विधान पत्रिकेंत नाहीं. आणि ही व्यक्ति इतिहासप्रसिद्धहि नसल्यानें तिला आयुष्य किती लाभलें व मृत्यु केव्हां घडला हें समजण्याला ऐतिहासिक साधनहि नाहीं.

जेधे यांच्या पत्रिकेपेक्षां ठकार यांच्या पत्रिकेंत बरेंचसें विवेचन कमी आहे. याचें एक कारण असें दिसतें कीं, ज्यानें ही पत्रिका लिहिण्यास आरंभ केला त्याच्या हातून ही पत्रिका पूर्ण झालेली नाहीं. महर्दशेचें वर्णन चालू असतां शनीच्या दशेपर्यंतचें अक्षर व लिहिण्याची ढब वेगळी आहे. तेथून पुढला राहिलेला भाग एकाद्या अज्ञानी इसमानें किंवा मुलानें लिहिला असावा असें त्यांतील बोजड अक्षर आणि अशुद्ध लिपि व भाषा यांवरून अनुमानितां येतें. या दुसऱ्या लेखकाला आंकडेसुद्धां नीट स्पष्ट लिहितां येत नाहींत अशा अशुद्ध रीतीनें कांहीं भाग लिहिला गेल्यानंतर पांचपन्नास ओळी पुनः पहिल्यासारख्या वळणदार व शुद्ध पद्धतीनें लिहिलेल्या आहेत. पण शेवटच्या पंधरा ओळींत लिहिण्याचें काम पुनः त्या अडाणी लेखकाकडे आलें असावें असें त्यांतील अक्षरावरून दिसतें. मग लेखकांची अशी अदलाबदल होण्याचें कारण कांहींही असो. पण एकंदरींत या दोन पत्रिकांवरून पाहतां श्रीशिवाजीमहाराजांच्या वेळेस पत्रिका कोणत्या स्वरूपाच्या असत आणि त्यांत व हल्लींच्या पद्धतींत कोणता फरक आहे, तें समजण्याला हें एक साधन उपलब्ध झालें आहे. पद्धतींत फरक कितीहि असो; पण त्यावेळच्या एखाद्या सामान्य व्यक्तीचीहि पत्रिका जर इतकी विस्तारपूर्वक लिहून ठेवलेली आढळते; तर मग शहाजी, शिवाजी, संभाजी, राजाराम इत्यादिकांच्या पत्रिका लिहिल्या गेल्या नसतील असें कसें मानावें ? अर्थात् त्या लिहिल्या गेल्या असाव्या. पण रायगडच्या दप्तराबरोबरच त्या नष्ट झाल्या असाव्या, असेंच अनुमान करणें प्राप्त आहे.

---

१३ जन्मपद्धति ग्रंथ.

(जुनाट पोथी)

(ले. शंकर गणेश दाते.)

ही पोथी पुणें येथें रा. मोरे या जीर्णग्रंथ- विक्रेत्याकडे ०४ आण्याला घेतली. ही पोथी सबंध असून हिचीं एकंदर पृष्ठें ११० आहेत, म्हणजे पाठपोठ धरून २२० पानें झालीं. पृष्ठांच्या लांबीरुंदीचें मोजमाप लांबी १० इंच, रुंदी ४$\frac{५}{१०}$ इंच असें आहे. प्रत्येक पानावर बरोबर १७ ओळी आहेत. व दरेक पंक्तीमध्यें सरसकट ४९ अक्षरें बसतात. लेखक आपल्या कामामध्यें चांगलाच निपुण दिसतो. सबंध पोथी एकटाकी असून अक्षर मोत्यांच्या दाण्यासारखें दिसतें. प्रत्येक ओळ वांकडीतिकडी बिलकूल नसून अगदीं सुतांत आहे.

३ ग्रंथादिग्दर्शनः ही पोथी ज्योतिषविषयक आहे. ग्रंथाचा लेखक महिमोदय हा आहे. नांवावरून हा जैन दिसतो ग्रंथान्त येणेंप्रमाणें आहे.

श्रीमत्खर ×× गच्छे श्रीजिनमाणिक्यसूरयोऽभूवन् । विनयसमुद्रमुनींद्रा। अभूवन्भूतले वराः । १ तच्छिष्यमुख्यगुणरत्नगुणौघमंदिरा । विद्यार्णवः सुगुरुरत्न-विशालसुंदराः। तच्छिष्यलब्धविजयाविजयाप्तसौख्याः। भव्यारविंदप्रतिबोधनबद्धकक्षाः २ तत्पादांभोजभृंगेण महिमोदयसाधुना। शास्त्रं संकलितं तेन शिवरामस्य हेतवे।३ इति श्री जन्मपद्धतिः समाप्ता ॥ श्रीस्वात् सर्वदा लेखक पाठक वाचकानां । यावरून श्रीजिनमाणिक्यसूरी यांच्या कोणा विद्वान् शिष्यानें हें शास्त्र 'शिवरामस्य हेतवे' संकलित केलें असें दिसतें. मात्र हें संकलनकार कोण ? हा शिवराम कोण ? त्यांचा संबंध काय ?

ग्रंथारंभः-

॥ ओं ॥ श्री सद्गुरुभ्यो नमः । श्रीगणेशाय नमः ।
स्वस्ति श्री सौख्यधात्री सुतजयजननी तुष्टिपुष्टिप्रदात्री ।
मांगल्योछाहकर्त्रीगतभवसदसत् कर्मणां व्यंजयित्री ।
नानासंपद्विधात्री धनकुलयशसां सायुषां वर्द्धयित्री ।
दुष्टापाद्विघ्नहंत्री गुणगणवासितिर्लिख्यते जन्मपत्री ॥ १
पुढें
ललाटपट्टे लिखते विधाता । षष्ठी दिने याक्षरमालिका च ।
तां जन्मपत्रीं प्रकटीं विधत्ते । दीपो यथा वस्तु घनांधकारे ॥ ६
अशा तऱ्हेनें १३ श्लोक लिहून पुढें लेखक म्हणतो—

"एषा प्रशस्तिः सर्वेषां लिखनीया ।"

अशा तऱ्हेनें लेखकानें ४ प्रशस्ति लिहिल्या आहेत.

(१) सार्वत्रिक प्रशस्ति	श्लोक	१३
(२) जैन प्रशस्ति	—	४
(३) वैष्णवी प्रशस्ति	—	८
(४) यावनी प्रशस्ति	—	२

यावनी प्रशस्ति कांहींशी नवी दिसते व मनोरंजकहि आहे.

यः पश्चिमाभिमुखसंस्थितविद्यमानो । ह्यव्यक्तमूर्तिपरिवर्तितविश्वभोगः । दुर्लक्षविक्रमगतिः कृतकर्मलक्षो । राज्यश्रियं दिशतु वो रहमाण एषः । १ अलाहो अकब्बरश्चैव । इलिल्लाहतथैव च । महमदो रशूलश्च । कुर्वंतु तव मंगलं । २९

५२ पानावर एका महाराजांचा उल्लेख आहे:—

इति श्रीसकलसामंतचक्रचूडामणि मरीचिमंजरिपरागपंजरतचरणकमल-महाराज श्रीविरचिते विवेक पंचम प्रकाशः ।

६९ पानावर दैवज्ञ ढुंढिराजकृत जातकाभरणाचा उल्लेख आहे.

७० पानावर ९ यावनी जातक श्लोक दिलेले आहेत. ते येणेंप्रमाणेः—

ताजकमते जन्मपत्री विलोकनस्य यवनभाषाये श्लोकाः मालषांने चस्मषोरा वषतषानेमुस्तरी । उजहद्दीदुस्मन्नषाने सुलहसुलहा मेदनी । १ वषतषांनेमुस्तरी च मालषांनेजुहरगर । दुस्मनषांने हसकेकवी साहि आलमवाजफर । २ अवदातषांने जुहरसुद् वजीर कां सहसुवद् कोदकमालवाजरदरबुवद् । गरहमाद्वाजदहचूमाल-षांने गरबुवद् सत्तरिगाईयांवाजिकोकवसुवद् साहि आलम् सुवद् ॥ ४ ॥ जुहरकोक-वह्कवुरज विहारश्मयापंजमुनुकाकम् अवलिवगरस्युंमशान हद्दर जातिगरा अमराम ॥ दरहमलगरसमसवासद् उस्मनाकुसवादिसा हउमराउ सु वद्वसाहि दोमीसउरद् रवासद्चुमाह । ६ ॥ मिररीषगरदरजद्वीवासदक विसरहसंपेसमी रजुहरदर मांहि-चुंआ यद् रसद् दौलतिवावरजीर । ७ संबूलउतारिद सुवदकांतिवह मदारसाल-कमाल मुस्तरी रसतां बुवासद सहरहावा सदाचामाल । ८ गम आज आयद् जुहलमीजांवुवदपेसमीररासजउजां आंकजन्नवलाफजनसारिवगीर ॥ ९ ॥

८२ पानावर एक घोड्याचें व एक हत्तीचें अशीं दोन चित्रें काढलेलीं आहेत तीं फार सुंदर आहेत. अशीच कांहीं मनुष्याकृति ८० व्या पानावर आहेत. ८२ पानावरील घोड्याच्या पोटांत कांहीं फारशी अक्षरें दिसतात.

ग्रंथवैशिष्ट्यः—

या ग्रंथाचें वैशिष्ट्य असें, कीं पोथी जुनी आहे हें तर खरेंच पण जागोजाग मूळ संस्कृतावर लेखकानें हिंदी टीका लिहिली आहे. ती वैयाकरणांना रूपांच्या दृष्टीनें उपयोगी पडेल. दुसरें महत्त्व अशा दृष्टीनें कीं, त्यामध्यें जुनी अक्षरवाटिका पाहावयाला मिळते. ज, ब, ध, ड, अ, भ, छ, श, ठ, घ वगैरे अनेक अक्षरांचें जुनें वळण विचारणीय आहे.

ग्रंथावर कालनिर्देश बिलकूल नाहीं.

१४ आर्याबद्ध शकुनवंती.

(ले.– वि. म. कोल्हटकर)

सदरहू शकुनवंतीची प्रत आपले मंडळाचे सन्माननीय संशोधक श्रीयुत पुरंदरे मास्तर यांनीं पैदा केली. प्रतीवर मिति नाहीं. कागदाच्या जुनेपणावरून ती पेशवाईच्या उत्तरार्धांतील असावी असा त्यांचा अंदाज आहे. या शकुनवंतीमध्यें उभीं तीस व आडवीं तीस अशीं एकंदर ९०० घरें पाडलेलीं असून प्रत्येक घरांत एक एक अक्षर लिहिलेलें आहे.

शकुन पहाण्याची रीतिः– कागदांतच पहिल्या आडव्या कोष्टकांतील २० वे घरांत एकाचा आंकडा टाकून नंतर दुसऱ्या आडवे कोष्टकांतील १० वे घरांत २ शेवटचे ३० वें घरांत ३ असे क्रमानें ४५ आंकडे सारख्या २०-२० च्या अंतरावर घातलेले आहेत व हीं ४५ अक्षरें क्रमानें मांडिलीं असतां एक शुद्ध मराठी भाषेंतील सार्थ आर्या बनते व ती इच्छित प्रश्नाचे उत्तरात्मक असते. याप्रमाणें आंकडे मांडून दिलेल्या अक्षरांच्या जुळणीवरून होणारी आर्या खालील प्रमाणें आहे.

नरहरि माझें इच्छित-फल करी हेंच मागणें तुजला ।
श्रवण करुनि मम वाक्या प्रसाद दिधला अलभ्य हा मजला ॥ २० ॥

याच पद्धतीनें कोणत्या तरी एका अक्षरावर प्रश्न करणारानें बोट ठेविलें असतां तेथून वीस वीस घरांवर असणारीं सर्व अक्षरें (अर्थात ९०० संख्येला २० नीं भागिलें असतां येणारी संख्या ४५ होय. तेव्हां सर्व पटावरून एकाच वेळीं घेतलेलीं अक्षरें ४५ होणार तीं) क्रमानें मांडिल्यास प्रश्नाचें उत्तर मोघम रीतीनें सांगणारी आर्या बनते.

९०० अक्षरांपैकीं कोणत्याहि अक्षरावर बोट ठेवून प्रश्न पहाण्याच्या पद्धतीनें गेल्यास प्रश्नाचें उत्तर मिळतें. परंतु पहिलीं २० अक्षरें हींच बोट ठेवण्यास उपयोगांत आणलीं असतां आर्येच्या पदांचा अगर सार्थ शब्दांचा भंग न होतां आरंभापासून शेवटपर्यंत आर्या सुसंबध सांपडते. व बाकीच्या अक्षरांवर बोट ठेविलें असतां पाठीमागचीं व पुढचीं अक्षरें एकत्र करून आर्येच्या चरणाचा आरंभ कोठून व शेवट कोठें हें विचारानें ठरवावें लागतें.

एकंदर वीस उत्तरात्मक आर्या तयार करून शकुनवंती करणारानें पहिली आर्या १ आंकड्यापासून मांडण्यास सुरुवात केली. पहिलें अक्षर पहिल्या घरांत घालून दुसरें २१ वें घरांत; तिसरें दुसरें आडव्या कोष्टकांतील ११ वें घरांत व चौथें तिसऱ्या आडव्या कोष्टकांतील १ लें घरांत अशा क्रमानें त्या आर्येचीं सर्व

अक्षरें १०० घरांपैकीं ४५ घरांत मांडिलीं. नंतर दुसरी आर्या घेऊन तिचें पहिलें अक्षर पहिल्या आडव्या कोष्टकांतील दुसरें घरांत मांडून नंतर पहिल्या आर्येच्या प्रत्येक अक्षराच्या पुढील घरांत मांडण्याची पद्धत ठेविली. अशाच क्रमानें २० आर्या १०० घरांत बसाविल्या आहेत.

आर्या हें मात्रावृत्त आहे, त्यामुळें आर्यांतून सारखींच अक्षरें असण्याची जरूर नाहीं. मात्रा फक्त प्रत्येक चरणामध्यें ठराविक असल्या म्हणजे झालें. तरी या ४५ अक्षरांचीच प्रत्येक आर्या करावयाची असल्यामुळें व शकुनवंती करणारा उत्तम कवी नसल्यामुळें प्रासादिक अशी कविता त्याचेकडून उतरलेली नाहीं. अशा तऱ्हेची शकुनवंती तयार करणें मयूर कवीला उत्तम साधलें असतें. कांहीं अक्षरांच्या ऱ्हस्वाचें जागीं दीर्घ व दीर्घाचें जागीं ऱ्हस्व लिहिल्यामुळेंहि हा रसभंग होत असावा. कित्येक आर्यांतून एकादें अक्षर जास्त होतें अगर कमी पडतें. याचें कारणहि ही नक्कल करणारानें ऱ्हस्वदीर्घाकडे विशेष लक्ष दिलेलें नाहीं हें होय.

फर्ग्युसन कॉलेजमध्यें लायब्ररीयन असतेवेळीं तेथील मंडलिक ग्रंथसंग्रहांत अशाच तऱ्हेची एक शकुनवंती शिळाप्रेसवर छापलेल्या एका पुस्तकांत माझ्या पाहण्यांत आलेली होती. त्यामधीलही अशीच १०० अक्षरांची मांडणी असून प्रश्न कसा पहावा वगैरे सर्व माहिती संग्रहकर्त्यानें दिलेली होती व ही कोणी तयार केली हें सुद्धां त्यांत सांगितलें असावें असें मला स्मरतें. हल्लींच्या तेथील लायब्ररीयनास पुस्तक (या पुस्तकाला क्रमांक विभाग वगैरे लाविलेलें नसल्यामुळें तें रद्दींतच पडलेलें होतें) मीं पहावयास सांगितलें पण त्यांनीं तें हल्लीं सांपडत नाहीं. असें सांगितलें.

आर्या शकुनवंती प्रारंभ.

अतिशय सत्वर होइल तव चिंतित कार्य सत्य वाक्य मनीं ।
मानुनि निज दैवतपदिं व्हावेंत रत सदा सुखें नमनीं ॥ १ ॥
प्रश्न सफल होइल परि विलंब बहुधा विशेष वाटतसे ।
श्रमसाध्य सत्य मानुनि प्रयत्न करणें अवश्य घाटतसे ॥ २ ॥
श्रीमज्जगदीश्वर तव प्रश्न करिल सिद्ध हर्ष होइलसा ।
करुणार्णव रघुपति तो साह्य करिल सर्व क्लेश जाइलसा ॥ ३ ॥
बहुधा न घडेल वाटे कार्य परंतु प्रयत्न कर बरवा ।
हटवुनि प्रारब्धगति जगतामधिं यत्न हा प्रमुख ठरवा ॥ ४ ॥
घडिलें, कार्य कशास्तव संशय करितां उगेंच स्वस्थ बसा ।
हरिभजनीं तत्पर व्हा पुनरपि कधिंही न येचि प्रश्न असा ॥ ५ ॥
घडणें कठीण दिसतें कार्य मला हें बहूत विबुध वरा ।
यास्तव चिंतन निजमनिं न करुनि इच्छेप्रती बळें अवरा ॥ ६ ॥

सफल मनोरथ असतां प्रश्न कशाला उगीच विफल करी ।
स्वगृहिं जरि विक्रय तरि कशास व्हावी दुकानची विकरी ॥ ७ ॥

अतितर प्रयत्न करितां प्रश्न सफल परि असे विलंब बहू ।
स्मरतां हरि नारायण कार्य घडे इच्छितां तसें हुबहू ॥ ८ ॥

प्रयत्न करितां देतो जगदीश्वर सकल सर्व उघड असे ।
मनशांतिस्तव करणें प्रश्न सकल वाटतें खचीत असे ॥ ९ ॥

प्रश्नावरि मन ठरवुनि प्रयत्न विसरूं नका तरीच खरा ॥
होइल प्रश्न सफल मग आनंद रत्नयुक्तसर विखरा ॥ १० ॥

समय उचित पाहुनि मग प्रश्न करी कवनिं बुद्ध नर साचा ॥
शुभाशुभाचा अनुभव त्यानंतर ये कनिष्ट दासाचा ॥ ११ ॥

कार्यच सत्वर होइल कार्य मनोप्सित अलभ्य लाभ घडे ॥
घडि घडि स्मरण करावें हरि नारायण अदृष्ट तें विघडे ॥ १२ ॥

हार्षित तनुमन होतें श्रवण करी प्रश्न सकल तव चिंता ॥
जाइल दिगंतराप्रति, जगदीश्वर वासुदेव मनिं चिंता ॥ १३ ॥

करितां बहुत परिश्रम जाइल सिद्धीस प्रश्न अवघड तो ॥
हा तर सुसाध्य आहे यास्तव मज वाटतें त्वरित घडतो ॥ १४ ॥

तव चिंतन मज निर्फळ दिसतें नरवर शिरोमणी याची ॥
आशा किमपि न कर परि इच्छा धरि हरि–समर्थपायाची ॥ १५ ॥

श्रीमत् रमारमणपदिं शरण असुनि कार्य हें न होय कसें ॥
यास्तव स्वस्थ करुनि मन दासा रक्षील हरिच अर्भकसें ॥ १६ ॥

करुणासागर प्रभु तो साह्य करुनि कार्य हें न होय कसें ।
तच्चरणीं मन असतां पातक सगळें सखा त्वरित निरसें ॥ १७ ॥

प्रतिकूळ काळ असतां घडणें मनकामना कठिण असतें ।
परि अति दुर्धर आशा न सुटे हृदयांत तेंच तें वसतें ॥ १८

श्रीहरिवरप्रतापें अवघड जें कार्य तें सुलभ घडतें ।
मग जें सुसाध्य असतें तद्विषयीं मन कशास गडबडतें ॥ १९ ॥

नरहरि माझें इच्छित फला करी हेंच मागणें तुजला ।
श्रवण करुनि मम वाक्या प्रसाद दिधला अलभ्य हा मजला ॥ २० ॥

	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५
१	अ	प्र	श्री	ब	घ	घ	स	अ	प्र	प्र	स	का	ह	क	त
२	म	र्य	र्षि	रि	व	म	रु	ति	ह	र २	श	स	ज्ज	धा	लें
३	य	फ	ग	न	का	क	म	र	क	रि	उ	स	त	थ	त
४	चि	त्व	नु	हु	न	र	ग	का	र	मा ५	ल	हो	श्व	ड	क
५	र	इ	र	ल	शा	दि	थ	त्न	दे	ठ	पा	हो	न	प	ज
६	हु	ई	हो	रि	नि	प	भु	स	प	छि ८	इ	प	व	ठे	व
७	ल	रि	प्र	का	सं	का	ता	ता	प्र	नि	म	कां	श्र	म	ळ
८	ग	र्य	व	जा	दि	र	हा	ड	घ	फ ११	व	ल	क	प	य
९	चि	ब	रि	रं	क	ल्प	क	स	र	त्न	श्र	ने	क	ल	ते
१०	क	सि	रि	सि	व	सु	नि	न	का	रि १४	त	हु	सि	प्र	ता
११	का	था	द्ध	य	उ	हु	उ	प	ल	रू	क	अ	श्र	स	व
१२	व	ल	स	प्र	र	र्य	हे	ना	सु	मा १७	स	श	र्ष	क	च
१३	त्य	ष	हो	र	स्व	बु	वि	से	उ	त	सु	ला	ल	अ	रो
१४	बु	भ	त	व	म	हो	य	ण	घ	तु २०	क्य	ट	ल	र	ब
१५	मा	त	सा	वा	सा	रा	क	ब	अ	स्त	न	डे	चिं	उ	या

१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३	२४	२५	२६	२७	२८	२९	३०	
श्री	क	प्र	श्री	न १	ति	श्च	म	हृ	डि	ड	फ	ति	य	श्चा	१
जें	ल	त	त्न	व	य	च	त	तां	चिं	द्र	णा	कू	रि	हृ ३	२
मा	सा	ळ	व	रिं ४	ल	ळ	दि	घ	र्य	टि	ना	प्र	रि	म	३
ण	र	य	ता	न	त	र	म	त	म	म	र	ळ	प्र	श्रें ६	४
ण	प्र	अ	ता	ई ७	हो	ल	त	वा	स्त	स	अ	क	तो	र	५
ते	स	रि	ज	उ	न	ल	ते	श्च	फ	दि	तो	ता	अ	त ९	६
शे	सा	घ	व	स १०	त	वि	श्च	र्य	श	र्य	प्र	प्र	दि	प्र	७
म	श्च	श्च	श्व	य	प्र	म	ण	ई	त्त	ण	क	णें	ड	ल १२	८
आ	रु	मँ	जे	क १३	ति	ब	ल	तु	रि	हे	शा	फ	स	वी	९
च	ला	ल	फ	स	रिं	त	प्र	द्धि	र	नि	*ा	का	र्य	हे १५	१०
का	र्य	म	ते	च १६	र्य	वि	ह	त्न	ग्य	त	ग्य	रि	से	न	११
वि	च	अ	च	का	रि	भ्य	क	श्च	सि	हें	न	क	ल	ग १८	१२
न	हो	ठि	भ	णें १९	वा	वा	ई	ब	स्त	श्व	फ	वि	घ	रि	१३
व	ल	ल	ड	च	द्धु	घ	व	घ	णि	य	क	अ	ड	ज २१	१४
क	से	स	ते	ला २२	नी	से	क	ह	ह	या	रि	ब	से	रा	१५

१६	र	घ	ता	तो	चि	श	त	ते	म	श्र २३	मा	श्र	रू	ठ	रि
१७	नु	म	ना	उ	म	व	ग्र	स्म	न	ई	चा	घ	ई	त	शा
१८	शु	डि	ल	र	की	य	णि	अ	स	क २६	नि	ध्य	व	प्रा	नी
१९	ज	स	र	र	त	न	रि	ह	स्त	श्र	शु	र	गा	सा	पी
२०	भा	ण	त	ध्य	न	क	अ	र्ध	अ	म २९	व	मा	प	ग	र
२१	त	नु	ति	ति	ह्मा	म	य	रा	र	ल	अ	रा	प्र	ह	र
२२	नु	वे	ति	था	प	म	पा	शी	त	क्या ३२	दि	प्र	सा	ग	न
२३	ह्मा	य	ह्य	ता	र	क	क	का	श्र	आ	व	रि	ग	व	ई
२४	स्या	ना	दि	म	छा	ता	स	टे	ह्रं	द ३५	त	क	रि	धी	क
२५	र	र	ल	य	धी	इ	ह्मा	डे	ल	र	त	य	र	वा	र
२६	र	ण	वा	ट	ह	ल	स	या	क	ला ३८	स	आ	र्य	हां	न
२७	दा	व	क्ले	प्र	ये	ति	का	ना	ते	ल	क	द	दे	त्व	स
२८	नी	ष्ट	व	रि	म	च	रि	च	ग	भ्य ४१	सें	घा	जा	स्व	प्र
२९	न	ट	ई	ठ	श्र	अ	वि	दु	त	वि	दा	वि	नी	घ	पा
३०	सा	घ	चि	ड	या	क	र	स	ड	ज ४४	नी	से	सा	वा	सा
	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५

न्त	श्व	हु	म	हो	सा	डी	जा	हा	आ	या	च	ण	ग	व २४	१६
स्त	र	बि	जे	ण २५	नि	सा	र्ग	नि	ज	चि	हि	र	शा	ल	१७
त	ज	ता	ि	प्र	भा	स्म	दि्	स	म	स्व	न	ति	स्वा	रू २७	१८
स्त	न	दु	ध्य	न २८	दैं	त्य	घृ	ब्ध	म	नि	वि	रि	व	स	१९
ज	क	ना	क	फ	चा	क	रा	अ	क	रु	स	र	स	म ३०	२०
नि	ता	आ	ते	वा ३१	प	नि	तो	ज	पु	नि	त	य	णों	म	२१
न	रि	ण	प्र	ग	भ	ह	ज	स्त	री	न	त	न	द्वि	प्र ३३	२२
व	क	सु	ष	सा ३४	वे	त्न	क	म	पि	रु	शा	र्य	स	न	२३
नि	स	घ	क	द	न	रा	श्व	ज	ध	र	ग	द्ध	म	दि ३६	२४
क्षी	ळें	द्	न	ध ३७	त	णों	स	त्न	हि	छे	वि	इ	वा	त्न	२५
प्र	दु	छि	ट	यु	ये	अ	शु	ते	री	ह	स्या	त	शा	अ ३९	२६
रि	त्व	ते	स	ल ४०	सु	स्य	स	मु	चि	ब	न	त	स्व	स	२७
ळं	चि	से	चि	र	ष्ट	ते	म	त	र्थ	भ	त	ते	ड	हा ४२	२८
भं	नि	व	ब	म ४३	म	त	ल	र	आ	व	क	ब	अ	स	२९
वा	ि	हु	से	रा	चा	डे	ता	तो	चि	से	से	ते	ते	ळा ४५	३०
१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३	२४	२५	२६	२७	२८	२९	३०	

१५ महानुभावीय वाङ्मयांत आलेले यादवकालीन ऐतिहासिक उल्लेख.

(ले.—य. खु. देशपांडे एम्. ए. एल्एल् बी. यवतमाळ)

" महानुभावीय मराठी वाङ्मय " या पुस्तकांत जे ऐतिहासिक उल्लेख आले ते विशेषतः " लीलाचरित्र " या ग्रंथामधूनच उद्धृत केले होते. लीलाचरित्र हा ग्रंथ महानुभावीय पंथाचा संस्थापक श्री चक्रधर यांच्या चरित्रात्मक असून तो त्यांच्या सहवासांत राहिलेल्या महींद्रभट नांवाच्या शिष्यानें स्वतःच्या आठवणीनें व इतर शिष्यांच्या आठवणी संग्रहीत करून, चक्रधर स्वामीच्या बदरीकेदार प्रयाणानंतर थोड्याच कालांत लिहिला आहे. श्री चक्रधराचा प्रयाणकाळ शके ११९५ चा आहे.

वरील चरित्रलेखनासंबंधानें 'श्री नागदेवाचार्य चरित्र' नांवाच्या १३ व्या शतकांतील दुसऱ्या एका गद्यग्रंथांत उल्लेख आला आहे तो असा—

" महेन्द्र भट्टां: लीळा संवादी: यथानुभवाचियां: तेया तेयातें पुसावेयां अनुज्ञाः ॥ महेन्द्रभट्टीं जिया लीळा शोधौनि आणिलियां: तिया भट्टो बा सा पुढा संवादेलियाः तंव भटोबासी भणितिलें: हें सर्वज्ञाचेया श्री मुखीचें शब्दें होतिः हें न होतीः मगः भटोबासीं महेन्द्र भटातें भणितलें: उपाध्याचिया अनुभवांचियाः तिया उपाध्यातें पुसावियाः नाथोचेया अनुभवांचिया नाथोसीः साधाचिये अनुभविचिया तिया साधातें पुसावियाः ऐसियाचि परिः जेयां जेयांचिये अनुभविचियां: तिया तियाः तेयां तेयांतें शोधौनि पुसावियाः ऐसेः भटोबासीं महेन्द्रभटातें भणितिलें: मगः महेन्द्रभटीं: ही जेयां जेयांचेया अनुभवाचेया तेयां तेयांतें पुसौनिः पूर्विलापरीः भटोबासा संवादेलियाः मग पूर्वार्द्ध आन उत्तरार्ध ऐसें दोनि विभाग केली"-लीळा ३५

वरील उताऱ्यावरून लीळाचरित्र ग्रंथ कसा निर्माण झाला हें दिसून येईल. चरित्रनायकाच्या सान्निध्यांत राहून चरित्रनायकाचें प्रत्यक्ष माहितीवरून लिहिलेलें, उत्कृष्ट चरित्र म्हणजे बॉस्वेलनें लिहिलेलें डॉ० जॉनसन यांचें चरित्र होय. या शतकांत मोर्ले साहेबानें लिहिलेलें ग्ल्याडस्टन साहेबांचें चरित्रहि त्याच तोडीचें आहे. हीं दोन्ही इंग्रजी भाषेंत आहेत. मराठी भाषेंतील चरित्रें पाहावयाचीं असल्यास लक्ष्मणशास्त्री यांनीं लिहिलेलें विष्णुशास्त्री चिपळुणकरांचें चरित्रहि त्याच

१ १७ वें संमेलन.

नमुन्याचें आहे. मराठींतील वरील धर्तीचें उत्कृष्ट चरित्र म्हटलें म्हणजे श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं लिहिलेलें कै. लोकमान्य टिळक यांचें चरित्र होय. वरील चरित्रामध्यें स्वतः सान्निध्यांत राहिल्यामुळें प्रत्यक्ष असलेली माहिती, तसेंच उपासनी, शारंगपाणी इत्यादिकांच्या आठवणींतील माहिती ही एकत्रित करून हें उत्कृष्ट चरित्र लिहिलें आहे. या तऱ्हेचा प्रयत्न सुमारें ६००–६५० वर्षांपूर्वी महेंद्रव्यासांनीं केला होता व त्याचें फल म्हणजे हा 'लीळाचरित्र' ग्रंथ होय; असें वरील अवतरणावरून दिसून येतें. या ग्रंथास मराठींतील आद्यचरित्र ग्रंथ म्हणावयास हरकत नाहीं.

वरील लीळाचरित्रांत आलेले ऐतिहासिक उल्लेख पूर्वींच प्रसिद्ध झाले असल्यामुळें ते न देतां दुसऱ्या ग्रंथांतील ऐतिहासिक उल्लेख येथें देत आहे.

'नागदेवाचार्य चरित्र' हि त्याचा शिष्य परशराम व्यास यांनीं प्रत्यक्ष सान्निध्यांत राहूनच लिहिलें आहे. त्यांतील कांहीं उल्लेख येणेंप्रमाणें:—

रामदेवरावो म्लेंच्छ बंधनीं राणिये विटंबना श्रवणें भविष्यें बंधमुकानुवादु ॥ दिल्लीचेया सुलतानाची कटकें आलीः तेणें रामदेवरावो धरिलाः देवगिरीचे राणियां विटंबौलियाः ऐसेंः भटोबासीः निलंगेया आइकौनी भविष्य केलेंः आन भणितलेंः रामदेवरावो म्लेंच्छीं धरिला परि सुटेलः तंव एकीं भणितलें तो कांइसेनि सुटेलः तंव भटोबासी भणितलेंः ना मी जंव पर्यंत वर्ते तंव महाराष्ट्रीं जाधव राज्य वर्तैलः तेंवि केविः ॥ यस्मिन्देशे वसेत् ज्ञानी योगी वाध्यात्मचेतसः ॥ तन्मंडलं पवित्रं च सर्वोपप्लववर्जितम् ॥ ऐसा भटोबासी श्लोक भणौनि भणितलेंः ते या धरितेना परि तेणें भ्रातृहत्या आन संता महंताचे वोखटेया इतरांचेनि सांगात धर्मं राज्यनीति विध्वंसौनिया प्रवर्तलाः म्हणौनिची धरिलाः हें जाले हातवणीः आसुई जेवण तें पुढें उरलेंचि असेः (लीळा १७ वी.)

वरील लीळेंत रामदेवराव यांचें बंधन, तसेंच त्यानें भ्रातृहत्या वगैरे केल्याचा उल्लेख आहे; तो बहुधा आमणदेयाचे डोळे काढिले, नरसिंहदेव यास पळावयास लाविले इत्यादि गोष्टींस अनुलक्षून असावा.

राजकोपद्रवी आबाइसा साडेगावीं बैजनाथ भट्टाजवळीं राहवणें: (लीळा१९४.)

राजकोपोपद्रवें (दिल्लीच्या सुलतानाचा) निंबयावास करणें: (लीळा १९१.)

नरेंद्रकवे ग्रंथ भेटीसी अनुसरणें : नरेंद्रकवि : शैल्यकवि : नृसिंहकवि अयाचिते हे तिघे बंधु देवगिरीयेसी रामदेवरायाचे या आश्राइती येती : नृसिंह कवीयें नलोपाख्यान केलें : शैल्य कवीयें रामायण केलें : ते आपुलाले ग्रंथेनसीं सभे माझारी जावौनी रामदेवो राया पुढें भणितलें : तेथेंचि नरेंद्र कवि बैसले असति : तेयांसीं भटोबासापासूनि श्रवण होते : तेही ग्रंथ ऐकौनिया तोषले : आन शैल्यकवि (अपभ्रंशें साल कवी) ते भणितलें : ऐसाचि जरी द्वारकेचा

रावो वर्णितेती तरि तुमचेया जन्मांतराचेया पापा पुरश्चरण होतें कीं : ऐसें रामदेवराया देखतांचि भणितिलें : तंव तेहीं भणितलें : तुम्हीही एक कवित्व करानाका : मा पाहो तुमचा वर्णनु : मग नरेंद्रकवि तेणें चि सळें अंठराशत वोवीये "रूक्मिणी स्वयंवर " ग्रंथ केला : मग तोही बंधुद्वया देखतांचि रामदेवराया पुढां भणितला सहर्षें वाचितां इये वोवीये पर्यंत आला " देवाचेया दादुलेपणाचा उबारा॥ न साहोचि सातांही सागरा ॥ भणे वोसरौनी राजसभा ॥ दिधली द्वारावती ॥ " यावरी रामदेवरायें भणितलें ग्रंथाचा अभंगीं (अंतीं) नाम आमुतें देयावेः मा ग्रंथींचेया जेतुकीया वोवीयाः तेतुकेचि सोनटंके आन चौथरीया आसु वोवाळणीये घालीजेलः जंव नरेंद्र कवें भणितलेंः ना राजे होः आमुचेया कविकुळा बोल लागेलः तंव रामदेवरावो बलात्कारें ग्रंथ तेया पासौनि घेतलाः तवं नरेंद्र कवियें रायातें विनाविलें: जे राजे हो इया ग्रंथीं आझुई क्वचित ठायीं शोध उरलाचि असेः तो एक दीं ग्रंथ देयावाः मा शोधौनी देवोंः तंव रायें भणितलेंः उदेयांचिये वेळें ग्रंथ आणौनी देयावेंः ना तरि आम्ही घेवोंचि लाहोः ऐसें भणौनि हेमाडी पंडितांची (हेमाद्रि) वास पाहिलीः तंव हेमाडी पंडितीं भणितलेंः ना राजे होः आम्ही ब्राह्मण रायाश्रायितें कींः रायासी ग्रंथ नेदू तरि देवों कवणासीः ऐसें भणौनि नरेंद्र कवीया भणितलें: कविवरो राजे कांइ भणितातीः ते तुम्हा प्रमाण आतीः नरेंद्रीं भणितलें: आम्ही रायाचीये कींः ग्रंथु देयावेया कांइ दूषण आतीः रामायण नलोपाख्यान ते तुम्ही रायासी जैं दिधलें तैं रूक्मिणी स्वयंवरुहि करुनिया रायां अर्पावें: शेखीं रामवर्णनु केलेंः तें कांइ वाउरेंचि केलें कींः ऐसें भणौनि सेवटील भागु वाचौनी दाखविलाः तैं रायें तो ग्रंथु नरेंद्र कवीया दिधलाः परि उदेयांची सभे आणौनीः येणेंचि आतीः हो राजेहोः आतीः ऐसें ग्रंथ घेवौनी गृहां गेलेः आन शैल्य नृसिंहातें भणितिलें: तिघे बंधु मिळौनि लेखन करौ पां: तरि तेही मानिलें: ऐसेया परि तीन तीन शत वोवीयाः येयांचि लेखन केले पाः पुनर्लेहों बैसलेतिः तंव ब्राह्म मुहुर्तीचि रायें बोलावो पाठविलें: ग्रंथ शोधु जालाः तो आतांचि आणावाः तेया सारिसोंचि नरेंद्र कवीये ग्रंथु नेवौनि रामदेवरायासी आशिर्वादमंत्रेनसी दिन्हलाः आन नरेंद्र गृहा येवौनि नूतन लेखक ग्रंथ नवशत ओवीयांचा घेवौनि संसाराचा त्याग करुनिया भटोबासा जवळी येवौनी तेंही भिक्षा केलीः ऐसीया परि रूक्मिणी स्वयंवरासी नरेंद्र कवीया महात्म मार्गीं आलेः आन तो ग्रंथुही आला असेः(लीळा १६१)

याप्रमाणें नरेंद्रकृत रूक्मिणीस्वयंवर ग्रंथाची पूर्वपीठिका आहे. महानुभावांच्या सातहि ग्रंथांत हें रूक्मिणी स्वयंवर फक्त ९००ओव्यांचेंच मिळतें. आम्हांस एक प्रत जवळ जवळ २९५० ओव्या असलेली मिळालेली आहे. प्राचीन मराठी

वाङ्मयाच्या एका खंडांत हें नरेंद्र कवीचें संपूर्ण काव्य यावयाचें आहे. या काव्यास वाङ्मयभक्त श्री. अच्युत सिताराम साठे यांनीं प्रस्तावना लिहावयाचें अभिवचन दिलें होतें. पण कालाचा आकस्मिक घाला त्यांच्यावर नुकताच पडल्यामुळें तें कार्य तसेंच राहिलें। असो.

कामाई अग्नि प्रवेशाद्भाव चुकविणें: शिष्यें प्रश्नें मग किती एका दिवसा रामदेवरायो निवर्तैला: तंव सकळही रायाचेया स्त्रिया पतिसवेंचि अग्निप्रवेशाया उदिता जालिया: परि कामाइसें लाहो न करिता देखौनी: रामदेव रायाचेनि ज्येष्ठ पुत्रें सिंगणरायें (शंकर देवरायें) भणितलें: कामाई आतां वेग करा: तुम्ही अग्निप्रवेशाची आहुती कां न कराचि: तंव कामाइसी भणितलें: बा सिंगणा मज सत्व नाहीं: मी तुम्हिये भानवसीयेचा ठोंबरा खावौनि तुम्हें कल्याण चिंतीन: पतिव्रता धर्मेंनसी असेन: तंव सिंगणें भणितलें: जेयातें ये वेळी सत्व नाहीं तेयातें: बांधौनीया रायाचेया सहगमनें चितेसी घालावें लागेल: तंव कामाईसांचा पिता मादळी माहादेव द्रणा आला: तेणें कामाईसातें हातीं धरौनी भणितिलें: हें काई कामाई: गोड तें खाइजे: आन कडु तेया सांडिजे: तुम्ही रायाची अर्धांगी कीं:जी जी माहादेव द्रणें याचे कन्येसी सिंगणरायें पतिसवें बांधौनिया घातली: ऐसें काई अवघा मिनलेया लोकांचेया मुखीं म्हणवौनिया। आमुचेया नांवा बोलु लाविसी तिये वेळीं न माहातीचि निगाली आन प्रेत शिळेवरी उभी ठाकौनी परमेश्वरू नामस्मरण करुनि पुनाति सकल लोकां भोंवतें पाहौनि भणति जाली: बा सिंगणा मज वेधवंती नागदेवाचार्यांचा मंत्रोपदेश असे: आत्म हनने नर्क होती ऐसी माते जाणीव असे: बा सुपुत्रा मातें सोडी: मा भिक्षा करौनी सुखें कल्याण चिंतीत परमेश्वरा आराधने भूदेशीं असेन: तुमतें कांहींचि मागेना: आन तुमचेया कुला बोलहि लागे ऐसा घृणितु आचार ही करैना: माझेया परमेश्वर चिंतनें तुम्हें आयुष्य आन राज्य अखंड टिकैल: ना आइकसी तरि तुम्हें चामुंडे कवणांचेनि हातें सोलवैल: आन निसंतान होवौनी यादववंशीय राज्यछत्राचा ही अल्पावकाशेंचि निःपातु होईलगा: ऐसें आइकौनी तेणें भणितलें: लोटारे लोटा काईसा: भविष्यु साच मानिताये: भणौनि कामाईसा चितेसी लोटिलें: आन तें अवघेंचि भट्टोबासा गोपाळ पंडितें जाणविलें: तंव भटोबासातें शिष्यें पुसिलें: हा भट्टो कामाईसे तळमळीत दग्धली तरि तियेसी काई होईल: भटोबासी भणितलें: वेध: बोध: आन: अनुसरणाचि तळमळ असैल तरि: देहांतिया होईल: अथवा अडाणिये अनुसरण प्रतिबंधले तरि परमेश्वर होईल: तथा वेध बोध असौनीं तळमळ नाहीं तरि प्रमाद अक्षेपौनी चैतन्य फळ होईल: तथा बोध राखिला जेणें तयांचा तोषु उपजेल: तथा बोध नाहीं आन वेध तळमळ असे तरि पुढती पुरुष होउनि जन्मली मग परमेश्वर-ज्ञान

होवौनि भिक्षाचारं करीतोः थोरा साध्यातेयातें परमेश्वरु उधरीजैलः ऐसिया परि भटोबासी कामाई साचेया संशयोच्छेद प्रकर्णी आचारभेदाचें निरोपण केलेंः एकी पुनती पुसिलेंः हा भट्टो कामाईसें रायांसी निस्संतानत्वाचा तथा छत्रभंगाचा श्रापु दिधलाः तो कांई साचु होईलः तंव भटोबासी भाणितलेंः कामाईयेचा मुसा धर्माधिष्ठात्री देवतेनी जें वदविलें तें ब्रह्मादिकांचेनि आतां चुकवितांही न चुकेचि। तें अढळवाणी कीं गा ऐसें सांघीतलेंः (लीळा १७१)

वरील हकीकत नव्यानेंच बाहेर येत आहे. अन्यत्र यासंबंधानें कोठें उल्लेख आलेला नाहीं. लीळाचारित्राचे कर्ते महिंद्र भट हे देशस्थ यजुर्वेदी, सारळकर उपनांवाचे ब्राम्हण होते. हे निजामहद्दीमधील सराळे या गांवचे मूळ राहणारे. यांचा काल ६००।६५० वर्षांपूर्वींचा. यांचे वंशज वांझरगांव येथें राहत असल्याचें समजतें, व वंशज अद्यापिहि सारळकर उपनांव लावितात. त्यापैकीं नारायण बाळकृष्ण सारळकर विद्यमान असल्याचें समजतें.

परशरामबावांनीं ज्यांचें चरित्र लिहिलें त्या नागदेवाचार्यांची पीठिका खालीं देतों. त्यांचे पणजोबा वामनाचार्य यांची वंशावळ येणेंप्रमाणें. हे कृष्णदेव ऊर्फ कन्हरदेव यादवांचे पुरोहित असत. हे मूळचे पुरीचे राहणार.

- वामनाचार्य स्त्री विदुषी महदाई
  - दामोदराचार्य (वृत्तिनिरास)
    - माधवभट्ट-आबाई स्त्री.
      - शार्ङ्गपाणी (मारले गेले).
      - नागदेवाचार्य स्त्री गंगाई.
        - महेश्वर
          - धनेश्वर
          - चक्रपाणी
          - लखुदेव
          - जयदेव
          - नागाऊ (हस्तरिका)
        - वैराग्यदेव
      - वैजनाथ गृहस्थाश्रमी संतती.
      - उमाई. (हस्तरिका[1])
    - वामनायक=वामनभट- स्त्री कामाई
      - आपदेवपाई
      - महदंबा
      - बहिणी

१ हस्तरिका = विधवा.

शिशुपालवध या उत्कृष्ट मराठी काव्याचा कर्ता भानुभट बोरीकर उर्फ भास्कर कवीश्वर व्यास, याच्या चरित्रावर कोणा कवीनें भानुविजय नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ लिहिला आहे. हे भानुभटहि यादवकालीनच होते. त्या भानुविजय ग्रंथांतील ऐतिहासिक उल्लेख खालीं देतों:—

सिंहणराये देवागिरी। तेयाचा कन्हर अवधारी
तेआं पाठी राज्यावरी। महादेवराव बैसिला ॥ १३६ ॥

तया पाठी आमदये। राजी बैसला गतान्वये।
तेया न मनी रामरायें। ओखटेआं प्रवर्तिला ॥ १३७ ॥

हाति सेनिका वधीले। पाट सेनिका मार्वले।
आमदयाचे नेत्र काढिले। रामु राजी बैसिला ॥ १३८ ॥

रामरायापासुनी। जन्मा आले पुत्र तीनी।
वडील शंकरु प्रतापाग्नी। युद्धपटु ॥ १३९ ॥

तयाधारा बल्लाळ भुपू। जेयांचा वाणो नेणिजे प्रतापु।
जेयांची दिठी न साहती रिपु। समरांगणी ॥ १४० ॥

तयाधारा बिंब देवो। जेणे वैरियाचा फेडला ठावो।
जेया न रुचे हावभावो। कामिकांचा ॥ १४१ ॥

शंकरु आपणा रावो मणवी। ते बल्लाळा न रुचे जीवी।
असंसितु घातु पर प्रसवी। पाड न वचे ॥ १४२ ॥

जाणोनि द्वंद्व संघु। वाधा केला विभागु।
तेणें फिटला दुःखरोगु। यादवांचा ॥ १४३ ॥

भल्लाळा त्रिलिंगावरी। रक्षण ठेविले सैंहाद्री।
शंकरा राहविलें देवागिरीं। आपणा जवळी ॥ १४४ ॥

बिंबा गुजराते वरी। गडे केले देशाउरी।
स्वर्ग घायें जीणिले अरी। भूमंडळी ॥ १४५ ॥

ऐसा तो बल्लाळ भूपती। राणीव करीताये पर्वती।
तेणेसी साधिली प्रीती। विनायक दीक्षितें ॥ १४६ ॥

वरील मजकुरांत रामदेवरावाचे तिघे पुत्र शंकर, बल्लाळ व बिंब या तिघांना आपले जिवंतपणींच राज्यविभागणी करून दिल्याचें प्रथमच कळतें. बल्लाळ यास त्रिलिंग (तेलंगण) या विभागावर सैंह्याद्री (माहूर) येथें ठेविलें. शंकरास देवगिरी येथें आणि बिंबास गुजराथेवर. मात्र बिंबानें पुढें ठाण्यास राज्य

स्थापिलें. यासंबंधानें कै. राजवाडे यांनीं प्रसिद्ध केलेल्या महिकावतीच्या बखरींत विस्तृत माहिती मिळते.

दुसरा उतारा—

तुर्कांचिया कारागारी । बंधनी पडिलिया भानुसूरी ।
तंव गुप्तिये जाणवीले देवगिरी । रामरायां ॥ १ ॥

भणति राया भानुसूरी । तुर्कीं धारिला हातोहातीं ।
आम्हा आंगवणें नाटोपिती । जुंझारिले ॥ २ ॥

ऐकतां खेवो वृष्णीपती । दचकौनि म्हणे न चले गती ।
प्रधानु आम्हाणी तुर्कांप्रति । कळों आलें ॥ ३ ॥

जरि करावा रणकंदन । हेमाद्रि तुर्का लागले पण ।
दिल्लीश्वरें देवोनि धन । मंत्री पा वश्यु केला ॥ ४ ॥

करो जाती युद्धाहती । आम्हा विरोधी दुर्मती ।
म्हणे तुर्का आम्हा प्रीती । तरि दंदु कां पां कीजे ॥ ५ ॥

राणे राजपुतां सैनिका । नेदी हा कवडां मागतां ।
पुन चतुरंगामाजी विषमता । वाढविली येणें ॥ ६ ॥

भानुगणीं असाहणें पणें । अहिता प्रेरिलें दुर्जनें ।
तुर्कां कांई असे आंगवणें । हेमाद्रियेचीं बंधाविलें ॥ ७ ॥

या ओव्यांत भानुभटास तुर्कांच्या बंदींत पडावयास हेमाद्रीच कारण झाल्याचें कवि म्हणतो. येवढेंच नव्हे तर हेमाद्रि हा तुर्कांस मिळून त्यांच्याकडून द्रव्य घेऊन राजद्रोहीपणाचाहि दोष त्यानें केला होता असें स्पष्ट म्हटलें आहे. अन्य पुराव्याच्या अभावीं यासंबंधानें कांहींच निश्चय करतां येत नाहीं.

सिंहाद्रीचिये पाठारी । त्रिविक्रमाची जन्मपुरी ।
पुनित गावो कासारबोरी । गंगे उत्तरे ॥ १ ॥

त्रिविक्रमु विद्यापती । भास्कराचार्य वेदमूर्ति ।
तयाचा गोविंदु अद्वैती । तिये शाखेसी ॥ २ ॥

प्रभाकराचा मनोरथु । तेआंचा महेश्वरु पुनीतु ।
तेयांचा कवीश्वरु पंडितु । वेदांतिया ॥ ३ ॥

कवीश्वराचार्यापासुनी । कमलापोटीं पुत्र दोनी ।
जेष्ट चांगो फल्हस्थानीं । गुरु तो यादवांचा ॥ ४ ॥

चांमोचे राजनायकु । राजेंद्राचा पुत्र जनकु ।
तेया चांगदेवो अवतारिकु । मायापती ॥ ५ ॥
धारा कवीश्वराचा कुमरु । कमलेपोटीं लक्ष्मीधरु ।
तेआंचा पोटीं अनंतेश्वरु । तेआधारा चांगदेओ ॥ ६ ॥
चांगदेवो देशाउरी । अध्यापकु जाला अवधारी ।
अनंतें घातली कासारबोरी। लौघ्याकारण शाला ॥ ७ ॥
अनंता यादवें आव्हाणौनी । राहाविले तीर्थी पैठणीं ।
अध्यापकु वृत्ती स्वीकरौनी ः राये वृत्ती वर्तती ॥ ८ ॥
क्रमेंचि अनंतापासौनी । उमांबाजठरी पुत्र दोनी ।
तल्लाभें दंपत्यु मनी । अति सुखाथिले ॥ ९ ॥
जेष्ठ नावें दिवाकरु । धारा भानु कवीश्वरु ।
अचाट प्राज्ञा साचोकारु । वाचस्पतीसा ॥ १० ॥
मग दिवाकराची ब्राह्मणा । जुदैवें झाली गर्भिणी ।
एक कन्या पुत्र दोनी । वरां ओपी ॥ १३ ॥
तीर्थी कर राची श्रीपुरी । व्याहिली कन्या दिवाकरी ।
तंव ती हातरिती जाली कुमरी । तोकडेनि कालें ॥ १४ ॥
तेचि भुआई नागांबिका । त्यागा पातली भानुजवाळिका ।
जेही बोधिले रघुनायका। नांदेडकरातें ॥१५॥ भानुविजय अध्याय १३

यामध्यें भानुभटाची पूर्वपीठिका दिली आहे. आद्य पुरुष त्रिविक्रम-भट्ट हा बहुधा नलचंपूचा कर्ता त्रिविक्रम भट असून राजा भोज यांचा विद्यापति असावा. वंशावळ खालीलप्रमाणें येतेः--

त्रिविक्रम विद्यापती
|
भास्कराचार्य
|
गोविंदु
|
महेश्वरु
|
कवीश्वरपंडीत–कमला



या वंशावळींतील भास्कराचार्य (१) हा प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य होय. आणि चांगदेव (२) हाच चांगदेव, ज्यानें भास्कराचार्यांचे ग्रंथ शिकविण्याकरतां खानदेशांतील पाटण येथें शाळा काढिली होती. त्या पाटण येथील शाळेचा शिलालेख के. राजवाडे यानीं प्रकाशित केलेला तो सुप्रसिद्धच आहे. भानुकवीश्वर हेच भानुविजय ग्रंथाचे चरित्रनायक होत.

'विराट पाठी चरित्र' म्हणून एक चरित्रग्रंथ आहे. त्यांतील पुढील अवतरण देत आहे. त्यावरूनहि तत्कालीन इतिहासावर थोडा प्रकाश पडेल.

शके ११०३ विरोध संवत्सरी भाद्रपद मासी शुक्रवार द्वितीयेसी पुर स्वीकारिलें: मरवस (भडोच) त्रिमल्ली देव राजा त्यासी भड्ग्रुषीचा श्राप म्हणून पुत्र नाहीं. त्याचा प्रधान विशालदेव तो सामग ब्राम्हण लाड देशीच्या त्रिमल्ल देवरायें मरणसमयीं विशाळ देवासी राज्य दीधलें व पालक पुत्र निरोपिला तोहि निवर्तला विशाल देवासी पुत्र नाहीं मग हरिपाल देव बहुतां नवसें जाला तो बहुता प्रकारें पुरुषार्थी जाला तयाचा विव्हाव जाला तयासि वरुषें २२ भरलीं तंव सिंघणरायोंचे कटक गुजरावर चालिले जे रायेवीण प्रधान राज्य करीत असे तर ते राज्य घ्यावे म्हणौनि सिंघणें चाल केली जगळदेव विंझदेव आणि एक असें तीन योध्ये गुजरावर पाठविले. ते ऐकून विशाळदेवें आपले सकळही बल्हाने पाठविले सवे मुंजमल्ल प्रधान दीधला मग येरयेरादळा जुंझ जाले सिंघणाचेनि दळे प्रधानाचे दळ भंगले मग प्रधान पुत्रे कटकेची आइती मांडिली पूर्वेच्या दारवंठे निघून स्वारी केली हे ऐकून जाधवी मुरड घेतली ते प्रधानपुत्रें भंमिले ठाव बैसावित वेळा पुरावेन्ही आला

मागुते आपल्या नगरासी गेला. मग लिंपणे शिपाई केली मग प्रधानाची कटके बा-डली ऐसा पराक्रमाचा तो प्रधानपुत्र होता.

वरील अवतरणांत जो प्रधानपुत्र हरीपाळदेव म्हणून वर्णन केला आहे, तोच पुढें राज्यत्याग करून श्रीचक्रधर या नांवानें प्रसिद्धीस आला व तोच महानुभावीय सांप्रदायाचा संस्थापक होय.

याप्रमाणें प्राचीन ग्रंथामध्यें जे यादवकालीन ऐतिहासिक उल्लेख आले आहेत ते आपणापुढें सादर केले आहेत. या उल्लेखांतील ऐतिहासिक सत्यास अन्य पुराव्याची कसोटी लाविल्याशिवाय कांहींच निश्चय करतां येत नाहीं. संशोधक विद्वानांच्या पुढें ग्रंथांतून आढळलेले उल्लेख परीक्षणार्थ ठेवण्याचेंच कार्य फक्त केलें आहे.

---

१६ सोनवडे येथील श. ९५५ चा चालुक्य ताम्रपट.

(लेखक-गणेश हरी खरे, टिळक राष्ट्रीय विद्यालय सातारा)

उपलब्धिः— हा ताम्रपट प्रो. दत्तो वामन पोतदार यांनीं निजाम हैद्राबादे-हून आणिला. त्यांच्या कृपेनें तो मला वाचण्यास मिळाला. मला जसा वाचतां आला तसा वाचून मंडळाच्या आजच्या वाढदिवसाच्या[1] प्रसंगीं आपणापुढें मांडीत आहे.

ताम्रपटवर्णनः— ताम्रपटाचे एकंदर तीन पत्रे असून ते एका जाड कडींत ओंवले आहेत. पहिल्या व शेवटच्या पत्र्याच्या बाहेरच्या बाजू अलिखित असून बाकीच्या ४ बाजूंपैकीं प्रत्येकीवर अनुक्रमें २१, २१, २०, १३ ओळी आहेत. प्रत्येक ओळींत सुमारें ५० अक्षरें आहेत. प्रत्येक पत्र्याची लांबी, रुंदी, जाडी अनुक्रमें १५, ९॥, $\frac{1}{8}$ इंच आहे. कडीचा व्यास ४ असून ज्या सळईची कडी बनविली आहे तिचा व्यास किंवा आडवा छेद $\frac{1}{2}$ इंच आहे. कडीचीं दोन्हीं तोंडें ज्या ठिकाणीं एकत्र केलीं आहेत त्या ठिकाणीं चौकोनी मुद्रा आहे. तिची लांबी रुंदी अनुक्रमें ३॥ व २॥ इंच आहे. या मुद्रेवर मधोमध वराह, वरच्या बाजूस डावीकडून उजवीकडे चक्र, शंख, चंद्र, सूर्य, गदा व खालच्या बाजूनें स्वस्तिक व

---

१ एकोणिसावा वाढदिवस शके १८५१ आषाढ शु. (७-७-२९)

अंकुश खोदले आहेत. अगदीं खालच्या बाजूस ५।६ कानडी अक्षरें आहेत. तीं बहुधा " श्रीमत्चालुक्याभरण " अशीं असावींत.

अक्षरवाटिका:– अक्षरें देवनागरी पद्धतीचीं असून त्यांचें स्वरूप याच जयसिंहाचे जे इतर ताम्रपट सांपडले आहेत, त्यांशीं बरोबर जुळतें. येवढेंच नव्हे तर इतर ताम्रपटांत अक्षराचे आदेश करण्याची जी पद्धत तीच याहि ताम्रपटांत दिसून येते. उदाहरणार्थ, [२]मिरज, दौलताबाद, कवठे येथील ताम्रपटांत ब बद्दल व, आणि श बद्दल स लिहिले आहेत. तीच पद्धत या शासनाच्या लेखनांतहि अमलांत आणिली आहे. लेखनांत फारशी चूक आढळून येत नाहीं. क्वचित् एकादें अक्षर खोदावयाचें राहून गेलें आहे. पण एकंदरींत ताम्रपट कोरणारा शुद्ध लिहिणारा असावा असें दिसतें. हल्लीं आपण ओळीच्या शेवटीं अपुऱ्या राहिलेल्या शब्दापुढें – अशी रेघ ओढतो. येथें ।– असें चिन्ह केलें आहे.

भाषा:– भाषा गद्यपद्य मिश्रित संस्कृत आहे. पद्यभागांत विविधवृत्तें योजलेलीं असून शब्द व अर्थ असे दोन्ही अलंकार साधण्याची खटपट केली आहे.

कालनिश्चय:–दान ९५५ शकांत श्रीमुख संवत्सरीं आषाढ वद्य अमावास्येस सूर्य ग्रहण समयीं दिलेलें आहे. दि. ब. पिल्ले यांच्या थोरल्या जंत्रींत श. ९५५ ला श्रीमुख संवत्सर दिला असून आषाढ अमावास्येस सूर्य-ग्रहणहि वर्तविलें आहे.

स्थल निश्चय:– दान केलेलें सोनवडें गांव निजाम हैद्राबादेपासून वायव्येस सुमारें ३०।४० मैलांवर असावें. हैद्राबाद संस्थानचा मोठा नकाशा मला पहावयास मिळाला नाहीं त्यामुळें सर्व गांवांचा पत्ता लागला नाहीं. ज्यांचा पत्ता लागला तीं हल्लींच्या नांवासह व इतर तर्कासह खालीं देतों.

सोन्नवड=(सोनवडें); वंजरा नदी=मांजरा नदी, किसगेरे=किसगूर; आत्ति णउर=हातणूर; लक्ष्मणा=(लाखण), मोदेयपल्ल= ! पेंगुरगुंटे=(पिरंगूट); मुग्रद्देप= !

दानकालीं राजाचा मुक्काम **पोटलकेर** या गांवीं होता. तसेंच सोनवडे गांव **वीरिंगे** चाळिशी मधील होतें, यांपैकीं पोटलकेर किंवा होटलकेर हे बल्लारी जिल्ह्यांतील धण्णायकरण होय, असें डॉ. फ्लीट म्हणतो. वीरिंगेचा पत्ता लागत नाहीं.

---

२ या लेखांत मीं ज्या ताम्रपटांचा उल्लेख केला आहे ते कोठें छापले आहेत हें सांगून ठेवतों.

(१) कवठें ताम्रपट:– इंडि. ॲंटि. भाग १६; (२) दौलताबाद ताम्र-पत्र:–हैद्राबाद आर्किऑलॉजिकल सीरीज़ नं. २; (३) मिरज ताम्र०:– इंडि. ॲंटि भाग ८ व एपि. इंडि. भाग १२; (४) येवूर शिलालेख:– इंडि. ॲंटिहि भाग ८ व एपि. इंडि. भाग १२, (५) निळगुंद ताम्र. एपि. इंडि. भाग १२;

वंशावळः— या ताम्रपटांत खालील वंशावळ आली आहे.

(१) जयसिंह ⟶ (२) रणराग ⟶ (३) पुलकेशी ⟶ (४) कीर्तिवर्मा
⟶ (५) मंगलीश

(४) कीर्तिवर्मा ⟶ (६) सत्याश्रय (पुलकेशी २ रा) ⟶ (७) नेडमारि ⟶ (८) आदित्यवर्मा ⟶ (९) विक्रमादित्य ⟶ (१०) युद्धमल्ल (विनयादित्य) ⟶ (११) विजयादित्य ⟶ (१२) विक्रमादित्य ⟶ (१३) कीर्तिवर्मा
⟶ अज्ञात (भीम) ⟶ कीर्तिवर्मा ⟶ तैल ⟶ विक्रमादित्य ⟶ भीम ⟶ अय्यण × कृष्णनन्दना ⟶ विक्रमादित्य × बोंथा देवी ⟶ (१४) तैल × जाकब्वा भम्मह रट्टाची मुलगी ⟶ (१५) सत्याश्रय
⟶ (१६) दशवर्मा × भाग्यवती ⟶ (१७) विक्रमादित्य
⟶ (१८) जयसिंह (मल्लिकामोद)

क्र. ७, ८, ९, १० या व्यक्तींविषयीं वाद आहे. बदामी चालुक्यांच्या लेखांत नेडमरि ही व्यक्ति मुळींच आढळत नाहीं. आदित्यवर्मा आहे; पण तो पुलकेशी २ रा याचा मुलगा सांगितला आहे. तसेंच विक्रमादित्य हा आदित्यवर्म्यांचा मुलगा न सांगतां पुलकेशी २ रा याचाच मुलगा सांगितला आहे. कदाचित् असें असणें शक्य आहे कीं, हे तिघेहि पुलकेशी दुसरा याचे मुलगे असूनहि लेखकास बरोबर माहिती नसल्यानें चुकीनें या तिघांना आजा, बाप व मुलगा असें दाखविलें आहे. विक्रमादित्य १ ला याच्या भावाला विनयादित्य युद्धमल्ल नांवाचा मुलगा होता. लेखकानें चुकीनें विक्रमादित्य १ ला याचा मुलगा जो विनयादित्य त्यासच युद्धमल्ल म्हणून संबोधिलें आहे. कीर्तिवर्मा (२ रा) यानंतर तैला (१४) पर्यंतच्या व्यक्तीविषयीं लेखी पुरावा मिळत नाहीं. यामुळें त्यांच्याविषयीं निश्चित विधान करणें अवघड आहे. अय्यणानें कृष्णाच्या मुलीशीं लग्न केलें. हा कृष्ण राष्ट्रकूटांपैकीं कृष्ण ३ रा धरला तर त्याचा काल श. ८६२ ते ८८३ असल्यामुळें अय्यणाचा काल सुमारें श. ८६० येईल. अय्यणाचा मुलगा विक्रमादित्य यानें चेदि लक्ष्मण याची मुलगी बोंथा इजशीं लग्न केलें. ह्या लक्ष्मणाचा काल श. ८७२ च्या पुढें आहे. अर्थात् विक्रमादित्याचा काल सुमारें श. ८८० असा येईल.

चर्चा—एपि. इंडिकाच्या १२ व्या भागांत डॉ. बारनेट यांनीं कवठे (श. ९३०); मिरज (श. ९४६); येवूर (श. ९९९) व निळगुंद (श. १००९) या चार लेखांची तुलना करणारें एक कोष्टक दिलें आहे. त्या वेळीं जयसिंहाचे तत्कालीन ताम्रपट उपलब्ध नव्हते. यामुळें त्यांस तुलना करण्यासाठीं बऱ्याच दूरच्या कालांतील

लेख घ्यावे लागले. आज आपल्यापुढें सोनवडें ताम्रपटाशीं तुलना करण्यास जगदेकमल्लाच्या कारकीर्दीचे आणखी दोन ताम्रपट आहेत. एक मिरज ताम्रपट (श. ९४६) व दुसरा दौलताबाद ताम्रपट (श. ९३९). या तीन ताम्रपटांची तुलना करतां खालील गोष्टी आपल्या ध्यानांत येतात.

(१) तीन्ही ताम्रपटांतील वंशावळ एकच आहे.

(२) सोनवडें ताम्रपटांत असणारा 'विख्यात कृष्णवर्णे' हा श्लोक मिरज व दौलताबाद ताम्रपटांत नाहीं.

(३) या ताम्रपटाचे शेवटीं असलेला 'मयेदं-लिखितम्' हा भाग इतर दोन्ही ताम्रपटांत नाहीं.

पैकीं वंशावळी विषयीं वर लिहिलें आहे. दुसऱ्या दोहोंविषयींचें म्हणणें पुढें देतों.

(२)'विख्यात कृष्णवर्णे' हा श्लोक मिरजेच्या ताम्रपटांत नाहीं.या ताम्रपटांत आहे. मिरज ताम्रपटांत " पंचद्रमिलाधिपतिं बलवंतं चोलं निर्धत्य सप्तकोंकणाधीश्वराणां सर्वस्वं गृहीत्वा उत्तरदिग्विजयार्थं कोल्लापुरसमीप " वगैरे उतारा आहे. मिरज ताम्रपटाचे वेळीं त्याच्या ताब्यांत ' कुंतलविषय' (कृष्णा-तुंगभद्रा नद्यांमधील प्रदेश) नसावा. श. ९४६ ते श. ९५५ च्या दरम्यान हरप्रयत्नानें त्यानें तो देश पूर्णपणें आपल्या ताब्यांत आणिला, आणि ही गोष्ट सुचविण्याकरितां या ताम्रपटांत ' विख्यातकृष्णवर्णे ' हा श्लोक घातला असावा.

(३) दौलताबाद व मिरज या ताम्रपटांत लेखकाचा उल्लेख ' भोलमार्य (भोलार्य) प्रतिबद्ध मायिवेवेन (माइपैयेन) असा आहे. पैकीं भोलार्य हा दौ. ता. चे वेळीं साधा दंडनायक व शासनाधिकारी दिसतो. तोच मि. ता. चे वेळीं महाप्रचंडदंडनायक झाला.सो.ता.चे वेळीं महाप्रचंडदंडनायक × कालिदास, शासनाधिकारी व अक्षपटलिक'निम्बण' असे वेगळेच अधिकारी आहेत. लेखक चामुंड' हा असून तो दृशधर्मांचा मुलगा व महाकवि *प्रज्ञाकरपंडित याचा भाचा सांगितला आहे. अर्थात् ही माहिती नवीन आहे.

× निळगुंद ताम्रपटाचे शेवटीं " मयेदं शासनाधिकारिकाक्षपटलिकमहाप्रचंडदंडनायककालिदासमुतविक्रमादित्यानुमत्या " वगैरे मजकूर आहे. आपल्या ताम्रपटांतील कालिदास व ह्या अवतरणांतील कालिदास एकच असावेत. अर्थात् पूर्वी अधिकार. वंशपरंपरेनें चालत असे हें लेखी व पुराव्यावरूनहि सिद्ध होतें.

* आफ्रेट सूचीच्या २ ऱ्या भागांत प्रज्ञाकर पंडिताविषयीं खालील माहिती आहे. " प्रज्ञाकर पंडित=मैथिल, विद्याकराचा मुलगा, आनंदकरस्वामींचा नातू व 'नलोदय ' काव्यावर सुबोधिनी नांवाची टीका लिहिणारा. " पण हा प्रज्ञाकर व वरील प्रज्ञाकरपंडित एक कीं दोन हें सांगतां येत नाहीं.

ताम्रपट.+

पत्रा १ बाजू २ री

(१) [1]जयत्याविष्कृतं[तं] विष्णोर्व्वाराहं क्षोभितार्ण्णवं । दक्षिणोन्नतदंष्ट्राग्रविश्रांत-
भुवनं वपुः । श्रियमुपहरताद्वः श्रीपतिः

(२) क्रोडरूपो विकटविसददंष्ट्राप्रान्तविस्रान्तिभाजम् । अवहद्वहदुरुरुष-
विस्पष्टकांडप्रतनुविसजटाग्रग्रंथि त(व)यो

(३) धरित्रीम् ॥ [3]करिमकरमकारिकांकितजलनिधिरसनां वसीकरोत्सवविवधूम् ।
जगेवकमल्लभूपतिरकलंकयसो

(४) वुरासिवलयितभुवनः ॥ गद्यम् ॥ स्वस्ति समस्तभुवनसंस्तूयमानमानव्यस-
गोत्राणां हारीतिपुत्राणां कौसिकीवरप्रसा

(५) दलब्धस्वेतातपत्रादिराज्यचिन्हानां सप्तमातृकापरिरक्षितानां कार्तिकेयवर
प्रसादलब्धमयूरपिञ्छकुंतध्वजानां

(६) भगवन्नारायणप्रसादासादितवरवराहलांछनेक्षणक्षणवसीकृताराातिराज-
मंडलानां समस्तभुवनाश्रयसर्व्वलोकाश्रय

(७) विष्णूवर्धनविजयादित्यादिविसेषनाम्नां राजरत्नानामुद्भवभूमिः ॥
वृत्तम् ॥ [4]कवलितनललक्ष्मी दुर्ज्जयोर्ज्जित्यहारी

(८) विहृतपृथुकदम्बाडम्बरो मौर्यनिर्ज्जित् । निजभुजबलभूम्नोत्पाटयन्राष्ट्रकूटा
न्विलितकलचुरिरत्नीरस्ति चालुक्यवं

(९) सः ॥ तज्जेषु राज्यमनुपाल्य गतेषु राजस्वेकान्नषष्टिगणनेषु पुरा
ध्ययोध्यम् । तद्वंसजास्तदनु षोडसभूमिपालाः

(१०) क्ष्मां दक्षिणापथजुषं बिभरांबभूवुः ॥ दुष्टवष्टा(व)ब्धायां कतिपयपुरुषान्त-
रान्तरितायाम् । चालुक्यकुलसं

(११) पदिभूयश्चालुक्यवंस्य एव ॥ [5]कंदष्कीर्त्तिलतांकुरस्य कमलं लक्ष्मीविलासास्पदं
वजं(ज्रं) वैरिमहीभृताम्प्राति

(१२) निधिर्द्दैवस्य दैत्यद्रुहः । राजासीज्जयसिंघवल्लभ इति ख्यातश्चरित्रैर्नि-
जैर्यो रेजे चिरमादिराज

---

१ अनुष्टुभ्. २ मालिनी. ३ आर्यागीति. ४ मालिनी. ५ वसंततिलक.
६ शार्दूलविक्रीडित.

+ ताम्रपटांत श आणि ब बद्दल आलेले स आणि व, जाड ठिकयानें दाखविले आहेत.

(१३) चरितोत्कंठाः प्रजानां हरम्(।) यो राष्ट्रकूटकुलमिन्द्र इति प्रसिद्धम्। कृष्णा-
ह्वयस्य सुतमष्टसतेभसैन्यन्निर्ज्जित्यदग्धनृपपं

(१४) चसतो वभार भूयश्चलुक्यकुलवल्लभराजलक्ष्मीम् ॥ [10]चटुलरिपुतुरगपटुभटक-
रटिघटाकोटिघटितरणरागः। सुकृतह-

(१५) रचरणरागस्तनयोभूत्तस्य रणरागः ॥ [11]तत्तनयः पुलकेसी केसिनिषूदन
समोभवद्राजा वातापिपुरीवरपतिरकलित

(१६) सलकलिकलंककलः॥ [12]वंयमपि पुलकेसिक्ष्मापतिं वर्णयन्तः। पुलककलित-
देहाः पश्यतायापि सन्तः। स हि तुरग ग

(१७) जेन्द्रग्रामसारं सहस्रद्वयपरिमितमृत्विक्सात्करास्वमेधे ॥ तत्तनयः ॥ नल-
[11]निलयविलोपी मौर्यनिर्याणहेतुः। प्रथित

(१८) पृथुकदम्बस्तम्बभेदीकुठारः। भुवनभवनभागापूरणारंभमारव्यवासितसित-
कीर्त्तिष्कीर्त्तिवर्म्मा नृपोभूत् ॥ तदनुतस्या

(१९) नुजः ॥ सर्वद्वीपाक्रमणमहसो यस्य नौ सेतुबन्धैरुल्लंघ्याब्धिं व्याधित पृतना-
रेवतीद्वीपलोक(प)म्। राज्यश्रीणां हठपतिरभूत्

(२०) यस्तु कालच्चुरीणां वभ्रेभूमिं सह स सकलैर्म्मङ्गलैर्मङ्गलीसः॥ [13]ज्येष्ठ-
भ्रातुस्सतिसुतवरेप्यभंकत्वादसके यस्मिन्नात्मन्य

(२१) कृत हि धुरं मङ्गलीसः पृथिव्याः। तस्मिन्प्रत्यार्प्पिपदथ [म] हीं यूनि सत्या
स्रयेसौ चालुक्यानां क इव हि पथो धर्म्यतः

पत्रा २ रा. बाजू १ ली.

(२२) प्रच्यवेत। [14]जेतुर्हर्सा विजितहर्षमहानृपस्य दातुर्मनोरथसताधिकमर्थय-
द्भ्यः। सत्यादिसर्व्वगुणरत्नगणाकरस्य। सत्यास्रय

(२३) त्वमुपलक्षणमेव यस्य ॥ [15]अडमरीकृतदिग्वलयोर्दितद्विडमरीपरिगीतमहायसाः
मृडमरिष्टभिदं मनसोद्वहन्नेडमरिक्षि

(२४) तिपोजनि तत्सुतः ॥ [16]सुतस्तदीयो गुणरत्नमाली भूवल्लभोभूद्भुजवीर्यसाली
आदित्यवर्म्माज्जितपुण्यकर्म्मा तेजोभिरादित्यस

(२५) मानधर्म्मा ॥ [17]तत्सुतो विक्रमादित्यो विक्रमाक्रान्तभूतलः। ततोपि
सु(यु)द्धमल्लाख्यो युद्धे यमसमो नृपः ॥ [18]तज्जन्मा विजयादित्यो वी-

(२६) रानेकांगसंगरे। चतुर्ण्णामण्डलानामप्यजयद्विजयोपमः॥ [19]तद्भवो विक्रमादित्य
ष्कीर्त्तिवर्म्मा तदात्मजः येन चालुक्यराज्यश्रीरन्तरा

---

७ वसंततिलक. ८ आर्या. ९ आर्या. १० व ११ मालिनी. १२ मंदाक्रांता. १३ मंदाक्रांता. १४ वसंततिलक. १५ द्रुतविलंबित. १६ उपेंद्रवजा. १७ अनुष्टुभ्. १८ अनुष्टुभ्. १९ अनुष्टुभ्.

(२७) यिण्यभूद्भुवि ॥ [20]विक्रमादित्यभूपालभ्राता भीमपराक्रमः । तत्सूनुष्कीर्त्ति-
वर्म्माभून्मृत्रासादितदुर्ज्जनः । [21]तैलभूपस्ततो जातो विक्रमा
(२८) दित्यभूपतिः । तत्सूनुरभवत्तस्माद्भमिराजा रिभीकरः ॥ [22]अय्यणार्यस्ततो-
जज्ञे यद्वंसस्य स्त्रियं स्वकं । प्रापयन्निव वंसं स वबृतेकृष्णनन्द
(२९) नाम् ॥ [23]अभवत्तयोस्तनूजो विभवविभासी विरोधिविध्वसी तेजोविजयादित्य-
स्सत्यधनो विक्रमादित्यः ॥ [24]चेदीसवंसतिलका लक्ष्मणराज
(३०) स्य नंदना नुतसीलाम् वोंथादेवीं विधिवत्पारिणिन्ये विक्रमादित्यः ॥
[25]सुतमिव वसुदेवाद्देवकी वासुदेवं गुहमिव गिरिजामिर्दुवम
(३१) धेन्दुमौलेः ॥ अजनयदथ वोंथादेव्यतस्तैलभूपं विभवविजितसक्रंविक्र-
मादित्यनाम्नः ॥ [26]अरिकुंभिकुंभभेदनरिपुदुर्गकवाटभे
(३२) दनप्रभृतिः सहजबलस्य हरेरिव बालक्रीडा भवेद्यस्य ॥ किञ्च ॥ राष्ट्रकूट-
कुलराज्यसम्बन्धावुभौ [27]और्ज्जित्यौवरणा
(३३) विवप्रचलितौ साक्षात्कलेष्कामतः । क्रूरौ वद्धसरीरकौ गुरुजनद्रोहप्ररोहाविव
कालात्खंडितराष्ट्रकूट
(३४) ककुलं(ल) श्रीवल्लिजातांकुरौ लूनौ येन सुसेन कर्कररणस्तंभौ रणप्रांगणे ॥
[28]इत्थं पुरा दितिसुतैरिव भूतधात्रीं
(३५) यो राष्ट्रकूटकुटिलैर्गमितामधस्तादुध्दृत्य माधव इवादिवराहरूपो वभ्रेचलुक्य-
कुलवल्लभराजलक्ष्मीं ॥ [29]हूणप्राणहरप्रतापद
(३६) हनो यात्रात्रसन्मारवः । चैद्यश्छेद्यसिलक्ष्माजयनयन्युत्पन्नधीरुत्प(त्क)लः
येनात्युग्ररणाग्रदर्शितवलप्राचुर्यसौर्योदयः कारागा
(३७) रनिवेसितश्कविनृपा (वृषा)यं वर्णयन्घूर्णते । [30]मम्महरंब्बादभवद्भूपाला-
त्राष्टकूटकुलतिलकात् । लक्ष्मीरिव सलिलनिधेः श्रीजाकव्वा
(३८) ख्याकन्या ॥ [31]चालुक्यवंसांवरभानुमाली श्रीतैलभूपाल उपायतैनां तयोश्च
लोकाभ्युदयाय योगः स चंद्रिका चंद्रमसोरिवासी
(३९) त् ॥ [32]श्रीतैलभूमिपालात् श्रीजाकव्वा समजीजनत् । श्रीमत्सत्याश्रयंस्कं-
दमम्बिकात्र्यम्बकादिव ॥ [33]विद्विषद्गोत्रवित्रासीदेवोविबुध
(४०) सम्मतः दिवीव भुवि यो धत्ते सर्ववर्णवरं धनुः। अपिच ॥ [34]यस्य प्रतापज्वलनेन
दग्धः प्ररोहतीवारिगणस्य वंसः वालैः प्ररूढा (ढां) कु

---

२० अनुष्टुभ्. २१ अनुष्टुभ्. २२ अनुष्टुभ्. २३ आर्या. २४. आयार्गीति व आर्या. २५ मालिनी. २६ आर्या. २७ शार्दूलविक्रीडित. २८ वसंततिलक. २९ शार्दूलविक्रीडित. ३० आर्या. ३१ उपजाति. ३२ अनुष्टुभ. ३३ अनुष्टुभ. ३४ उपजाति

(४१) रजालकल्पैर्हृसां विजेतुष्वपि सन्निविष्टैः ॥ [35]तस्यानुजस्त्रीदसवर्म्मनामा। तद्वल्लभा भाग्यवतीति देवी तयोरभूद्विक्रमसील

(४२) साली श्रीविक्रमादित्यनृपस्तनूजः ॥ [36]असौ निजज्येष्ठपितुः परोक्षं व्रभारवारांसिवृतां धरित्रीम्। भुजेन केयुरलताभि

पत्रा २ रा, बाजू २ री-

(४३) दोव्वैर्विदारितारातिकदंबकेन ॥ [37]ज्योत्स्नेवेन्दुमुनिर्म्मला निसि सि(स)रस्ती रेषु हंसाकृतिः। कासस्ता (स्तो)मसमा सरित्सुगगने गौ

(४४) राभ्रवृन्दद्युतिः। कीर्तिर्यस्य तदुद्यमोचितसराचिन्हायमानारिपून्। नित्यं भाय-यतीच्छमन्यसमये श्यामासविद्वेषिणी। [38]वर्ण्णाश्र

(४५) माणां स्थितये स्थितोपि यस्याकरोद्वर्ण्णविसेषहानिं। स्वकीर्तिभिर्व्याप्तदिग-न्तरामिस्तथापि लोके महनीय एव ॥ [39]त्यागादयो यस्य

(४६) गुणाः प्रसिद्धाः संख्यामतिक्रम्य सदा प्रवृत्ता येस्सज्जनानां हृदयानि वध्वा समाचकर्षात्मसमीपदेसं ॥ तदनु तस्यानुजः ॥ [40]यस्या

(४७) सिलव्याप्ति यसोवदातमकांडदुग्धांवुधिवृद्धिसंकां करोतिमुग्धामरसुन्दरीणा मभूत्स भूपो जगदेकमल्लः ॥ [41]सदा वनस्थः पटुवि

(४८) क्रमाढ्यो मदान्धगन्धेभघटाविपाटी धरोर्ज्जितप्रस्फुरितप्रभावो रराज योसौ जयसिंघराजः ॥ [42]यत्र प्रसीदति समस्तजगच्छरण्ये

(४९) न्यकूच(कु)रन्तकं(क)मपि क्षितिपाः सकोपं यस्मान्मनोरथपथातिगमर्थमर्थी संप्राप्य संस्मरति न स्म सुरद्रुमाणां। [43]अंगमदासिलधात्री येन

(५०) राजम्वतीत्वान्निवसति नृपलक्ष्मीर्यस्य सुभ्रातपत्रे। स सकलनमितारिक्षोणि-भृन्मौलिरत्नद्युतिसवलितपादो गंडरोलगंडभूपः

(५१) [44]अदोषाकरसंगोपि विनापि मलदूषणं। सभूतिभूषणो यस्च संप्राप ज्जगदी-सतां। [45]विख्यातकृष्णवर्णे तैलस्नेहोपलब्धस

(५२) रलत्वे कुन्तलविषये नितरां विराजते मल्लिकामोदः॥ स तु स्त्रीपृथ्वीवल्लभ-महाराजाधिराजपरमेस्वरपरमभट्टा

(५३) रकसत्याश्रयकुलतिलकचालुक्याभरणस्त्रीमज्जगदेकमल्लदेवश्रीमद्वल्लभनरेन्द्र-देवः कुसली सर्व्वानेव यथास

(५४) म्वध्यमानकान्राष्ट्रपतिविषयपतिग्रामकूटकायुक्तकनियुक्तकाधिकारिकमहत्तरा-दीन्समादिसत्यस्तु वः संविदितं

---

३५ उपजाति. ३६ उपेंद्रवजा. ३७ शार्दूलविक्रीडित. ३८ उपजाति. ३९ उपजाति. ४० उपजाति. ४१ उपेंद्रवज्रा. ४२ वसंततिलक. ४३ मालिनी. ४४ अनुष्टुभ. ४५ आर्या.

(५५) यथास्माभिः ॥ सकनृपकालातीतसम्वत्सरसतेषु नवसु पञ्चपञ्चासदधि-
केष्वंकतोपि सम्वत् ९५५ प्रवर्त्तमान स्त्रीमुखसम्वत्सरा

(५६) न्तर्गताषाढामावास्यायां पोट्टलेकेरे समावासितनिजविजयस्कन्धावारे
सूर्यग्रहणमहापर्व्वनिमित्तं भारद्वाजगोत्राय बह्व

(५७) चसाखासब्रह्मचारिणे श्रीवत्सभट्टपौत्राय दामोदरभट्टसुताय यजन-
याजनादिषट्कर्मनिरताय वेदवेदांगपारगाय

(५८) गोकर्णभट्टाय वीरिगे चत्वारिंसदन्तर्व्वत्ती सशुल्ककरबाधापरिहारः समस्ता-
देयसहितः निधिनिधानसमेतः राजकीयानाम

(५९) नंगुलिप्रेक्ष(प्रक्षेप) णीयः पादप्रक्षालनं कृत्वा धारापूर्व्वकं सोमवडनामा ग्रामः
सर्वनमस्योग्रहारो दत्तः ॥ तस्य चाघाटाः ॥ पूर्व्वत

(६०) उम्बरउरिकानामग्रामः । तत्र सीमा । किसुगेरे । ततः आग्नेयकोणे
मिलिता वंजरानाम नदी । दक्षिणतः वंजरा नदी पर

(६१) कुले अत्तिणउरनामा ग्रामः। आग्नेयतः प्रभृति नैरित्यं यावत्। सीमा वजरा
नदी । पश्चिमतः लक्ष्मणानामग्रामः परकूल ।

(६२) नैरित्यतः प्रभृति वायव्यं यावत्। वंजरा नदी । सीमा । उत्तरतः पुरण्डिणना
माग्रामः । वायव्यतः प्रभृति मोदेय(ष)पल्लं । ततः

(६३) तटाकं । ततः दैवगुप्तिका वापी । ततः पेगुरुगुंटे । ऐसान्यतः मुग्नुट्टे(प) ॥
एवं पूर्व्वप्रसिद्धसमस्तसीमासमन्वितः चतुराघा

(६४) टविसुद्धः स युष्माभिरागामिभिरन्यैश्च भूमिपालैष्पालनीयः ॥ तथा चोक
(कं) भगवता वेदव्यासेन व्यासेन ॥ बहुभिर्व्वसु

(६५) धा भुक्ता राजभिस्सगरादिभिर्यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा फलं ।
अपहरणेपि च दोषस्तेनैवोकः ॥ स्वदत्तां प

(६६) रदत्तां वा यो हरेत वसुन्धरां षष्टिं वर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ॥
विन्ध्याटवीष्वतोयासु सुष्ककोटरसायिनः

(६७) कृष्णसर्प्पा·हि जायन्ते ब्रह्मदेयापहारिणः ॥ सुवर्णमेकं गामेकां भूमेरप्ये
कमंगुलम् । हरन्नरकमाप्नोति यावदाहू

(६८) तसंप्लवं ॥ निघ्नतां भर्तृगोविप्रबालस्त्रीयोषित्तपस्विनां । या गतिः सा भवेभूमिं
हरतस्सासनांकिताम् ॥ दत्तानि या

(६९) नीह पुरा नृपेन्द्रै दानानि धर्मार्थयसस्कराणि । निर्वान्तमाल्यप्रतिमानि
तानि को नाम राजा पुनराददीत ॥ रामभ

(७०) द्रेणाप्युक्तं ॥ सामान्योयं धर्मसेतुर्नृपाणां कालेकाले पालनीयो भवद्भिः सर्वानेतान्भाविनः पा
(७१) र्थिवेन्द्रान् भूयो भूयो याचते रामभद्रः ॥ मद्वंसजा परमहीपतिवंसजा वा पापादपेतमनसो भु
(७२) विभाविभूपाः । ये पाळयन्ति मम धर्म्ममिमं समस्तं तेभ्यो मया विरचितोंजालिरेष मूर्घ्नि ॥
(७३) मयेदं महाप्रचंडदंडनायककालिदासार्यानुजस्य सासनाधिकारिकाक्षपटलिक निम्वणार्यस्य प्रतिवद्धेन वृत्त
(७४) धर्म्मसूनुना महाकवेः प्रज्ञाकरपंडितस्य भागिनेयेन चामुंडार्येण लिखितम् ॥ –६ ठ ३– ॥ जयश्रीवल्लभः श्री
(७५) माञ्जयसिंघ महिपतिः सासनं दत्तवानेतदनिवारितसासनः ॥ –६ ठ ३– । श्रीमज्जयसिंह देवस्यदत्तिः ॥ –६ ठ ३–

भाषांतर

(१) ज्यानें आपल्या उंच व उजळ्या दाढेवर धरल्यामुळें जग विश्रांत पावलें व ज्यानें समुद्राला क्षुब्ध केलें त्या विष्णूच्या वराहरूपाचा जय असो. (२) ज्यानें आपल्या दाढेवर पृथ्वीला बिसतंतूच्या जुंबाड्याप्रमाणें धारण केल्यामुळें पृथ्वी विश्रांत पावली, तो वराहरूप श्रीपति तुम्हांस ऐश्वर्य देवो. (३) अकलंक यशोदधीच्या योगानें ज्यानें जगाला वेढिलें आहे त्या हत्ती, नक्र इत्यादींनी अंकित अशा समुद्राचा पट्टा घातलेल्या पृथ्वीवधूला त्या जगेदकमल्लानें, स्ववश केलें आहे. (गद्य) हें चालुक्यकुल—सर्व जग स्तुति करीत असलेल्या मानव्य गोत्रांत उत्पन्न झालेल्या, हारितीचे वंशज असलेल्या, कौशिकीच्या वरप्रसादानें ज्यांना शुभ्रछत्रादि राजचिन्हें मिळालीं आहेत, सात मातांनीं ज्यांचें रक्षण केलें आहे, कार्तिक स्वामीच्या वरप्रसादानें ज्यांना मोरचेल, माला, निशाण हीं मिळालीं आहेत; भगवान् नारायणाच्या प्रसादानें ज्यांना वराहलांछन प्राप्त झालें आहे; ज्यांनीं शत्रुराजमंडळें क्षणांत वशीकृत केलेलीं आहेत, आणि सर्व जग व लोक यांना जे आश्रयभूत अशा—*विष्णुवर्धन विजयादित्यादि नांवें असलेल्या राजरत्नांची जननी, असें आहे.

---

* बांबे गॅझिटेअर व्हॉ. १ भाग २ च्या ३४० पानावर डॉ. फ्लीट यांनीं पुढें लिहिल्याप्रमाणें माहिती दिली आहे:—"विष्णुवर्धन राजराज १ ला याच्या इ. स. १०, १२–२३ च्या एका लेखांत अयोध्येस ५९ राजांनीं राज्य केल्यावर विजयादित्य नांवाचा एक तत्कुलीन मनुष्य दक्षिणेंत आला व विजयेच्छेनें, त्यानें त्रिलोचनपल्लव याजवर हल्ला केला. पण त्यांत तो स्वतःच प्राणास मुकला. त्याची गरोदर राणी कांहीं दिवसांनीं प्रसूत झाली. जन्मलेला मुलगा विष्णुवर्धन होय." अर्थात् हें सर्व कविकपोलकल्पित आहे. कारण प्रत्यक्ष पुरावा कांहींच मिळत नाहीं.

या चालुक्यवंशानें **नलांची** लक्ष्मी हस्तगत केली; **कदंबांचें** अवडम्बर नाहींसें केलें; **मौर्यांना** जिंकलें; स्वतःच्या बाहुबलानें **राष्ट्रकूटांना** उखडून टाकिलें; व **कलचुरींचें** ऐश्वर्य खिळखिळें केलें आहे. या वंशांतील ५९ राजांनीं पूर्वी **अयोध्येस राज्य केलें**; त्यानंतर १६ राजांनीं दक्षिणापथावर अधिकार चालविला. दुष्टांनीं कित्येक वेळां कुलसंपत्ति पळविली असतांहि या वंशांतील लोकांनीं ती पुन्हां परत आणिली आहे. कीर्तिलतेच्या अंकुराचा कांदा, लक्ष्मीच्या विलासाचें स्थान, शत्रुराजांना वज्र, दैत्यद्वेषी देवांचा प्रतिनिधि, स्वतःच्या वर्तनाबद्दल प्रख्यात; प्रजेचें मन हरण करणारा, असा **जयसिंह** नांवाचा (चालुक्य कुलांतील) पहिला राजा होऊन गेला. यानेंच **राष्ट्रकूट**कुलांतील **कृष्णाच्या इंद्र** नांवाच्या ८०० हत्तींचें सैन्य असलेल्या प्रसिद्ध मुलाला, जिंकून व ५०० राजांना जाळून टाकून पुन्हां चालुक्यराज्यलक्ष्मी धारण केली. त्याला—ज्यानें व्रात्य शत्रू, त्याचें घोडदळ व हस्तिदळ यांची युद्धाची सुमसुमी जिरविली आहे आणि ज्याचें सुकृत व शिवचरण या ठिकाणीं प्रेम आहे असा—**रणराग** या नांवाचा मुलगा झाला. त्याचा मुलगा **पुलकेशी** हा कृष्णासारखा असून **बदामीचा** प्रथम राजा झाला. यानें खलादींच्या ओरड्याला कधीं भीक घातली नाहीं. पहा, या **पुलकेशी** राजाचें वर्णन करीत असतां आमच्या अंगावरहि रोमांच उभे राहिले. यानें अश्वमेधामध्यें २ हजार अश्व, हत्ती व गांवेंही ऋत्विजांना अर्पण केलीं. त्याचा मुलगा **कीर्तिवर्मा**; यानें **नलांना** जमीनदोस्त केलें; **मौर्यांना** हाकलून लावलें; प्रख्यात अशा **कदंबकुल**रूपी खांबाला मोडून टाकलें; व पृथ्वीला ऐश्वर्यभरित करून विमल यश मिळविलें. यानंतर याचा धाकटा भाऊ **मंगलीश**; याच्या सैन्यानें सर्व द्वीपांचें आक्रमण करण्याची महत्त्वाकांक्षा धरून नावांच्या पुलाच्या साह्यानें रेवतीद्वीप जिंकिलें; हा बळेंच **कलचुरीं**च्या राज्यश्रीचा मालक बनला व पृथ्वी सर्व मंगलांनीं युक्त करता झाला. थोरल्या भावाचा मुलगा लहान असल्यामुळें यानें लोभ नसतांच राज्यधुरा वाहिली व तारुण्यांत आलेल्या **सत्याश्रय**नामा त्या मुलाला राज्य देऊन टाकिलें; चालुक्यांपैकीं कोणता पुरुष धर्म्य मार्गापासून च्युत होईल! ज्यानें दिशा जिंकिल्या व **हर्ष** नांवाच्या राजास जिंकिलें; याचकांना मनोरथापेक्षां अधिक दिलें; जो सत्यादि सर्वगुणरत्नांची खाण आहे अशा त्याला **सत्याश्रय** हें पद शोभत असे. यानंतर त्याचा—गुणरत्नांची माला धारण केलेला, पराक्रमी, पुण्यकर्मी व तेजानें सूर्यासारखा असा—**आदित्यवर्मा** नांवाचा मुलगा राजा झाला. त्याचा मुलगा, पराक्रमानें भूतलाचें आक्रमण करणारा असा, **विक्रमादित्य**. त्याचा मुलगा, युद्धामध्यें यमाप्रमाणें असा, **युद्धमल्ल**. त्याचा मुलगा **विजयादित्य**. यानें अर्जुनाप्रमाणें एकट्यानेंच शेकडों वीरांना युद्धांत जिंकलें. त्याचा मुलगा **विक्रमादित्य**. त्याचा **कीर्तिवर्मा**;

याच्या वेळीं चालुक्य-राज्यश्री लुप्त झाली. विक्रमादित्याचा भयंकर पराक्रमी असा एक भाऊ होता. त्याचा मुलगा **कीर्तिवर्मा**. त्यापासून **तैल** उत्पन्न झाला; **तैलाचा** मुलगा **भीम**. त्यापासून **अय्यणार्य** झाला; यानें स्वकुलश्रीच अशी **कृष्णाची** मुलगी बायको ह्मणून मिळविली. त्यांपासून–ऐश्वर्याला प्रकाशमान करणारा, शत्रूंचा नाश करणारा, तेज व विजय यांचा सूर्यच असा–**विक्रमादित्य** झाला. यानें चेदिवंशीय **लक्ष्मणराज** याच्या **बोंथादेवी** नांवाच्या मुलीशीं लग्न केलें. देवकीला वसुदेवापासून व पार्वतीला शंकरापासून जन्मलेल्या कृष्णकार्तिकेयाप्रमाणें **बोंथादेवी तैलास** जन्म देती झाली. कृष्णाप्रमाणेंच याची बालक्रीडा शत्रू व त्यांचे दुर्ग यांचा नाश करणारी होती. दोघेहि राष्ट्रकूट कुलाशीं संबद्ध होते. यानेंच, कलीप्रमाणें ढांगा टाकणारे, क्रूर, कवच घातलेले, गुरुजनद्रोहाचे अंकुरच, राष्ट्रकूटकुलांत उत्पन्न झालेले, असे जे **कर्कर, रणस्तंभ**, त्यांस रणामध्यें कापून काढिलें. अशा प्रकारें पूर्वीं वराहरूपधारी माधवानें, दैत्यांकडून पृथ्वी समुद्रांत ओढली जात असतां ज्याप्रमाणें वर उचलली, त्याप्रमाणें राष्ट्रकूटांतील कुटिलांनीं बुडविलेली चालुक्यराज्यलक्ष्मी यानें वर उचलून धारण केली. ज्याचा प्रताप **हूणांचा** प्राण घेता झाला; मोहिमेचे वेळीं ज्यानें **मारवास** भीतीनें गर्भगलित केलें; चेदीचा उच्छेद केला; पृथ्वी जिंकण्याच्या नीतींत प्रवीण व ज्यानें युद्धांत बल व शौर्य यांचें प्रदर्शन केलें आहे अशा उत्पलास यानें कारागारांत टाकिलें; याचें वर्णन करीत असतां कविश्रेष्ठांस भोवंड येते. राष्ट्रकूटकुलतिलक अशा **भम्महरट्टाची**, समुद्राची जशी लक्ष्मी तशी, **जाकव्वा** नांवाची मुलगी होती. तिचें चालुक्यकुलसूर्य अशा ह्या **तैलानें** पाणिग्रहण केलें. त्यांचा योग लोकाभ्युदयार्थ झाला व ती चंद्राच्या चंद्रिकेप्रमाणें होऊन राहिली. पार्वती जशी गुहाला तशी **जाकव्वा सत्याश्रयाला** प्रसवली. हा शत्रूंना त्रास देणारा व देवांना सम्मत असून उत्कृष्ट धनुष्य धारण करीत असे. दिग्जेत्या अशा याच्या प्रतापाग्नीनें जळालेल्या शत्रुसमुदायाचा वंश रस्त्यावर उगवलेल्या तृणांकुरासारखा कष्टानें वाढत असे. त्याचा धाकटा भाऊ **दशवर्मा** व त्याची बायको **भाग्यवती**. या दोघांपासून **विक्रमादित्य** नांवाचा विक्रमशाली मुलगा झाला. यानें आपल्या ज्येष्ठ चुलत्यानंतर, शत्रुमंडलाला विदारण करणाऱ्या बाहुबलाच्या जोरावर पृथ्वीचें पालन केलें. याची कीर्ति, ज्योत्स्ना, रात्रीच्या वेळचे नदींतील हंस, नदींतील काश गवत किंवा आकाशांतील अभ्रसमुदाय याप्रमाणें शुभ्र असून त्याच्या उद्योगासारखीच शत्रूंचो शरदृतूप्रमाणें कृशता लक्षित करणारी होती. इतर वेळीं व इतरांना मात्र चंद्रप्रकाशाप्रमाणें अंधकारनाश व

आनंद करणारी होती. + वर्णाश्रमाच्या रक्षणाकरितां असूनहि यानें आपल्या दिगंतरांना व्याप्त करणाऱ्या कीर्तीनें शुभ्रवर्णाशिवाय इतर वर्ण नष्ट केले, व हा लोकांमध्यें महनीय होऊन राहिला. ज्यांनीं सज्जनांचीं हृदयें बांधून आपल्याकडे ओढून आणिलीं असे त्याचे त्यागादि गुण अपरिमित होते. त्यानंतर त्याचा धाकटा भाऊ **जयसिंह**. याची विश्वव्यापि व उज्वल कीर्ति देवांगनांना, क्षीराब्धी एकदम उचंबळून आला आहे कीं काय, अशी शंका उत्पन्न करीत आहे. हाच **जगदेकमल्ल** होय. हा नेहमीं सभाजांत राहणारा, पराक्रमानें श्रीमंत, मस्तहत्ती (शत्रू) चें भेदन करणारा व तेजस्वी अशा प्रभावानें प्रकाशमान होणारा **जयसिंह** विराजत आहे. शरण्य अशा याच्या ठिकाणीं सर्व जग समाधान पावतें, याच्या आश्रयानें राजांनीं मृत्यूचाहि धिक्कार केला, व मनोरथांच्या पलीकडचीहि इच्छा प्राप्त झाल्यानें याचकांना कधींच कल्पतरूंची आठवण हा होऊं देत नाहीं. याच्या योगानें सर्व पृथ्वी राजवती झाली, याच्या शुभ्र छत्राच्या ठिकाणीं लक्ष्मीनें निवास केला, यानें सर्व शत्रूंना नम्र केलें आहे, व याच्या शिरावरील रत्नांचा प्रकाश पायांवर पडलेला आहे, असा हा राजा आहे. + चंद्राची संगती न करिताच व यज्ञविध्वंसाचें दूषण न घेतांच भूतिभूषण अशा याला जगदीशत्व प्राप्त झालें. × ज्याचा कृष्णवर्ण विख्यात आहे, तैल राजाच्या स्नेहामुळें ज्या देशाचें वर्तन सरळ झालें आहे, अशा कुन्तल देशांत मल्लिकामोद (जयसिंह !) विराजत आहे.

+ वर्ण या शब्दावर कवीनें श्लेष केला आहे. पहिल्या वर्ण शब्दाचा अर्थ चार वर्ण, दुसऱ्या वर्ण शब्दाचा अर्थ रंग. यशाचा रंग पांढरा. वर्णाश्रमांच्या रक्षणाकरितां तो जगत होता यामुळें त्याची कीर्ति इतकी पसरली कीं त्यांत प्रेम, अयश वगैरे भावांचे रंग अजीबात लोपून गेले. तात्पर्य, धर्मरक्षणामुळें त्याची अत्यंत उज्वल व शुभ्र कीर्ति झाली.

+ या ठिकाणीं कवीनें श्लेष साधिल्यामुळें या श्लोकाचे दोन अर्थ निष्पन्न होत आहेत. कवीचा रोख असा आहे कीं, शंकरानें चंद्रा (दोषाकर) ची संगति धरली, दक्षयज्ञाचा विध्वंस केला (अर्थात् हें दूषण आहे) व चिताभस्म धारण केलें. या तीन गोष्टींमुळें शंकराला जगदीशत्व प्राप्त झालें. या उलट जयसिंहानें दोषसमुदायाचा संग धरिला नाहीं यज्ञ विध्वंस केला नाहीं व ऐश्वर्यास (भूतीस) भूषण मानलें व यामुळें त्यास जगदीशत्व प्राप्त झालें.

× या ठिकाणींहि कवीनें श्लेष केला आहे. सरळ अर्थ वर दिला आहे. दुसरा अर्थः—ज्यांचा काळा रंग विख्यात आहे. तैलादि स्निग्ध पदार्थांच्या योगानें ज्यांना सरलत्व आलेलें आहे अशा केसांच्या वाचतींत (कुन्तलविषये) मोगऱ्याच्या फुलांचा वास चांगला शोभतो.

फडके आहेत. झुंझारराव म्हणून पोतदार सोनार आहेत. ह्यांस इसापती इनाम आहे. हवालदार सरनोबत आहेत. बरवे कोठीदार आहेत. सबनीस यांस खातवलीचे शराकती इनाम आहे. माहुली म्हणून स्वतंत्र गांव असून तें माहुलीगडाच्या अगदीं पायथ्याशींच आहे. तेथील पाटील आगिवले म्हणून आहेत. माहुलीगडाच्या पायथ्याशींच भडंगी नांवाची नदी असून गडाचा भुईतट ह्या नदीस वाट देतो. हा माहुली किल्ला पेशवाईत जव्हारकराकडे होता. त्यांपासून पेशवे चिमाजी आपा यांनीं घेतला. जवळच भंडारगड व पळसगड आहेत. पळसगडच्या देवीस जव्हारकरांकडून उत्पन्न होतें. असो. माहुली म्हणजे आतां शहापूर येथील फडणिसांची वंशावळ मीं आणिली आहे.

मोहाडी— शहापुराहून परत आसनगांव स्टेशनवरून पुढें खेरवाडीहून मोहाडीस म्हणजे नाशिक जि. दिंडोरी तालुक्यांत गेलों आणि येथून योजिलेल्या संशोधनास प्रारंभ झाला. ह्या मोहाडी गांवीं माझ्या पूर्वीं मंडळाचे कार्याविषयीं आस्था बाळगणारे सं. रा. पुरंदरे मास्तर हे गतवर्षीं गेले होते. व त्यावेळीं तेथील सोमवंशी घराण्यांतील कागद म्हणजे नकला त्यांनीं आणिल्या आहेत. येथील ऐ. घराणीं १ जाधव पाटील, १२ जाधव देशमूख, ३ सोमवंशी सरलष्कर, ४ एकबोटे, ५ जोशी, ६ कुलकर्णी, ७ कवडे इत्यादि. कवडे हे सोमवंशी सरलष्कर यांचे दिवाण. एकबोटे हे सरदेशमूख यांचे गुमास्ते. ह्यांबद्दल कागदच हातीं आला आहे व त्यावरून मी हें म्हणत आहें. एकबोटे यांचा वाडा चांगला ३ चौकी मोठा, पण पडीक आहे. एकबोटे यांचे वाड्यांतील अंबारांत वगैरे, रा. हरिभाऊ जोशी यांच्या मदतीनें कागद पाहिले. पण कागद मुळींच आढळले नाहींत. कवडे यांचें घर रा. मार्तंड दाजी जोशी, रा. बाबा जोशी ह्या चौघां बंधूंनीं घेतलें आहे. त्यांचेच सहाय्यानें कवडे यांजकडील कागद पाहिले. कागदांत कांहीं वाङ्मयात्मक असें साहित्य प्राप्त झालें. त्यात अपुरें शिवलीलामृत, मंगळवेढेकर दामाजी आख्यान त्रुटित असून एकनाथकृत रुक्मिणीस्वयंवराची पोथी आहे. व ती कवडे यांचे संग्रहांतच आहे. येथेंच हें एक सांगावयाचें कीं, मीं ह्या बाजूस जवळजवळ १५।२० खेडेगांवीं ३०।४० घराण्यांत कागद पाहिले, तर बहुतेक प्रत्येक ठिकाणीं हें रुक्मिणीहरण, शालिवाहन राजाची बखर, हीं आढळलीं. असो. येथें ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचे असे कागद रा. विद्याधरकाका जोशी यांजकडे असावेत. कारण मला २।३ दप्तरांतील त्यांनींच १०।१२ कागद दाखविले. त्यांत श. १५५४ पासूनचे कागद अस्सल आढळले. हे कागद जोसपणाविषयीं म्हणजे मुळेपणाबद्दलचे आहेत व ते मंडळाच्या पा. स. त मांडले होते. त्यांतच एकदोन काव्यें आढळलीं तीं नकलून आणलीं आहेत. तीं येथें सारांशानें सादर करतों. पैकीं एकाच्या कर्त्याचा निर्देश "आबा ब्राह्मण दक्षणदेसे लावि तुरा॥ गुनि गंगाजी, लालजी सटवा गडी पारा॥" ह्या शेवटच्या कडव्यांत आला आहे. अर्थात् हें काव्य म्हणजे लावणी आहे. लावणींतला कांहीं भाग असा—"भ्रुकुटपानि साजती कळेना बाई, मायबापानें प्राहुनवर ठवलाई.। करुनियां लग्न।

सुबेळ धुंडितानाहि । मंगळसूत्र विचित्र पडविले स्वाई । ' पुढें ' चाकरी धरुनि गेले हिंदुस्थान लवलाई । छावन्या रे जाल्या नहि आली कबर कोन्ह्या ठाइः '॥ यानंतर आथा ब्राह्मणानें विरहिणीची दुरवस्था ३। ४ प्रसंग कथन करून वर्णिली आहे. आणि शेवटीं " मूर्च्छना येउ पडले मी धरणिवर । धावति सखया उठविती धरुनिया करः ' अशा वेळीं सख्यांचीच कामगिरी अधिक असते. होनाजी बाळानें ' गांवा जातो प्राणविसावा । राहवा दोन गोष्टी सांगून । पसरा पदर मजसाठीं सख्यानों । घ्या एवढें त्याला मागून ' ॥ असें वर्णन केलें आहे. त्याप्रमाणेंच येथेंहि ' जासुद्‌जोडी पाठवा सख्या जवळीं, ' असें म्हणून सखीकडून जासूदांची जोडी पाठवून पत्र भ्रतारास पोंचविलें. तें ' वाचि पत्र वर्तमान कळला सारा । रजा घेउनिया कुचाचा दिला नगारा । दूर कूज करुनिया वेचले राजमंदिरा ॥ ' त्याचा आनंद इतका झाला कीं, ' हुशार जालि सुंदरा, नगर लोकासी शेहरात वाटि साकरा ः इत्यादि.

दुसरेंहि कवन लावणचि असून त्याचीं ३ च कडवीं उपलब्ध झालीं. लावणी पूर्ण दिसत नाहीं व कर्त्याचें नांवहि शेवटीं आलेलें नाहीं. मात्र पहिल्यापेक्षां ही लावणी सरस आहे ह्यांत शंका नाहीं. ही संवादपर आहे. सासरा, सासु आणि दीर हे ' चाकरी गेला तुझा भ्रतार । बेहुन चाल आमुला कर संसार ' असें म्हणून लौकिकानें राहण्यास सांगत आहेत. आणि ही सासुरवासीण आपली अवस्था कशी कठीण आहे व आपला संसार कसा व्यर्थ जाला हें वेगवेगळे पण मार्मिक दाखले देऊन सांगत आहे. एक दोन दाखले तर फार अभिनव व बिनतोड वाटतात. दोन्ही काव्यें देण्याचा मोह स्थळा-भावीं आवरणें नूर्त भाग पडलें आहे.

असो; वृद्ध विद्याधरकाकांचा सर्व संग्रह एकदां पाहण्यास मिळेल तर त्यांत त्यांच्या-बरोबर इतिहासासहि बराच उपयोग होण्याचा खास संभव आहे. रा. मार्तंडराव, बापूराव व पंढरिनाथपंत जोशी हे मनावर घेतील तर हेंहि हरप्रकारें घडून येईल असें वाटतें. मोहाडीचें दुसरें ऐतिहासिक घराणें देशमुख यांचें. ह्यांचें आडनांव **जाधव**. मोहाडीची पाटिलकीहि जाधवांकडेच आहे. मात्र दोन्ही शाखा आतां वेगवेगळ्या आहेत. जाधव देशमुखांकडील कागदांत विशेष कागद असे सहा आहेत. पैकीं एका कागदांत पूर्वीं गांवकरीमंडळी आपल्या बाजूनें पेशवे दरबारांत वकिली, पत्रांत "गोरवी ' शब्द दिला आहे, करून ' हरयेकविशी आथा उपराला करावयास ' भरवश्याचा आणि वजनदार मनुष्य आप-लासा करून कसा ठेवीत व त्यास फी कोणती देत, हें स्पष्ट दिसून येतें. मोहाडी-गांवकऱ्यांनीं रास्ते यांस आपला वकील करून ठेविलें होतें आणि त्याबद्दल त्यांस ३० बिघे जमीन दिली होती. तिसरा कागद–सवाई माधवरावांनीं राघोबादादांकडील मंड-ळीस शिक्षा करण्याचें कार्य कसें चालविलें होतें, तें ह्या कागदांत स्पष्ट दिसून येतें. ह्या कागदाचा काल पौष शु. ६ श. १६९७ –ता. २८।१२।१७७५– हा आहे. अर्थात् माधवराव नारायण प्रधान यांच्या नांवें हा हुकूमी कागद आहे. म्हणजे उघडच सखाराम

बापू, नाना इत्यादि कारभारी मंडळींच्याच कडून ही शिक्षा–कामगिरी चालली होती. कारण, माधवराव नारायण प्रधान हे ह्या वेळीं १॥–२ वर्षांचेच आहेत.

चवथा कागद सोमवंशी सरलष्कर यांची हकीकत असलेला असा आहे. त्यांत 'श्रीमंत नानासाहेबांनीं मोह्राडीस आमची स्थापना केली. चाकरी विठल शिवदेव यांच्या तैनातसि करावी. चाकरी दोन रावताची' अशी स्पष्टता केली असून सोमवंशी घराण्यांत कोणाकडे 'सरलष्करी'चा आणि कोणाकडे 'हिंदुराईचा' अधिकार व तो कां हें स्पष्ट केलें आहे.. शाहूनें ही सरलष्करकी दिली असेंहि त्यांत प्रारंभींच ठरतें. पांचवा कागद इस्तावा म्हणजे जमाबंदी प्रकरणीं आहे. 'सालमजकुरापासून (इ.१७५४) जागीर श्रीमंत साहेबाची जाली येकंदर परगण्याचा इस्तावा जाला' असें ठरतें. सहाव्या कागदावरून 'अंबाजी त्रिंबक एकबोटे गुा सरदेशमुख आहेत' असें दिसून येतें. गोवर्धने माली मेहत्रे यांचें हें पत्र आहे.

मोह्राडीचे तिसरे घराण्यांत म्ह. गोविंदराव व माधवराव कुलकर्णी यांजकडे जे कागद मिळाले त्यांतील नवीन माहिती तेवढी अशीः– हल्लीं ज्याला इरीगेशन म्हणतात म्हणजे शेतीजमिनीकरतां नदी–ओढ्यास पाटबंधारे वगैरे बांधून पाणी मिळण्याची सोय, ही इतिहासकालीं होती कीं नाहीं अथवा कशी होत असे हें एका कागदावरून चांगलें व स्पष्ट ध्यानांत येतें. मोह्राडीजवळ कादवा नांवाची नदी आहे. हल्लींहि ह्या नदीस छोटेसें धरण बांधून शेतजमिनीच्या पाण्याची व्यवस्था केली आहे. ह्याच कादवा नदीस श. १६३१ म्ह. १७०९ मध्यें "बंधारा बांधलिया पानी मौजे मजकुरास येते आणि जमीन भिजोन बागाइत होते" ह्या करतां गुलछनाबाद म्हणजे नाशीक येथील आगुजी सेट व भवानजीशेट भोरपी यास १८० बिघे जमीन इनाम देऊ करून बंधारा बांधविण्याचें ठरविलें. ह्या भोरपी शेटजीनीं जो टका लागेल तो लावून बंधारा बांधावयाचा तेवढा; असेंच केवल नव्हे 'तर बंधारा जुना जालियावरी जाया जाला तरी दुरुस्त करून जाया होऊं नेदू.' इतकेंहि नव्हे तर 'हमेशा बंधारियाची खिजमत करून पाणी सिवारांत बागाइताचे जागा जमनि असेल तेथें आणून देऊं' इतक्या गोष्टी करावयाच्या; असा कागदांत स्पष्ट उल्लेख मोह्राडीच्या पाटील देशमुख मंडळींनीं केला आहे. बंधारा बांधल्याबद्दल दिलेल्या इनाम जमिनिवरील 'जागिरदार सारा मागतील तर आपण त्यांस सांगोन' असेंहि म्हटलें आहे.

दुसरा एक कागद पाटबंधाऱ्याबद्दलचा पण शिवकालीन असा उपलब्ध झाला आहे. हा श. १५९६ म्ह. इ. स. १६७४ चा आहे. शिवकालीन म्हणून तो जसा मला जरा महत्वाचा वाटतो तसाच तो आंतील मजकुराच्या दृष्टीनें वरील कागदापेक्षां अधिक महत्वाचा वाटतो. मोह्राडीकर श. १५९६ मध्यें आपल्या गांवास नदी नाहीं; म्हणून गावांच्या वर असलेल्या बाणगंगेस एके ठिकाणीं बांधारा बांधावयास लागले. तों जाणोरीकरांनीं अडथळा आणिला; कीं हा बंधारा बांधला तर आमच्याकडे खालीं पाणी कमी होईल व नुकसान होईल. अर्थात् हा तंटा दिवाणदरबारीं गेला व मोह्राडीकरांप्रमाणें निवाडा

झाला. ह्यांत तंट्याचा निकाल देण्यापूर्वी पूर्वचौकशी व पाहणी मोठ्या दक्षतेनें केली आहे असें दिसून येतें. (पहा ऐ. सं. साहित्य खं. १ पृ. १११ ले. ११४)

ह्यानंतर मोहाडीसच मिळालेल्या एका सामाजिक कागदांतील सारांश सांगतों. जातींत घेण्याचा अधिकार कोणाचा ? ह्याचें उत्तर श. १६२४ म्ह. स. १७०२ मधील ह्या पत्रानें दिलें आहे. गोतांत घेणें म्हणजेच जातींत घेणें. आणि हा गोतांत घेण्याचा म्हणजे गोताई करण्याचा अधिकार जातीकडे अथवा जातीस संमत असलेल्या पुढारी व्यक्तींकडेहि असे. माळी जातींत हा अधिकार माळी मंडळींनीं वडील व मुख्य म्हणजे माळी मेहतरे यांजकडे दिल्याचें व त्याप्रमाणें जातींत घेण्याचे प्रसंगहि घडल्याचे दाखले देऊन सिद्ध केलें आहे.

मोहाडी हा गांव श. १६४५ [स. १७२३] मध्यें लतीफखान पवार यास जागीर होता. पुढें नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दींत म्हणजे श. १६७५ स. १७५३ मध्यें मराठी साम्राज्यांत तो अंतर्निविष्ट झाला. मोहाडीस गोपाळकृष्णाचें मंदिर आहे. त्याचा गाभारा रास्ते यांनीं आणि मंडप एकबोटे यांनीं बांधिला. मार्तंड दाजी जोशी यांजकडून एक काव्यगुंडाळी हातीं आली. तींत ' चला काशिला करा तयारी लोक जाती स्नानाला । प्रयागराज पुण्यपवित्र ध्वजा लाविली स्वर्गाला ॥ ' हें एक कवन आहे. ह्याच्या कर्त्याचा उल्लेख ' म्हणे म्हलारी या संसारी घ्या देवाचें दर्शन, दर्शनमात्रे पावन होती मुक्तीस जाती ते जन ' ॥ ह्या कडव्यांत आला आहे. पुढील कडव्यांत असें म्हटलें आहे कीं ' ऐसी कथा ऐक समयीं बेळे पुरंदर गावाना । धरा सज्जना धर्म वासना तोडा नये मुद्लाला । प्रयाग० ॥ ' म्हणजे यावरून हा म्हलारी बेले-पुरंरधर(?)गांवचा दिसतो. ह्याच गुंडाळींत दुसरें एक काव्य काशीयात्रेच्याच वर्णनाचें आहे. पण तें अर्धें आहेसें दिसतें. आणि प्रारंभहि नाहीं. असो. मोहाडीस बोहाडा म्हणून म्हणजे मोहाडालिंगाची जत्रा होत असते. ह्यांत दशावतार किंवा निरनिराळ्या देवताविषयक सोंगांची मिरवणूक काढणें हा मुख्य भाग आहे. हे बोहाडे चैत्र-वैशाख महिन्यांत तिकडे चालतात. कित्येक गांवांत प्रति वर्षीं, कित्येक गांवीं वर्षाआड, तर कित्येक गांवीं ३,५,१० वर्षांनीं हें बोहाड्याचें वर्ष येतें. सामान्यतः देवी, गणपती, सारजा, म्हसोबा, वीरभद्र, रावण, भस्मासूर, महादेव, पार्वती, नंदी, गजासूर, भैरव, खंडेराव, इंद्रजित, वेताळ, झोटिंग, जंबूमाळी, हिरण्यकश्यपु, प्रल्हाद, नारद, सहदेव, घटोत्कच, हेडंबा, इत्यादि इत्यादि सोंगें निघतात. कोणचें सोंग कोणीं घ्यावयाचें हें ठरलेलें आहे. सर्व कारूनारूंच्याकडे हीं सोंगें घेण्याचें काम असतें; सोंग घेतल्यानंतर सोंगानुरूप करावयाच्या हालचालीचें आधीं शिक्षण सुरू होतें. मिरवणुकींतील ह्या हालचालींकरतांच घरेंहि पाडावीं लागतात. एकदां रावणाच्या दहा तोंडांना सन्मुख जातां यावें म्हणून बोळांतील घरांचे माळे व पुढें आलेले भाग पाडले ! हा खेळ मला कळण्याचें कारण हें कीं, ह्या सोंगांच्या मुखवट्यांकरतां वगैरे जुने कागद उपयोगांत आणितात व म्हणून ऐतिहासिक कागद, पोथ्या नाहींत. पुणें—सातारा भागांत जसे डोले तसे इकडे हे

बोहाडे. ' नर करणी करे तो नरका नारायण हो जावे ' हें खरें. पण ती करणी म्हणजे, असल्या ऐ. कागदाचे ईश्वर-विषयक मुखवटे लावण्याची नव्हे ! सातान्यांतील ऐ. कागद मुसलमानांच्या डोल्याला गेले; इकडे ह्या बोहाडयांतील सोंगापायीं नाहींसे झाले !

राजापूर—हा गांव पूर्वीं फार मोठा असला पाहिजे. नांवावरूनच नव्हे तर हल्लीं जे तेथें मोठमोठ्या वाड्यांचे अवशेष, बुरुज, वेशी, देवालयें इ. आहेत, त्यांवरूनहि म्हणतां येतें. गांव उंचवट्यावर आहे. हल्लीं ह्या सर्व पडिक जागांवर निवडुंग आहे. निरनिराळ्या पिकांना जसे वेगळे वेगळे बिवड लागतात तसा बिवड म्हणजे एकवार वैभव भोगलेली भरभराटीची जागा हीच, ह्या फडया निवडुंगांस (पानसाबर) फार आवडते असें दिसतें. येथील देशमुखांकडे कांहीं कागद आहेत.

आंबेगांववाडी—राजापुरा शेजारच्या वाडींत कांहीं कागद मिळाले. त्यांत एक कागद नकल स्वरुपांत असा आहेः—राजश्री बालाजी बाजीराव व सदाशिव चिमणाजी उपनाम भट देशमुख प्रा। दंडा राजपुरी यानी ह्या राजापुर (प्रा। वण)-ची निमी मोकदमी रु. ५००स विकत घेतली आहे. विकत देणारा रा। नारायण सिवजी दलवई पाटिल हा सांपत्तिक दृष्ट्या अति अडचणींत आल्यामुळें; उपासमार होऊ लागली, दिवाण पैक्याबद्दल तोसीस फार लागू लागली. तेव्हां त्यानें कोण्ही सख्तसीर भाऊ करण्याचा विचार करून हा आपला अर्धा भाग मानपानासुद्धां श. १६७४ माघ व. १२ गुरुवारीं विकला आहे [ता. १।३।१७५३]. लगेच नारायण सिवजी दोख वारला. आणि पुढें त्या नारायण सिवजीच्या संक्राजी मुलानें आणखी दोन वर्षांनीं श. १६७६ माघ शु. ५ (शुःध्य असें काढलें आहे.) [१७।१।१७५५] स आपल्या मोकदमीची तिसरी तक्सीम २५०० रुपयास गोविंदराव म्हालोजी गायकवाड, गुजराथप्रांतांतील सावखेड्याचे संस्थानीक, यास विकली. हें दुसऱ्या एका खरीदीखताच्या नकलेवरून ध्यानांत येतें. त्या खतांत 'सावकारापासोन आदा व्हावे म्हणून पेशजी वतन आमचे बापानें श्रीमंत पेशवे यांजला विकिलें' असा स्पष्ट उल्लेख आहे. म्हणजे पेशव्यांचें वर जें खरेदीखत आहे, त्यास हा आणखी सबळ पुरावा झाला. ही तिसरी तक्सीम विकतांना केवल कर्ज वगैरे फेडण्याकरतां गायकवाड याजपासून पैसे घेतले आणि वतन दिलें, असें केलें नसून, कर्ज वगैरे फेडून पुढेंहि प्रतिपाल करावा म्हणूनहि वतन विकिलें आहे. अशा तऱ्हेनें तेव्हां 'वतनभाऊ' होत. त्यांसच ' जडे' म्हणतात. आणि अशा कारणानेंच आडनांवें, दैवतें, कांहीं रूढी एका ज्ञातींतील दुसऱ्या ज्ञातींत व घराण्यांत चालू होतात. खरेदिखतांत ' अडिच हजार पुरें घेऊन ' असें म्हटलें आहे. येथेंच कांहीं काव्यवाङ्मय पाहिलें. होनाजी बाळाचीहि एक वेदांतपर लावणी सांपडली. मलिकंबरापासूनचे वेळोवेळचे जमीनधाऱ्याचे प्रकार व माप असलेली एक गुंडाळी मिळाली. हिला १० जोड असून अर्धीच असावी असें दिसतें. निरनिराळ्या जीमनींचा सारा व जिन्नसावरील सायेर म्हणजे जकात, किती इत्यादि हें त्यांत सांगितलेलें आहे. जकातीचे निरनिराळ्या जिन-

सांवरील आकार सांगतांना 'मुसलमान असामी कीर्दी करील अगर बेपार करील त्यास मिर्में हंसील असें म्हणून रुा २॥ लिहिलेहि आहेत. आणि वर इतरांकरतां रु. ५ हा आकार सांगितला आहे. तसेंच बैल, म्हैस, टोणगा, फरोख्त केला त्यास रु. ५ सांगून गाय फरोख्त केली तर त्यास हसील माफ असें सांगितलें आहे. हा सर्वच कागद फार महत्त्वाचा आहे. जमिनीच्या प्रती व त्यांचा सारा, तसेंच वेगवेगळ्या अंमलदारांचे हक्क ह्यांत स्पष्ट सांगितले आहेत. दुसरें एक सवाई माधवराव पेशव्यांचे वेळचे [श. १७०५ पौ. शु.] यजितपत्र पाहिलें. त्यांत 'रजपुताची लेक खांड्यासी लग्न लावून आणिली तिच्या पुत्रास वाटा नाहीं. कारण तशा लग्नाची चाल आपल्या माहाली नाहीं ' असा मजकूर आहे.

दुसरें एक खरीदीखत मिळालें. तें श. १६६८ स. १७४६ मधील आहे. त्यांत वणीच्या देशमुखांनीं देशपांड्यांना आपलें वतन विकलें असून वणी परगण्याच्या उत्पन्नाचा आंकडा म्हणजे जमीनसारा रु. ८८१६३॥= दिला आहे. हा ८८ गांवांचा वसूल आहे. ४५ गांवांचें देशपांड्यांचें उत्पन्न ४१९०४॥|= दिलें आहे. ह्या खरेदी खतांत इतरहि माहिती बरीच आहे.

वणी—ह्यानंतर वणी येथील देशपांडे यांजकडील खोलीभर कागद, अतिशयोक्तीनें नव्हे, यथार्थपणें लिहितों, तपासले. त्यांतील निवडलेले कागद वाचून व नकलून व्हावयाचे आहेत. येथेंच एक समर्थसांप्रदायी मठ आहे. त्यासंबंधीचे कागद एका पाक्षिक सभेपुढें वाचले आहेत. येथेंच शिवकालीन मुळे म्हणजे जोशी घराण्याचे कागद मिळाले. वणी नंतर श्री सप्तशृंगीदेवीचें दर्शनास गेलों. वाटेनें लागलेले पांचहि शिलालेख लिहून आणिले आहेत. लेख अर्वाचीन आहेत. सप्तशृंगी डोंगराच्या पायऱ्या, वणीपासून ३ मैल पायथा व पुढें १ मैल डोंगर चढ चालून गेल्यानंतर, लागतात. ह्या ३५० पायऱ्या आहेत. आणि त्याच पायऱ्या चढणें कष्टाचें आहे. ह्या ३५० पायऱ्या वरून खालीं बांधत आणिल्या असाव्या असें शिलालेखावरून दिसतें. लेख ५ आहेत, खालून पहिला लेख असाः—

[१]

(१) श्रीगणपतेयनमः ॥ *भूग्रहरसचंद्रैश्च
(२) संमिते च विरोधिको ॥ चैत्रे मासि च शुक्ले
(३) तु प्रतिपद्भृगुवासरे ॥ १ ॥ श्रीसप्त
(४) शृंगारण्यगिरौ लोकानां हितका
(५) म्यया ॥ रामतीर्थास + कांत
(६) क्षुद्रैः कर्तुं न शक्यते ॥ २ ॥ दे

---

* श. १६९१ चैत्र. शु. १ शुक्रवार (ता. ७।४।१७६९) हा कालनिर्देश बरोबर आहे.

(७) वीरूपाकटाक्षेण मानवेन
(८) विनिर्मितं ॥ लोकयात्रासुखत
(९) तं सर्वाश्चर्यकरं महत् ॥

[२]

(१) श्री कोनेरी रुद्र कृष्ण गिरमाजी
(२) लोकविश्रुतं ॥ बंधुत्रयमेकचित्त
(३) प्रित्या युक्तं दिने दिने ॥ ४ ॥ जन
(४) स्छाननिवासी च रायारायोपना
(५) मकं ॥ देवी पाठे सुनिष्णातं ब्र
(६) म्हाविष्णु [ष्मु] शिवांशजं ॥ ५ ॥
(७) गणेशनाम्ना विख्यातो मा
(८) र्गोयं सुलभः यतः ॥ मुनिप-
(९) र्वतवासाच तत्पुत्रापिगजान
(१०) नः ॥ ६ ॥ शके १६९१ शुभं भवतु

[३]

(१) श्रीगणेशाय नमः ॥ श्री
(२) देवि चरणि दृढ भाव ज्याला
(३) कोनेरी हे नाम असे तयाला
(४) श्रीरुद्र क [रु] ष्ण अभिधान ज्य
(५) सि ॥ बंधुद्वये शोभतसे तयासि ॥
(६) रायाराव हे उपनाम ज्याला
(७) सदा जनस्थानि निवास के
(८) ला ॥ अत्यंत हा दुर्घट मार्ग जे
(९) णे ॥ केला सुपथ जगतात ते
(१०) णे ॥ २ ॥ सके १६९० सर्वधारी
(११) नाम सवत्सरे ज्येष्ठ शुध

[४]

(१) ॥ कोनेररुद्र गिरमाजि ॥
(२) ॥ रुद्राजि गिरमाजि ॥
(३) ॥ कृष्णाजि गिरमाजि ॥
(४) ॥ रायाराव + + व्य ॥
(५) ॥ जनस्थानकर ॥

[५]

(१) श्रीदेवीचरणि दृढ भाव बंधु
(२) त्रयाचा । कोनेरिरुद्र कृष्ण जन
(३) स्थानी वास त्याचा ॥ रायारावे कृ
(४) ष्ण नामे शोभत सु[त]यासि ॥ दिगां
(५) ति कीर्ती मार्ग सुगम केला जगती ॥

तिसरा लेख अंदाजें १०० पायऱ्या चढून गेल्यानंतरचा श. १६९० तील आहे. पायऱ्यांचें बांधकाम जनस्थानकर गिरमाजी रायाराव यांचे तिघे पुत्र कोनेर, रुद्राजी, व कृष्णाजी ह्यांनीं लाखो रुपये खर्चून केलें आहे. लेखांत बंधूंचें ऐक्य ' बंधुत्रयं ऐकचित्तं प्रीत्या युक्तं दिने दिने ' असें मोठ्या गौरवानें वर्णिलेलें आहे.

वणीचा वण असा उल्लेख राष्ट्रकुटांचा तिसरा गोविंद राजा (श. ८५२) याच्या ताम्रशासनांत आहे. त्यानंतर इ. स. १४७८ अहिवंतगडावरील किल्लेदार जो गणपतराव जनार्दन यानें हें गांव वसविलें असावें. स. १७६० पर्यंत हा गांव मुसलमानांच्या सत्तेत होता. नंतर पेशव्यांच्या हस्तगत झाला असें गॅ. मध्यें म्हटलें आहे तें चूक आहे. कारण वणीच्या समर्थांच्या मठास श्री. नानासो पेशव्यांची देणगी स. १७५७ मधील आहे. नुकतेच हे सर्व कागद मी त्रै. व. ९ अं. ४ पृ. ८३–८७ मध्यें दिले आहेत. खेरीज मोहाडी येथील एका कागदांत गुदस्तां हा गांव जहागीर जाला व रास्ते हे कमाविसदार नेमले असा उल्लेख आहे. म्हणजे श. १६७५ (स. १७५३) मध्येंच ह्या गांवावर मराठ्यांचा अंमल होता हें स्पष्ट सिद्ध आहे. इ. १७८० मध्यें गोपिकाबाईचें वहिवाटदार श्रीधर गणेश शेणवी यांनीं वणी येथें तीळभांडेश्वर व अगस्त्येश्वर हीं मंदिरें बांधलीं आहेत.

वणीनंतर जोपूळ, मडकी जांब, सायखेडें इत्यादि गांवीं गेलों; कांहीं प्राप्तीहि झाली. जोपूळ येथें श्री. गोपाळराव कुलकर्णी यांजकडे नाशिकच्या काळ्या राममंदिराचे जमाखर्च असण्याचा संभव होता. कारण, ज्यांनीं रामाचें साधें पण सुंदर देवालय बांधिलें त्या रंगराव ओढेकरांच्या कारभाऱ्यांचें हें घराणें. मंदिराबद्दलचे कागद जरी मिळाले नाहींत तरी इतर कांहीं हातीं आले आहेत.

दिंडोरी– येथील देशमुखदेशपांड्यांचे कागद एकत्र असलेलेच आढळले. पण ५।६ दिवे घेऊन ४।५ जण जेव्हां त्या जागेंत गेलों, तेव्हां तेथील पाकोळ्या पळाल्या ! पूर्ण अंधार, अर्थात् कोंदट व कुजट हवा, शिवाय गवत, शेतकीचीं मोडकीं आउतें, विटा, कवलें इत्यादि सर्वांचा एकच खच ज्या एका माडींत झाला आहे तेथें हे कागद आहेत ! कागद मात्र महत्वाचे असावेत हें निःसंशय. कारण २।३ दिवस अशा प्रकारें मीं कागद

पाहात असतां शिवाजीची बखर, वाटतें कीं एक थोरल्या माधवरावांची एक स्वतंत्र बखर असावी, तशींच काव्येंहि आहेत. दासबोध, मलिकंबरपासूनचे कागद, तेथें आढळले. सर्व निवडावयास एक महिना व कांहीं खर्च लागेल. म्हणजे प्रथम तो कागदांचा भारा उघडया मोकळ्या जागेंत आणून ठेविला पाहिजे. देशमुखांच्या वाड्यांत हे कागद आहेत. वाडा मोठा, सुंदर, पण पडीक आहे. दिंडोरीस पेशव्यांची गढी होती; तेथें गोपिकाबाई रहात असत असें म्हणतात. शिवकालांत शके १५९२ मध्यें दाउदखानाचा पाडाव शिवाजी राजांनीं केला तो दिंडोरी हीच. मोरोपंत पेशवे यांचे जव्हार राजाशीं युद्ध झालें तें ह्या दिंडोरीपाशींच. दिंडोरीस मिळालेले कागद शिवकालीन आहेत. दिंडोरीचे रा. पाडेकर जोशी यांजकडे गाडीभर कागद आहेत व ते पाहिलेहि. पैकीं त्यांनीं कांहीं दिले आहेत. हे सर्व जोसपणाबद्दलचे पण शिवकालीन आहेत. येथें रा. अण्णा मोकाशी हे एक परिस्थितिज्ञ व उद्योगी गृहस्थ आहेत. त्यांजकडे पोथ्या व कागद आहेत. पैकीं कागद हातीं आले त्यांत ह्या मोकाशांनीं पूर्वीं सायखेडें गांवची वसाहत व लावणी केल्यामुळें त्यांस हें मोकासपण मिळाल्याचें अस्सल महजर–पत्र आहे. स र्व कागद रा. अण्णांनीं आपणहूनच दिलें हें नमूद करणें आवश्यक आहे. दिंडोरीस बाजार भरतो तेथें सडकेपलिकडील विहिरींत एक अर्वाचीन शिलालेख आहे.

आतां फक्त त्र्यंबक क्षेत्रीं झालेलें कार्य थोडक्यांत सांगून हें संशोधनवृत्त पुरें करतों. आपणा सर्वांस हें विदितच आहे कीं, श्री त्र्यंबक क्षेत्रा सारखीं तीर्थक्षेत्रें म्हणजे आपल्या पूवजांच्या भेटीचीं पवित्र स्थानें आहेत. पूर्वजांच्या पिढया कश्या, घराण्यांच्या शाखा किती व कोठें, पूर्वजांचीं नांवें बरोबर कोणतीं व सामान्यतः कोण कोणत्या वर्षी होते, विशेषतः पूर्वजांच्या हातचा असा लेख कोठें पहावयाचा असेल तर तें असल्या क्षेत्रस्थांकडे; आणि ह्या दृष्टीनें मला त्र्यंबकक्षेत्रीं चांगलाच लाभ झाला. भोसले व निंबाळकर यांचें उपाध्ये ढेरगे. येथें मिळालेल्या कागदांतील माहिती स्वातंत्र्यानेंच पुढें मांडावयास हवी. सांप्रत इतर माहिती देतों.

शिव छत्रपती व राजे निंबाळकर यांचे उपाध्ये ढेरगे. यामध्यें वाटण्या होऊन श. १५५६ सालीं एका शाखेकडे भोसले व दुसऱ्या शाखेकडे निंबाळकर हीं घराणीं विभागलीं गेलीं. छत्रपतींचें उपाध्येपण ज्या ढेरग्यांकडे आहे त्यांजकडे छत्रपतीबद्दल कागद अस्सल आहेत. ते वर म्हटल्याप्रमाणें स्वतंत्र मांडतों, पण एक अगदीं लहान व जुनी वही सांपडली, नींत महत्त्वाच्या पुढील नोंदी आहेत.

शके १६७३ प्रजापती नाम सं + मार्ग वद्य ७ सप्तमी गुरुवासर (२९।११ १७५१) पूर्वानक्षत्र विष्कंभमयोग ते दिवशीं श्रीपर्वत + + श्रु श्रीमंत [illegible] [illegible] स्वामी + + [illegible] [illegible] ॥ १ ॥ त्र्यंबक सूर्याजी [illegible] +

१६७४ आंगिरानाम संवछरे चैत्र वद्य ४ ते वसी अंबरखाना उडून गेला अडी-चसे मनुश्य मेली सात ब्राह्मण ॥ २५० ॥ ह्रो + दिवसा (२२।३।१७५२)

शके १६७४ आंगिरानाम संवछरे ज्येष्ठ वा॥ १३ ते दिवसी मसीद पाडून काढिला देव श्री त्र्यंबकराज दर्शन जाले असे.

शके १६६८ क्षय नाम संवछरे आषाढ शु॥ ६ षष्ठी ते दिवशीं राजेश्री शाहू छत्रपतीचे अनुष्ठानास ब्राह्मण पाच प्रारंभ त्याची याद

यापमाणें निरानिराळ्या दृष्टींनीं उपयोगी अशा आणखीहि कांहीं नोंदी नकलून घ्यावयाच्या राहिलेल्या, ह्या वहींत आहेत. श्री त्र्यंबकेश्वराजवळील ब्रह्मगिरीवर दोन अर्वाचीन शिलालेख आहेत. एक गोदावरीच्या उगमतीर्थामागील झाडाखालच्या लहान विहिरिसारख्या कुंडावर असून दुसरा, निंमा डोंगर चढून गेल्यानंतर पायऱ्या चढण्यास लागण्याचे पूर्वीं उजव्या हाताकडील बाजूच्या जुन्या मोठ्या विहिरींत आहे. त्र्यंबकेश्वर येथें श्रीमंत आण्णासो डयीर व श्री. जोगळेकरसो श्रीयुत वे. कुरंभट्टी (प्रतिनिधि), फडके (भानू, जोशी), पेंडवळे (घाटगे), बापूराव शुक्ल (थोरात, दाभाडे, गायकवाड), भाऊशास्त्री जोशी व श्री. अंबादास चिं. जोशी (शिंदे), शिखरे (जाधव), दत्तंभट व नथुभट ढेरगे (भोसले व निंबाळकर), देशमुख, दीक्षित, निखाडे इत्यादि सद्गृहस्थांकडे जी जी माहिती व कागद मिळाले ते स्वतंत्रपणेंच मंडळापुढें मांडण्याविषयीं वर लिहिलेंच आहे. परंतु असेंहि वाटतें कीं, त्र्यंबकेश्वरींच अद्यापीहि कांहीं घराणीं मला तेव्हां कागद पहाण्यास न मिळालेलीं अशीं आहेत. तो एकदां प्रयत्न करून नंतर ते सर्व कागद प्रसिद्ध करणें हें अधिक इष्ट होईल. तसेंच मौजे दिंडोरी, वणी, सायखेडे, येथीलहि कागद मंडळापुढें यथावकाश मांडण्याचें सांगून हें वृत्त येथेंच पुरें करतों.

थेटे कडूस. य. रा. गुप्ते, बी. ए. एम्. आर. ए. एस्.

भा.इ.सं.मं. त्रै. व. ४ अंक १–४ पृ. ८५ वर प्रो. दत्तोपंत पोतदार म्हणतात:— " थिटे– कडूस हेंहि घराणें शिवपूर्वकालीन असावें. याची एक वंशावळ १०।१२ पिढ्यांची बिबीकरांकडेच मिळाली. रा. दामुआण्णा थिटे यांनीं हौसेनें कांहीं कागद दिले. हे कागद देशपांडेगिरीचे असून थिट्यांकडे आप्तसंबंधात आलेले आहेत." खेड तालुक्यांत " थिटे " व " थेटे " अशा दोन्हीं आडनावांचीं घराणीं आहेत. तथापि वरील दामु आण्णा हे " थिटे " घराण्यांतील नसून " थेटे " कुलांतील आहेत. त्यांचे चुलतभाऊ रा. रावजी सिद्धेश्वर थेटे कामानिमित्त खेडास येतात. त्यांस विचारून ही दुरुस्ती करीत आहोंत. ज्या देशपांड्यांच्या कागदांच्या पोतदारांनीं उल्लेख केला आहे ते कागद रा. थेटे यांचे मातुल घराण्याचे म्हणजे वाडेकर देशपांड्यांचे होत.

---

१८ बन्सीपुरी मठांतील शिलालेख

[सं–ग. ह. खरे]

हा लेख साताऱ्याच्या पश्चिमेस असलेल्या वरील मठांत विहिरीवर आहे. मठपती हे बडे सावकार असून शाहू कालांतील सरदारांना लाखो रुपये कर्जाऊ देत असत हें त्यांजकडे पाहिलेल्या कागदांवरून दिसून येतें. लेख पुढीलप्रमाणें आहे. लेखाचा ठसा मंडळ संग्रहांत देत आहें.

(१) शक १६५८ नळ नाम संवत्छर जेष्ट पौर्णि

(२) मा भृगुवासर समस्छ [देश] मध्यस्छ शाहुनगरे

(३) सकल वाटवासिक [जनस्य] कार्यार्थ उद्क

(४) वापि वाधवाणि (?) कृत ×× दं महत बन

(५) सि पुरि हस्तेन सीधितं शुभमस्तु

(६) + + दत्तलाभः + +

---

१९ अवचितगडावरील शिलालेख.

(शं. ना. जोशी)

हा गड कुलाबा जिल्ह्यांतील मेढें गांवाजवळ आहे. हा लेख त्याच्या दक्षिण बाजूच्या तटाच्या भिंतींत मध्यभागीं आहे. लेखशिला एक वीत रुंद, एक वीत दोन अंगुलें उंच अशी आहे. लेखाचा काल सवाई माधवराव पेशव्यांची कारकीर्द येतो. लेख असा.— श्री

(१) श्रीगणेशा (२) यनमा श्रीवा (३) पदेव शके (४) १७१८ नळना (५) मसंरे चैई शु (६) ध १ प्रतीपदा

हा लेख वे. शा. सं. नारायण शास्त्री मराठे–वाई यांजकडून मिळाला. ६० संवत्सर–नामयादींत 'आनंदो राक्षसोनलः' असें आहे. येथें अनल कीं नल पाठ घ्यावा असा संशय पडतो. आणि श्री गौरीशंकर ओझा, ज्ञानकोशकार, प्रख्यात ज्योतिषगणिती श्री. दीक्षित व पिले इत्यादि ग्रंथकारांनीं संवत्सर नामावलींत 'अनल' हेंच नांव दिलेलें आहे. पण, ताम्रपट, शिलालेख व पत्रें ह्यांमधून 'नल' असाच निरपवाद उल्लेख केलेला आढळतो. तेव्हां असें वाटतें कीं 'अनला'चे ऐवजीं 'नळ' हाच पाठ अधिक ग्राह्य व्हावा.

१९ वोळवे कोट बांधणी

(मि. शि. ला. आतार संग्रह.)

ले. १०९] श्री [श. १६७३ माघ शु० ४
मू. दा. चा.] [ता. ९।१।१७५२

आज्ञापत्र राजश्री कुसाजी भोसले ताहां नरस गौडा वलद आणाजी पाटील जैन कसबा वालवें ता। मजकूर सु।। ईसने खमसैन मया व अलफ कसबा मजकूर येथील कोटाचे काम हुजुरुन होत आहे त्यास दक्षणभागीं श्रीदेव याचे स्थान आहे ते स्थल वेदमुहूर्ती नरसिंह भट ग्राम उपाधे व रा। चिमणभट इसापुरकर या उभयतांचे आहे परंतु कुस बांधावयासी त्यास ताखत नाहीं याजकारितां ते स्थल कुसुं व हुडा बांधावयासी तुज दिल्हे असे हुडा व कुसु ४० हात याप्रमाणें मुस्तेद् करून त्या जागेवरी आपले गुराढोरास घरदार बांधून सुखरूप राहाणें कदाचित त्या जागेचा धणी येऊन उभा राहिलाच तरी तुजकडील जो खर्च जाहला असेल तो दिल्हियावर मग तो जागा त्याचे हवाला करणें जाणिजे छ २ रविलोवल

मोर्तब शुद

२० इंदापूर व ताराबाई

(कृ. वा. पुरंदरे—पूर.)

ले. ११०] श्री [श.१६२७ श्रावण वा। ११
मू. दा. चा.] [इ. स. १७०५ आगष्ट ४

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३२ पार्थीव नाम संवत्सरे श्रावण बहुल येकादसी भृगुवासरे क्षत्रीये कुलायेकुलावतंस राजा शिवछत्रपती यांणी देशमूख व

श्री शि	श्री आईआ	देशपाडे पा। इंदापूर यासीं आज्ञा
वनरपति	दि पुरुष श्रीराजा	केली ऐसी जे का। मजकूर दे।
हर्ष निदान मो	शिवछत्रपतीस्वामि	पेठा पेशजीचे मुकासदाराकडून
रेश्वरसुतनलि	कृपानिधि॥ तस्यप	दूर करून हालीं कुल बाब कुल-
कंठप्रधान	रशुराम त्र्यंबक	कानू दाहिजा चौथाई बाबत व
(कोयरी शिक्का)	प्रतिनिधि	सरदेशमुखी सावोत्रा देखील मातुश्री
	(गोल शिक्का)	आईसाहेबाकडे दिल्हे आहे तरी

तुम्ही लावणी संचणी होऊन सारा ऐवज हुजूर ये यैसे करणें उपसर्ग कांहीं लागो न दणें जाणिजे लेखनालंकार मर्या। देयं विरा। जते (षट्कोनी)

---

१ ऐ. सं. सा. सं. १–१४ पा. स $\frac{3}{पृ१}$.

२१ जुनें पुणें

[कृ. वा. पुरंदरे—पूर.]

ले. १११] ॥ श्री ॥ [श. १६८८
मू. द्दा. प.] [इ. १७६६

छं मा। अनाम देशमूख व देशपांडे प्रो पुणें यांसि माधवराव बलाल प्रधान राजाराम नरप सुा सबा सितैन मया व अलफ शके १६८८ व्ययनाम संवती हर्षनिधान माध त्सरे वेदमूर्ति राजश्री भटंभट बीन नारायेणभट उपनाम ढेरे वराव बल्लाळ मु आठघरे गोत्र वशीष्ट सूत्र आश्वलायेन वास्तव्य कसबे मजकूर ख्य प्रधान याणी मौजे सिगण हल(बन?) पो गुडगुटे श्रीकृष्णा दक्षणतीर गोल शिक्का. येथील मुकामी हुजर येऊन विदित केले की मो मजकूरी आपले घर बंधूसहित समाइक वाडा मिरासीचा आहे त्यास आपले वाटणीत नादत आह्मो ते जागा थोडी कुटुंबास पुरत नाहीं ऐशास स्वामींनी कृपा करून नूतन जागा बेवारसी मिरास करून दिल्ही पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणून पहिली जागा याची आहे ते पुरत नाहीं यास्तव को मजकुरी उपरी कुले राहात होती त्यास सरकारांतून दुसरी जागा देऊन ते जागा यास पंधरा तसूचे हाताने लांबी पूर्वपश्चम हात ६० साठ व रुंदी उत्तर दक्षण भिंतीसुधा हात २४ चोवीस यासी चतुःसीमा पूर्वेस माधवराव विश्वनाथ याचा वाडा दक्षणेस निलो केशव याचा वाडा पश्चमेस परशराम नाईक आनगल याचा वाडा उतरेस गली येणप्रमाणें चतुःसीमापूर्वक जागा नूतन मीरास करार करून दिल्ही असे तरी सदर जागा याचे दुमाला करून याजकडे व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे याची प्रती लेहून घेऊन हे असल पत्र भोगवटीयास भटजीजवल परतोन देणे जाणिजे छ ६ साबान आज्ञाप्रमाण लेखन सिमा

---

१ कागद पुणें येथें [पेठ कसबा घ. नं. २४०] श्री. गोविंद वामन ढेरे यांजकडे मिळाला. पा. स. ५³

२२ हिंगणें येथील पाटिलकी

(शं. ना. जोशी—वांई.)

ले. १११]
मू. दा. चा]

श्री

[श. १६२६ वैशाख शु.॥१
[ता. २३।४।१७०४

श्री शके १६२६ तारण नाम संवछरे वैशाख सुध प्रतिपदा आदितवार तदिनी स्थल का॥ खटाऊ पा॥ मजकूर सु॥ सन ११११ हजीरानी मज्यालसी

राजमुद्रा देसक

या विदमाने केला महजर यैसा जे सिवाजी बिन गोदजी ढोले बणजार वणजार मोकदम मौजे हिंगणे पा॥ मजकूर यासि लेहून दिला महजर यैसा जे मौजे मजकूरीची पटेलगी कदीम माणाई* कोम दताजी व सुभानजी ढम खात असता मौजे मजकूर बेचिराख २०॥२५ वरिसे पडिले होते त्यावरी सालगुदस्ता लावणीची ताकीद दिवाणे देसमूख व देसपांडे यासी केली की मौजे मजकूरचे पटेल जेथे असतील तेथे जाऊन घेऊन येऊन गाऊ मामूर करणे म्हणौन हुकूम केला त्यावरून देशमूख व देसपांडे पा॥ मा॥ मौजे भागेलगाऊ पा॥ भूम तेथे जाऊन पटेल मजकूराची समजावीस केली पोटास गला देऊ केला व तश्रीफ दिलिया गावावरी आलियावरी त्यास पोटास कर्ज व गला व पैके दिले त्यावरी सालमजकुरी ×दुस्काल पडिला कुली पाऊस पडिला नाहीं व लस्कर धामधूम जाहाली तेणेकरिता हैरानगती जाहाली कर्ज सेकले कर्जदार न सोडीत त्यामध्ये खावयास नाही याकरिता दताजी मजकूर मेला मुले नेणती बाईको व सुभानजी भीक मागो लागला कर्जाबदल व पोटाबदल अपले पटेलगीपैकी तकसीम १ तिसरी विकून वाचावे व कर्ज फारीख करावे यैसा विचार करून सिवाजी मजकूर मो॥ कलबी पा॥ अउद तेथे जाऊन आपले अत्मशंतोशे त्यास तिसरी ता॥ पटेलगीची दिली विकीतखत करून दिल्हे सिवाजी मा॥रे दिवाणीची महजर करून देणे म्हणौन सागितले त्यावरून माणाई व सुबानजी मा॥रे साहेब बंदगीस अर्ज केला की अपले खुसीनें आपण दुकालात वाचावे व कर्ज फेडावे यावदल अपली पटेलगी पैकी तिसरी ता॥ विकू (टा)कली आहे साहेबी मेहेरवान होऊन महजर करून दिला पाहिजे जीवनमाफीन साहेबास नजर देईन म्हणौन अर्ज केला बराये अर्ज मनास अणून तुज महजर करून दिला असे तिसरी पटेलगी पैकी तकसीम खाऊन सुखे कीर्दी मामुरी

१ पा. स. वंतु. * 'जी'चें इ केलें आहे. ×स्पष्ट अर्थ्या स्ल ला का जोडला आहे.

करून असणे इनामती व हक पढीपासोडी सेवधार व बाजे हक तारेतार तिसरी ता। साऊन सखी असणे यास इस्कील करी तो गोताचा अन्याई व दिवाण गुन्हेगार हा महजर लेहून दिला सही

२३ सामाजिक टिपण

शेणव्याचे पंगतीचा दोष

(दि. वि. काळे.)

पुढील पत्र सं. पुरंदरे मास्तर यांजकडून मिळालें. सामाजिक दृष्ट्या खालील गोष्टी महत्वाच्या वाटतात. (१) "भिडेस पडून" किंवा 'स्वतःचे घरीं आचाराचा इतका कडकपणा नाहीं' म्हणून शेणव्याला पंगतीला घेऊन बसणारे इसम १८ व्या शतकांत चांगल्या घराण्यांत होते. (२) तथापि राजसत्ता अशा गोष्टींकडे काना डोळा करण्यास तयार नव्हती. (३) पंगत भ्रष्टविण्याचा गुन्हा करणाऱ्यास १० हजार रुपये दंड पुरा वाटत नव्हता. (४) पश्चात्तापार्थ चतुर्थाश्रमी होत असत. चातुर्मास सीमोल्लंघन करूं नये असा हवामान व उद्योगधंदा या उभयतांस पटणारा असा निर्बंध लक्ष्यांत घेण्याजोगा आहे. (५) चवदा वर्षांची मुलगी सती गेली.

॥ श्री ॥ पौ छ ७ रा। लावल

श्रीमंत राजश्री नाना—स्वामीचे सेवेसी

पो गोविंद सिवराम सां नमस्कार विनंती ता। छ ७ रावल मु।। पुणें सुखी असो विशेष च्यार दिवस जाले आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तरी सविस्तर लेखन केले पाहिजे इकडील वर्तमान तरी सिंदे होलकर यासी निरोप जाला येथून कूच करून गेले. रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण पुणियासी आले उभयतांची रवानगी हिंदुस्थानांत होत आहे. माहादजी सिंदे याणीं निरोप घेतला ते दिवसी बाजी नरसी आमचे घरीं सांईकाली सोमवारीं भोजनास आले बराबर रामोबा पागे याचा भाऊ भोजनास घेऊन आले तो जातीचा सेणवी हे आम्हास ठाऊक नाहीं पगंतीमधे बसोन भोजन केला बाजी नरसी याणी सांगावे ते सांगितले नाहीं काहीं भिडेस पडला व कांहीं फारसा त्याचे घरीं भेदहि नाहीं भोजने जालियावर आम्हास वर्तमान कलले ते समईच त्याचे पारपत्य करावें तरी आम्हास वाडियांतील बोलावणें निकडीनें आलें व आपलें घरास महस्त आला असें चित्तांत आणून दरबारास गेलों. श्रीमंताच्या कानावर घातले त्याणी प्रातःकाली त्यास आणून फजीत करून दंड बांधावा ऐसे केले ते दाहा हजार रुपये देत आहेत येजमान घेत नाहींत पुढें कसे होईल पाहावे वेदशास्त्र-

संपन्न राजश्री सेशाद्री शास्त्री यासी उगाच पश्चात्ताप होऊन पंचमीचे दिवसी संन्यास ग्रहण केलें केवल विरक्त होऊन प्रपंच साडून चतुर्थाश्रम संपादिला चातुर्मास सीमा उलघन करू नये यास्तव आमचे बागात राहिले आहेत त्याचा पुत्र येक समागमे आहे बाईको कासींत आहे राजश्री दिनकर माहादेव यास पुत्र येकच होता तो वात होऊन नाशकांत मृत्यु पावला त्याची बाईको ती बाबूराव कोनेर याची कन्या चवदा वर्षांची आहे ती येथें आहे ती समागमन करिती आस्ती आणावयासी माणसे गेली आस्ती आलियावर जाणार दिनकरपंतावर ईश्वरी क्षोभ जाला तो काये ल्याहावा श्रीमंत सोमवारी देवास जाणार येसे म्हणतात जातील तेव्हां खरे. आम्ही सारे सेणवी याचे पगतीस जेवलो यास्तव आम्हास प्रायश्चीत कर्णे लागले येक उपास करून दुसरे दिवसी पंचगव्य घेतले आजी श्रीमंत स्वामीस पुढी करावयास आमच्या बागेंत भोजनास गेले आहेत श्रीमत बाईचे पत्र श्रीस जावयाचे आले होते त्याचे उत्तर जरूर देऊनच गेले ती जेजुरीस आलियावर आपणहि जावे रुमाल पाठविला आहे महायात्रेस जावयाचा निश्चय आहे गंगोबा येवजाचा निकाल पडत नाहीं यास्तव पुढें काये होईल पाहावे आपले शरीराचे वर्तमान वरचेवर लिहीत जावे. ×बहूत काय लिहीणे हे विनंती.

---

२४ पुण्याचा गारपीर.

[द. वा. पोतदार.]

मराठी सैन्यें विजयार्थ पुण्याबाहेर डेरे दाखल जेव्हां होत ते वेळीं पहिला मुक्काम गारपिरावर पडत असे. हा गारपीर नक्की कोठें आहे हें पाहिलेले पुण्याच्या पिढीजाद राहणारांपैकीं थोडेच सांपडतील. हल्लींच्या कलेक्टर कचेरीचे आसपास तो आहे; एवढें अदमासानें पुष्कळ सांगतात. परवां हा गारपीर प्रत्यक्ष जाऊन पाहिला. कलेक्टरकचेरीचे पलीकडे लालदेवळाकडे वळणाऱ्या रस्त्याच्या कोपऱ्यावर हा तकिया आहे. पिराचें स्थान आहे. तेथें एक जुना खांब उभा आहे व भिंतीगलीकडे एक जुनी बारव आहे. नमाजाची मशीद समोर आहे. खुद्द पिराभोंवतीं गारा रचून ठेवून गारपीर या अभिधानास सार्थकता आणण्याचा प्रयत्न अर्वाचीन असावा असें वाटतें.

मला असा संशय येतो कीं, ह्या पिराचें जागीं पूर्वी एखादा पार असावा. येथें पेशवाईंत फार दाट झाडी होती, हें प्रसिद्धच आहे. कदाचित् हें पुणेश्वर-

---

× अक्षर वेगळें. १ पा. स. ५१

नारायणेश्वराप्रमाणेंच जुनें देवालयहि असावें. या गारपिरास पेशवाईंत देणगी होती. त्याबद्दलचा एक कागद पिराचे मुजावर यांजपाशीं मिळाला तो पुढें दिला आहे. पुण्यांत शेकसल्ला दर्गा व अनगडशाचा तकिया हीं दोन प्राचीन मुसलमानी पवित्र स्थळें आहेत. दोन्हीं स्थळीं जुने बादशाही कागदपत्र आहेत. पैकीं अनगडशाचे तकियाबद्दल माहिती लवकरच हातीं येईल. मंडळाचे कोणी उत्साही सभासद नियमानें येतील व काम करतील तर एक नगरसंशोधनाचें नवें खातेंच चालवितां येईल. हा मूळ कागद रा. दि. वि. काळे व रा. द. वि. आपटे यांनींहि पाहिलेला आहे.

ले. ११९ मू. न.	श. १७५६ भाद्र. शु. १० इ. १८३४ सप्टें. १२

अर्जी बे॥ सुलतानशा वलद गुलजारशा फकीर तकिया गारपीर शहर पुणें सन १२४२ फसली कारणे अर्जी करितो ऐसी जे आम्हांस श्रीमंत पेशवे सरकारांतून तकीयाचे नेमणूकीस पिराचे नैवेद्याकरितां दररोज तांदूळ केली ०८। येक सर व उदाकरिता येक पैसा येणेप्रो आम्हास पावत आले त्याचा तपशील येणेप्रो

१ श्रीमंत सवाई माधवराव साहेब याचे कारकीर्दींत शनवार वाड्यांतून कोठींतून दरमहा तांदूळ केली ८॥१॥ साडे सात पायली व उदाबद्दल दरमहा ·॥· आठ आणे प्रो घेऊन येत गेलो का ———————————— कलम

१ श्रीमंत बाजीराव साहेब याचे कारकीर्दात काही दिवस बिठलपंत वाकनीस याजकडून पावत आले पुढें सखो मालसे याजकडे मक्त्याचें काम होते ते देत आले काही दिवस जामदारखान्यांतून त्रिंबकजी डेंगळे याजकडून तीस हा रोख सालाचे सालास पावत आले

—
२

सदरहूप्रा पेशवे सरकारातून गारपीर तकियास पावत आले पुढें इग्रजी अमल जाला आम्ही अर्ज करावा तरी आणीक तकिये शहर मारी आहेत आणि त्यासहि नेमणुकी आहेत त्याजला पाऊ लागल्यास मग अर्ज करावा याजमुळें अर्ज केला नाहीं हली दुसरे तकियेवाले यानी अर्ज केले त्याचे वर्षासन त्यास चालू केले त्याचा ता

१ सैद सादातवाले याजला नेमणूक दोन बाजार रविवार व दोन बाजार बुधवार येथील बैठक व शेव सरकारात यावयाची त्याचे उत्पन्न होईल ते त्यानी

---

१ मं. वाकाद्दि.१९ वा.

द्यावे याप्रो मामूल पावत होते त्याप्रो त्याचे त्यास घेण्यास हुकूम देऊन मसतेदार यास ध्यार रोजाचा ऐवज मजुरा देतात————————कलम

१ अनगड शह्यचे तकियासहि सदरी लिहिल्याप्रो ध्वार बाजार घेण्याची चाल आहे त्याबदल हली तकियेवाले फकीर यास रोस पोस्यातून श्रा २५ पंचवीस पावत आले

२

सदरहू दोन तकियेवाले यास नेमणुकीबदल पैसा साहेबानी मेहेरबानी करून *चालू (ह्रु) केला त्याप्रोच आमचे तिसरे तकियाचे *चालू (ह्रु) करणे सावंदाकडे आहे तरी मेहेरबानी करून *चालू केले पाहिजे मिती भाद्रपद शुा १० शके १७५६ जयनाम सवच्छरे

२५ शेतीकरतां पाटबंधारे

[शं. ना. जोशी—वांई.]

ले. ११४]
मू. दा.चा.]

[श. १५९६ मार्ग. शु.७
[इ. १६७४ नोवें. २४

ई महजर सुरत मजलसी ब तारीख ५ शहर रमजानु शरे मजलसी हुजूर

देशमुख व देसपांडिये प्रा। दिंडोरी

प्रा। गुलशणाबाद देशमुखानी व देशपांडे प्रा। मजकूर

देवबोजी व रेउजी देशमुख प्रो मा।र निशानी नांगर

बरवाणी बाबाजी देशमुख माो मा।र निशानी नांगर

मेऊजी देशमूख ता। मोजाड निशानी नांगर

खंडोजी देशमूख भोगडे निमे पा। मजकूर निशानी नांगर

(आडवें) कृस्णाजी पाटील मोकदम कसबे नासिक

विसाजी सूर्या व बाबा

बोमाजी सिवदेऊ देशपांडिये

कासी आपदेव पा। निमे

---

* मोडी ल काढून बालबोध उकार जोडला आहे. १ सं. १७ वें.

प्रा गुलशनाबाद हजीर मजलसीस महजर केला यैसा जे कबजी पा मोकदम व मुजारियाने मौजे मोहाडी प्रा दिडोरी सु॥ सन हजार १०८४ येऊन हजूर जाहीर केले मौजे मजकुरचे सिवेमधे नजीक मौजे अधे जासमातेच्या वडाजवली बानगंगामध्ये बांद बाधोन मौजे मजकुराच्या सिवारात पाणी नेऊन काही बागाइत करून अबादानीची पैरवी करावी म्हणोन उमेदवारी धरून काम सुरू केले औसिबासी मौजे जाणोरकर मोकदम येऊन कामास हरकती केली आहे की येथे बांद बांधलियाणे आपल्या बांदास पाणी कमी होईल बदल बांद बांधो नेदू आबादानीच्या कामास हरकती जाली आहे येसियासी मौजे मजकुरी नदी नाही रयेतीने मेहनत करून बिहिरी केलिया अहेत हली सालबसाल पाऊस कमी होतो त्याकरितां विहिरीस पाणी कमी बहुत जाले आहे मुतास मोट चालत नाहीं जिराईत पीक जबून होते येनेकरून रयेतीची खराबी होते यैसियासी बानगंगेस जागाजागा बाद बधारे बाधले आहेत नदी थंड कालवरी पाणी निले राहाते तोवरी आपणासहि पाणी पोहचालियाने रयेती कीर्द अबादानीची उमेदी धरून—ले आणि दरम्यान जाणोरकर कामास हरकती करून काम चालू देत नाहीत तरी कुंदरती नदी जमीन आसमान आहे तैपासून आहे आणि बाधारे तरी सबब आबादानी हर कोन्ही हिमती धरून करितात हे सुदामद तमाम दुनियामधे रवर्ज आहे येसियास साहेबी इनसाफ करून आपनास बाद बाधावयाचा हुकूम केला पाहिजे म्हणोन कबजी मजकुरे हकीकत जाहीर केली यावरून हुकूम महाराज साहेबजीचा जाला जे शरीयेत पन्हा काजी व दारोगे व मुश्रीफ अदालत व सिवजी गोळी फौजदार ता॥ राजापूर प्रा उन व जैरामदास सेकदार गुमास्ते दिवाण जामासिग व देशमुख व देशपाडियानी व मोकदम देहाये प्रा गुलशनाबाद व प्रा दिडोरी व प्रा उणी येश करकशाच्या जागा जाऊन कजिये जमीनदार सेरजमीन आज रुये रास्ती दुरुस्ती नजरेसी पाहोन मुशकस करणे म्हणौन फर्माविले यावरून सदरहू मुदसदी व जमीदार तिहीं परगन्याचे येऊन दोन रोज मुकाम करून नजरेस पाहून चालते वरते जागाजागा बधारे बाधोन पाणी नेलें आहे येसियास हे जागा बधारियाल्यास आहे मेहनत बहुत आहे टकाखर्च होईल अमा पानीं पोहोचल व माफिक करून हे हुकूम शराशरीफ सादर जाला जे कुदरती नदी आहे हर कोन्ही पानी नेईल त्यासी काही मणा नाहीं अमा बशर्त कोन्हास जलल न पोहोचे व णुकसान न होये तरी पाच जन तिन्हायेत जमीदार या कामात व कुफरासत असतील तेहि तजविजे करने जरी जानोरकरास जलल व णुकसान पोहोचत नसले तरी मोकरर करने की मोहाडीकर बद बाधोन यावरी पाच जण जमीदारी तजवीज केली जे काही जाणोरकराचे ज्यान व णुकसान होत नाहीं व त्याच्या पाटाचे क (मी होत)

भारत इतिहास संशोधक मंडळ

—— ×× ——

'सतरावें संमेलन व एकोणिसावा वाढदिवस'

(शके १८५१)

भा.इ.सं. मंडळाचें सतरावें संमेलन मि. वैशाख कृ.९।१०।११ (ता.२,३,४ जून) व मंडळ वाढदिवस आषाढ शु. १ शके १८५१ (ता. ७ जुलै १९२९) या दिवशीं हे दोन्ही समारंभ मंडळ-मंदिरांत प्रतिवर्षाप्रमाणें सकाळ संध्याकाळ उत्तम रीतीनें साजरे झाले. दोन्ही प्रसंगीं हजर असलेले सद्गृहस्थ—

श्रीमंत बाळासाहेब पंडित पंत प्रतिनिधी, चीफ् ऑफ् औंध (औंध), श्री. चिं. वि. वैद्य, श्री. सरदार तात्यासाहेब मेहेंदळे, श्री. सरदार आबासाहेब मुजुमदार, प्रो. द. वा. पोतदार, रा. द. वि. आपटे, रा. स. म. दिवेकर, श्री. तात्यासाहेब केळकर, रा.य.खु. देशपांडे (यवतमाळ), प्रो.रा.वि. ओतुरकर (नाशीक), प्रो.वि. ना. कुंभारे, रा. कृ. वा. पुरंदरे मास्तर(पुर), रा. शं. ना. जोशी वांईकर, रा. द. वा. परचुरे (सातारा), प्रो. चिं. गं. भानू , रा. चिं. ग. कुलकर्णी, रा. शं. ग. दाते, रा. बिं. ना. साठे, रा. स. ग. जोशी, रा. दि. वि. काळे,रा. वा प. मेहेंदळे (औंध), रा. त्र्यं. ह. आवटे, रा. य. रा. दाते, रा. अ. वि. पटवर्धन, रा. सा. ना. गो. चापेकर (बदलापूर), रा. सि. वि. केळकर, रा. श्री. कृ. साठे, रा. य. न. केळकर, रा. य. ग. फफे, रा. वा. दा. तळवलकर, रा. दा. ना. आपटे (बडोदें), रा. ज. स. करंदीकर, प्रो. वा. गो. काळे, रा. वि. गं. लेले, रा. श्री. बा. जोग, रा. रा. आ. जोगळेकर, वैद्य पु. ग. नानलशास्त्री, रा. द. कृ. गोसावी (सातारा), रा. शं. ल. वैद्य, प्रो. म. रा. परांजपे, प्रो. श्री. व्यं. पुणतांबेकर (काशी), डॉ. गो. स. पळसुले, रा. ग. वि. देवधर, डॉ. रा. दा. घोलप, रा. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, रा. म. दा. साठे (यवतमाळ), रा. सा. बाबासाहेब देशपांडे, रा. गो. रा. देव (नागपूर), रा. रा. ग. हर्षे, रा. म. वि. डोंगरे (महाड), प्रो. अ. स. अळतेकर (बनारस), रा. वि. द. घाटे (अहमदनगर), रा. रं. वि. रबडे, रा. रा. दा. देसाई, रा. ग. ह. खरे (सातारा), रा. शं. रा. गोडबोले, रा. वा. सि. बेन्द्रे, रा. के. आ. पाध्ये (मुंबई,) रा. ग. श्री. साठे, रा. वि. म. कोल्हटकर, वैद्य ग. त्र्यं. जोशी, रा. रा. ह. गाडगीळ (मुंबई), रा. ना. वि. आठवले, रा. ध. बा.

गुर्जरशास्त्री, रा. बा. ल. शिंदे, रा. स. ज. भागवत, रा. त्र्यं. भा. खरे (मुंबई), प्रि. ध. रा. गाडगीळ (सुरत), रा. स. रा. बखले (मुंबई), श्री. मा. ह. घोरपडे, रा. ए. रा. आलेगांवकर (खडकी), रा. रा. ज. गोखले, प्रो. वि. ब. नाईक, रा. य. रा. गुप्ते (खेड), रा. बा. पां. ज्ञा. कुलकर्णी (आळंदी), प्रो. प. म. लिमये (सांगली), रा. ना. श्री. राजपुरोहित (धारवाड), रा. भा. ज. भिडे, रा. भा. द. खांडेकर, रा. चिं. ग. कर्वे, रा. ह. वि. बेहरे, श्री. ठाकूर सिसोदिया, प्रो. स. रू. पिंपळखरे, रा. अ. वा. फडणीस, रा. वा. दा. मुंडले (वाढदिवस) (इस्लामपूर), श्री. भाऊसाहेब चोखाळकर (मोमिनाबाद), रा. ज्ञा. भी. कुळकर्णी (नागापूर), रा. वि. वि. देशपांडे (जुन्नर), प्रि. डॉ. बाळकृष्ण (कोल्हापूर), डॅा. वि. स. सुखटणकर. या शिवाय प्रो. ओक (जयपूर), श्री. खांडेकर (इंदूर), इ. इ. पाहुणे मंडळी हजर होती.

स्वागतपर भाषण— मंडळाचे उपाध्यक्ष श्री. **चिं. वि. वैद्य** यांचें जमलेल्या मंडळीच्या स्वागतार्थ संमेलनप्रसंगीं भाषण झालें. त्यांत त्यांनीं इतिहासचर्चेंत अनुमान व तर्क ह्यांचें संभवस्थान कोणतें, पुराव्याची चिकित्सा, बखरींतील ग्राह्य व त्याज्य भागाविषयींची मीमांसा इत्यादि मुद्यांसंबंधानें विवेचन केलें. त्याचा सारांश§ पुढीलप्रमाणें—

श्री. **चिं. वि. वैद्य** यांचें भाषणः- **श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधि** व सन्माननीय सभासद्हो ! आजच्या सतराव्या वार्षिक संमेलनाचे प्रसंगीं मी आपलें मनःपूर्वक स्वागत करितों व आपल्या कार्यासंबंधानें चार शब्द सांगतों. आपल्या प्राचीन इतिहासाच्या संशोधनासंबंधानें प्रत्येकानें आस्था दाखविली पाहिजे. त्याप्रमाणें दिवसानुदिवस ही आस्था वाढत आहे, हें अभिनंदनीय होय. इतिहास व दंतकथा यांतील फरक लक्ष्यांत ठेवून बिकट साधनांची निवड झाली पाहिजे. इतिहास व दंतकथा यांची भेसळ कशी होत जाते हें भारताचें महाभारत कसें झालें; ह्या वृत्तांतावरून लक्ष्यांत येण्यासारखें आहे. शिवचरित्र-साहित्यासंबंधानें नवीन माहिती प्रसिद्ध होत आहे. आजपर्यंत ग्रँट डफ, केळूसकर व जदुनाथ सरकार यांनीं चरित्रें व माहिती प्रसिद्ध केली. परंतु ती बहुतांशीं निरनिराळ्या बखरींच्या आधारावर उभारलेली आहे. ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असा समकालीन कागदपत्रांचा पुरावा हळूहळू संशोधकांच्या खटपटीमुळें व लोकांच्या सहानुभूतीमुळें जास्त जास्त उपलब्ध होत आहे. तो प्रसिद्ध करून त्यावर जास्त

§ संमेलन व वाढदिवस ह्या दोन्ही समारंभप्रसंगीं ऐतिहासिक निबंधवाचन, वस्तुप्रदर्शन आणि संभाषणें इ. कार्यक्रम झाले. पैकीं निबंध मंडळामार्फत त्रैमासिकांत व स्वतंत्र ग्रंथांत प्रसिद्ध होतील. येथें भाषणांचे सारांश तेवढे दिले आहेत.

जास्त प्रकाश पाडणें हें आपलें कर्तव्य होय. कारण, बराच काळ लोटल्यानंतर लिहिलेल्या बखरींचा पुरावा हा दुरून पाहात असलेल्या डोंगराप्रमाणें आहे. म्हणजे जसजसा समकालीन पुरावा जास्त उपलब्ध व प्रसिद्ध होईल तसतसा, डोंगरावर गेल्यावर तेथील खांचखळगे वगैरे परिस्थितीचें जसें यथार्थ ज्ञान होतें त्याप्रमाणें, यथार्थ इतिहास कळून येणार आहे. शिवचरित्रांत वादविषयक स्थलें अनेक आहेत व त्यांसंबंधीं निश्चित निर्णय करण्याकरतां समकालीन कागदांची आवश्यकता आहे. हें नवीन कागदपत्र पाहातांनाहि कल्पित गोष्टी टाकून सत्य गोष्टींची निवड व निश्चिती करणें जरूर आहे. व हें करीत असतां संशोधकानें न्यायाधिशाची न्यायनिष्ठुरता बाळगिली पाहिजे. कारण समकालीन पुरावा देखील मतदूषित असण्याचा संभव असतो. उदा.—पोर्तुगीज, डच व इंग्रज पुरावे पुढें येत आहेत; त्यांत एकमेकांचे परस्परसंबंध व लेखकाचीं वैय्यक्तिक मतें यांचीहि पूर्ण छाननी झाली पाहिजे.

आतां तिसरा मुद्दा असा कीं, कित्येक प्रसंगाचे कागदपत्र अद्याप सांपडले नाहींत. संशोधकानें 'लेख सांपडत नाहींत' असें विधान न करतां 'लेख सांपडले नाहींत,' असेंच म्हणणें सयुक्तिक आहे. ते शोधून काढणें हें प्रयत्नाचें काम आहे. जेथें दोन निरनिराळ्या काळीं घडलेल्या गोष्टींचा दुवा जुळवावयाचा आहे तेथें तो **दोन तऱ्हांनीं** जुळवितां येतो. त्या तऱ्हा म्हणजे **अनुमान व तर्क** ह्या होत. ह्या दोन्ही गोष्टी समकालीन पुराव्यावरून अधिक निश्चित स्वरूपाच्या असतात. उ०— शहाजीच्या सुटकेशीं शिवाजी महाराजांचा संबंध होता कीं नव्हता? तर समकालीन पुराव्यावरून असें **अनुमान** होतें कीं, तो होता. कारण विजापूरदरबारनें सिंहगड किल्ला हा महाराजांच्या ताब्यांतून, शहाजीस सोडतांना, आपल्या ताब्यांत घेतला. हें समकालीन पुराव्यावरून सिद्ध होतें. तसेंच शहाजी महाराजांची सुटका करतांना, शिवाजी महाराजांच्यावर कांहीं अटी लादण्यांत आल्या होत्या काय? यासंबंधानें पुरावा सांपडला नाहीं; पण येथें तो **तर्कानें** जुळविला पाहिजे, व शिवाजी महाराजांनीं पुढें तीन वर्षांनीं धुंडाई आरंभिली; यावरून तशा अटी वगैरे कांहीं नसाव्या किंवा ३ वर्षे कांहीं करूं नये अशीच अट घातली असेल असा तर्क चालतो. **तर्कापेक्षां अनुमान श्रेष्ठ.** जावलीकर मोऱ्यांना मारलें, असें जें बखरकारांचें विधान आहे तें तसें चुकीचें आहे; असें उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरून निश्चित **अनुमान** होतें. कारण, अफजलखानाचें जें पत्र सांपडलें आहे त्यांत 'कदीम चंद्रराव मयत जाला व गैरी लोकीं कबजा केला,' असे शब्द आहेत. आणि जेधे शकावलींत दत्तक चंद्रराव जावळींतून रायरीवर पळाला, असेंहि निश्चित आहे. तेव्हां शिवाजीनें कोणत्याहि चंद्ररावाचा कपटानें खून करविला नाहीं हें निश्चित आहे. आतां हा दत्तक चंद्रराज केव्हां झाला वगैरे गोष्टींसंबंधानें निरनिराळे

तर्क होतील. तिसरें उदाहरण, शिवाजीची व रामदासाची भेट केव्हां झाली ? श्री. सं. श्री.देव यांनीं दाखविल्याप्रमाणें रामदास शिवथर खोऱ्यांत श. १५७४ पासून १५८४ पर्यंत होते हें निश्चित. पण रायगड जवळ असल्यानें शिवाजी व रामदास यांची या मुदतींत भेट झाली असली पाहिजे, हा तर्क. कारण, यत्र यत्र सानिध्यं तत्रतत्र भेटिः हें निश्चितच आहे असें नाहीं. म्हणजे **सान्निध्य हें अनुमान व भेट हा तर्क.**

महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास उज्ज्वल आहे. या कारणानें महाराष्ट्रीयांस इतिहास-संशोधनाची आवड असणें साहाजिक आहे व त्या आवडीचें दृश्य स्वरूप म्हणजे हें इति. सं. मंडळ आणि ही त्याची भव्य इमारत होय. आतां प्राचीन इ० चें वैभव सांगणें म्हणजे "वडिलाची किर्ती सांगे तो एक मूर्ख" ह्या श्रीरामदासांच्या उक्तीच्या कक्षेंत येण्यासारखें आहे. कीर्ती नेहमीं सांगणें दोषास्पद होईल; पण त्या कीर्तीची माहिती करून घेणें दोषास्पद नाहीं. किंबहुना श्रीरामदासानीं महामूर्खाचीं लक्षणें सांगितलीं असतीं तर 'वडिलाची किर्ती विसरतो तो महामूर्ख' असें एक प्रमाण सांगितलें असतें. वडिलांच्या खऱ्या कीर्तीचा अभिमान बाळगणें हें चांगलें लक्षण आहे. यासाठीं वडिलांचा इतिहास साधार व निश्चित रूपाचा करून ठेवणें हें आपलें कर्तव्य आहे. पण हें कार्य करण्यास द्रव्यसाहाय्याची आवश्यकता आहे. मंडळास कर्ज आहे. तरी देखील मंडळ उत्साहानें काम करून नवीन नवीन ग्रंथ छापून प्रसिद्ध करीत आहे हें अभिनंदनीय आहे. गुदस्तां श्री. दिवेकर यांच्या शिवभारताप्रमाणें यंदा पुरंदरे दप्तरांतील पेशवाईकालीन अस्सल कागदपत्रांचा एक खंड बाहेर पडला आहे. तसेंच धार संस्थानचा इतिहास, मुधोळच्या घोरपड्यांचा इतिहास, कऱ्हाडचा इतिहास वगैरे सुंदर ग्रंथ अन्यत्र बाहेर आले आहेत. पुढच्या वर्षी **श्रीशिवाजी महाराजांचा त्रिशतसांवत्सरिक जन्मदिनोत्सव** आहे. आणि त्यासमयीं शिवचरित्राचीं शक्य होतील तितकीं साधनें मिळवून साधार शिवचरित्र लोकांपुढें मांडण्याची खटपट सुरू आहे. तें कार्य यशस्वी रीतीनें पार पडण्याचीं चिन्हेंहि दिसत आहेत. असो. मंडळाचें कर्ज आपल्या सर्वांच्या मदतीनें लवकरच फिटेल अशी मी अपेक्षा करितों, व पुनः एकवार आपणां सर्व इतिहास–भक्तांचें आनंदानें स्वागत करतों.

ह्या नंतर मंडळाचे चिटणीस प्रो. द. वा. पोतदार यांनीं मंडळाच्या समारंभास यश चिंतणाऱ्यांचे संदेश वाचून दाखविले. त्यांतील कांहीं नांवें पुढीलप्रमाणें:—

(१) श्री. यादवराव काळे (बुलढाणा), (२) श्री. शिवाजीराव चौसाळकर (मोमिनाबाद), (३) श्री. संपादक दासबोध (मसूर), (४) रा. विठ्ठलराव मुकादम (मोमिनाबाद), (५) रा. ब. वा. अ. बांबर्डेकर (नाशिकरोड),

(६) श्री. सरदार चंद्रोजीराव संभाजीराव आंग्रे, (ग्वाल्हेर), (७) रा. ता. ने. पांगळ, (८) रा. वा. दा. मुंडले (इस्लामपूर), (९) रा. सा. के. जी. सबनिस (कोल्हापूर), (१०) रा. शि. का. ओक (धार) इ.

श्रीमंत पंडित बाळासाहेब पंत प्रतिनिधी यांचें भाषण झालें. **प्रतिनिधी** हे सदर समारंभास पहिला दिवस (सकाळ दुपार) व दुसरे दिवशीं सकाळीं असे हजर होते. दुसरे दिवशीं सकाळची बैठक समाप्त होण्याचे वेळीं प्रतिनिधींचें हें भाषण झालें. त्याचा सारांश येणेंप्रमाणें:– ' आम्ही काल व आज मिळून संमेलनाच्या तीन बैठकी पाहिल्या. दर वर्षीं संमेलनाचें निमंत्रण येतें. पण प्रत्यक्ष समारंभ पाहण्याचें यंदां जमलें. आणि सांगण्यास आनंद वाटतो कीं, संमेलनाचा कार्यक्रम पाहून म्हणजे निबंधादि चर्चा ऐकून समाधान झालें. त्यांतील कांहीं गोष्टींबद्दल थोडें सुचवावेसें वाटतें. तें हें कीं, येथें श्रीशिवचरित्राविषयीं जी चर्चा झाली व चरित्रसाधनाविषयीं जे परिश्रम चालू आहेत त्यांतच ऐ० स्थलनिरीक्षण अवश्य करावें. म्हणजे शिवचरित्रांतील हालचाली झालेलीं ऐतिहासिक स्थलें समक्ष पाहून मग ते प्रसंग वर्णन केले जावेत. एरव्ही त्याची यथार्थता पूर्णपणें ध्यानीं यावयाची नाहीं. उदाहरणार्थ– 'आम्ही नुकताच राजगड पाहून आलों. राजगडला जातांना वाटेंत एक खिंड लागते ती इतकी अरुंद आहे कीं तींतून फक्त सुटीं उंटघोडीं व माणसेंच जाऊं शकतात, गाड्या जात नाहींत. गडाच्या पायथ्यापासून गडाचा माथा सुमारें दोन हजार फूट उंच आहे. वर जाण्यास पांच मैलांची वाट आहे. व ती चढण फार आहे. हा किल्ला उंच असल्यामुळें आसपासचे सर्व किल्ले स्पष्ट दिसतात. वरील बाले किल्लाच ४०० फूट उंच असून त्यावर वानरासारखें दगडी पायऱ्यांवरून चढत जावें लागतें. व यासेरीज दुसरा मार्ग नाहीं. या बालेकिल्ल्यावर मुख्य वाडा, २५ टाकीं व बाजारपेठ असून हा किल्ला कसा घेतला, केव्हां घेतला, कोणीं घेतला वगैरेचें टांचण तेथें एका मनुष्याजवळ आहे. तें मिळविण्याच्या प्रयत्नांत आहोंत. तसेंच महाराजांचा लोड व गालिचा तेथें आहे असें आम्हांस सांगण्यांत आलें. हा प्रत्यक्ष पुरावा संशोधकांनीं पहावा. तसेंच ह्या गडाविषयीं एक आख्यायिका तेथें ऐकली. ती अशी–राजमाता जिजाबाई यानीं याच किल्यावरून सिंहगडाची मागणी केली व लढाईस जाण्यापूर्वीं नरवीर तानाजी व त्याचे १२०० मावळे यानां पंचपक्वान्नाचें इच्छाभोजन दिलें. असो, शिवाजीचा दुसरा मुलगा याचें नांव राजाराम आहे. त्याच्या जन्मापूर्वीं रामदासांची व त्यांची गांठ पडली असावी, असा तर्क आहे. कारण त्यांच्या वंशांत विष्णू ह्या देवतेचीं वाचक नांवें तत्पूर्वीं कोठें आढळत नाहींत. सारांश, ऐतिहासिक पत्रांप्रमाणें

ऐतिहासिक स्थलनिरीक्षण अतिशय महत्वाचें आहे. त्याचा चरित्र लिहिण्यापूर्वी विचार होऊन अंमलबजावणीहि व्हावी. दुसरें असें कीं, श्रीशिवचरित्र नुसतें मराठींत प्रसिद्ध होऊन उपयोगाचें नाहीं. हा होणारा चरित्रग्रंथ इंग्रजींतहि प्रसिद्ध होणें अत्यंत इष्ट व आवश्यक आहे. शिवचरित्रसाधनें प्रसिद्ध करण्याचे बाबतींत कांहीं साधनें नियतकालिकांतून प्रसिद्ध झालीं पण आज तीं दुर्मिळच आहेत; अशांचा संग्रह करून त्याचा एक ग्रंथ प्रसिद्ध व्हावा. आजच रा. शंकरराव जोशी यांनीं इ. स. १८९६ च्या केसरींत प्रसिद्ध झालेलें जें पत्र वाचलें त्यावरून निदान केसरीपुरती तरी ही अवश्यकता व शक्यता अधिक वाटते. इतरहि वेगवेगळीं वृत्तपत्रें व मासिकें ह्यांतून असें साधन व चर्चा वाङ्मय बरेंच प्रसिद्ध झालें आहे. मात्र तें सर्व प्रसिद्ध होण्यास इतरांचें साहाय्य हवें. मंडळाच्या संग्रहीं कागदपत्रांचा संग्रह फार मोठा आहे असें ऐकण्यांत येतें. तें आम्हीं पाहिलें त्यावरून खरें आहे. कारण एक लाखावर कागद आज मोजूनच दप्तरीं दाखल आहेत. पण हे कागद प्रसिद्ध करण्याची व्यवस्था झाली पाहिजे. कै. राजवाडे ह्यांनीं २०।२२ खंड प्रसिद्ध केले, तोहि मार्ग ह्या बाबतींत मंडळानें पत्करावा. ह्यानंतर श्रीमंतांनीं मंडळाच्या वस्तुसंग्रहांत असलेलीं चित्रें सुरक्षित राहाण्याकरतां काय करावें तें सांगून त्याकरतां तूर्त रु. ५० ची देणगी देऊन, आपलें भाषण संपविलें.

---

१९ वा वाढदिवस—समारंभ

स्वागतपर भाषण

श्री. **चिंतामणराव वैद्य म्हणाले**

आज (आषाढ शु.१ शे.१८५१ ता.७-७-२९) पावसामुळें जरी मंडळी थोडी आलेली असली तरी ती इतिहासावरील प्रेमामुळें आणि आदरामुळेंच आल्यामुळें मी त्यांचें अंतःकरणपूर्वक स्वागत करतों. **इतिहासानंद हा एक ब्रह्मानंदाचाच भाग आहे**. कारण या इतिहासानंदांत सत्यच असतें. अमुक एक गोष्ट कळली कीं इतिहाससंशोधकाला व भक्ताला स्फुरण चढतें आणि आनंद होतो; आणि हाच इतिहासानंद होय. या सत्याचे धागेदोरे सर्व इतिहासांत पसरलेले असल्यामुळें देशाच्या फायद्याच्या दृष्टीनेंहि इतिहाससंशोधन करणें अत्यंत आवश्यक आहे. या सत्यांत तंटा होण्याचा संभव आहे. पण सत्यार्थ तंटा करणें हेंच देशाच्या प्रेमाचें खरें लक्षण आहे. अशा प्रसंगीं जरी कांहीं शाखा फुटल्या तरी त्या इतिहासामध्यें गुरफटलेल्याच पाहिजेत; इतिहासाला

सोडून असतां उपयोगी नाहींत. निरनिराळ्या मतांचें वैगुण्य इतिहासा-नंदांत असतां उपयोगी नाहीं. कोणी कोणाचा अभिमान न धरतां सत्याला धरून वागणें अत्यंत श्रेयस्कर आहे. पुढील वर्षीं (इ.१९३०) श्रीशिवाजी महाराजांचा ३०० वर्षांचा जन्मदिन—समारंभ झाल्यावर मतभेद नाहींसा होऊन हा वाढदिवस याहिपेक्षां जास्त थाटानें साजरा केला जाईल यांत शंका नाहीं. जें कांहीं ठरेल त्याप्रमाणें वागावें. नाहींतर निदान दोन्हीं सत्य आहेत; अशा समजुतीनें तरी वागावें हेंच उत्तम होय. इतिहास एकच आहे ही भावना सर्वांनीं आपल्या डोळ्यांसमोर ठेवणें अतिशय जरूर आहे. असो. नुकत्याच झालेल्या संमेलनप्रसंगानें मीं अनुमान व तर्क यांसंबंधीं माझ्या भाषणांत ऊहापोह केला आहे. या तर्काला अनुकूल अशा बखरी आहेत. बखरींचा उपयोग समकालीन गोष्टी तर्काला धरण्यासाठीं करतां येण्यासारखा आहे.

पूर्व–पूर्व प्रामाण्य अशा बखरी

आहेत. या बखरींची माहिती मला श्री. शंकरराव जोशी यांनीं दिली आहे. सभासदी बखर सन १६९७, चित्रगुप्ताची बखर १७५९, खं. ४ मधील बखर १७८२, एक्याण्णव कलमीबखर १७८०, महाराष्ट्र साम्राज्याची बखर १८१७, मल्हारराव कृत बखर १८१०, शिवदिग्विजय बखर १८१८, शिवाजी प्रताप १८२९, शेडगांवकर बखर १८५४ ह्या प्रमाणें बखरींचा काळ धरून उपयोग करतां येईल. दोन बखरींत सारखा उल्लेख असेल तर तो घ्यावयाचा, पण जर पहिल्या बखरींत नसलेला उल्लेख दुसऱ्या बखरींत सांपडला तर तो मात्र घेणें जरूर आहे. ज्या ठिकाणीं विरोध असेल त्या ठिकाणीं पहिल्या बखरींतील उल्लेख प्रमाण मानिला पाहिजे. समकालीन लेखांना विरोधी असेल तें बखरींतून बिलकूल घेऊं नये. उदा०—९१ कलमींतील कालोल्लेख समकालीनपत्रांनीं जवळजवळ सर्व त्याज्यच ठरत आहेत. सुरतेची लूट दोनदां झाली हें बखरींना माहीत नाहीं. तसेंच, शहाजीचा मृत्यु व शिव जन्मप्रसंग हे भलत्याच तऱ्हांनीं सजविल्यामुळें त्यांत अनेक चुका व विपर्यस्तता होऊन गेली आहे. बखरींत कांहीं प्रसंग नाहींतच; पण हें वैगुण्य न मानतां जे दिले आहेत त्यांचीच छाननी करतां मी हें सांगत आहें. इतर दृष्टींनीं बखरी फार उपयुक्त आहेत हें सांगणें नकोच. दैवी चमत्कारांना इतिहासलेखकांनीं बिलकुल जागा देऊ नये. त्या गोष्टी अगदींच खोटया असतात, असा माझ्या म्हणण्याचा आशय नव्हे;

पण त्याचा इतिहासकारांनीं शक्य तितका उल्लेख टाळावा हेंच उत्तम. कवि-कल्पनांना आणि कवींच्या भावी कल्पनांना बिलकूल जागा देऊं नये. भविष्य-सूचक विचार इतिहासकारांनीं तर टाळावेच पण अतिशयोक्तीलासुद्धां बिलकुल थारा देऊं नये. जातिविषयक प्रश्न तर अजिबात गाळावेत. स्वतःच्या बडे-जावीचा उल्लेख बिलकूल करूं नये. बखरकार स्वतःच्या जातीचीच जास्त फुशारकी अभिमानानें बखरींत मारीत असतो; तिला इतिहासांत बिलकुल स्थळ देऊं नये. तसेंच ऐतिहासिक व्यक्तींच्या तोंडीं घातलेलीं भाषणेंहि वर्ज्य करणें इष्ट होय. असो. इतिहासकारांनीं या गोष्टी लक्षांत ठेवून इतिहास लिहावा.

सवाईमाधवराव–दरबार–तसबीर– अनावरणसमारंभ

हा समारंभ श. १८५१ श्रावण शु. १३ ता. १-९-२९ रोजीं सायंकाळीं ६॥ वाजतां भा. इ. सं. मं. चे सभागृहांत साजरा झाला. त्याप्रसंगीं पुढीलप्रमाणें मंडळी उपस्थित होती—१ श्रीमंत सरकार बाबासो इचलकरंजीकर व श्रीमंतसरकार आप्पासो सांगलीकर, श्रीमंत युवराज विशालगडकर, श्रीमंत रामदुर्गकर, श्री. तात्यासो दीक्षित जहागिरदार–शेंदुर्णी, श्रीमंत राजे कुर्लेकर भोसले, श्री. हिमतबहाद्दर, श्रीमंत गणपतराव राजे भोसले, श्री. गो. स. सरदेसाई, प्रो. भानू, बॅ. गाडगीळ, प्रि. तावरे, रा. ब. कृ. ग. जोशी, प्रो. पिंपळखरे, श्री. दाजीसो नातू, प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले, श्री. ज. स. करंदीकर, डॉ. गोडबोले, श्री. वि. के. पानशे, श्री. व्ही. पी. गाडगीळ, रा. ब. ग. ना. खरे, श्री, वि. स. पटवर्धन, श्री. स. वि. रानडे, श्री. स. तात्यासो मेहेंदळे, श्री. जुन्नरकर देशपांडे, रा. ब. ग. ना. खरे, रा. सा. वि. अ. पटवर्धन, श्री. त्रिं. व. तालीम, मि. सॉलोमन सॅमसन्, डॉ. गो. स. पळसुले, श्री. चितळे इंजीनिअर, रा. सा. य. न. ठोंबरे–(सांगली), रा. सा. देशपांडे, श्री. राजवाडे, रा. सा. दीक्षित, प्रि. पुंडलीक, श्री. बापूसाहेब विंचुरकर, श्री. बाबासाहेब कामत, रा. पांगळ.

ह्या अनावरणसमारंभाचे वेळीं सुरतेचे शेट हरगोविंददास ईश्वरदास बँक-वाले यांचीं चित्रें मांडिलीं होतीं. ह्या **चित्रांतील विशेष** हा कीं, चित्रांतील रंग त्या त्या रंगाच्या निरनिराळ्या मूळ वस्तूंचे तुकडे वापरून दाखविले होते. ह्या वस्तू म्हणजे सुपारी, शिंपा, रक्तचंदन, शिंगें, नारळाची करवंटी, कथील, लाकूड, हस्तीदंत, इ. इ. तसेंच ऐतिहासिक व इतर चित्रेंहि पुष्कळच होतीं. रा. पारेख

यांनीं नवीनच कला व धंदा शोधून पुढें मांडला आहे. या वरील वस्तूंनीं तयार करविलेल्या अजिंठ्याच्या लेण्यांतील हि कांहीं चित्रांचे नमुने बनवून ते मांडले होते. समारंभाचे प्रारंभीं श्रीमंत बाबासाहेब यांचें पुढीलप्रमाणें भाषण झालें.

श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांचें प्रास्ताविक भाषण.

हिज हायनेस श्रीमंत सांगलीकर, आपण आमचे विनंतीस मान देऊन अनावरण समारंभ करणेचें मान्य केल्याबद्दल प्रारंभीं आपले आभार मानले पाहिजेत. ह्या समारंभावरून पूर्वीं इचलकरंजी येथें झालेल्या एका समारंभाची आठवण होते. एखादा आनंददायक समारंभ श्रीमंत सर आपासाहेब यांचे हस्तें व्हावा अशी इच्छा होती व तें घडून आलें हें योग्यच आहे. आपल्याला इतिहासाचा नाद असून आपला ऐतिहासिक पुस्तकांचा संग्रह मोठा आहे, हें मला माहीत आहे. शिवाय आपल्या घराण्याचा पेशव्यांशीं असलेला राजनिष्ठेचा संबंध पाहतां हा ऐतिहासिक प्रसंग दाखविणाऱ्या तसबिरीचा अनावरणसमारंभ आपले हस्तें व्हावा हें सर्वथैव योग्यच आहे.

पटवर्धन व पेशवे ह्या घराण्यांचा फार निकट संबंध आहे. आपले घराण्यांतील पुरुषोत्तम दाजी हे सवाई माधवराव यांचे शरीरसंरक्षक होते. त्यांनीं तें काम किती उत्कृष्ट रीतीनें केलें हें सर्वश्रुत आहे. तसेंच सवाई माधवरावांना पुत्रसंतती नाहीं म्हणून कांहीं पटवर्धन संस्थानिक त्यांना पितृतर्पणांत गणीत असतात. हें मला माहीत आहे. अप्पासाहेब सांगलीकर यांनीं आपला पेशव्यांशीं असलेला राजनिष्ठेचा संबंध लक्षांत आणून इंग्रजांची नोकरी न पत्करतां मोठ्या उत्पन्नाचा मुलूख गमविला. आपले घराण्यांतील मंडळी, सांगलीकर नाटक मंडळी करीत असलेला ‘ नारायणरावपेशवे यांचा वध ’ हा दुःखपर्यवसायी खेळ पहात नसत. ह्या गोष्टी सामान्य व लहान वाटतील. पण ह्यांत पहाणारास महत्व आढळून येईल.

आपण आपले संस्थानचा लौकिक व दर्जा पुष्कळ वाढविला आहे. इतिहासाची आपणांस अभिरुचि आहे. आपलीं पटवर्धन–संस्थानें म्हणजे पेशवाईचीं चालतीं बोलतीं स्मारकें आहेत.

ह्या तसबिरींत रेखाटलेला प्रसंग एकसमयावच्छेदेंकरून अभिमान व खेद निर्माण करणारा आहे. सूर्याचा अस्त व चंद्राचा उदय ज्या वेळीं होतो त्यावेळेप्रमाणें

संमिश्र सुखदुःखाच्या भावना उत्पन्न करणारी ही वेळ आहे. पेशवाईचा अस्त व इंग्रजशाहीचा उदय सूचित करणारा हा प्रसंग आहे. आपल्या सर्वांना ह्याबद्दल आनंद व खेद वाटणें साहजिक आहे. पण माझी त्या प्रसंगाकडे पहाण्याची दृष्टि वेगळी आहे. कै. रा. माधवरावजी रानडे ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें आमचा व इंग्रजांचा संबंध ईश्वरी संकेतानें घडला आहे. त्यांत परमेश्वराचा चांगला हेतु आहे. जे दोष आमच्या नाशास कारणीभूत झाले व ज्यायोगें आमचा उत्कर्ष केव्हांच होणार नाहीं त्या दोषांचा अस्त व्हावा व ज्या गुणांमुळें इंग्रजांनीं हा हिंदुस्थान काबीज केला त्या गुणांचा आपणांत उदय व्हावा, म्हणून हा संबंध घडला आहे. पाश्चात्यांच्या कर्तबगारीनें व शिस्तीनें पौर्वात्यांवर विजय मिळविला आहे. हे गुण आमच्यांत यावेत हा ईश्वरी संकेत आहे. हा संकेत पुढें घडणारा संबंध सूचित करणारा आहे असें मला वाटतें. इंग्रजांचे नेतृत्वाखालीं आमचा उत्कर्ष होणार आहे असा माझा विश्वास आहे.

हें सुंदर चित्र काढणारे प्रो. **सदाशिवराव पिंपळखरे** हे इचलकरंजीचे राहिवाशी आहेत. लहानपणापासून त्यांना चित्रकलेचा नाद आहे. स्वभाव फारच भिडस्त असल्यामुळें ते मागें राहिले. सध्यांच्या दिवसांत मनुष्य पुढें पुढें करणारा पाहिजे. प्रसिद्ध पुरुषांचीं तैलचित्रें काढून सार्वजनिक संस्थांना देणेचा त्यांचा उपक्रम नांवाजण्यासारखा आहे. त्यांना इटलीला पाठविणेचा विचार होता. ते इटलीला गेले असते, तर फार चांगले झाले असते. परंतु त्यांच्या लाजाळू स्वभावामुळें ती गोष्ट शक्य झाली नाहीं.

चित्रांत साहेबांच्या पायांत बूट आहेत ती चूक आहे. पण हा दोष चित्रकाराचा नाहीं. ही चूक मूळ चित्रांत आहे. कदाचित् हें मूळचित्र दरबार झालेवर मागाहून स्मरणद्वारें तयार केल्यामुळें ही चूक झाली असावी. येथील दाणे आळींत एका घरावर हें चित्र होतें. पण त्यावेळीं तें मला मिळालें नाहीं व पुढें त्याचें काय झालें हेंहि मला ठाऊक नाहीं. त्यांत साहेबांच्या पायांत बूट नव्हते. साहेब दूर अंतरावर हात जोडून उभे असल्याचें मला स्मरतें.

असो, **हिज हायनेस सर आप्पासाहेब** यांनीं हें तैलचित्र अनावृत करावें व रा. पिंपळखरे यांना पारितोषिक द्यावें अशी विनंति करतों.

श्रीमंत बाबासाहेब यांचें भाषण झाल्यावर श्रीमंत सर आप्पासाहेब यांनीं तैलचित्र अनावृत केल्याचें जाहीर केलें; नंतर त्यांचें पुढीलप्रमाणें भाषण झालें.

श्रीमंत सर आप्पासाहेब सांगलीकर यांचें भाषण.

" श्रीमंत बाबासाहेब, भारत इतिहास संशोधक मंडळाचे सभासद व सद्गृहस्थ हो,

श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांनीं भारतेतिहास संशोधक मंडळास महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध चित्रकार श्रीयुत पिंपळखरे यांनीं तयार केलेलें श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांच्या दरबारचें चित्र नजर केलें आहे तें अनावृत करण्याचा आज मला योग आला त्याबद्दल फार आनंद होत आहे.

हा समारंभ पेशव्यांचे राजधानीचें ठिकाण पुणें येथें भारतेतिहास-संशोधक मंडळाच्या इमारतींत या विद्वानांच्या सभेसमोर माझे हस्तें घडत आहे याबद्दल मला फार अभिमान वाटत आहे व हा समारंभ माझे हातून घडवून माझा जो गौरव केला त्याबद्दल मी श्रीमंत बाबासाहेब व या मंडळाचे चालक यांचे मनापासून आभार मानतों.

वस्तुतः या मानास चित्रकलाभिज्ञ अगर इतिहासविषयप्रवीण इसम हाच पात्र होय. सुदैवानें आपल्या महाराष्ट्रांत असे अनेक नामांकित पुरुष आहेत व त्यांपैकीं एखाद्याची या समारंभासाठीं निवडणूक झाली असती तर अधिक उचित झालें असतें. एवढें मात्र खरें आहे कीं, इचलकरंजी आणि सांगली या घराण्यांचा परस्परसंबंध व दोघांचाहि पेशवे घराण्याशीं संबंध फार प्राचीन असून पटवर्धन मंडळींची श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांच्या ठायीं वसत असलेली स्वामिनिष्ठा सुविश्रुत आहे. हे संबंध लक्षांत घेतां आजचा अनावरण समारंभ माझ्या हातानें व्हावा हा श्रीमंत बाबासाहेब यांचा आग्रह, विशेषतः त्यांचें मजवरील प्रेम व माझी त्यांचेविषयीं असलेली पूज्यबुद्धि यामुळें मला मोडवेना.

आज जें चित्र अनावृत झालें आहे त्यांत रंगविलेला प्रसंग महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयाचा आहे. हा प्रसंग श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांनीं इंग्रजांचे वकिलास भेट देण्याकरितां भरविलेला दरबार होय. या चित्रांत मुख्य तीन व्यक्ति आहेत. एक, मराठेशाहीचे धुरीण खुद्द श्रीमंत सवाई माधवराव पेशवे, दुसरे, तिचीं त्यावेळचीं सूत्रें चालविणारे नाना फडणीस, व तिसरे, इंग्रजांकडील पेशवे दरबारांत आलेले पहिले वकील मि. म्यालेट. आपल्या पूर्वजांनीं स्वपराक-

मानें स्थापिलेल्या महाराष्ट्रसत्तेच्या वैभवाची साक्ष म्हणून हें दरबारचें चित्र साहाजिकच महाराष्ट्रीयांच्या स्वाभिमानभावना जागृत करतें. तसेंच ज्या बलाढ्य इंग्रजसत्तेशीं वर्तमानकाळीं आपलें ऐक्य झालेलें आहे त्याचा या दरबारांत मि. म्यालेट यांनीं प्रारंभ केलेला आपणास पहावयास सांपडतो. या दृष्टीनें या चित्रांतील प्रसंग अतिशय ऐतिहासिक महत्त्वाचा म्हटला पाहिजे. ज्या चित्राचें आतां अनावरण केलें जात आहे, त्यासंबंधीं थोडेसें दिग्दर्शन करणें या समयीं अप्रासंगिक होणार नाहीं. श्रीमंत सवाई माधवरावसाहेब व नाना फडणीस यांच्या कारकीर्दीची महाराष्ट्रीयांस अर्थातच पूर्ण माहिती आहे; सबब मि. म्यालेटबद्दलच दोन शब्द येथें या वेळीं सांगतों. मि. म्यालेट यांची पुणें येथें इंग्रजी वकिलाचे जागीं इ. स. १७८५ च्या नोव्हेंबर महिन्यांत नेमणूक झाली. त्यानंतर सुमारें चार वर्षांनीं हें चित्र काढिलेलें आहे. सन १७६१ च्या पानिपतच्या लढाईनंतर आपल्या धैर्यशाली पूर्वजांनीं त्या वेळीं मराठेशाहीस बरेंच सांवरलें होतें. उत्तर हिंदुस्थानांत महादजी शिंदे आणि दक्षिणेंत नाना फडणीस या असामान्य बुद्धिवान् पुरुषांनीं मराठेशाहीचा पुनः वचक बसविला होता. इंग्रजांनीं फ्रेंचांस हिंदुस्थानांतील राजकारणांत कित्येक ठिकाणीं नामोहरम करून आपली सत्ता प्रस्थापित करण्यांत बरीच मजल गांठली होती. नुकताच मराठ्यांशीं सामना होऊन मराठे आणि इंग्रज यांच्यामध्यें सालप्याचा तह झाला होता. एकंदर देशी राजसत्तांपैकीं मराठेशाहींत अद्यापि बराच जोर असल्याचें इंग्रजांच्या निदर्शनास येऊन चुकलें होतें. पुढें फ्रेंच राष्ट्राशीं व्हावयाच्या युद्धासाठीं मराठेशाहीच्या राजधानीचें स्थान पुणें येथें फ्रेंच, टिप्पू, निजाम वगैरेबरोबर जीं कारस्थानें चालत होतीं त्यांवर नजर ठेवण्यास व तीं अनिष्ट असल्यास वेळींच त्यांचा प्रतिकार करण्यास आपला एक वकील कायमचा पुणें येथें असावा असें इंग्रजांस वाटूं लागलें होतें.

इंग्रजांचे वकील मराठेशाहीच्या स्थापनेनंतर श्रीशिवाजी महाराजांच्या वेळेपासून मराठी दरबारांत राजकारणाकरितां वेळोवेळीं येत असत. परंतु ते दरबारांत कायमचे रहात नसून कारणापुरतें त्यांचें येणें जाणें असे. मि. म्यालेट यांचेपूर्वीं याचप्रमाणें तात्पुर्तिक कामासाठीं इंग्रजांनीं वकील पुणें दरबारांतहि पाठविले होते. त्यांच्या वकिलांचा पुणें दरबारीं कायमचा प्रवेश होऊं नये, म्हणून नाना फडणीस यांनीं पुष्कळ दिवस प्रयत्न केला. तथापि महादजी शिंदे यांच्या

पराक्रमानें मराठेशाहीचा उत्तर हिंदुस्थानांत झालेला विस्तार, बंगालमध्यें इंग्रजी स्थापना व दक्षिणेंत फ्रेंच आणि टिपू यांचें कारस्थान यांमुळें भारतांतील राजकारणाची स्थिति पूर्ण पालटली होती. तिला तोंड देण्याकरितां इंग्रजांचें साहाय्य इष्ट वाटल्यावरून शेवटीं इंग्रजांच्या वकिलास पुणें येथें राहण्याची परवानगी देणें भाग पडलें. इंग्रजी राजसत्तेच्या उत्कर्षाचें हें पहिलें चिन्ह होय. मि. म्यालेट यांचा सत्कार करितांना त्यांस पेशव्यांच्यातर्फे हत्ती, घोडा व पालखी देऊन बहुमान करण्यांत आला. हा बहुमान इंग्रजांच्या उत्कर्षाचें दुसरें चिन्ह होय. प्रथमतः त्यांस हत्ती देऊं नये असें ठरलें होतें. परंतु पुणें दरबारांत पूर्वी फ्रेंचांच्या वकिलांस हत्ती दिला होता, व उत्तरेंत मोंगल बादशहा आणि शिंदे यांनीं इंग्रजांच्या वकिलास हत्ती देऊन त्यांचा मान केला होता. पेशवे दरबारीं मात्र त्यांच्या वकिलास पूर्वी केवळ घोडा मिळाल्याचाच दाखला होता. फ्रेंच वकिलापेक्षां आपली प्रतिष्ठा आपल्या राष्ट्राच्या इभ्रतीकरितां कमी होऊं नये म्हणून मि. म्यालेटनें अटोकाट प्रयत्न केला व त्यामुळें बऱ्याच बाटाघाटीनंतर त्यास हत्ती देण्याचें ठरलें. अशा तऱ्हेनें या बहुमानाचेंहि इंग्रज व फ्रेंच यांच्या चुरशींत बरेंच ऐतिहासिक महत्त्व आहे.

मि. म्यालेट यांनीं आपल्या नेमणुकीच्या आरंभीं पेशवे दरबारांत इंग्रजी राष्ट्राची जी इभ्रत ठेविली ती त्यांनीं तशीच पुढें आपल्या राजकारणपटुत्वानें एकसारखी वाढविली. ते पुण्यास इंग्रजी वकील या नात्यानें इ. स. १७८६ ते इ. स. १७९६ पावेतों होते. या अवधींत मराठे आणि इंग्रज यांचें सख्य तर त्यांनीं दृढतर केलेंच, परंतु टिपूवरील मोहिमेसाठीं इंग्रज, मराठे आणि निजाम या तिघांचेंहि सख्य घडवून आणिलें. हें राजकारण फार अवघड व नाजूक होतें. नाना फडणीसांसारख्या राजकारणधुरंधर व अलौकिक बुद्धिमान् माणसाशीं त्यांचा प्रसंग होता; परंतु आपल्या सौजन्यानें, शहाणपणानें आणि कर्तृत्वानें त्यांनीं हें राजकारण सिद्धीस नेलें; व टिपूचा मोड करवून ब्रिटिश राजसत्तेची दक्षिणेंत उभारणी सुगम करून ठेविली. टिपूवरील स्वारींतच इंग्रज आणि पटवर्धन यांचे निकट संबंध येऊन ते ईश्वरी कृपेनें पुढें कायमच्या स्नेहसंबंधांत परिणत झाले असून आजतागायत वृद्धिंगत होत आहेत. टिपूस निर्बल केल्यानें ब्रिटिश राजसत्तेच्या वाढीस पुढें मार्ग सुकर झाला. या यशस्वी कामगिरीबद्दल मि. म्यालेट यांची विलायतेंत फार प्रशंसा होऊन त्यांस बॅरोनेट ही बहुमानाची पदवी मिळाली.

वरील एकाच कामगिरीवरून मि. म्यालेट यांचे मराठीशाहीच्या तत्कालीन मुत्सद्यांवर कसें वजन पडत असे, हें दिसून येणार आहे. त्यांच्या पुण्यांत राहण्याचा परिणाम केवळ राजकीय बाबींवरच झाला नाहीं. महाराष्ट्रांत पाश्चात्य कला व विद्या यांची मराठ्यांस ओळख करून देण्याची व त्यांविषयीं त्यांच्या अंतःकरणांत नवीन अभिरुचि उत्पन्न करण्याची संधि मि. म्यालेट वायां जाऊं देत नसत. विशेषेंकरून त्यांचे वेळीं पाश्चात्य वैद्यकला आणि चित्रकला यांचा पुणें दरबारांत पुष्कळ प्रवेश झाला. खुद्द श्रीमंत सवाई माधवरावसाहेब व नाना फडणीस या उभयतांस चित्रकलेची गोडी लागली. त्यावेळीं घड्याळजीहि तयार झाला. खुद्द श्रीमंतांस दुर्बिणीची बरीच अभिरुचि उत्पन्न होऊन तिच्या मदतीनें त्यांनीं खगोल शास्त्राचें ज्ञान संपादन केलें व मि. म्यालेट यांचेकडोन भूगोल विद्येचेंहि ज्ञान हस्तगत केलें.

मि. म्यालेट यांनीं केलेल्या निरनिराळ्या कामगिऱ्या निःसंशय अत्यंत महत्त्वाच्या झाल्या. पण त्यापेक्षां त्यांचेपासून आपणांस आज देखील जो बोध घेतां येण्याजोगा आहे तो अधिक महत्त्वाचा आहे व या चित्राचें खरें रहस्यहि या बोधांतच आहे असें मला वाटतें. श्रीमंत सवाई माधवराव साहेब यांच्या दरबारचें हें चित्र म्हणजे इंग्रज आणि मराठे यांच्या सहकारितेचें चित्र होय. मि. म्यालेट यांस येथील संगमावर राहण्यास जागा दिलेली होती. त्यावेळीं त्या संगमावर इंग्रज आणि मराठे –किंबहुना पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृति-यांचा संगम घडून आला असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. मानव जातीच्या अभिवृद्धीसाठीं भूतलावरील निरनिराळ्या राष्ट्रांचें सख्य आणि एकीकरण होण्याची किती जरूर आहे याचा विचार केला म्हणजे इंग्लंड आणि भारत यांचा वरील संगम ईश्वरी संकेतानें घडून आला त्याचें महत्त्व सहज लक्षांत येईल. श्रीमंत सवाई माधवराव पेशवे व नाना फडणीस यांचे वेळीं मराठी राज्य स्वतंत्र असून त्यांत कर्तृत्ववान् पुरुष होते व मराठेशाहीचा जोम कायम होता. अशा वेळीं त्यांनीं परकीय इंग्रजांशीं सख्यत्वानें व स्नेहानें वागून त्यांचे गुणांचा आदर करून गुणग्रहण करण्यांत कमतरता केली नाहीं व ते इंग्रजांशीं सहकारित्वानें वागले हें ध्यानांत घेण्यासारखें आहे. आज आपणांस दुर्दैवानें सर्व बाजूंनीं अवनत स्थिति प्राप्त झाली आहे. अशा वेळीं इंग्रजांचें गुणग्रहण करणाऱ्या ह्या वैभवशाली पुरुषांचें अनुकरण करणेंची किती जरूर आहे याबद्दल मला अधिक विस्तार करण्याची आवश्यकता दिसत नाहीं.

पाश्चात्य राष्ट्रांमध्यें इंग्रजी राष्ट्राचा दर्जा फारच उच्च आहे व एकंदर मानवजातीचे अभिवृद्धीकरतां व जगांत सर्वत्र शांतता प्रस्थापित करण्याकरितां पाश्चात्य राष्ट्रांचे League of Nations, Peace Conferences चे द्वारें जे काय प्रयत्न चालले आहेत त्यांत इंग्रजांचा भाग महत्त्वाचा आहे. अशा उच्च दर्जाच्या राष्ट्राशीं आपला संबंध ईश्वरी इच्छेनें आलेला आहे. त्याचा फायदा आपण घेऊन इंग्रजी राष्ट्राशीं खांद्यास खांदा लावून सहकारित्व करून आपणहि मानवी जातीचे आभिवृद्धीकरितां व जगांत सर्वत्र शांतता प्रस्थापित करण्याकरितां एकादिलानें खटपट करणें हाच या चित्रांतील बोध आहे असें मला वाटतें. जगांत पुढें येणें हें पूर्वींसारखें सुकर राहिलेलें नाहीं—तें अत्यंत अवघड झालेलें आहे— हें मला मान्य आहे; परंतु चित्रांतील दरबाराचे वेळीं मि.म्यालेट यांच्याहि मार्गांतील अडचणी लहानसहान नव्हत्या. अगदीं परकीय राष्ट्रांत येऊन तेथील परिस्थिति सहानुभूतीची अगर उत्तेजनकारक नसतां प्रतिकूल आणि असहाय्य परिस्थितींत केवळ चिकाटी, धैर्य, आत्मविश्वास यांच्या जोरावर आपल्या राष्ट्राची प्रतिष्ठा त्यानें महाराष्ट्रांत वाढविली व आपल्या आंगच्या गुणांच्या बळावर ह्या देशांत इंग्रजी सत्तेच्या प्रस्थापनेचा मार्ग सोपा केला व आपल्या राष्ट्राच्या सेवेंत यश संपादन केलें; यावरून कोणतीहि अडचण उदात्त भावनेनें प्रेरित झालेल्या माणसास मागें ठेवूं शकत नाहीं हा सिद्धांत प्रस्थापित होतो. श्रीमंत बाबासाहेब यांनीं या संस्थेस दिलेलें हें चित्र प्रेक्षकांच्या मनांत हा सिद्धांत सतत जागृत ठेवून निरंतर स्फूर्तिदायक होवो अशी जगन्नियंत्याची प्रार्थना करून आपण सर्वांनीं माझे दोन शब्द शांत चित्तानें ऐकून घेतले त्याबद्दल आपले सर्वांचे आभार मानून व श्रीमंत बाबासाहेब व मंडळाचे चालक यांनीं आज जो मला हा सुयोग आणून दिला व माझा गौरव केला त्याबद्दल त्यांचे पुन्हां एकवार मन:पूर्वक आभार मानून मी हें भाषण संपवितों.

यानंतर श्रीमंत बाबासाहेब यांचे विनंतीवरून श्रीमंत आपासाहेब यांनीं प्रो. पिंपळखरे यांस श्रीमंत बाबासाहेब यांनीं दिलेलीं **सोन्याचीं सलकडीं** अर्पण केलीं; आणि मंडळातर्फे चिटणीस यांनीं रा. पिंपळखरे यांस हार घातला. चि. **प्रो. पोतदार** यांनीं अखेरीस सर्वांचे आभार मानले. त्यावेळीं ते म्हणाले,

श्रीमंत आप्पासाहेब व श्रीमंत बाबासाहेब आणि सज्जनहो, आजचा समारंभ अत्यंत अपूर्व आहे. श्रीमंत इचलकरंजीकर यांचा मंडळावर अत्यंत लोभ आहे. कै. वा. शास्त्री खरे यांच्या तसबिरीचा अनावरण समारंभ मंडळांत कर-

ज्यांत आला त्यावेळीं श्रीमंतांनीं आज दिलेल्या चित्राच्या देणगीची कल्पना जाहीर केली. आणि त्याप्रमाणें प्रो. पिंपळखरे यांजकडे तें काम सोंपवून आजचा प्रसंग घडून येत आहे. श्री. आप्पासाहेब ह्यांचीहि जोड या प्रसंगास श्री. बाबासाहेबांच्या कृपेनें झालेली आहे. श्री. आप्पासाहेब हे इतिहासप्रेमी आहेत. यांची कै. रा. ब. पारसनीस ह्यांचे कार्यास केवढी सहानुभूति असे हें सर्वश्रुत आहेच. खुद्द मंडळांतहि त्याचे बाल स्वरूपांत श्रीमंत आप्पासाहेब १।२ वेळां येऊन गेलेले आहेत. नवीन स्थळीं मंडळ आल्यावर तें त्यांचे नजरेस पडावें हा फार हेतू होता. तो आज ह्या रीतीनें सफल होत आहे. मंडळाचें कार्य आणखी एकादे वेळीं स्वस्थपणें श्रीमंत पाहतील आणि मंडळाचे स्थितीचा विचार करून त्यास सहाय्याची किती आवश्यकता आहे व त्यास तें कसें पात्र आहे हें हि मनांत आणतील अशी उमेद् आहे. मंडळास श्रीमंत बाबासाहेब, श्रीमंत आप्पासाहेब प्रभृती मंडळींचें पाठबळ व शुभेच्छा मिळाल्या म्हणजे त्याच्या सर्व चिंता हरण झाल्यासारख्या आहेत. मायेची ममता हा मोठा आधार आहे. आर्थिक दैन्याचा टिकाव या ममतेपुढें कधीं लागावयाचा नाहीं. असो;

मंडळाच्या अनेक उद्देशांपैकीं एक असा आहे कीं, नामांकित इतिहाससंशोधक व नामांकित ऐतिहासिक व्यक्ति यांचीं चित्रें सर्व लोकांचें रंजन करण्याकरितां व स्फूर्ति उत्पन्न करण्याकरितां ह्या मंडळाचे सभागृहांत लटकत ठेवावींत. पुण्यासारख्या विद्यानगरींत एखादी नॅशनल पिक्चर गॅलरी किंवा ' राष्ट्रीय चित्रमंदीर ' असूं नये, हें पुण्यास लांछन आहे. अंशतः हें दूर करण्याचें कार्य आजच्यासारख्या प्रसंगानें साधणार आहे. रानडे, राजवाडे, खरे, पटवर्धन यांचीं चित्रें येथें आहेत. कीर्तने यांचें चित्र आलें आहे; आणि श्रीमंतांची कृपा असल्यावर साने, पारसनीस, ग्रँट डफ् वगैरे सारख्यांचीं चित्रेंहि लवकर येथेंच लटकवलेलीं दिसतील, अशी उमेद् आहे. मंडळाचा जन्मगुणच असा आहे कीं, त्यास या नाहीं त्या प्रकारानें मदत करावी अशी स्फूर्ति सर्वांस होते. मंडळाचे प्रयत्न अल्पसेच आहेत. आज रा. सुरतवाले ह्यांनीं हीं चित्रें मांडून शोभा आणिली आहे. हा ह्याच सहानुभूतीचा परिणाम होय. आजचें चित्र फार अलौकिक आहे. मूळ चित्र वुइलयम् डॅनियल व जेम्स वेलस् ह्यांचे हातून तयार झालें आहे. आणि तें बहुधा विलायतेस झालें. केव्हां तरी तें मूळ शोधून काढिलें पाहिजे. यांच्या फोटोवरून हा आकार—विस्तार प्रो. पिंपळखरे यांनीं मोठ्या कौशल्यानें केला आहे. चित्रांत दाखविलेला प्रसंग कधीं घडला असावा हें सांगतां येणें कठिण आहे. परंतु श्रावणांत

गोकुळ अष्टमीचा उत्सव झाल्यावर भाद्रपदांत गणेश महालांत हा दरबार भरला असावा आणि टिपूवरील मोहिमेचा तहनामा या वेळीं दरबारांत पेश झाला असावा असा तर्क वाहतो. ह्याबद्दल पारसनीस यांचे पुस्तकांत मोठी मनोरंजक माहिती एकत्र दिली आहे. श्री. आप्पासाहेब यांनीं सांगितल्याप्रमाणें मॅलेट साहेब हा पेशवे दरबारांत बरेंच वजन राखून होता. सांगितलें तर आश्चर्य वाटेल कीं, मॅलेट याजबद्दल ‘ मऱ्हाष्ट्र भाषा साफ बोलतात ’ असे त्या वेळचे उल्लेख आहेत. पेशवे दरबारांत व्यापारी उन्नतीकडे लक्ष्य देणारा पुरुष कोणी नाहीं, इत्यादि प्रकारें मार्मिक टीका मॅलेट यांनीं आपल्या पत्रांतून केलेली नुक्तीच प्रसिद्ध झाली आहे. हें चित्र पाहून मॅलेट, क्रूसो, नुरुद्दीन हुसेन इत्यादि चित्रें लवकर चटकन ओळखूं येतात आणि नाना फडणीस,सवाईमाधवराव, हरीपंत फडके कदाचित् परशरामभाऊ इत्यादि मंडळीहि दिसून येतात. मानाजी फाकडे या एकांडे शीलेदाराच्या बैठकीचें वर्णन इंग्रज लेखकानीं फार बहारदार केलें आहे. तो चेहरा यांत कोठें दिसत नाहीं.असो.तत्कालीन बरेच प्रख्यात पुरुष या चित्रांत एकसमयावच्छेदेंकरून नजरेस येतात. याच्यामुळें हें चित्र म्हणजे त्या कालांतील प्रतिमाच होय असें मानावयास चिंता नाहीं. असा याचा विचार फार मोठा आहे. चित्रांत दाखविलेले बूट बरोबर आहेत, असें मला वाटतें. कारण मखमलीचे देशी बूट पायांत घालून युरोपीयन मंडळी आंत जाऊन कशी बसली त्याचें वर्णन तत्कालीन ग्रंथांत आहे. आमच्या या अनावरण सनारंभाचे प्रसंगीं आपासाहेब यांनीं मंडळाचे निमंत्रणास मान दिला याबद्दल श्रीमंताचे पुनः आभार मानतो आणि आशा करतो कीं श्रीमंतांचा हा संबंध उत्तरोत्तर दृढ होत जाईल. श्रीमंत बाबासाहेब यांचे योग्य आभार मानणें माझ्या शक्तीबाहेर आहे. प्रो. पिंपळखरे यांनीं पुष्कळ तसबिरा देऊन मंडळास मदत केली आहे. त्यांस कारभारी मंडळानें वर्ग १ चे तहाहयात सन्मान्य सभासद म्हणून करण्याचें व या रीतीनें गुणगौरव करण्याचें ठरविलें आहे. हें जाहीर करावयास मला फार आनंद वाटतो. आजच्या प्रसंगीं श्रीमंत रामदुर्गकर, श्रीमंत हिमतबहादर, श्रीमंत राजे भोसले, श्री. दिक्षीत कायगांवकर, श्री. विंचुरकर, श्रीमंत विशाळगडकर इत्यादि मंडळी येथें पाहून हाहि एक दरबारच भरला आहे, अशी शोभा आली आहे, असें कोणासहि वाटेल. समारंभास अशा प्रकारें शोभा आणल्याबद्दल आज सर्वांचे पुनः एकवार मनापासून आभार मानतों.

यानंतर पानसुपारी होऊन हा गोड समारंभ समाप्त झाला.

निवेदन.

—⬩○⬩—

अंक दुसरा आज वाचकांचे हातीं जात आहे. ह्याबद्दल संतोष वाटतो. दिवसेंदिवस मं० चें काम वाढत आहे. व मंडळाच्या गरजांना हल्लीं छोटें त्रैमासिक अपुरें पडत आहे. नव्या वर्षापासून कांहीं नव्या योजना करण्याचा विचार आहे. अभिप्राय, प्रचार इत्यादि सदरें जोडण्याचा हेतु अद्यापहि सफल झाला नाहीं. असो. ह्या अंकांत रा. खरे यांनीं सोनवडे येथील वाचलेला ताम्रपट आम्हांस हैद्राबादचे सुप्रसिद्ध पुढारी श्री. **वामनराव नाईक सो** यांचे कृपेनें मिळाला. ह्याबद्दल नाईक सोंचे आम्ही फार फार आभारी आहों. कळविण्यास आनंद वाटतो कीं, श्री.नाईक सो मं. चे **तहाहयात हितकर्ते** झाले असून त्यांनीं रु. १०५० मंडळाकडे पावतेहि केले आहेत.— चिटणीस.

छत्रपती शिवाजी महाराजांचा त्रिशतसांवत्सरिक जन्म–दिन–महोत्सव

त्रिशतसांवत्सरिकशिवस्मारकग्रंथावलीपैकीं 'Foreign Biographies of Shiwaji' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. ' शिवकालीन–पत्र–सार–संग्रह' या ग्रंथाचीं ५०० पृष्ठें छापून झालीं. शिवाजी– निबंधावली (कालविषयक) या ग्रंथाचीं सुमारें १५० पृष्ठें छापून झालीं असून चरित्र–विषयक निबंधांच्या छपाईला सुरवात झाली आहे. शिवचरित्र साहित्याचा खंड ३ रा. चित्रशाळेंत छापूं लागला आहे. छापून झालेल्या १०० पृष्ठांगणिक १ रुपया यापेक्षां किंमत अधिक पडणार नाहीं. ३१ जानेवारी १९३० चे आंत नांवें नोंदविणारांस शेंकडा १६ टक्के सवलत मिळेल. अंदाजी किंमतीच्या निम्में म्हणजे ग्रंथापाठीमागें दोन रुपये पाठविणारासच आगाऊ ग्राहक म्हणून नांव नोंदवितां येईल.

—चि.शि.कार्यालय.

श्री.

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें.



कारभारी मंडळ, शके १८५१–५४.

अध्यक्ष.

१. श्री. चिं. वि. वैद्य, एम्. ए., एल्‌ एल्. बी.

उपाध्यक्ष.

२. श्री. सरदार खं. चिं. मेहेंदळे, बी. ए.

३. श्री. न. चिं. केळकर, बी. ए., एल्‌एल्. बी., एम्. एल्. ए.

चिटणीस.

४. प्रो. द. वा. पोतदार, बी. ए.

५. श्री. स. गं. ना. मुजुमदार, एम्. एल्. सी.

खजिनदार.

६. श्री. अ. वि. पटवर्धन, बी. ए.

सभासद.

७. रा. सा. ना. गो. चापेकर, बी. ए. एल्‌एल्. बी. (बदलापूर).

८. श्री द. वि. आपटे, बी. ए.

९. श्री. स. म. दिवेकर, (कल्याण)

१०. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, चीफ् ऑफ् इचलकरंजी (इचलकरंजी).

११. ना. केशवराव कोरटकर, (हैदराबाद).

१२. श्री. सरदार चंद्रोजीराव संभाजीराव आंग्रे, (ग्वाल्हेर).

१३. श्री. स. रा. बखले, बी. ए. एल्‌एल्. बी. (मुंबई).

हिशेबतपासनीस– श्री ग. स. मराठे, एम्. ए., ॲक्चुअरी.

श्री

सा. न. वि. वि.

भारत इतिहास संशोधक मंडळ संस्थेचें नांव आपणांस ठाऊक असेलच. आज सोबत संस्थेविषयीं माहिती देणारीं छापलि पत्रकें पाठविलीं आहेत. तीं आपण सवडीनें अगत्य वाचावीं म्हणजे या **संस्थेस साहाय्य** करणें किती अवश्य आहे हें ध्यानीं येईल. स्वदेशाचा इतिहास व स्वदेशाचें साहित्य यांचें संपूर्णतया ज्ञान मिळविणें व फैलावणें सर्व देशाभिमान्यांचें आद्य कर्तव्य आहे. तें पार पाडण्यास मदत केल्यानेंच ' पितृऋणाचें ' जें थोर ओझें आपले शिरावर आहे तें थोडेंफार हलकें केल्याचें श्रेय लाभणार आहे. तेव्हां मंडळास आपण

(१) जुने कागद, पोथ्या वगैरे पाठवून

(२) जुनीं चित्रें, जुनीं नाणीं, जुन्या मूर्ती, नजर करून

(३) मंडळास दरसाल रु. ३००।१२५।२५।१२।६ किंवा ३ देऊन आश्रयदाता, हितकर्ता, सभासद वर्ग १।२।३।४ यांपैकीं ऐपतीप्रमाणें एकाद्या वर्गांत नांव दाखल करून अगर एकदम रु. ३०००। १२५०।२५०।१२०।६० किंवा ३० देऊन **कायम तहाहयात** सभासद होऊन (प्रवेश अर्जाचा नमुना पुढें आहे.)

(४) मंडळाचे मंद्रिरनिधीस देणगी देऊन अथवा हलक्या व्याजानें कर्ज देऊन

(५) मंडळाचें सर्व अगर कांहीं ग्रंथ विकत घेऊन किंवा खपवून

(६) मंडळासाठीं नवीन सभासद व सहाय्यकर्ते मिळवून अगर शक्य त्या अन्य तऱ्हेनें मदत करून

ऋणी करावें ही प्रार्थना आहे व ती भरंवसा धरून केली असल्यामुळें निष्फळ होणार नाहीं अशी आशा आहे. कळावें, बहुत काय लिहिणें ! लोभ करावा ही विनंती.

आपले,

दत्तो वामन पोतदार

गंगाधरराव नारायणराव मुजुमदार

चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

पुणें पेठ भांबुर्डा घ. नं. ९१६।२ येथें आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व दत्तो वामन पोतदार व गंगाधरराव नारायणराव मुजुमदार यांनीं ३१४ सदाशिव पेठ पुणें येथें प्रसिद्ध केलें.

Original from

तहाहयात सभासद. (पूर्ण भरणा.)

आश्रयदातेः– (६०५) श्री. बाळासाहेब पंडित पंत प्रतिनिधी, चीफ् ऑफ् औंध. (६२७) श्री. बाबासाहेब पंतसचीव, चीफ् ऑफ् भोर.

हितकर्तेः– (४९) श्री. सरदार गोविंद बळवंत पटवर्धन शास्त्री. (२७०) श्री. वामन रामचंद्र नाईक, जहागिरदार (भरणा १०५० रु.). (६०४) श्री. मालोजीराव ऊर्फ नानासाहेब नाईक निंबाळकर, चीफ् ऑफ् फलटण.

वर्ग १ः– (७०) रा. स. म. दिवेकर. (८७) रा. द. वि. आपटे. (१६०) डॉ. श्री. व्यं. केतकर. (३६२) श्री. पा. ज. देसाई. (३७७) श्री. गं. य. दीक्षित. (४१६) श्री. ह. के. गोखले. (४२७) श्री. त्र्यं. ना. पंडीत. (६१०) रा. ब. वा. ग. राळे. (७६१) डॉ. जस्टिन इ. ॲबट् (अमेरिका.) (१२३५) मास्टर मनहर बरवे. (१२६८) श्री. शं. बा. ढवळे. (१२७१) डॉ. प. म. केतकर (१३२५) श्री. सरदार भय्यासाहेब विंचूरकर. (१३२६) श्री. रा. र. देशमुख, रावेरकर. (१३३०) श्री. वि. पां. करमरकर. (१३६१) श्री. सरदार चंद्रोजीराव संभाजीराव आंग्रे. (१३७२) श्री. गं. ब. तळवलकर. (१३७९) प्रि. ज. र. घारपुरे. (१४१६) श्री. गो. वि. रानडे. (१४४१) श्री. मो. ना. परांजपे.

वर्ग २ः– (४) प्रो. चिं. गं. भानू. (२३) रा. रा. द. पराडकर. (६३) रा. सा. ना. गो. चापेकर. (६९) रा. ह. वि. तुळपुळे. (७७) प्रो. श्री व्यं. पुणतांबेकर. (८०) रा. वि. का. भागवत. (८८) प्रो. पां. वा. काणे. (११७) प्रो वा. गो. काळे. (१४२) रा. पां. के. शिराळकर. (१६१) रा. रा. ज. गोखले. (१६५) रा. शं. ना. जोशी, वाईकर. (२२६) डॉ. वा. गो. परांजपे. (२८२) श्री. मा. ह. घोरपडे. (२८७) रा. सा. वि. अ. पटवर्धन. (३४३) रा. द. वा. परचुरे. (३५४) श्री. वि. वि. रानडे. (३६३) रा. धों. रु. साठे. (४११) रा. गो. स. सरदेसाई. (४३५) रा. सा. वि. त्र्यं आगाशे. (४७९) श्री. सरदार नानासाहेब चंद्रचूड. (५०१) रा. ग. वा. मावळणकर. (५५९) रा. शं. सा. परशा. (५६३) रा. गो. अ. मोडक. (५८८) रा. म. रा. रानडे. (५९०) रा. स. ग. फडके. (६१३) रा. रु. वा. पुरंदरे. (६७१) रा. वि. अ. देशपांडे, तेरदळकर. (६७८) रा. र. चिं. सोहोनी. (६९०) न्या. म. वि. भिडे. (६९१) श्री. य. मा. काळे. (८३२) श्री. न. भ. देशपांडे. (८६६) रा. गो. अ. लेले. (८८९) रा. दि. वि. काळे. (८९४) रा. ल. र. गोखले. (९१७) प्रो. स. वि. आपटे. (९२२) प्रो. रा. पु. पटवर्धन. (९४३) रा. सा. गं. के. देशपांडे. (१००८) रा. रा. ह. गोखले. (१०२३) रा. सि. ह. कुलकर्णी. (१०५४) रा. चिं. वि. जोगळेकर. (१०८५) न्या. गो. दि. माडगांवकर (१०८९) रा. वा. बा. वझे. (११२०) रा. शं. य. तेली. (११२१) रा. रा. प. शिंदे. (११६६) रा. का. वि. खानविलकर. (१२०३) रा. हिं. बा. पारेख (१२०४) रा. बी. डी. पाटील. (१२५४) रा. वा. शि. तोरो. (१२७४) रा. द. ल. परांजपे. (१२७६) रा. नं. के. गोखले. (१२७९) रा. ब. वि. रु. मुल्ये. (१२८०). रा. सा. आ. रु. नूलकर. (१२८३) रा. बा. ना. शालिग्राम. (१२९१) रा. बा. सि. कामत. (१२९८) प्रि. ध. रा. गाडगीळ. (१३२०) श्री. स. वि. रानडे. (१४०३) रा. ब. शं. दावके. (१४२६) रा. वि. ह. डोंगरे. (१४२७) रा. म. वि. डोंगरे.

नो. क.———— श्री. मि————
———— ता.————

रा० रा० चिटणीस भा० इ० सं० मंडळ यांसीः—

वि० वि० आपल्या मंडळाचे उद्देश + व नियम वगैरे मीं वाचले असून ते मला मान्य आहेत. वार्षिक/एकदम रुपये वर्गणी देऊन मंडळाचा *वर्ग————चा वार्षिक/तहाहयात सभासद शके १८————पासून होण्याची माझी इच्छा आहे. कळावें, हे विनंति. (सही)————————

माझा कायम पत्ताः—मु० पो० जि०

————————————

नांव व हुद्दा संपूर्ण————————————

————————————

रा. रा.————————————यांनीं

विनंति केल्याप्रमाणें त्यांस वर्ग चे वार्षिक/तहाहयत सभासद करावें अशी माझी सूचना आहे. मिति————

मु.———— (सही सूचक सभासदाची)————

वरील सूचनेस माझें अनमोदन आहे. मिति————

मु०———— (सही अनुमोदक सभासदाची)————

रा० रा०————————————यांची

... .सभासद म्हणून रीतसर निवड————वेळीं होऊन त्यांस तसें जा. क.........नें कळविलें असे. मिति————

(सही चिटणीसांची)————————

* येथे वार्षिक ३०।१२५।२५।१२।६ आणि ३ किंवा एकदम ३००० १२५०।२५०।१२०।६०।३० रुपये देणाऱ्या आ., हित., वर्ग १।२।३।४ या वार्षिक किंवा तहाहयात वर्गांपैकीं ज्या वर्गांत नांव दाखल करावयाचें त्याचा निर्देश करणें.

१ पत्ता बदलेल तेव्हां तेव्हां सभासदांनीं जरूर मंडळाचे कचेरींत कळवावें.

+ सोबत उद्देश आणि निवडक नियम दिले आहेत ते पहा.

Google Original from

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें.

[पुणें–सदाशिव पेठ ३१४, जुन्या मुरलीधराचे मागें, शिवाजीमंदिरापलीकडे]

[स्थापना शके १८३२]

सन १८६० च्या २१ व्या नं० सोसायटीज् रेजिस्ट्रेशन ॲक्टान्वयें नोंदलेलें.

स्थापनाः—सुमारें चाळीस वर्षे महाराष्ट्रांत स्वेतिहाससंशोधनाची खटपट पुष्कळ एतद्देशीय विद्वानांनीं आपापल्यापरी केलेली आहे. त्यांची कामगिरी बिन-मोल झाली याविषयीं वाद नाहीं. परंतु बारीक विचार केला तर झालेलें काम राई-एवढें तर व्हावयाचें काम डोंगराएवढें, असें म्हणण्यांत खचित अतिशयोक्ती नाहीं. अर्थात् एकेकटा सुटा संशोधक म्हणजे समुद्र आटवूं पाहणाऱ्या टिटवीप्रमाणें भासूं लागतो. यास्तव 'संघे शक्तिः कलौ युगे' हा न्याय अनुसरून सर्व इतिहासप्रेमी व इतिहाससंशोधक मंडळींची एक संस्थाच स्थापावी असा विचार होऊन **शके १८३२ सालीं आषाढ शु. १ स 'भारत-इतिहास-संशोधक-मंडळ'** या नांवाची संस्था स्थापन झाली. प्रसिद्ध पंडित **कै. रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी, बी. ए. व कै. रा. ब. काशिनाथ नारायण साने बी. ए.** हे या मंडळाचे अनुक्रमें पहिले व दुसरे अध्यक्ष होते. त्यानंतर **श्री. चिंतामण विनायक वैद्य, एम्. ए., एल-एल. बी.**, यांची शके १८५१ सालीं अध्यक्षस्थानीं योजना झाली.

उद्देशः—कांहीं वर्षे काम केल्यावर संस्था शके १८३८ सालीं (ता ९।१०।१६) सो. रे. आक्टाप्रमाणें नोंदण्यांत आली. त्यावेळीं संस्थेचे उद्देश येणेंप्रमाणें ठरविलेः—

(श्री) भारतवर्षासंबंधीं ऐतिहासिक साधनें म्हणजे कागदपत्र, दस्तऐवज, बखरी, कैफियती, शिलालेख, जुने हस्तलेख, सर्व प्रकारचे सारस्वत ग्रंथ, कलाकुसरीचीं कामें, नाणीं, ताम्रपत्रें, मूर्ती, शिल्पकृत्यें, चित्रें आणि इतर हरतऱ्हेच्या ऐतिहासिक महत्वाच्या वस्तू जमा करणें व संरक्षिणें.

(ग) असलीं सर्व साधनें संरक्षिण्याकरितां व प्रदर्शिण्याकरितां योग्य इमारती उभारणें.

(णे) अशीं साधनें प्रसिद्ध करणें, त्याचप्रमाणें ऐतिहासिक संशोधनाचें कार्य जोरावण्याजोगे इतर ग्रंथ प्रसिद्ध करणें व भारतवर्षासंबंधीं ऐतिहासिक ग्रंथ व लेख प्रसिद्ध करणें.

(श) हिंदुस्थानच्या इतिहासासंबंधीं संशोधन व त्याचा चिकित्सापूर्वक अभ्यास जेणेंकरून बळावेल व उत्तेजित होईल असे मंडळाला जरूर अगर योग्य वाटतील ते अन्य उपाय योजणें.

भा. इ. सं. मं. चे निवडक नियम व पोटनियम.

(१) प्रतिवर्षीं ३०० रु. अगर अधिक वर्गणी मंडळास देणारा आश्रयदाता सभासद होय. (२) सालीना १२५ रु.अगर अधिक वर्गणी मंडळास देणारा हितकर्ता सभासद होय. (३) सालीना २५ रु. देणारास सभासद वर्ग १ म्हणावें. (४) सालीना १२ रु. देणारास सभासद वर्ग २ म्हणावें. (५) सालीना ६ रु. देणारास सभासद वर्ग ३ म्हणावें. (६) सालीना ३ रु. देणारास सभासद वर्ग ४ म्हणावें.

कोणत्याहि दराच्या **दसपट** वर्गणी एका व चालू वर्षांत देणाऱ्यांस त्या वर्गाचे **तहाहयात** सभासद समजण्यांत येईल. म्हणजे रु. ३००० दिल्यास आश्रयदाता, १२५० दिल्यास हितकर्ता व अनुक्रमें रु. २५०।१२०।६० व ३० दिल्यास वर्ग १।२।३।४ चे तहाहयात सभासद होतां येईल. रक्कम हप्त्यानें दिल्यास **भरणा पूर्ण होईल त्या सालापासूनच** तहा. सभासद केलें जाईल.

(२) मंडळाच्या उद्देशांस लेखी मान्यता देऊन व मंडळाच्या कोणा कायम सभासदांकडुन सूचना व अनुमोदन मिळून ती सूचना रीतसर मंजूर झाल्यावर कोणासही मंडळाचा सभासद होतां येतें.

(३) कारभारी मंडळाचे ठरावानुरूप मंडळाच्या त्रैमासिकाची एक प्रत प्रत्येक बेबाक सभासदास **मोफत** मिळेल. रु. १२ किंवा त्याहून अधिक वर्गणी दरसाल देणाऱ्या सभासदास खास मंडळातर्फे प्रसिद्ध झालेले स्वीय-ग्रंथ-मालेंतील त्या त्या सालच्या वांट्याचे पुस्तकाची १ प्रत **फुकट** मिळेल. दरसाल ६ रु.व ३ रु. वर्गणी देणारे मंडळाचे सभासदास मोफत मिळणारे ग्रंथाखेरीज **त्या सालच्या वांट्याचे** खास मंडळातर्फे प्रसिद्ध होणारे इतर स्वीय ग्रंथ (एक प्रत) अनुक्रमें निम्या व पाऊणपट किंमतीस मिळतील. सभासदांना वरील नियमांप्रमाणें मिळावयाचे स्वीय ग्रंथ, ते ज्या सालीं सभासद मंजूर झाले असतील **त्या सालापासूनच मिळावयाचे**. कोणत्या सालच्या सभासदांना कोणता स्वीय-ग्रंथ द्यावयाचा तें कारभारी मंडळ ठरवील.

(४) मंडळाचें वर्ष संपण्यापूर्वी सर्व वर्गण्या रीतसर दिल्या पाहिजेत. मंडळाचें वर्ष चैत्र शु. १ प्रतिपदेस सुरू होऊन फाल्गुन अमावास्येस संपतें. ज्यांच्या वर्गण्या बाकी आहेत अशा सभासदांस मत देण्याचा किंवा मंडळाचीं पुस्तकेंहि मोफत अगर सवलतीनें मागण्याचा किंवा इतर सभासदत्वाचे कोणतेहि हक्क राहणार नाहींत.

(५) कारभारीमंडळाचे परवानगीवांचून मंडळाचें सामान, संग्रह वगैरे कचेरींतून बाहेर नेतां यावयाचें नाहीं.

(६) मंडळाची सर्व व्यवस्था मतदार सभासदांनीं प्रतिवर्षी वार्षिक सभेंत निवडून दिलेल्या कारभारी मंडळाचे हुकमतीखालीं चिटणीस पहातात. एक अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष, दोन चिटणीस, एक खजिनदार व सात साधारण सभासद मिळून **तेरा** गृहस्थांचें **कारभारी मंडळ** असतें. कारभारी मंडळांत सभासद वर्ग ३।४ यांपैकीं कोणी निवडतां येत नाहींत. **सभासद वर्ग ४ सोडून बाकीच्या सभासदांसच फक्त** काय तो मंडळाच्या वार्षिक अगर साधारण सभेंत **मत** देण्याचा **अधिकार** आहे. मात्र त्यांजकडे वर्गणी बाकी नसावी.

बारावें संमेलनानंतर मान्य झालेली पुस्तीः—वर्ग ३ च्या सभासदांस कारभारी मंडळाचे जे सात साधारण सभासद (आ. हि. व. वर्ग १।२ पैकीं) निवडावयाचे त्यांतील एक सभासद निवडण्यांत मत देण्याचा हक्क आहे.

टीपः—दोन वर्षांवर वर्गणीची बाकी ज्या सभासदांकडे निघेल त्यांचीं नांवें मंडळांतून कमी करण्याचा अखत्यार कारभारी मंडळास आहे.

Google Original from

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-पुरस्कृत-ग्रंथमाला

वि. सू. :–ह्या मालेंतील ग्रंथ मोबदल्यांत मिळत नाहींत. परंतु सभासदांस विशेष सवलतीनें मिळतील.

क्रमांक

(१) मठगांवचा शिलालेख आणि ब्राह्मण सामंत राजवंश(पृ. २४३) लेखक-रा. ब. वा. अ. बांबर्डेकर. किं रु. २, सभासदांस रु.१-१४

(२) पर्णालपर्वतग्रहणाख्यनम् (मूळ व भाषांतर) पन्हाळ्यावरील शिवाजीची स्वारी. प्रकाशक –स. म. दिवेकर (पृ. ५०) किं.०१० सभासदांस ०८

(३) श्री शिवभारत (कवींद्र परमानन्द कृत) मूळ व मराठी भाषांतर (सं.व. प्र. स. म. दिवेकर.) पृ. ५८९ किं. रु. ६, सभासदांस रु. ५ ०१२

(४) शिवचरीत्र–प्रदीप (सं. द. वि. आपटे. व स. म. दिवेकर) कागदी व कापडी. पृ. ३३५ किं. रु. ३॥ व ४, सभासदांस रु. ३। व ३॥

(५) हिंदी शिल्पशास्त्र भाग १ ला (ले. कै. रा. सा. कृ. वि. वझे) पृ. २००, किं. रु. ३, सभासदांस रु.२

(६) शिवकालीन जंत्री (शके १५५१–१६४९) पृ. २०० किं. रु. ५

(७) साधन–चिकित्सा (ले. वा.सि. बेन्द्रे.) पृ.३२० किं. रु. ३॥ सभासदांस ३ रु.

(८) ऐतिहासिक पोवाडे (सं.य.न. केळकर.)पृ. ६१५ किं.रु.३, सभासदांस रु. २॥

(९) वाठारकर निंबाळकर–इतिहास (पृ.३००) किं. रु.१॥ सभासदांस १०३ ०३.

(१०) भूतेश–आख्यान (पृ. ७५) किंमत ०१२ सभासदांस ०१०

(११) कऱ्हाड (ले. य. रा. गुप्ते. बी. ए.) द्वि. आ. पृ. ५४ किं. ०८

(१२) ऐतिहासिक प्रस्तावना (कै. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे) पृ. ६०० किं. रु. ३, सभासदांस २ ०६ ०६

(१३ ते १६) तयार नाहींत.

(१७) पुरंदरे–दफ्तर, भाग २ रा. (उत्तर पेशवाईतील पत्रव्यवहार) किं.३ रु.सभासदांस २॥ रु.

(१८) " The Deliverance or the Escape of Shivaji the Great from Agra" by R. S. G. K. Deshpande किं. रु . ३ सभासदांस २॥ रु.

(१९) लोक–कथा, पुस्तक १ लें (सं. शं. ग. दाते) किं. रु. १ कागदी व १॥ रु. कापडी. सभासदांस १४ आणे व १। रु.

(२०) पानसे घराण्याचा इतिहास (राव. ब. पानसेकृत) किंमत ३ रु. सभासदांस रु. २॥

(२१) कै. वासुदेवशास्त्री खरे– चरित्र (रा. दा. मो. भट) किं. रु. २॥ सवलत २।०

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ–स्वीय–ग्रंथमाला.

* अशी खूण केलेले ग्रंथ मुंबई सरकारनें प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयांसाठीं मंजूर केले आहेत.

मालांक	किंमत रु.
१ अहवाल (शके १८३२)	३
२ " (शके १८३३)	५
+३ सुबंतविचार(रा.वि.का.राजवाडे)	१०
४ वार्षिक इतिवृत्त (शके १८३४)	५
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (रा. राजवाडे)	१८
*६ प्रथमसंमेलनवृत्त(शके १८३५)	॰१२
*७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३५)	६
*८ द्वितीयसंमेलनवृत्त(शके १८३६)	३
*९ वार्षिक इतिवृत्त (शके १८३६)	३
*१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खं. २० (शिवकालीन घराणीं)	३
*११ वार्षिक इतिवृत्त (शके १८३७)	६
*१२ तृतीयसंमेलनवृत्त(शके १८३७)	३
*१३ मुकुंद-महाभाष्य (संस्कृत)	॰८
* १४ ग्रंथराज (दासोपंत) "	॰८
* १५ स्फुट प्रकरणें भाग १ ला	॰१२
* १६ स्फुट प्रकरणें भाग २ रा	॰१२
भा. इ. सं॰ मं. त्रैमासिकः-१८४२। १८४३।४४।४५।४६।४७।४८।४९ ५०।५१ प्रत्येकीं रु. ३	
* १७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३८)	३
१८ चतुर्थसंमेलनवृत्त(शके १८३८)	४
* १९ राजवाडे-खंड-स्थलसूची(१८३९)	४
* २० पंचमसंमेलनवृत्त (शके १८३९)	३
२१ संशोधनसंग्रह (१८३९)	छा. आहे.
२२ चंद्रचूड-दफ्तर-कला १	३
२३ महाराष्ट्रसारस्वत (संपलें)	
२४ षष्ठसंमेलनवृत्त (१८४०)	४
२५ सप्तमसंमेलनवृत्त (१८४१)	३
२६ संशोधकाची छोटी जंत्री (रा. द. वि. आपटे)	॰४
२७ प्रदर्शनपरिचय	॰४
*२८ फारशी पत्रव्यवहार मूळ व भाषांतर (कंपनी व पेशवे)	५
२९ फार्शी-मराठी-कोश	४
३० शिवचरित्रसाहित्य खंड १ ला	१८
३१ Historical Miscellany.	१
३२ पुरंदरे-दप्तर-भाग १ कृ.वा.पुरंदरे (छत्रपती राजाराम ते पानिपतअखेर.)	४
३३ शिवचरित्रसाहित्य खं. २रा	छा.आहे.

इतर पुस्तकेंः– वासुदेवशास्त्री खरे–कृतः– (१) अधिकारयोग किं. ॰१०; ऐति. ले. संग्रह खंड ५ ते ११ किं. ३ ते ४. **राजवाडेकृतः–** ' मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ' खंड १, ५, ७, १०, ११, १३ व १४, १५ किं. अनुक्रमें रु. + १०, + १०,३, २॥, + १, २, ५ **काव्येतिहाससंग्रह–मुक्तेश्वर–वनपर्व** ४, वामनपंडित– स्फुट प्र. ३, अनेककविकृत स्फु. प्र. भाग १ व २ किं. रु. ३, समर्थकृत रामायणें व इतर प्रकरणें रु. २ व **भारतवर्षः**–वर्ष १, अंक १ १ ४–१२ किं. प्र. ॰१२. **चित्रें:–** थोरले बाजीराव नऊरंगी किं. ॰८; पिलाजी जाधवराव व श्री. शिवाजी महाराजांचा होन ॰॥.

टीपः—ट.हं. व बंगी व्ही. पी. वगैरे खर्च निराळा पडेल. घाउक घेणारांस चांगलें कमिशन देऊं. माहितीपत्रक मागवा. + दुर्मिळ सबब वाढविलेल्या किंमती.

Google Original from

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ–पुरस्कृत–ग्रंथमाला

वि.सूः-ह्या मालेंतील ग्रंथ **सभासदांस विशेष सवलतीनें** मिळतील.

क्रमांक

(१) मठगांवचा शिलालेख आणि ब्राह्मण सामंत राजवंश (पृ. २४३) लेखक– रा. ब. वा. अ. बांबर्डेकर, किं. रु. २

(२) पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् (मूळ व भाषांतर) पन्हाळ्यावरील शिवाजीची स्वारी. प्रकाशक–स. म. दिवेकर(पृ.५०) किं. ०१० सभासदांस ०८

(३) श्री शिवभारत (कवीन्द्र परमानन्दकृत) मूळ व मराठी भाषांतर सं. व प्र. स. म. दिवेकर पृ. ५८९) किं. ६ सभासदांस ५०१२

(४) शिवचरित्रप्रदीप (सं–द. वि. आपटे व स. म. दिवेकर) (कागदी व कापडी) (पृ. ३३५) किं. ३॥ व ४ सभासदांस ३। व ३॥

(५) हिंदी शिल्पशास्त्र भाग १ ला (ले.– कै. रा. सा. कृ. वि. वझे) (पृ. २००) किं. ३ सभासदांस २

(६) शिवकालीन जंत्री (शके १५५१–१६४९)(पृ.२००) किं.५

(७) साधन–चिकित्सा (ले. वा. सि. बेन्द्रे) (पृ. ३२०) किं. ३॥ सभासदांस३

(८) ऐतिहासिक पोवाडे (सं.–य. न. केळकर) (पृ. ६१५) किं. रु. ३ सभासदांस २॥

(९) वाठारकर निंबाळकर–इतिहास (पृ. ३००) किं. १॥ सभासदांस १०३०३

(१०) भूतेश आख्यान (पृ. ७५) किं. ०१२ सभासदांस ०१०

(११) कऱ्हाड (य. रा. गुप्ते, बी. ए.) द्वि. आ. (पृ. ५४) किं.०८

(१२) ऐतिहासिक प्रस्तावना (कै. इतिहासाचार्य वि. का.राजवाडे) (पृ. ६००) किं. ३ सभासदांस २०६०६

(१३ ते १६) छापत आहेत.

(१७) पुरंदरे दप्तर भाग २ रा (उत्तर पेशवाईतील पत्रव्यवहार) किं. ३ रु., सभासदांस २॥रु.

(१८) The Deliverance or the Escape of Shivaji the great from Agra किं. ३ रु. सभासदांस २॥ रु.

(१९) लोक–कथा (शं. ग. दाते,) (पृ. ८४) किं. रु.१ व रु.१॥ सभासदांस, किं. १४ आ. व १। रु.

(२०) पानसे घराण्याचा इतिहास (रा. ब. के. रं. पानसे) (प. २४०) किं. ३ रु. सभासदांस २॥ रु.

(२१) वासुदेवशास्त्री खरे–चरित्र व ग्रंथपरिचय–(दा. मा. भट.) (प. ३५०) किं २॥ सभासदांस २।–

Digitized by Google Original from

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ–स्वीय–ग्रंथमाला

या मालेंतील ग्रंथ सभासदांस नियमाप्रमाणें मोबदल्यांत मिळतात.

वि. सू.– * अशी खूण केलेले ग्रंथ मुंबई सरकारनें प्राथमिक व दुय्यम शाळांच्या पुस्तकालयांसाठीं मंजूर केले आहेत.

मालांक	किंमत रु.
१ अहवाल (शके १८३२)	३
२ ,, (शके १८३३)	५
+३ सुबंतविचार(रा.वि.का.राजवाडे)	१०
४ वार्षिक इतिवृत्त (शके १८३४)	५
५ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १२ (रा. राजवाडे)	१।८
*६ प्रथमसंमेलनवृत्त (शके१८३५)	०।१२
*७ वार्षिक इतिवृत्त (शके१८३५)	६
*८ द्वितीयसंमेलनवृत्त(शके१८३६)	३
*९ वार्षिक इनिवृत्त (शके १८३६)	३
*१० मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २० (शिवकालीन घराणीं)	३
*११ वार्षिक इतिवृत्त (शके १८३७)	६
भां. इ. सं. मं. **त्रैमासिकः**–१८४२,४३ ४४।४५।४६।४७।४८।४९।५०।५१ प्रत्येकीं	३
*१२ तृतीयसंमेलनवृत्त(शके१८३७)	३
*१३ मुकुंद महाभाष्य (संस्कृत)	०८
*१४ ग्रंथराज (दासोपंत) ,, +	२
* १५ स्फुट प्रकरणें भाग १ ला	०।१२
* १६ स्फुट प्रकरणें भाग २ रा	०।१२

मालांक	किंमत रु.
* १७ वार्षिक इतिवृत्त (शके १८३८)	३
१८ चतुर्थसंमेलनवृत्त (शके१८३८)	४
*१९ राजवाडे-खंड स्थलसूची	४
*२० पंचमसंमेलनवृत्त(शके१८३९)	३
+२१ संशोधनसंग्रह (१८३९)	छा. आहे
२२ चंद्रचूड-दप्तर-कला १	३
२३ महाराष्ट्रसारस्वत (संपलें.)	६
२४ षष्ठसंमेलनवृत्त (१८४०)	४
२५ सप्तसंमेलनवृत्त (१८४१)	३
२६ संशोधकाची छोटी जंत्री (रा. द. वि. आपटे)	०४
२७ प्रदर्शनपरिचय	०४
२८ फारसी पत्रव्यवहार मूळ व भाषांतर (ईस्ट इं. कंपनी व पेशवे)	रु. ५
२९ फार्शी मराठी कोश	रु. ४
३० शिवचरित्र साहित्य खंड १	१।०८
३१ Historical Miscellany	१
३२ पुंदरे दप्तर–भा.१ कृ.वा. पुरंदरे छत्रपती राजाराम ते पानिपतअखेर	४
३३ शिवचारित्र साहित्य खंड २	छा. आहे

इतर पुस्तकें:–वासुदेव शास्त्री खरे–कृत :– (१) अधिकारयोग किं. ०१० **ऐ. ले. संग्रह** सं. ५-११ किं. ३, ४, **राजवाडेकृतः**–मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १,५,७,१०,११,१३ व १४,१५ किं. अनुक्रमें रु. + १०, +१०, ३, २॥, + १, २, ५ **काव्येतिहाससंग्रह**– मुक्तेश्वर–वनपर्व ४, वामनपंडित–स्फुट प्र. ३, अनेककविकृत स्फु. प्र. भाग १ व २ रु. ३, समर्थकृत रामायणें व इ. प्रकरणें रु. २ व **भारतवर्षः**– व. १ अं. १ व ४ – १२ किं. प्र. ०१२. **चित्रें:**–थोरले बाजीराव नऊरंगी किं. ०८; पिलाजी जाधवराव व श्री शिवाजी महाराजांचा होन किं. ०॥.

टीपः–टपालहंशील व बंगी व्ही. पी. वगैरे खर्च निराळा पडेल. घाऊक घेणारांस चांगलें कमिशन देऊं. माहितीपत्रक मागवा. + दुर्मिळ सबब वाढविलेल्या किंमती.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

ला

मिळतात.

ध्यम शाळांच्या

किंमत रु.

(शके १८३८)३

(शके१८३८)४

कसूची ४

के१८३९) ३

८३९) छा. आहे

ग १ ३

(संपले.) ६

१८४०) ४

१८४१) ३

जंत्री

टे) ८४

८४

मूळ व भाषांतर

शवे) रु. ५

। रु. ४

खंड १ १८८

scellany १

रु. वा. पुरंदरे

पानिपतअखेर४

खंड २ छा. आहे

योग किं. ८१०

तेहासाचीं साधनें

, ३, २॥, + १,

: प्र. ३, अनेक·

5. २ वं भारत·

जीराव नऊरंगी

८॥·

ाऊक घेणारांस

लेल्या किंमती.

Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

BHĀRATA

Vol. XI.

भारत

वर्ष ११]

दत्तो

गंगाध

वार्षिक वर्गणी

Annual Subscri

Printed by An
House No. 93
Messrs. Dat
M

Digitized by Google

Original from
UNIVERSITY OF MICHIGAN

Traimasika

BHĀRATA ITIHĀSA SANSHODHAKA MANDALA.

Vol. XI.] QUARTERLY [No. 4
(44)

GEAD DS 403 B48 V. 11 No. 4

श्री

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

त्रैमासिक.

(४४)

वर्ष ११] चैत्र श. १८५३ [अं. ४ था.

UNIV of MICH.
JAN 10 2003
STACKS

संपादक व प्रकाशक :
दत्तो वामन पोतदार, बी. ए.
गंगाधरराव नारायणराव मुजुमदार.

चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. ह वगैरे निराळें. फुटकळ अंक १२ आणे
Annual Subscription Rs. 3. Postage &c. Extra. Each No. As. 12

Printed by Anant Vinayak Patvardhan at the Aryabhushan Press House No. 936/2 Bhamburda Peth, Poona City and published by Messrs. Datto Waman Potdar and Gangadharrao Narayanrao Mujumdar 314 Sadashiv Peth, Poona City.

Digitized by Google Original from UNIVERSITY OF MICHIGAN

निवेदन.

(१) त्रैमासिकाच्या अकराव्या वर्षाचा शेवटचा अंक आज प्रसिद्ध होत आहे. ऐतिहासिक संकीर्णसाहित्य खंड १, स्वीय ग्रंथमाला अनुक्रम ३५ म्हणून पुरा केला आहे. शिवचरित्रसाहित्य खंड ४ क्रमशः प्रसिद्ध होतच आहे.

(२) शके १८५३ पासून त्रैमासिकांत आणखी बऱ्याच सुधारणा करण्याचें योजिलें आहे. हितचिंतकांनीं सूचना कराव्या. शक्यतेनुरूप विचार केला जाईल.

(३) त्रैमासिकाच्या पृष्ठांची संख्या वाढवावयाची तर वर्गणीदार व सभासद यांची संख्या आज आहे तिपेक्षां पुष्कळच वाढली पाहिजे. तो प्रयत्न सर्वांकडून कळकळीनें व्हावयास पाहिजे. हल्लीं जे वर्गणीदार व सभासद आहेत त्यांनींहि आस्थेनें वर्गणी वेळेवर पाठविली पाहिजे. नवीन वर्ष सुरू होऊन दोन महिने आतां होतील **तरी सर्वांनीं वर्गणी पाठविण्याची व्यवस्था करणें जरूर आहे.**

(४) याच अंकांत **एकोणिसावें वार्षिक संमेलन** व **एकविसावा वाढदिवस** या मंगल प्रसंगांचें आमंत्रण दिलें आहे. तिकडे लक्ष देऊन दोन्ही दिवस यशस्वी कसे होतील याची चिंता सर्वांनींच बाळगावी.

कै. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या स्मारकासाठीं श्री. सदाशिव शंकर गोडबोले (हस्तें श्री. महेश्वर शंकर गोडबोले) यांजकडून रोख रुपये शंभरची देणगी आली आहे. मंडळ त्यांचें आभारी आहे. देणगीचा विनियोग श्री. गोडबोले यांच्या संमतीनें यथायोग्य करण्यांत येईल. अशा अनेक देणग्या मंडळाला मिळाल्या पाहिजेत.

ज्येष्ठ शुद्ध १ शक १८५३ — चिटणीस

अनुक्रमणिका.

अ.			पृ.
(१)	संशोधनवृत्त	श्री. ग. ह. खरे	१
(२)	,,	,, शं. ना. जोशी	१०
(३)	चर्चा		१८
(४)	मंडळवृत्त		२१
(५)	Marathi articles in this issue		२४

Digitized by Google — Original from UNIVERSITY OF MICHIGAN

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें.

वर्ष ११ वें.] त्रैमासिक [अंक ४ था.

संशोधनवृत्त.[1]

(श्री. ग. ह. खरे)

शक १८५१ सालीं कागदपत्रें व शिलालेख यांसाठीं मीं प्रत्येकी ८।१० दिवसांच्या अशा दोन सफरी काढल्या. त्यांत मी ज्या ज्या गांवीं गेलों व तेथें जें जें पाहिलें त्यांचें थोडें थोडें वर्णन, तसेंच जी सामुग्री मला मिळाली ती कोठें प्रसिद्ध झाली आहे व अप्रसिद्ध असल्यास तिचा सारांश या गोष्टी या वृत्तांत दिल्या आहेत.

पहिली सफर.

शनिवारीं (१९२९ नोव्हें. १६) भुलेश्वराच्या पायथ्याशीं असलेल्या **माळशिरस** (पुणें) गांवीं मुक्काम केला. तेथील श्री. नारायण सखाराम तांबे हे गृहस्थ अत्यंत प्रेमळ, मनमिळाऊ, आर्जवी व चिकित्सक बुद्धीचे दिसले. रविवारीं (नोव्हें. १७) सकाळींच **भुलेश्वरीं** गेलों. जातांना डावे बाजूस एक पडका पण मान्याचा बुरूज भेटला. उजव्या बाजूस कांहीं अंतरावर एक पडकी मशीद आहे. वर दोन टाकीं आहेत; देऊळ सर्वांत उंच स्थानीं बांधलेलें आहे व त्या खालीं पहिल्या बाजिरावाच्या कारकीर्दींत ब्रह्मेंद्रस्वामींनीं तीन कमानींचा दुघई नगारखाना बांधला आहे. नगारखान्यांतूनच देवळांत जाण्यास वाट आहे. एकंदर कलाकौशल्यावरून देऊळ मुसलमानपूर्वकालीन खास असावें असें वाटतें. देवळाचें वैशिष्ट्य पुढीलप्रमाणें–(१) देवळास कुर्णांच्या कमानी कोठेंही नाहींत. (२) कीर्तिमुख उंबरठ्याच्या मध्यभागीं न काढतां मध्यभागाच्या दोन्ही अंगांस दोन कीर्तिमुखें कोरलीं आहेत. (३) गाभाऱ्याच्या गणेशपट्टीवर जरी गणपतीचें चित्र आहे तरी देवळाच्या भोंवतीं असलेल्या कांहीं दक्षिणाभिमुख ओवऱ्यांच्या गणेशपट्टीवर गणेशाएवजा भैरवाचें चित्र खोदलें आहे. (४) देवळाच्या भोंवतीं ओवऱ्या बांधून त्यांत निरनिराळे देव बसविणें ही पद्धत यादवकालीन देवळांत क्वचित् दिसून येते. हा पद्धत बहुधा जैनांच्या उत्तरेकडील पद्धतींतून उचललेली दिसते. (५) मंडपाच्या भोंवतीं उंच कट्टा असून त्यावर उत्तरेच्या बाजूस रामायण व महाभारत यांतील कांहीं प्रसंगांचीं चित्रें काढलीं आहेत. (६) चित्रांत रथांना दोन चाकें व दोनच घोडे दाखविले आहेत. (७) पुरुष व बायका यांचीं

१ हें वृत्त १८ व्या संमेलनांत वाचलें.

कर्णभूषणें हल्लींच्या कुणब्यांच्या कानांतील बाळ्यांप्रमाणें आहेत. (८) गाभाऱ्याच्या बाहेरून सर्वत्र उत्तम उभ्या मूर्ति खोदल्या आहेत. त्या फार सुंदर असाव्या. पण मुसलमानांनीं फोडल्यामुळें हल्लीं विद्रूपझाल्या आहेत. (९) ओवऱ्यांच्या पुढें सोपा असून गाभाऱ्यासमोरील सोप्याच्या पाटणीच्या भागावर निरनिराळ्या देवतांचीं त्यांच्या वाहनांसह चित्रें काढलीं आहेत. (१०) नंदीच्या उजव्या बाजूस एक ओटा असून त्यावर कासवावर बसलेला नंदी होता असें वाटतें; हल्लीं त्याचें फक्त डोकेंच शिल्लक राहिलें आहे; त्यामुळें तो प्राणी निश्चित कोणता हें नीट समजत नाहीं. (११) ओवऱ्या व खिडक्या यांची एकाआड एक अशी मांडणी केली असून खिडक्या दगडाच्या खोदून बनविलेल्या आहेत. (१२) कीर्तिमुखाच्या जागीं कित्येक ठिकाणीं नुसती नक्षीच काढली आहे. (१३) चबुथऱ्यावर एकमेकांकडे तोंडे केलेले हत्ती, सिंह, घोडे यांचीं चित्रें आहेत. चालुक्य पद्धतींत असलीं चित्रें काढण्याची पद्धती फार आहे. हल्लीं हें देऊळ पुराणवस्तुसंशोधन खात्यानें आपल्या ताब्यांत घेतलें आहे. मी एकादा नवीन शिलालेख मिळेल या आशेनें तेथें गेलों होतों; पण तो न मिळाल्यानें मी त्याच दिवशीं म्हणजे रविवारीं सायंकाळीं माळशिरसला परत आला. माळशिरस येथें कांहीं फुटके वीरगळ इतस्ततः पडलेले दिसले. याशिवाय प्राचीन कांहीं एक सांपडलें नाहीं. पेशवाईत ब्रह्मेंद्रस्वामींनीं बांधिलेली एक मोठी बारव या गांवीं आहे. हें गांव ब्रह्मेंद्रस्वामी-कडेच इनाम चालत आहे. सोमवारीं (नोव्हें. १८) सकाळींच राजेवाडी स्टेशनवर आलों. वाटेंत पेशवाईंतील हुजरातीचे सरदार दरेकर यांचा वाडा दुरून दिसतो. राजेवाडीहून निरा–बारामती रस्त्यावरील **माळगांवास** गेलों. माळेगांवें दोन आहेत. एक जुनें व एक नवें. जुन्या माळेगांवांत एक पडकें देवालय, दीपस्तंभ व कांहीं वीरगळ आहेत. नव्या माळेगांवाच्या पश्चिमेस अर्ध्या मैलावर नागेश्वराचें सुमारें ४०० वर्षांचें जुनें देऊळ आहे. देऊळ हेमाडपंती थाटाचें पण भिकार आहे. सभामंडपांत शिरतांच उजव्या व डाव्या अंगच्या खांबांवर अनुक्रमें राम व कृष्ण यांच्या आयुष्यांतील कांहीं प्रसंगांचीं चित्रें असून एका चित्रांत ३ मनुष्यांना ४ पाय व एकच गुदद्वार दाखविलें आहे; बाकीचे अवयव प्रत्येक मनुष्याचे निरनिराळे आहेत. नंदीच्या चबुथऱ्याच्या पूर्वेस एक शिला असून तीवर १४।१५ व्या शतकांत कोरलेला लेख आहे. लेख अगदीं पुसट आहे. तथापि ठसा आणला असून कांहीं उमगल्यास मंडळापुढें मांडीन. तेथून मंगळवारीं (नोव्हें. १९) **बारामतीस** गेलों. नदीनें बारामतीचे दोन भाग केले आहेत. पूर्वेकडील भागांत नायकांनीं बांधलेलें भव्य शिवमंदिर आहे. पश्चिमेकडील भागांत एक जुनें, माळेगांव येथील नागेश्वराच्या तोडीचें व तसल्याच कलाकुसरीचें, काशीविश्वेश्वराचें देऊळ आहे. शिलालेख वगैरे कांहीं नाहीं. तेथून बुधवारीं (नोव्हें. २०) सकाळीं **फलटणास** आलों. फलटणांत शिरतांच एक जुनाट देऊळ लागतें. पण तें बंद असल्यानें निरीक्षण करतां आलें नाहीं. गावांत भव्य पण आधुनिक शंकर, राम, दिगंबर तीर्थंकर वगैरेंचीं देवळें आहेत. शिल्पाच्या दृष्टीनें त्यांत नाविन्य

कांहींच दिसलें नाहीं. जगेश्वराचें देऊळ मात्र पहाण्यासारखें आहे. हेमाडपंती देवळाचे गाभारा व मंडप असे दोन भाग पडतात. पैकीं मंडप चौकोनी आणि गाभारा बाहेरून बहुकोनी पण समकेंद्र व आंतून चौकोनी असा असतो. या देवळाचा मंडप गाभाऱ्याप्रमाणेंच बहुकोनी आहे. सबंध देवळाला उंच चबुतरा आहे. एकंदरींत देऊळ खात्रीनें मुसलमान पूर्वकालीन आहे. यास पुरावा म्हणजे देवळाच्या भिंतीवर खोदलेल्या व भग्न झालेल्या मूर्ति. आंतील भाग कुलूप असल्यानें पहावयास मिळाला नाहीं. मंडळाचे सभासद श्री. शंकर नरहर सरदेसाई यांचा उत्तम पाहुणचार घेऊन येथून **नातेपुतें** येथें गेलों. **नातेपुतें** येथें एक जुनें गिरिजाशंकराचें देऊळ व तलाव आहे. जुन्या महाराष्ट्रांतील मराठ्यांचें (हैद्राबाद संस्थानचा मराठवाडा) हें कुलदेवत असल्यानें त्या भागांतील अनेकांनीं या देवळाच्या बांधणीस हातभार लावलेला आहे. त्यांचीं नांवें पायऱ्यांवर, खांबांवर, फरशीवर, दरवाजांच्या उंबरठ्यावर वगैरे अनेक ठिकाणीं खोदलेलीं आढळतात. देवळाची बांधणी हेमाडपंती थाटाची आहे. पण बांधणीचें भिकार स्वरूप, नांवांची अक्षरवटिका वगैरे लक्षांत घेतां देऊळ ४०० वर्षांहून जास्त जुनें असेल असें वाटत नाहीं. देवळांत खोदलेलीं कांहीं नांवें पुढें देतों. (१) पंडो नागनाथ देशकुलकर्णी पा। माण (२) नागोजी देशकुलकर्णी पा। माण (३) गणो केमू सो। घोडेगो सो। दौलताबाद. नातेंपुतें येथील श्री. बापूराव देशपांडे यांचे घरीं ५०।६० रुमाल कागद असून मी जीं ५।६ दप्तरें चाळूं शकलों त्यावरून त्या दप्तरांत बरेच महत्वाचे कागद असावेतसें वाटतें. दप्तरें कोणासही दाखविण्यास त्यांची तयारी आहे. तेथून गुरुवारीं (नोव्हें. २१) दुपारीं **शिंगणापुरीं** विठ्ठल रामचंद्र बडवे यांचे घरीं गेलों. शिंगणापुरास २ देवळें आहेत. एक शंभुमहादेवाचें व दुसरें अमृतेश्वराचें. पैकीं अमृतेश्वराचें देऊळ शंभूमहादेवापेक्षां जास्त जुनें आहे. एकंदर मांडणी व वापरलेला दगड यावरून तें देऊळ मुसलमानी अमल सुरू झाल्यावर थोड्याच अवधींत म्हणजे शक १३०० च्या सुमारास बांधलें असावें. शंभूमहादेवाचें देऊळ अगदीं अलीकडे म्हणजे शाहूच्या कारकीर्दींत बांधलें आहे. दीपमाळेवरील विरूबाई या नांवावरून व जागोजाग कोरलेल्या 'श्रीचरणी तत्पर बसवंतराय निरंतर' यावरून हें स्पष्ट होत आहे. श्री. विनायकराव बडवे यांजपाशीं असलेल्या कागदावरूनही तेंच सिद्ध होतें. हा कागद देवळाच्या बांधणीविषयीं पाथरवटानें लिहून दिलेल्या कतब्याचा आहे. त्यांत जुनें देऊळ मोडून नवें देऊळ उभारल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. देवळाच्या दक्षिणेस खांब वगैरे जुन्या देवळाचे अवशेष अस्ताव्यस्त पडले आहेत. अमृतेश्वराचें हल्लींचें देऊळही असेंच जुनें मोडून नवें बांधलें असावें असें त्याच्या भोंवतीं असलेल्या तटास जे दगड आहेत त्यांवरून दिसतें. तळ्याचे कामाचीही हीच स्थिती आहे. तळ्याच्या भिंतीचा कांहीं भाग मालोजी, कांहीं शहाजी व कांहीं संभाजी अशा ३।४ जणांनीं मिळून बांधला आहे असें वरील कागदांत स्पष्ट म्हटलें आहे.

शंभूमहादेवाच्या देवळाच्या मुख्य दरवाजाच्या पायरीवर **शहाजी भोसले व शिवाजी भोसले** अशीं नांवें कोरलीं आहेत. देवळाच्या आवारांत ३ घंटा आहेत. पकीं देवळाच्या पाठीमागील घंटेवर खालील लेख आहे.

DOBENAVENTVRADO SANCTO AMARO

हरहर महादेव मण ·॥।४

खाम्या तुरंबेकार ✝ A

IHS M

हे कोण घेईल तो मात्रागमनी A

1630

देवापुढील दोन घंटांवर पुढील लेख आहेत.

✝ 1729 ; ✣ 1716

अर्थात् सातारा गॅझिटिअरमध्यें देवळांत इ. स. १७२० च्या दोन घंटा आहेत असें जें विधान आहे तें अगदीं चुकलें आहे हें उघड आहे. मुख्य देवळाच्या आग्नेयीस भटांची विहीर म्हणून एक वापी आहे. तीमध्यें उतरतांना डाव्या अंगास भिंतींत २′, ८″ × १′, २″ लांबीरुंदीच्या दगडावर पुढील श्लोक आहे.

श्रीनृसिंहस्य प्रपौत्रो यो दक्षिणामूर्तिपोत्रकः ।
शंभोः सुतश्च योगींद्रः सखारामाय ते नमः ॥
श्रीशंभोः स तया (कृपया!) तावत् सख्युश्चापांगवीक्षणात् ।
अकंभट्टाभिधेनेयं रचिता दीर्घवापिका ॥

पण आश्चर्य हें कीं, गॅझिटिअरमध्यें ही विहीर व शिलालेख यांचा उल्लेख नाहीं.

शिंगणापूरच्या आग्नेयीस सुमारें दोन मैलांवर कड्याच्या खोबणींत गुप्त लिंगाचें अत्यंत रम्यस्थान आहे. इतर दृष्टींनीं तें स्थान अत्यंत सुंदर असलें तरी शिल्पाच्या दृष्टीनें त्यांत महत्वाचें असें कांहीं नाहीं. शिंगणापूर सिंघणराजानें वसविलें असा प्रवाद आहे. पण यादवकालीन लेख कोठेंही आढळला नाहीं. तरी पण अमृतेश्वराच्या देवळावरून त्या प्रवादांत कदाचित् तथ्य असेलसें वाटतें. असो. शनिवारीं (नोव्हें. २३) सकाळीं शिंगणापुराहून निघून १० । ११ वाजण्याच्या सुमारास **वेळापुरास** पोहोंचलों. नातेपुतें येथून वेळापूर पंढरपूरच्या अलिकडे ११ कोस आहे. तेथें प्राचीन देवळें व इतर अवशेष पुष्कळ आहेत. त्यांची यथाक्रम माहिती देतों. तेथील मुख्य देऊळ हरनरेश्वराचें आहे. याचें शिखर मुसलमानोत्तर देवळांच्या शिखरापेक्षां बरेच बुटकें आहे. शेजारच्या देवळाचें शिखरही असेंच बुटकें आहे.

मुख्य देवळांत शिरतांना उजव्या अंगास एक शिला पडलेली असून तीवर शक १२२२ मधील रामदेव यादवाचा मराठी लेख आहे. मुख्य देवळासमोरच एक बारव आहे. तींत उतरतांना उजव्या अंगास भिंतींत बसवलेली एक शिला असून तीवरही १२२७ चा रामदेव यादवाचा एक मराठी लेख आहे. दोन्ही लेख दाक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ या पुस्तकात छापले आहेत. गांवांतील वरील देवळापेक्षांही एक जुनें लक्ष्मीचें देऊळ आहे. हें देऊळ हेमाडपंती थाटाचें नाहीं. मंडप मात्र ९ खणी दिसतो. गाभाऱ्यांत गणेश पट्टीवर गणेशाऐवजीं दिगंबर तीर्थंकराची मूर्ति खोदली आहे. तसेंच लक्ष्मीची मूर्ती ज्या सिंहासनावर अधिष्ठित आहे, त्या सिंहासनाला ध्यानस्थ तीर्थंकराची मूर्ती खोदलेला एक दगड बसविला आहे. अर्थात् हें देऊळ पूर्वी दिगंबरपंथी जैनांचें असावें असें वाटतें. गांवाच्या उत्तरेस तळ्याच्या कांठीं एक जुनें मंदीर आहे. थाट हेमाडपंती नाहीं. गाभारा, मंडप व एका बाजूस सोपा अशी त्याची रचना आहे. गणेश पट्टीवर दोन हत्तींच्या सोंडेखालीं लक्ष्मी (गजलक्ष्मी) काढली आहे. या देवळापासून जवळच एक खंडोबाचें देऊळ आहे. पण तें आधुनिक आहे. गांवाच्या उत्तरेस एक पडकी मशीद असून तिच्या जवळच मातींत गाडला गेलेला एक शिलालेख आहे. यावरील अक्षरें अस्पष्ट आहेत. गांवाच्या दक्षिणेस म्हसोबाचा एक दगड आहे. पण वास्तविक तो म्हसोबा नसून एक उत्तम शिलालेख आहे.[१] याशिवाय मारुतीचें देऊळ व चावडी यांजवळ एकंदर सुमारें २५ सुंदर कोरलेले वीरगळ पडले आहेत. तेथून पंढरपुरास गेलों. दुसरे दिवशीं म्हणजे रविवारीं (नोव्हें. २४) सकाळीं पुळुंज येथें गेलों. पुळुंज हें गांव पंढरपुरापासून पूर्वेस ६ कोसावर चंद्रभागेच्या कांठीं आहे. गांवात लिंगायतांचें शंकराचें देऊळ आहे. मुख्य देवळाची बांधणी हेमाडपंती थाटाची असली तरी पहिल्या मंडपास जोडून आणखी एक मंडप उभारला आहे हें विचित्र दिसतें. पण यापेक्षांही विचित्र व मूर्खपणाची गोष्ट म्हणजे हा मंडप उभारतांना पूर्वीच्या मंडपाची पूर्वेची बाजू भिंत घालून बुजविली आहे; व भिंतींत एक कानडी शिलालेख असलेला दगड घातला आहे. त्याच्याजवळच नवीन मंडपाचा एक खांब आहे; तो खांब व भिंत यांच्यामधील फट बुजविण्याकरितां लेखाचा दगड व खांब ह्यामध्यें एक दगड बसविला आहे. लेखाचा जो भाग दिसत आहे त्याचा ठसा काढला. पण मुख्य लेख देवळाच्या दक्षिण भागीं असलेल्या देवळांत आहे. या देवळास गाभाऱ्यापुढें मंडप नसून १ खणी सोपा आहे. खांबांच्या घडणीवरून देऊळ लिंगायतांचें

---

१ दोन्ही शिलालेख सध्यां ठशांच्या रूपांत मजपाशीं आहेत. हे ठसे ५।६ महिन्यांपूर्वी सफरीवर गेलों असतां मी आणले आहेत.

२ हा लेख फुटलेला आहे तरी त्यांत एक गोष्ट स्पष्ट आहे व ती ही कीं, व्यय संवत्सरास (गत श. ११४८) सिंघणाचें १७ वें वर्ष म्हटलें आहे.

असावें असें वाटतें. असो. गाभाऱ्यांत शिरण्याच्या वाटेवर दोन्ही बाजूंच्या खांबावर व डाव्या बाजूच्या नक्षीच्या पट्टीवर प्रत्येकी एक लेख आहे[१]. सोप्याच्या डाव्या आंगच्या, आगेंत एक भली मोठी शिला असून तीवरही पूर्वीच्याप्रमाणेंच एक कानडी लेख आहे. असो. जास्त हिंडण्यास सवड नसल्यानें दुसरे दिवशीं (सोमवार नोव्हें. २५) सुमारें ६ कोसावरच्या मुंडेवाडी स्टेशनावर येण्यास निघालों. वाटेंत **बाभुळगांव** येथें एक अतिशय सुंदर मुसलमान पूर्वकालीन देवालय आढळलें. पण गांवांत प्लेग असल्यानें व देऊळ वापरांत नव्हतें; म्हणून देवळाचें निरीक्षण करण्याचें टाकलें. संध्याकाळीं मुंडेवाडी स्टेशनावर येऊन सकाळीं (मंगळवार नोव्हें. २६) पुण्यास परत आलों.

२ री सफर.

ही सफर १०-१२ दिवसांची झाली. हींत बार्शी, आंबेजोगाई, जवळगांव, मार्डी, सोलापूर, वळसंग, तीर्थ, हालहळ्ळी, अक्कलकोट या गांवीं गेलों होतों. त्याचें यथाक्रम वर्णन पुढें देतों.

बार्शी:– (गुरु. ता. २७ मार्च इ. १९३०) येथें एक मोठें हेमाडपंती थाटाचें भगवंताचें देऊळ आहे. देऊळ विस्तीर्ण असलें तरी फार जुनें नसल्यानें कलाकुसरी किंवा बांधणी वगैरे शिल्पकाम या दृष्टीनें त्यांत पाहण्यासारखें कांहीं नाहीं. बार्शीहून सकाळीं आंबेजोगाईकडे जाण्यासाठीं मोटार सुटते. या मोटारीनें गेलें असतां संध्याकाळीं मनुष्य आंबेजोगाईस जाऊन पोहोचतो. पण माझी सकाळची मोटार चुकल्यानें मला संध्याकाळपर्यंत थांबावें लागलें. येथून परिंडा वगैरे मोगलाईच्या बाजूस मोटारी सुटतात.

असो. संध्याकाळीं मोटारनें मोगलाईतील मांजरा नदीच्या काठीं असलेल्या **कळंम** नांवाच्या गांवीं पोहोंचलों. कळम हें तालुक्याचें गांव आहे. येथें पहिली मोटार सोडून आंब्यास जाणारी मोटार पकडावी लागते. चौकशी करतां मोटार सकाळीं बरोबर सहा वाजतां निघणार असें समजलें म्हणून मी नाईक सावकारांच्या येथें रात्रीं राहिलों. शुक्रवारीं (मार्च २८) सकाळीं ९ च्या सुमारास

---

१ या दोन्ही लेखांत राजधानीपट्टण मंगळिवेडे (मंगळवेढें), मारुडिगे, (मार्डी) वगैरे गांवें व सिद्धसोमनाथ देव, अंमुगिरस, वीर नागरस वगैरेंचा उल्लेख आहे.

२ ७३ ओळींच्या या लेखांत प्रथम सिद्धसोमनाथ देव, त्याचा भक्त चाम्मिदेव किंवा अम्मिदेव, त्याचा शिष्य लंमिदेव यांचें वर्णन असून नंतर वीर नागरस, अंमुगिदेवरस, दाहळहकुनूहळ सिंघण, यांचे उल्लेख आणि सिंघण व त्याचे अधिकारी यांनीं दिलेलीं दानें आहेत. शेवटीं दामोदर दंडनायक व श्रीकरण चामुंडरस यांनीं लेख लिहिला असें सांगितलें आहे. काल सिद्धार्थी संवत्सर माघ शु. (१) सोमवार असा सांगितला आहे. हा उल्लेख श. ११२१ चा असावा असें वाटतें.

कळमहून निघालों ते १०-१०॥ ला आंबेजोगाईस जाऊन श्री. भाऊसो चौसाळकर यांचे घरा मुक्काम केला.

आंबे येथें ४ दिवस होतों. आंबे गांवांतील व आसपासची सर्व देवळें हिंडून पाहिलीं. पण ४ हून जास्त शिलालेख मिळाले नाहींत. बहुतेक देवळें यादवकालीन आहेत. पण सर्व देवळें ब्राह्मणीच आहेत कीं नाहींत याविषयीं शंका आहे. मंडळाचे सभासद श्री.शिवाजीराव चौसाळकर यांच्या घरापाशींच एक जुनें देऊळ किंवा मठ किंवा मठ आहे. हें देऊळ आहे हेमाडपंती थाटाचें. पण आंत खांबांवर व गणेशपट्टीवर ज्या मूर्ति खोदल्या आहेत त्यांवरून हें देऊळ ब्राह्मणी नसावें असें वाटतें. तीच गोष्ट सकलेश्वराची. आज सकलेश्वराचें देऊळ ब्राह्मणी समजतात व शिलालेखाचा त्यास आधारही सापडतो. पण त्याची बांधणी हेमाडपंती नसून मला वाटतें जैन पद्धतीची आहे; एवढेंच नव्हे तर देवळाच्या उत्तरेस जवळच दगडावर कोरलेली दिगंबर मूर्तीही पडलेली आहे. गावांत एक मोठी मशीद आहे; ती बहुतेक जुन्या देवळांचे खांब घेऊन बांधली असावी. कारण सर्व खांब हेमाडपंती पद्धतीचे आहेत. मशीदीचा घुमटही मुसलमानी पद्धतीनें न बांधतां हेमाडपंती पद्धतीनें बांधला आहे. यावरून ती मशीद मुसलमानी कारकीर्दीच्या अगदीं आरंभींच बांधली गेली असावी. गांवाच्या पश्चिमेस प्रसिद्ध जोगेश्वरीचें देऊळ आहे; हें देऊळ अगदीं अलीकडचें २००-१००वर्षांतील आहे हें त्यांतील मुसलमानी व हीन हेमाडपंती शिल्पावरून सहज कळून येतें. याच जोगेश्वरीच्या पश्चिमेस अर्धवट गाडलेली गुहा आहे. या गुहेचें वर्णन Arch. Survey of India, Western Circle Vol. III मध्यें केलें असल्यानें येथें जास्त वर्णन करीत नाहीं. ही गुहा पाहिल्यावर पुण्याजवळच असलेल्या पांचाळेश्वराची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. पांचाळेश्वराचें तोंड पूर्वेकडे तर या गुहेचें तोंड पश्चिमेकडे आहे. पांचाळेश्वराजवळ मोठे दगडी हत्ती नाहींत. या गुहेंत ४ भले मोठे हत्ती आहेत. या शिवाय गांवाच्या मध्यभागीं चौबारी व पश्चिमेस खोलेश्वराचा मठ या दोन यादवकालीन इमारती असून त्यांमध्यें प्रत्येकीं एक शिलालेख आहे. पण त्यांचें यथास्थित वर्णन दुसरीकडे आलें असून शिलालेखही छापले गेले असल्यानें त्यांचें वर्णन येथें करीत नाहीं[१].

आंब्याजवळच ३ कोसांवर जवळगांव नांवाचें खेडें आहे. तेथील विहिरीवर लेख असल्याची बातमी लागल्यावरून तेथें गेलों. पण लेख मिळाला नाहीं. एका माळ्यानें शेताचा वाद आपल्या विरुद्ध जाईल या भीतीनें तो मातींत पुरल्याचें समजलें. एक जुनी चुना न वापरतांच बांधकाम केलेली अशी विहीर मात्र आढळली. हल्लीं मोटेसाठीं ज्या प्रमाणें लाकडी बगाड उभारतात त्याप्रमाणें या विहिरीस

---

१ पहाः- Archaeological Survey of India, Western Circle Vol. III आणि दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ ला.

दोन दमडी खांबाचें बगाड लाविलें आहे. आडव्या लाकडाऐवजीं तेथें काय टाकीत असत हें समजत नाहीं. पण उभारलेल्या खांबास एकादें लाकूड किंवा लोखंडी पहार टाकण्यासाठीं मोठाल्या खोबणी मात्र आहेत. असो. पाडव्याच्या दिवशीं श्री. रामभाऊ पांडे यांचे घरीं जेवण करून निघालों, तो रात्रीं ९॥-१० च्या सुमारास गेल्या मार्गानें बार्शीस येऊन पोहोंचलों. दुसरे दिवशीं सकाळीं (मंगळवार एप्रिल १) मार्डीस जाण्याकरितां सोलापूरची मोटार गांठली. नेहमींप्रमाणें बराचसा खोळंबा होऊन दुपारीं ११-११॥ च्या सुमारास मार्डीपासून ३ मैलांवर असलेल्या नान्नज गांवीं पोहोंचलों व सुमारें १ वाजतां **मार्डीस** श्री.नानासो देशमुख यांच्या येथें उतरलों. घागरींत दूध ठेवण्याइतकी विपुलता मला फक्त यांच्या घरींच आढळली. मार्डीला एक मशीद आहे. त्या मशीदींत सर्व खांब हेमाडपंती आहेत व घुमटही हेमाडपंतीच आहे. अर्थात् ही मशीद हेमाडपंती देवळांचे अवशेष घेऊनच बांधली असावी. मशीदीच्या तटास एक कानडी लेखशिला बसविली आहे. तसेंच कुराण ठेवण्याच्या कोनाड्याच्या फरशीला व उघड्या जागेंतील फरशीला कानडी लेखशिला बसविल्या आहेत. एका मराठ्याच्या घराच्या जोत्यासही अशीच एक कानडी लेखशिला बसविली आहे. हे सर्व लेख धुपून झिजून गेल्यामुळें १।२ शब्दांपलीकडे जास्त लागत नाहींत. गावांतच सुतार आळींत एका पडक्या देवळाच्या अवशेषांत एक संस्कृत शिलालेख मिळाला[1]. गावाच्या पाश्चिमेस नागनाथाचें एक लहानसें देऊळ आहे. त्याच्या तटांत एक दगड बसविला आहे. त्या दगडावर एक झाड, झाडावर वानर व झाडाभोंवतीं विळखे घातलेला नाग असें चित्र खोदलें आहे. वृक्ष व नाग यांच्या पूजेचा तो एक अवशेष असावा. एका इंग्रजानें तो दगड गावकऱ्यांना मागितला होता. पण गावकऱ्यांनीं शहाणपणा दाखवून तो देवळाच्या तटांत कायमचा बसवून दिल्यामुळें आतां तो हिंदुस्थानाबाहेर जाण्याची फारशी भीति नाहीं. गांवाच्या पश्चिमेस सुमारें २ मैलांवर रानांत एक कानडी शिलालेख पडला आहे. कित्येक शतकें तसाच उघडा पडल्यानें खराब होऊन गेला आहे.पण सूर्यचंद्र, सवत्सधेनु, वगैरे चित्रांवरून दगडावर एकादें दानपत्र कोरलें असावें असें वाटतें. मार्डीस जागोजाग जे मोडके तोडके अवशेष आहेत त्यावरून मार्डी हें पूर्वीं बरेच मोठें गांव असावें असें म्हणण्यास हरकत नाहीं. मार्डीस आणखी एक दोन ठिकाणीं एक दोन ओळी कोरलेले दगड आढळले. पण त्यावरील लिपी अगदीं अलीकडची दिसल्यानें छाप घेण्याच्या भरीस पडलों नाहीं. असो. मार्डीहून दुसरे दिवशीं म्हणजे बुधवारीं (एप्रिल २) संध्याकाळीं कूच करून रात्रीं ८॥ च्या सुमारास सोलापुरांत शुभरायाच्या मठांत मुक्काम केला. गुरुवारीं सकाळीं श्री. बळवंतराव अध्यापक यांस घेऊन शिलालेखाच्या दृष्टीनें शहर धुंडाळलें. मुसलमान पूर्वकालीन अवशेष सोलापुरांत पुष्कळ असावयास पाहिजेत. पण एका किल्ल्याशिवाय इतरत्र कोठेंही असले अवशेष मला आढळले नाहींत. किल्ल्यांत एक

१ पहा दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १

जुनें देऊळ आर्किऑलजीच्या खात्यानें खणून काढलें आहे. या देवळाच्या दर्शनी खांबांवर कांहीं बीभत्स चित्रें आहेत. पण हीं चित्रें सज्जनगडाच्या पायथ्याशीं असलेल्या परळी गांवांतील केदारेश्वराच्या किंवा फलटण जवळच्या मलठण गांवीं असलेल्या देवळांइतकी उत्तान, बीभत्स व गलिच्छ नाहींत. तटांत ४।५ ठिकाणीं व विहिरींवर मिळून ५।६ शिलालेख आहेत. सर्व मोडी व बालबोध लिपींत आहेत. गॅझिटिअरमध्यें प्रसिद्ध झाले असतील या समजुतीनें त्यांचे ठसे घेतले नाहींत. पण गॅझिटियर पाहतां त्यांत फक्त या लेखांचा उल्लेखच केलेला आढळला. शनिवारीं सकाळीं उठून **वळसंग** येथें गेलों. येथें वळसंग येथील कुळकर्ण्यांविषयीं एक मजेदार गोष्ट सांगावीशीं वाटतें. कुळकर्ण्यांना एकादा ताम्रपट शिलालेख आहे कां म्हणून विचारिलें ! त्यांनीं उत्तर दिलें कीं, हो आहे मला ठाऊक; कोठें आहे तें सांगतों. पण माझी एक अट आहे. लेखांत द्रव्य कोठें पुरलें आहे याची माहिती मात्र आमच्याशिवाय कोणास सांगतां कामा नये. मी त्यांना उत्तर दिलें तुमची अट मला कबूल. लेखांत उल्लेखलेलें सर्व द्रव्य आपण बेलाशक घ्या. सध्यां मला लेख प्रसिद्ध करण्यास लागणारा ५।२५ रुपये खर्च मात्र द्या म्हणजे झालें. अर्थात् हा विनोद होता. पण खेडेगांवांतील लोकांमध्यें न वाचतां येणाऱ्या शिलालेखताम्रपटांविषयीं किती वेडगळ कल्पना असतात हें पाहण्यासारखें आहे. असो. वळसंगच्या उत्तरेस ३ मैलांवर **तीर्थ** नांवाचें एक खेडें आहे. या ठिकाणीं एक लहानसें देऊळ असून त्याजवळच तीन बाजूंनीं कानडी लिपींत लिहिलेला एक दगड आहे. त्या दगडाचे चार तुकडे झालेले आहेत. पैकीं तीन तुकडे एकावर एक रचून ठेविले आहेत. व चौथा तुकडा देवळाच्या बांधकामांत घालण्यांत आला आहे. या तुकड्याच्या एका बाजूवरील लेखन स्पष्ट दिसत आहे. ही गवंड्याची अहेतुक रुपाच म्हणावयाची. लेखांवर शेवाळ व दगडफूल माजल्यामुळें ठसा घेणें अशक्य झालें. पण ज्या भागाचा ठसा घेतला त्यांत आरंभीं 'नमस्तुंग.' हा श्लोक आहे व चालुक्याभरण त्रिभुवनमल्ल याच्या विजयराज्याचा उल्लेख आहे. तीर्थाहून एका हांकेवर असलेल्या **हालहळ्ळी** नांवाच्या गांवींही तपास केला. पण तेथें लेख मिळाला नाहीं. दुसरे दिवशीं म्हणजे रविवारीं सकाळीं उठून **अक्कलकोट**ला जाऊन तेथील राजोपाध्ये वकील यांचे येथें उतरलों. अक्कलकोटच्या माजी महाराजांनीं संस्थानांतील निरनिराळ्या गांवांहून सुमारें १५ लेख व १५।२० मूर्ती आणून खास बागेंत ठेविल्या आहेत. बहुतेक लेख कानडी असून त्यांपैकीं निदान १० तरी छापण्यासारखे लागतील असें वाटतें. येथेंही मला एक उद्वेगजनक प्रकार आढळला. एका भल्या मोठ्या कानडी लेखशिलेचा कपडे धुण्यासाठीं उपयोग केल्यामुळें तो लेख अजिबात कामांतून गेला आहे. येथील कारभारी श्रीयुत प्रधान यांची भेट घेऊन विचारपूस करतां त्यांनाही लेखप्रसिद्धीचें काम व्हावें असें वाटत असल्याचें दिसलें. पण सर्व लेखांचे ठसे घेणें २।३ दिवसांचें काम असल्यानें व मला लौकर परत यावयाचें असल्यानें तें काम तसेंच सोडून परत फिरलों.

या दोन सफरींत जो अनुभव आला त्याचा इत्यर्थ असाः—

(१) मध्ययुगीन इतिहासरचनेस उपयुक्त असें शिलालेख, ताम्रपट, देवळें, नाणीं, वगैरे साहित्य अत्यंत विपुल आहे.

(२) मुसलमानांच्या सर्वविध्वंसक शक्तीचा या साहित्यावर परिणाम झाला आहे हें खरें. पण सध्यां अस्तित्वांत असलेलें साहित्यही कांहीं कमी नाहीं.

(३) हें सर्व साहित्य काल, लोकांचें अज्ञान व राज्यकर्त्यांची विध्वंसक शक्ती किंवा अनास्था यामुळें प्रत्यहीं कमी होत आहे.

या प्रवासांत श्री. नारायण सखाराम तांबे (माळशिरस), श्री. कुळकर्णी मास्तर (माळेगांव), श्री. शंकरराव सरदेसाई (फलटण), श्री. कुळकर्णी मास्तर (वेळापूर), श्री. विठ्ठलराव, श्री. अंबादास व श्री. विनायकराव बडवे (शिंगणापूर), श्री. नारायणराव आराध्ये (पुळुंज), श्री. वि. द. रानडे वकील व श्री. खुलासे (बार्शी), श्री. भाऊसाहेब व श्री. शिवाजीराव चौसाळकर आणि श्री. रामभाऊ पांडे (आंबेजोगाई), श्री. नानासाो देशमुख (मार्डी), श्री. बळवंतराव अध्यापक (सोलापूर), श्री. माटे वैद्य (वळसंग) व श्री. राजोपाध्ये वकील (अक्कलकोट) या सद्‌गृहस्थांनीं त्या त्या ठिकाणीं मला अमूल्य मदत केली याबद्दल या सर्वांचे आभार मानणें आवश्यक आहे.

संशोधनवृत्त[1].

(श्री. शं. ना. जोशी–वांईकर)

श. १८४९ सालीं सातारा जिल्ह्यांत संशोधनासाठीं हिंडत असतां जी माहिती व सामुग्री मिळाली तिचें संकलन थोडक्यांत पुढें देत आहे.

कोरेगांव–येथें बोकील, दिवाण व बर्गे हीं तीन जुनीं प्रसिद्ध घराणीं आहेत. **बोकिलां**संबंधींची हकीकत कळली ती अशीः– हे मूळ जोगाईच्या आंब्याचे. कृष्णाजीपंत बापू ह्या नांवाच्या पुरुषानें, शिवाजीच्या वेळीं, जोशी घराण्याकडून त्यांचे गुमास्ते असतां कुलकर्णीपणाचें वतन संपादिलें. ह्या जोशांचें आडनांव क्षीरसागर. कृष्णाजीपंत समर्थशिष्यांपैकीं होते. समर्थांनीं बहेबोरगांवीं ' अक्षोभ्य ' डोहांत उडी टाकिली तेव्हां समर्थांच्या कमरेस धरून किंवा समर्थांबरोबरच ज्यांनीं दुसरी उडी टाकिली ते हेच कृष्णाजीपंत बोकील. समर्थांनीं ह्यांना श्रीरामाची मूर्ति दिली व ' प्रपंच कर जा ' असें सांगून निरोप दिला. त्यावर ह्या कृष्णाजीपंतांनीं कोरेगांवास येऊन वाडा बांधला. जुन्या कोरेगांवीं पुरेशी जागा मिळेना म्हणून हल्लींचा हा वाडा बांधला व त्याच्या आसपासच्या वस्तीचें हें नवें कोरेगांव वसविलें. सांप्रत आणखी

---

१ १६ वें सम्मेलन शक १८४९

नवी वस्ती व व्यापारव्यवहार वाढून ह्या नव्या कोरेगांवालाहि जुनें कोरेगांव ठरविणारें नवें कोरेगांव होत आहे. ह्या बोकिलांचें कुलदैवत तुळजापूरची तुळजाभवानी हें आहे. ह्या घराण्याला शिवाजी महाराज, पेशवे, प्रतिनिधी अशा तिघांकडून उत्पन्न मिळालें आहे. प्रत्यक्ष सनदा पाहण्यास मिळाल्या नाहींत. जळून गेल्या असें सांगतात. प्रतापसिंह महाराजांनीं त्यांचें उत्पन्न १२ वर्षें जप्त केलें होतें तें मोकळें करून त्यांनींच त्यांस नव्या सनदा १८३९सालीं दिल्या असें कळलें. प्रतिनिधींनीं श्री यमाई देवीचा सोन्याचा नवा टाक केल्यावर जुना टाक खंडोपंत आबा बोकील यांस देऊन कांहीं उत्पन्नहि दिलें. तें अद्याप चालूं असून देवीचा उत्सवहि चांगला होत असतो. त्यांच्याच पैकीं कृष्णाजीपंत बोकील हे पेशव्यांचे दरबारीं प्रतिनिधीतर्फे वकील होते. हल्लीं त्यांस कोरेगांव तालुक्यांतच आंबवडें, सांगवी, कोरेगांव; खानापूर तालुक्यांत उपाळे, मायणी; जावळीकडे पुनवडी व तळोशी त्या गांवीं जमीनी आहेत. नक्त नेमणूक कोरेगांव तहशीलींतून १६० रु. व वांईतून ११२ रु. आहे. त्या नेमणुका स्वारीपट्टीबद्दल व आपासाो महाराजांनीं दिलेल्या आहेत. धर्मशाळाही बोकिलांच्याच मालकीची असल्याचें सांगितलें. अभंग रामायणाचा कर्ता नरहरिदास हा कोरेगांवचा. हा रामदासपंथी आहे. ह्याच्या गुरुपरंपरेंत रामदास आहेत. यानें कांहीं पदेंहि केलीं आहेत. [इ. वृ. १८३४ पृ. १४७,१४८]. पण हा बोकील कीं कोण याचा पत्ता तेव्हां मला लागला नाहीं. बोकिलांचे वाड्यांत शेवटचे बाजीराव यांचा मुक्काम होता. बोकिलांच्या दोन शाखा आहेत. २ शाखा मिळून २५।३० घरें आहेत. दुसरें घराणें **दिवाणांचें**. हें एकच घर आहे. हे मूळचे बावधनचे. हे कण्वशाखीय आहेत. यांचें आडनांव किरकोळे. गोत्र भारद्वाज. यांचे मूळ पुरुष गणेशपंत किरकोळे. त्यांचे नातू शामराव अंबाजी. ह्या शामराव अंबाजीची हकीकत अशीः— पेशवे यांचे ऋणानुबंधी घराण्यांपैकीं एक बापूजी श्रीपतचें घराणें. बाबूजी असें कोठें कोठें छापलें गेलें आहे, तेथें बापूजी असें पाहिजे. बापूजी श्रीपतचें आडनांव चित्राव. हे पंतसचीवातर्फे पुरंदरचे अमलदार होते. पुरंदर गड जेव्हां पेशव्यांकडे आला तेव्हांपासून हे पेशव्यांचे दिमतीस आले. बापूजी श्रीपत म्हणजे बापूजीपंत नाना हे आणि यांचे चिरंजीव श्रीपत बापूजी ह्यांनीं पुण्याची सुभेदारी अव्वल पेशवाईत बरींच वर्षें केली आहे. राघोबादादांनीं अहमदाबाद घेतली तेव्हां तेथें श्रीपत बापूजीस अमलदार नेमिलें. पुढें ह्यांचा निर्वंश झाला. ह्या बापूजीपंतनानांचे भाचे ते हे शामराव अंबाजी किरकोळे. शामराव अंबाजीहि पुरंदरचे अधिकारी होते व पुण्याचे सुभेदार होते. पुढें ह्यांनीं व ह्यांच्या श्रीनिवास शामराव ह्या मुलानें वांईची सुभेदारी केली. शामराव अंबाजीस तीन मुलगे. श्रीनिवास शामराव, सदाशिव शामराव व जगजीवन शामराव. पैकीं वडील जे श्रीनिवास शामराव त्यांची शाखा ही कोरेगांवच्या दिवाण घराण्याची. वांई प्रांतावर शामराव अंबाजी हे अमलदार होऊन आले तेव्हां त्यांस

पेशव्यांकडून बेलवडें गांवाशिवाय नवीन उत्पन्नहि मिळालें. ह्या किरकोळ्यांचें दैवत व्यंकटेशाचें. ह्या व्यंकटेशासहि एक गांव इनाम आहे. वाईप्रांताची जमीन मोजणी ह्याच शामराव अंबाजींनीं केली. वाईप्रांतीं अशी लोकभाषा ऐकूं येते कीं, पुणें ते बेळगांव पर्यंतची नजरपाहणी शामरावांनीं केली व तेव्हांपासून हे दिवाण झाले. बापूजी श्रीपत व शामराव अंबाजी ह्यांचे शिक्क्याचे कागद बरेच मिळतात. विसाजी कृष्ण बिनीवाले यांचा उदय होण्यास शामराम अंबाजीच कारण झाले आहेत. येथें एक सांगितलें पाहिजे कीं, स्थलकालव्यक्तींचा वाटेल तसा विपर्यास करून 'गोष्टीवळा'-वर भर असलेल्या बखरग्रंथांतहि क्वचित् व केव्हां केव्हां बरोबर हकीकत सांपडते. तसा प्रकार सोहनी यांच्या पेशव्यांच्या बखरीसंबंधानें थोडासा झाला आहे. ह्या बखरींत बापूजीपंतनानाची बरीच व बहुतेक विश्वसनीय अशी हकीकत दिली आहे. यांचें आडनांव चित्राव हें किंवा हे देशस्थ ऋग्वेदी कां कण्वशाखीय हें दिलेलें नाहीं. पण इतर माहिती बरीच असून ती बरीच विश्वासनीयहि आहे. असो. श्रीनिवास शामराव ह्यांचा वाडा बावधनास व पुण्यास कसबापेठेंत होता. ह्या तीन बंधूंपैकीं दोघांचा वंश पुण्याकडे असून त्यांस भोरसंस्थानपैकीं खोपी हें गांव इनाम असून पुणें जिल्ह्यांतलि पुरंदर तालुक्यांत भिवडी गांवीं बरीचशी जमीन आहे. कोरेगांवास असलेल्या दिवाण घराण्यास २५००० रु. नक्त नेमणूक करून गांवें खालसा केलीं. स. १८५७ सालच्या बंडांत ही नेमणूक ५००० वर आली. पुढें ही नेमणूक विद्यमान रा. वामन नारायण किरकोळे यांच्या आजीपर्यंत चालूं होती. १८६४ सनांत ५८३९ च्या आकाराची जमीन ठेऊन दरमहा २५० रु म्ह. वर्षाचे ३००० देऊं लागले. आजीच्या पश्चात् तेहि रुपये मिळेनासे झाले. ह्यांचा वाडा ३ चौकी आहे म्हणजे होता. तो ३ वेळां अग्निमुखीं पडला. ह्या वाड्यांतलि विहरींत एक शिलालेख आहे. कोरेगांवचें गांवठाण पूर्वी केदारेश्वराकडे असावें. ह्या केदारश्वराचें मंदिरांत दोन शिलालेख आहेत. एक दोन ओळींचा व देवालयांत शिरतांना उजव्या हाताशीं आहे. 'सिद्जी बोबडा' अशी त्याची पहिली ओळ आहे. ह्यांतील बरेंचें वळण मोडी पण काना, मात्रा बाळबोधी रीतीचा आहे. दुसरा लेख उजव्या हाताशींच पण देवालयास टेकून उभा आहे. शिला उभी सुमारें १॥ हात उंच व हातभर रुंद आहे. प्रारंभीं सूर्यचंद्राकृती असून त्याखालीं नंदी सन्मुख असें शिवलिंग आहे. आणि नंतर पृष्ठमात्रांकित लेख आहे. लेखाच्या नऊ ओळींनंतर गधागाळ चिन्ह आहे. कोरेगांवचें तिसरें घराणें **बर्गे**. ह्यांची येथें बरींच घरें आहेत. पाटीलही हेच आहेत. मूळ पाटीलकी बोबडे यांची. तेल्यांची असेंहि ऐकिलें. बोबडवाडी म्हणून जवळच वाडीही आहे. यांजकडे कदाचित् कागद असतील. मला तेव्हां मिळाले नाहींत. बर्गे यांजकडे मी शोध केला नाहीं. कोरेगांवची मीं दिली ह्यापैकीं कांहींसुद्धां माहिती गॅझिटिअरमध्यें नाहीं.

पुसेगांव येथें जाधव आडनांवांचीं घराणीं पुष्कळ आहेत. निमी पाटीलकी पाडळीच्या

(खंडाळें) धायगुड्यांची आहे. ती जाधवांकडून एका धायगुड्यानें विकत घेतली आहे. हल्लीं चालू आहे. येथील महार मंडळींचें आडनांव मसणे व कांबळे. आसपासच्या गांवच्या हद्दी पुसल्या व गांव वसविलें. तें पुसेगांव, अशी गांवनांवाची पीठिका सांगतात. येथील कुलकर्णी अभंग आडनांवाचे. त्यांचें वावर म्हणून एक शेत आहे. हें गांव प्रथम प्रतिनिधीकडे होतें. येथें दामोदरपंत जोशी यांजकडे कागद पाहिले. पोथ्या बऱ्याच आहेत. पण तेव्हां पाहण्यास मिळाल्या नाहीत. येथून **नेर** येथें गेलों.

नेरास काशीविश्वेश्वराच्या मंदिरांत खांबावर दोन शिलालेख आहेत. डाव्या खांबावर ७।८ ओळी व उजव्या खांबावर ४।६ ओळी आहेत. एक लेख श्री. ग. ह. खरे यांनीं आतां छापला आहे. * जाधव मंडळींचीं घराणीं येथें फार आहेत.

नेरचें मूळ नांव चांपानेर. नेरचें काशीविश्वेश्वर मंदीर औरंगजेबानें उध्वस्त केलें होतें. पण गांवकऱ्यांनीं पुनः बांधिलें. नेरच्या शिवारांतच औरंगजेबाच्या सैन्याचा तळ होता. त्या जागेस पालुमाळ म्हणतात. एका पा. स.त नेरच्या लढाईची हकीकत मी दिली आहे तें हेंच नेर. येथें चौसष्टणी म्हणून हुडयावर एक स्थान आहे. त्याची हकीकत अशीः– मूळांत नेर जेव्हां वसलें तेव्हां ब्राम्हण पाटील होता. त्याला चार मुली होत्या. तो काशीस निघाला तेव्हां डाव धरून त्यास ठार केलें व पुढें मुली मेल्या. त्या ह्या चौसष्टणी म्ह. ४ सवाष्णी. कारींचे जेधे हे मूळचे नेरकडील. नेर जवळच एक पाहण्यासारखें **नागनाथ**मंदीर आहे. श्रावणांत येथें नाग निघतो व त्यास यात्रेकरू पुरुष आपल्या हातांत, बायका आपल्या पदरांत घेऊन, आतां कामनापूर्ती होणार असें मानतात. नाग चावत नाहीं. ह्या नागाच्या लांबी, रुंदी, रंग इ. चिन्हांवरून भविष्यें वर्तवितात. व अशापैकीं बऱ्याच गोष्टी इकडे कानीं येतात. ललगुण गांवाखालील नागनाथमंदीर नागनाथवाडींत आहे. नागनाथाची उत्पत्ति नेहमींप्रमाणें म्ह. जंगल, गाय, तिचें दूध विशिष्ट ठिकाणीं अपसुखांच गळणें, व नंतर दृष्टांत, चुकून काठी मारली तों डोळा फुटला व तोच हा नागनाथ अशी आहे. जमिनीपासून ३॥ पुरुष खोल नाथाची पिंडी आहे व ती नेहमीं पाण्यांत असतें. यात्रेच्या वेळीं किंवा अन्य एकाद्या सणवारीं, सोमवारीं देवालयाला अगदीं लागूनच एक मोटेची विहीर आहे, तिला मोट चालू करून ४।५ तास पाणी ओढून देव रिकामा करतात. वर दिसणाऱ्या शाळुंकेच्या आंत पांच गुप्त लिंगें आहेत. ह्या नाथास बुधचे राजे घाटगे यांजकडून कांहीं उत्पन्न आहे. जवळ पश्चिम अंगास पूर्व-पश्चिम असा असलेला डोंगर एका मुसलमानास इनाम आहे. ह्या मुसलमानाचा चिमणगांवीं व ह्या डोंगरावरही वाडा व तलाव आहे. वंशज कलेढोण मायणीस राहतात असें कळलें. नेरहून **खातगुण** येथें गेलों. येथें लावंड उपनावाचीं मराठी घराणीं आहेत. पाटिलकी ह्यांजकडेच आहे. कारखानिसहि आहेत. गांवांत नैर्ऋत्य दिशेस एक मशीद आहे. हिंदू देवळाप्रमाणें गाभारा असून हिंदु व मुसलमान दान्ही ह्याचे उपासक

* त्रैमासिक वर्ष १० पृ. १३३

व भक्त आहेत. यात्रा १५००० पर्यंत भरते. बकऱ्यांचा वध अधिच होतो. त्याकरितां स्वतंत्र फरशी व रक्त वाहाण्यास मोरी बांधली आहे! येथून कृष्णरावाच्या खट्वांगनगरीस म्हणजे **खटावास** गेलों. सातारा जि० तील प्रेक्षणीय व जुनीं ठिकाणें पहाण्याच्या गांवांपैकीं हें एक प्रमुख आहे. ऐतिहासिक काळांत येथेंच तालुक्याचें मुख्य ठाणें होतें. हल्लीं ८ मैलांवर वडूज येथें आहे. गांवाला गांवकुसूं असून पूर्व–पश्चिम टोकाला दोन मोठ्या वेशी आहेत. खटावचीं देवालयें फार मोठीं नाहींत. पण फार जुनीं व अवश्य पाहण्याजोगीं व शिल्पाचा अभ्यास करण्याचीं स्थलें आहेत. येथील प्रमुख मंदिरें अशीः– गांवाच्या बाहेर वायव्येस महादेवाचें मंदीर आहे. चांगल्या मोठाल्या व एकाच बाजूनें घडलेल्या धोंड्यांचें हें देऊळ आहे. धोंड्यांची घडलेली बाजू आंत व ओबड धोबड बाजू बाहेर आहे. नक्षी नाजूक व घोटीव काम अगदीं आरसपानीं आहे. देवालयाचा मंडप व गाभारा असे दोनच भाग आहेत. मंडपाला १६ दगडी खांब आहेत. ते बुडाशीं चौकोनी, मध्यें, वाटोळे व शेंडयास चार बाजूला चार कमानीचे अशा प्रकारचे आहेत. सभामंडपाचें छतहि नक्षीदार व बांधणी समकेंद्र चौकोनी धोंड्यांची आहे. सबंध इमारत चुन्याशिवाय केवल पाषाणमय आहे. पागोळ्या दगडीच आहेत. पण दुरुस्त दिसल्या. त्या चुन्यानें सांधलेल्या आहेत. आतां धोंडे थोडे सुटलेले दिसतात. यापेक्षां याचें जास्त वर्णन द्यावयाचें म्हणजे एकवार जाऊन अगत्य पहा असें सांगण्यानेंच होणार आहे. या देवालयाजवळच याहीपेक्षां मोठ्या धोंड्यांचें मारुतीचें देवालय आहे. तेंहि महादेवाच्या देवालयांप्रमाणेंच वर्णनीय व प्रेक्षणीय आहे. गांवांत लक्ष्मीनारायणाचें मंदिर उत्तराभिमुखी आहे. तें तर फारच सुंदर व प्रशस्त आहे. दगडी २ जुने सभामंडप असून लांकडी मोठा मंडप नवीन आहे. गाभारा अर्थात् दगडीच आहे. त्यांतहि चुन्याविटांचा संबंध नाहीं. मूर्तीहि कोरलेल्या पाहण्याजोग्या आहेत. ४ थें देवालय ह्या तीन देवालयाइतकें जुनें नाहीं. तें पिंपळेश्वराचें आहे. पिंपळ आसपास बरेच आहेत. पिप्पलाद ऋषींनीं वेदावती म्हणजे येरळा नदीकांठीं तप केलें तें हें स्थान असें सांगतात. खटाव ता० तच अथर्ववेदी घराणीं आहेत. त्यांच्या पिप्पलाद शाखेशींहि ह्या देवालयाचा संबंध लावितां येईल. मांगीशमाहात्म्य म्हणून जो हस्तलिखित ग्रंथ शिखरशिंगणापुरास पाहण्यास मिळाला, त्यांत पृ. १५ वर पिंपळेश्वर वर्णन आहे. ह्या पिंपळेश्वरास दरसाल १०० रु. ची नेमणूक आहे. पूर्वी देशमुख घराण्यांकडून उत्पन्न बरेंच असे. व्यवस्था पंचांमार्फत आहे. खटावांत आतां अलीकडे एक जुनाट बारव म्ह. विहीर सांपडली. तींतील माती वगैरे काढून ती खुली केली आहे. ही चौकोनी असून मोठी आहे. विहिरीस चारी बाजूंनीं पायऱ्या आहेत. विहिरीचें एकंदर काम जुनें व एकदां पाहण्यासारखें आहे. खटावास देशमुख (फडतरे), देशपांडे (भालवणे) नायकवाडी, काजी, जोशी, इत्यादि वतनदार व जुनीं घराणीं आहेत. त्यांत इतिहास-

प्रसिद्ध कृष्णराव खटावकरांचें हें विशेष ख्यात आहे. ह्या गांवाचा उल्लेख स. १४२९ पासून आढळतो. मलीक उत्तुजारनें येथील रामोशांवर चाल केली असें आढळतें. हें गांव चांगलें गढीबंद व लढाऊ आहे. खटावकरांचीं कांहीं हकीकत रिसायतींत, मंडळाच्या पुस्तकांत व इतिहाससंग्रहांत प्रसिद्ध झाली आहे. त्यापेक्षां अधिक व पुऱ्या माहिती-करितां मी चौकशी केली; पण कागद नाहींत असें कळलें. हल्लीं ह्या खटावकरांचीं बरींच घराणीं येथें असून चांगलीं संपन्न व सुशिक्षित आहेत. ह्यांचे वाड्यांत कृष्णरावांच्या वेळचें दत्तात्रेयाचें मंदिर आहे. खटावास गडदू जमीन नं. ४० व ३१ येथें शिलालेख आहेत. खटावचें देशपांडेपण नाशरेकर यांजकडे एके कालीं होतें असेंही ऐकलें. फडतरे देशमुखांकडे कागद पहाण्याचा प्रयत्न केला पण जमलें नाहीं. खटावास एक वैद्य कुलकर्णी आहेत. त्यांजकडीलहि कांहीं कागद पाहिले. खटावची पाटिलकी पूर्वीं देशमुखांकडेच होती. हल्लीं शिंदे यांजकडे आली. साताराचे आप्पासाहेब महाराजांनीं खंडूजी शिंदे म्हणून आपल्या मनुष्यास ही दिली. तेव्हांपासून शिंदे यांजकडे आहे. येथील रा. दत्तोपंत देशपांडे यांजकडे बरेच कागद आहेत. ते खटावपासून १०।१२ मैलांवरील **मांडवे** येथें रहात असत. तेव्हां मी तेथें गेलों. यांनीं नवरात्रांत रोज सप्तशतीचा पाठ म्हणण्याची गरज होती; ती मी भागविली व मला त्यांनीं ९।१० दिवस राहवून माळ्यावरील दप्तरें व पेटाऱ्यांतील पोथ्या दाखविण्याचें ठरविलें. पोथ्या पाहण्याच्या राहिल्या. पण कागद पाहिले. बरेचसे येथें आणण्यास रा. दत्तोपंतांनीं परवानगी दिली. खटावची लढाई, शाहूच्या वेळचे सरकारकुनांची याद, कांहीं महजर व वंशावळी, दुर्गादेवीच्या दुष्काळानंतर खटावप्रांताची जी फेर वसाहत झाली त्याबद्दलचे कांहीं कागद अशी सामुग्री मिळाली. पृष्ठमात्रेचे अथर्ववेदांतील वेदग्रंथ ह्यांजकडे आहेत. ह्यांच्या कागदां-पैकीं कांहींवर निबंध लिहून ते पाक्षिक सभेंत वाचले आहेत. मला ऐतिहासिक कागदांची प्राप्ती अशी येथेंच झाली. नवरात्रानंतर देशपांडे यांजकडे सांवत्सरिक श्राद्ध होतें तें उरकून मी पुढें दहिवडीस चालू झालों. दहिवडीस देशमुख, फडतरे मास्तर यांजकडे एक महजर पाहिला. त्यांत शिवाजीमहाराजांच्या नेताजी पालकरानें गांवावर खंडणी बसविली असा उल्लेख आहे. खटाव प्रांतांतील विजापूरच्या वाटेवरील व जवळच्या गांवांचा उल्लेख शिवभारतांत आला आहे तो ह्यावरून खरा ठरतो. शिवाजीमहाराजांनीं अफजल पुरा केल्यानंतर ह्या नेताजीनें बरीच लांबवर चाल करून खंडणी घेतली असा निर्देश येथें आहे. [अ. २३ श्लो. ५८–६१] दहिवडीस कागदांचा तपास केला. प्राप्ति झाली नाहीं. तेव्हां तेथून वावरहिऱ्यास गेलों. येथें पानलिंगाचें मंदीर आहे. तेथूनच बोंबलदरा लागतो. तेथील पाटील धनगर आहेत. आडनांव पांढरे. वावरहिरें, गोंदवलें, पिंगळी, नातेपुतें व मलवडी ह्या गांवचे कुलकर्णी घुगरदरेकर. प्रसिद्ध गोंदवलेकर महाराज हे घुगरदरेकर कुळकर्ण्यांपैकींच. येथें कागद मिळाले नाहींत. पण आहेत. पुनः गेलें पाहिजे.

शिंगणापूर हें महाराष्ट्राचें आद्यदैवत होय. मालोजी भोसले यांनीं तळें बांधिलें तें येथेंच. शंभू महादेवास जातांना वाटेवर उजव्या अंगास एक लहानसें देवालय आहे. ती शांतलिंग स्वामी यांची समाधी आहे. पुण्याईचे गहाणखताची काशीची गोष्ट आहे ती त्यांच्यापैकींच (भारत वर्ष). जरा पुढें गेलें कीं खडकेश्वर आहे. शाहू राजाजवळ बसवंतराव खोजा म्हणून जो होता त्यानें ह्या देवळाची पुनः दुरुस्ती केली. ठिकाठिकाणीं 'शाहूचरणीं तत्पर बसवंतराव निरंतर' असें खोदलेलें आहे. ह्या बसवंत खोजाची हकीकत शेडगांवकर बखरींत बरीच आहे. हा जातीचा वाणी होता. आडनांव कासुरडे. ह्यास द्रव्यप्राप्ती झाली ह्याचें मोठें विस्मयोत्पादक कारण तेथें दिलें आहे. व त्यामुळें त्यास खोजा असें म्हणूं लागलें. विरूबाई हीहि जातीची वाणीण होती असें तेथें म्हटलें आहे. खं. ३ ले.१८ वर लिंबच्या १६ मोटांच्या विहीरीवरील लेख दिला आहे (श्रीमंत सौ. विरूबाई-साहेब चरणीं तत्पर । बसवंतराव निरंतर॥). खासखेल ही पदवी खं.३ ले. १२८ पृ.१०६ मध्यें दिसून येते. असो. शिखरावर खाजिन्याचे खोलींत भिंतींत एक शिलालेख आहे. तो पाहण्यास मिळाला नाहीं. देवालयाचें शिखर गोपुरासारखें आहे. अमृतेश्वराचें देऊळहि जुनें व उत्तम आहे. हें बळी महादेवाचें देऊळ. मुख्य देवालयाला शिवाजीनें उत्पन्न दिलें असावें. कारण फुलारी यांस फुलाच्या व्यवस्थेकरितां जिजाबाईनीं दिलेली देणगी पुढें चालू ठेवण्याविषयींची श. १६०१ ची सनद मला मिळाली आहे. ती एका पा. स. त मांडिली. नात्यापुत्यास जिराइतखानें यांचें घराणें आहे. यांजकडे कांहीं कागद मिळाले त्यांच्या नकला घेतल्या आहेत. शिंगणापुरास छत्रपतींचा वाडा होता. कारण नारायणराव बल्लाळ प्रधान यांचें एक पत्र नागोजी झुंजारराव घाटगे यांस दिलेलें उपलब्ध झालें आहे. त्यांत पुढील मजकूर आहे. 'भटंभट बिन गोपालभट फुलारी यांस राहावयास वाडा छत्रपती यांचा तेथें सखोजी गौळी राहत असे तो आतां तंटा करतो तरी त्यास ताकीद द्यावी'. तसेंच ताराबाईचेंहि देशमूखदेशपांडे यांस ताकीदपत्र आहे. त्यांत आहे कीं, ' गोपाल फुलारी यांस सरकारचा वाडा दिला असतां हैबती गौळी तंटा करतो तरी त्यास दूर करावें.' 'जिजाई आऊसाहेबी श्रीचे उत्साहाबद्दल पातशाही होन ५०—नंदादीप १० विठोजी दिवट्या २ शंकरभट मिठे ११ शिवलिंग-जंगम २ बुरंगीं वाद्य वाजविणें बा। भागाई फुलारीण अन्नछत्राबा। २० ॥ देवजी पुजारी ४॥ सदर सोण्याचा—अशा तपशिलासह दिले आहेत. आणि हे ' इंद्रा-पूरच्या देशमुखीवरी देविले होते. अलीकडे इंदापूरची देशमुखी हिंदुराव घोरपडे यांस दिली. करतां खलेल जाली सबब देत जाणेविषयीं ' राजाराम छत्रपती यांनीं रामचंद्र पंडित अमात्य यांस आज्ञा केली आहे. राज्याभिषेक श. २० चें हें आज्ञापत्र आहे. शिंगणापूर हें घाटगे यांजकडून प्रथम महादेवास इनाम होतें. शिंगणापूरची पाटिलकी भोसल्यांकडेच आहे. शिंगणापूरचें फुलारी—घराणें ब्राह्मण असून शिवकालीन आहे. ह्यास संभाजी छत्रपतींनीं ५ बिघे जमीन दिली आहे.

Original from

शिवाजी महाराजांनीं पातशाही होन ५ आईस लुगडी २ होन १ ऐकून ६ होनांची मोईम दिली आहे.

शिखरशिंगणापूरच्या देवालयदुरुस्तीसंबंधीं एक उतारा† तेथें श्री. अण्णासो मिंडे यांजकडे मिळाला तो संग्राह्य वाटल्यावरून येथें देत आहें.

' शिखराचें काम पुरातन होतें तें पाडून राजश्री बसापा खोजे यांनीं करावयास प्रारंभ केला त्यावर हवालदार बाजी गोळे व कारकून बयाची(जी) पंत ठेविले होते त्याच्या हाताखालीं महादाजी बाजी घाडगे देशमुख कर्यात मलेवाडी यांनीं कारेगार पाथरटांचे नाईक तिघे दिले. त्यांचीं नांवें— म्हाळोजी नाईक थळवंते, गंगाजी नाईक उबाळे व तिसरा सुलतानची(जी) नाईक शिखरे ऐसे दिल्हे व लोणारी यांचे नाईक दोघे दिले. त्यांचीं नांवें मानाजी नाईक कर्वे व शाबाजी नाईक कर्वे असे पाचजण दिले. काम चालीस लागलें. दरमहा २ रु. एक हजार खर्चत. शेके १६५७ राक्षसनामसंवत्सरे श्रावण वद्य १४ बुधवारीं दोन घटिकांत मौजे मोहेच्या मार्गीं श्री. बेटादेवासनिध पुष्य नक्षत्रीं पहिले तासीं गूळ वाटून प्रारंभ केला. त्या खाणींतिल दगडाची चवकट व तिनि खांब व कर्णख्याले किरकोळ धोंडे आणिले व कोरांडे येथील खाणीचे तुळवट मात्र आणिले. कित्येक थोर धोंडे येथे मिळत नव्हते ते तेथून आणीत होते.

शेके १६५८ नलनामसंवत्सरे चैत्र वद्य १२ रविवारीं पूर्वाभाद्रपदा नक्षत्रीं अभिजित् मुहूर्तीं दोन प्रहरा देवालय पाडावयास आरंभ केला. अडीच महिने पाडावयास लागले. चैत्र वद्य १२ पासून अधिक मासासह ज्येष्ठ शुा ११ पर्यंत पाडिले. उपरांतिक देवळाचा पाया घालावयास मुहूर्त ज्येष्ठ शुा १२।१३ अनुराधानक्षत्रीं चतुर्थ प्रहरीं बुधवारीं पायाचा चिरा मांडावयास राजश्री महादजी बाजी घाटगे देशमुख व समर्षीहून नाना जोशी व कित्येक ब्राह्मण येतेसमयीं राजश्री बसवंतराव खोजे घेऊन आले. क्षेत्रींचे ब्राह्मण परशराम काळो बडवे व गंगाधर भट जोशी व समस्त क्षेत्रस्थ उभयतां होते. पुण्याहवाचन याज्ञिक करून धोंड्याचें पूजन करून गर्ता खाणून धोंड्यांचा डबा केला होता त्यांत रुप्याचें संपुष्ट घालून त्यामध्यें पंचरत्नें, मोहोर व एक रुपया संपुष्टांत घालून निक्षेपण केलें. वरी मुहूर्तेंकरून चिरा मांडिला.

---

† हा उतारा २० वर्षांपूर्वी ' मराठी शिक्षका'त आल्याचें कळतें.

१ यांचे वंशज शिंगणापुरीं असून त्यांचेकडे यात्रेकरू लोकांच्या नवसाच्या पायऱ्या बांधण्याचें व पालखीस खांदा देण्याचें काम आहे. २ ता. ६ आगष्ट १७३५ इ. ३ कारुंडे जि. सोलापूर. ४ ता. २८ मार्च १७३६ इ. ५ ता. ९ जून १७३६ इ. ६ यांचे वंशज कुकुडवाड येथें आहेत.

उपरांतिक श्रीदेव व जोतिषी व बडवे व देशमुख व देशपांडे यांस वस्त्रें दिलीं व तद्दिनीं अन्नसंतर्पण केलें.

शके १६६२ रौद्रनाम संवत्सरे श्रावण[1] शुा ८ सोमवारीं विशाखा नक्षत्रीं चतुर्थ प्रहरीं ध्वजा समाप्त करून वरी कळस मुलामगिरीचा बसविला. ध्वजा समाप्त जाली. ध्वजेस गिलाव्याचें काम चालीस लागलें. येकुण चार वर्षें दोन महिने देवालयाच्या कामास लागलें.

शके १६६२ रौद्र नाम संवत्सरे अश्वीन[2] शुा १० स पुढील मंडप विसर्जन करून पाया खाणावयास लागलें.

शके १६६२ रौद्र नाम संवत्सरे शशिरऋतौ माघ[3] शुा १३ रविवारीं श्रीशंभुच्या देवालयाचे उद्यापनास प्रारंभ केला. चतुर्दशी सोमवारीं संध्याकाळीं श्रीशंभु आच्छादित होता. त्याचें उद्धरण केलें. शांत्यर्थ नवकुंडी विधान केले. देवालयाचे पश्चिमभागासंनिध लक्ष होम केला. माघ[4] वद्य ५ रविवारीं यज्ञ समाप्त जाला. त्यावर लिंग होतें. ते तळ्यांत जलप्रवाह केला. उद्धरणलिंगावर वृहिभात घातला मण अकरा व पंचभक्ष परमान्न नैवेद्य याचा मणाचा केला. घागरीनें पंचामृत स्नान घालून एक अतिरुद्र अभिषेक केला. ब्राम्हणांस दक्षणा, गोप्रदानें द्रव्यद्वारा दिलीं. ऋत्विज ब्राम्हणांस हस्तमुद्रा, कर्णमुद्रा, सोवळीं व शाला व आसनें व तांबे प्रत्येकास मोहोर दक्षणा दिली. शके १६६२ रौद्रनामसंवत्सरे माघ[5] वद्य ८ गुरुवारीं चतुर्थ प्रहरीं गोधूळलग्नीं श्री-अमृतेश्वर प्रवर्तक नाम चिंचणलिंग उद्धरणी एका कुंडांत नवकुंडी होम केला. एकूण यज्ञ बारा दिवसपर्यंत झाला. संतर्पण पंधरा दिवस सांग केलें.

पुढें देवाच्या पुजेस चौघे बडवे ठेविले. ३ जंगमाचीं दोन भंडारघरें ठेविलीं. त्यांच्या रखवालीस कोळी ठेविले.

शंभुमहादेवासंबंधानें नवीन मिळाली तेवढी माहिति येथें द्यावयास हवी. ती मीं दिली आहे.

एकंदर सुमारें १० दहा गांवीं मी संशोधनार्थ संचार केला. श्री. भोसले वकील कोरेगांव, श्री. शंकरराव कुलकर्णी नेर, श्री. दामोदरपंत जोशी पुसेगांव, श्री. इनामदार वकील खटाव, श्री. दत्तोपंत देशपांडे मांडवे, श्री. देव वकील दहिवडी, श्री. अण्णासो मिडे, व श्री. बडवे मंडळी शिंगणापूर, श्री. जिराइतखाने नातेपुते, ह्या गृहस्थांच्या साह्यामुळें मला हें कार्य करतां आलें. म्हणून त्यांचा येथें साभार निर्देश करीत आहे.

---

१ ता. २१ जुलै १७४० इ. २ ता. १९ सप्टेंबर १७४० इ. ३ ता. १८ जानेवारी १७४१ इ. ४ ता. २५ जानेवारी १७४१ इ. ५ ता. २९ जानेवारी १७४१ इ.

Original from

चर्चा

शिवाजीचे राज्याभिषेकावेळचे अष्टप्रधान.

(श्री. चिं. वि. वैद्य.)

ग्रँट डफनें हे अष्टप्रधान पुढील प्रमाणें दिले आहेत:—

१ मोरोपंत पिंगळे, पेशवा अथवा मुख्यप्रधान

२ रामचंद्रपंत बोरीकर, मुजुमदार अथवा पंतअमात्य

३ अण्णाजी दत्तो, सुरनीस अथवा पंतसचिव

४ दत्ताजी पंत, वाकनवीस अथवा मंत्री

५ हंबीरराव मोहिते, सरनौबत अथवा सेनापति

६ जनार्दनपंत हणमंते, डबीर अथवा सुमंत

७ बाळाजीपंत, न्यायाधीश

८ रघुनाथपंत, न्यायशास्त्री अथवा पंडितराव

सभासद लिहितो कीं पुढील अष्टप्रधान अष्टसंयी उभे राहिले:

१ मोरो त्रिंबक	पेशवे	अथवा	मुख्यप्रधान
२ नारो नीळकंठ बोरीकर व रामचंद्र नीळकंठ	मुजुमदार	,,	अमात्य
३ अण्णाजीपंत	सुरनीस	,,	सचिव
४ दत्ताजी त्रिंबक	वाकनीस	,,	मंत्री
५ हंबीरराव मोहिते	सरनोबत	,,	सेनापति
६ त्रिंबकजी सोनदेव यांचे पुत्र रामचंद्रपंत	डबीर	,,	सुमंत
७ निराजी रावजी	न्यायाधीश		
८ रघुनाथ पंडितराव यांचे पुत्र रायजीराव	पंडित		

दोन्ही यादींत महत्वाचे फरक आहेत. मोरो त्रिंबक डफकडे पेशवे आहेत. त्यांचें उपनांव पिंगळे. पण हे कोठचें? एक रामचंद्र नीळकंठ बोरीकर सांगतो तर सभासद नारो नीळकंठ. यांचें उपनांव काय! अण्णाजी दत्तो सुरनीस दोघांकडे एक आहे. पण यांचें आडनांव व गांव कोणतें! तीच गोष्ट दत्ताजी त्रिंबक मंत्री याची. हंबीररावापासून पुढल्या तिघांत फारच फरक आहे. एक डबीर जनार्दनपंत हणमंते सांगतो; तर सभासद त्रिंबकजी सोनदेव यांचे पुत्र रामचंद्रपंत सांगतो. हे हणमंते दिसत नाहींत. एक बाळाजीपंत न्यायाधीश सांगतो तर सभासद निराजी रावजी देतो. हा निराजी महाराजांबरोबर आग्र्यास गेला होता आणि तेथून

आल्यावर त्यास न्यायाधीश केलें असा उल्लेख सभासदांतच आहे. यांचें नांव व कुळ काय ? पंडितरावांतही फरक आहे. एक रघुनाथपंत सांगतो तर सभासद त्याचा पुत्र रायजीराव म्हणून सांगतो. रघुनाथपंत वारला होता कीं काय ? यांचें गांव व कुळ कोणतें ?

शिवचरित्रांतील तीन शंकास्पद स्थळें

(श्री. चिं. वि. वैद्य.)

१ जेधे शकावलींत शके १५८८ च्या नोंदींत ' मार्गशीर्षमासीं पीरंमिया व बाजखान देवरुखी होता झगडा होऊन मारिला हाती पाडाव केला ' अशी नोंद आहे. यास शिवचरित्रनिबंधावलींत त्रुटित उल्लेख म्हटलें आहे. याचा संदर्भ लागत नाहीं. हा पीरंमिया कोण कोठचा कळत नाहीं असेंहि पुढें सांगितलें आहे. परंतु याचा अन्यत्र उल्लेख न सांपडला तरी हे विजापुराकडील सेनापति कोंकणांतील दाभोळ प्रांतांतील देवरुख घेऊन बसले होते व शिवाजीनें आग्र्याहून सुटून आल्याबरोबर त्यांजवर स्वारी केली व लढाईंत पीरंमिया मारला जाऊन एक हत्ती पाडाव झाला व कोंकणचा हा प्रांत मोकळा झाला असा संदर्भ सरळ लागतो असें मला वाटतें. यांत अडचण काय हें लक्षांत येत नाहीं.

२ तानाजी मालुसऱ्याच्या मावळ्यांनीं सिंहगड शके १५९१ माघ वद्य ९ स घेतला, त्याचें वर्णन करतांना दोघे यावेळीं " जैसे वानर जातात त्याप्रमाणें कड्यावर चढून गेले " असें सभासद म्हणतो. हें काव्य दिसतें. घोरपड चढवून तिच्या कमरेला बांधलेल्या दोराच्या सहाय्यानें मावळे चढले असा पुढील बखरकारांचा आशय. पण त्यास समकालीन आधार नाहीं. तीहि काव्यकल्पना दिसते. मी सिंहगड पाहिला त्यावेळीं ही जागा मला दाखविली. त्यावरून असा अंदाज झाला कीं, त्या जागीं पाण्याच्या प्रवाहानें शिडीसारखी थोडी उतरती जागा झाली आहे. त्या दोघां मावळ्यांस ही वैगुण्याची जागा माहीत असावी व तिचा त्यांनीं फायदा घेऊन वर चढून इतरांकरितां दोर टाकला. तेव्हां हें म्हणणें बरोबर आहे काय ? या ठिकाणीं आणखी भिंत बांधून त्यावर बंदोबस्त केला आहे असें पाहिल्याचें स्मरतें.

३ पत्रसारसंग्रह भाग १ नं. १२३९ यांत पिराजीराव राजे यास दिलेली शिवाजी महाराजांची सनद (जाने. २८ स. १६६९ शके १५९० माघ शु. ७) दिली आहे. त्यांत महाराज शिवछत्रपति असे शब्द आहेत. सनदा व पत्रें (पारसनीस) यांत पृ. ११९ वर (नं. ११) पिराजी राजे घाटगे यास दिलेलें राजपत्र अशा मथळ्याखालीं ही सनद छापली आहे. छत्रपति हा शब्द राज्याभिषेकानंतर चालू झाला असा समज आहे. त्याविरुद्ध शके १५९० त हा शब्द येतो. त्यावरून ही सनदेची नक्कल चुकीची आहे असें ठरतें. अस्सल सनद न पाहतां नक्कल करतांना नवीन

Google Original from

मायन्यांत कदाचित् अधिक मजकूर घातला आईल. पण प्रत्यक्ष पत्राच्या नाहीं. तेव्हां याची अस्सल सनद किंवा तिचा फोटो मागवून पहावा. मुळांतच घाटगे यांजपाशीं नकल असल्यास इलाज नाहीं. पण शुद्धि नवीन घातली नाहीं असेंहि मला वाटतें. शिवाजी महाराज आग्र्याहून सुटून आल्यावर त्यांनीं राजेपण जाहीर रीत्या धारण केलेलें दिसतें. पत्र नंबर १२०० (ता.९ मार्च १६६८ शके १५९० चैत्र शु. ७) औरंगाजेबाचें शिवाजीला पत्र असून अवरंगजेबानें राजे ही पदवी दिली अशा आशयाचें आहे. तेव्हां शिवाजी महाराज यावेळीं प्रत्यक्ष राजे असून अवरंगजेबानेंहि मान्य केलेले राजे होते आणि इतर लेखांत जरी शिवाजी राजे असेंच बहुधा येतें तरी या सनदेंत म्ह. शिवाजी महाराजांनीं एका मांडलिक राजाला (पिराजी राजे यांना) लिहिलेल्या पत्रांत पिराजी राजापेक्षां कांहीं तरी वरचढ दाखविणें युक्त होतें आणि तें छत्रपति या शब्दानें दाखविलें आहे. पिराजी राजे यांस छत्र वापरण्याचा अधिकार अयुक्त याविषयीं सभासदानें पुढीलप्रमाणें उल्लेख केला आहे. (पृ २८) 'पातशाहींत छत्री वजीर उमराव मातबर लोकांस होती. तो शिरस्ता मोडून टाकिला. पातशहावरहि छत्र आणि चाकरलोकांवरहि छत्र ही गैरपद्धत. या करितां पातशाही कायदा छत्रीचा मोडून अबदागिरीचा घातला.' यावरून शिवाजीनें ही नवीन शिस्त घातली कीं फक्त शिवाजी राजावरच छत्र धरावें. इतरांनीं अबदागिर वापरावी. अर्थात् छत्रपति हेंच राजाचें, स्वतंत्र राजाचें, लक्षण महाराष्ट्रांत झालें. तेंच पुढें राज्याभिषेकाच्या वेळीं पक्कें झालें. रामायणांत दशरथ व राम दोघेच श्वेत छत्र वापरतात. शिंदे यांच्या दरबारांत पांढरी उंच छत्री फक्त शिंदे महाराजांवर धरतात. या सर्व गोष्टींचा विचार करतां वरील सनदेंत छत्रपति शब्द योग्य लाविला आहे आणि हें पद शके १५९० इतकें जुनें आहे असें मला वाटतें.

मंडळवृत्त.

पाक्षिक सभाः—फाल्गुन श. १८५२ या महिन्यांत २ पाक्षिक सभा झाल्या व ६ निबंध वाचले गेले. त्यांची यादी पुढें दिली आहे. एकंदर सर्व वर्षांत २१ पाक्षिक सभा झाल्या. सरासरी १३ सभासद व ८ पाहुणे उपस्थित होते. १६ लेखकांनीं एकंदर ७० निबंध वाचले.

पा. स.		निबंधाचें नांव	लेखक
२०	(१)	वऱ्हाड व मध्यप्रांत यांतील कार्यप्रसार	श्री. बाबासो देशपांडे
"	(२)	पेशवेकालीन दोन फारशी पत्रें	" ग. ह. खरे
२१	(३)	दोन शंका (तोंडीं)	" चिं. वि. वैद्य
"	(४)	मिरजेची बखर	" दि. वि. काळे
"	(५)	परळी येथील फारशी शिलालेख	" ग. ह. खरे
"	(६)	अलीनामा—उपक्रमोपसंहार	" " "

शके १८५२ मधील निबंध-लेखक व त्यांनीं वाचलेल्या निबंधांची संख्या.

(१) श्री. वैद्यनाथशास्त्री (तंजावर) १	(९) श्री स. ग. जोशी १
(२) " म. गो. खांडेकर २	(१०) " का. प. साने १
(३) " म. ह. खरे २६	(११) " य. न. केळकर १
(४) " शं. ना. जोशी १३	(१२) " वा. गो. काळे २
(५) " द. वा. पोतदार ३	(१३) " चिं. वि. वैद्य ४
(६) " दि. वि. काळे ६	(१४) " य. रा. गुप्ते ३
(७) " बाबासाो देशपांडे ४	(१५) " रु. वा. पुरंदरे १
(८) " वा. सि. बेंद्रे २	(१६) " वा. वि. जोशी १

पुस्तकें:- मंडळास देणगीदाखल व अभिप्रायार्थ आलेलीं पुस्तकें (श.१८५२अखेर)

असिस्टंट आर्कियॉलॉजिकल सुपरिंटेंडंट सदर्न सर्कल	प्रोग्रेस रिपोर्ट १९१२-१३	प्रिन्सिपॉल, कॉलेज ऑफ् इंजीनियरिंग, पुणें
आठल्ये वा. वि.	कर्मयोगिनी	आठल्ये वा. वि.
आर्किऑलॉजिकल सर्व्हे आफ् इंडिया.	डेटूस् ऑफ् दि व्होटिव्ह इन्स्क्रिप्शन्स् ऑन दि स्तूपाज् ॲट सांची	प्रिन्सिपॉल, कॉलेज ऑफ् इंजीनियरिंग, पुणें
आर्किऑलॉजिकल् सर्व्हे ऑफ् इंडिया	साउथ इंडियन् इन्स्क्रिप्शन्स् व्हॉ. ३-१९२९	" "
ऑल एशिया एज्युकेशनल् काम्फरन्स, बनारस.	दि एज्युकेशनल् मॅग्नाचार्टा	प्रो. पोतदार
ऑल् इंडिया ओरिएन्टल् काम्फरन्स	ओपनिंग स्पीच ऑफ् हिज एक्सलन्सी दि गव्हर्नर ऑफ् बिहार ॲंड ओरिसा.	पोतदार द. वा.
इंडियन् हिस्टॉरिकल् रेकार्डस् कमिशन्	प्रोसिडिंग्स् ऑफ मीटिंग्स ॲट् लाहोर	प्रिन्सिपॉल, कॉलेज आफ् इंजीनियरिंग, पुणें
उदासी हरि नामदासजी	ऑरिजिन् ॲंड् ग्रोथ ऑफ् उदासीज	उदासी हरि नामदासजी
	एपिग्रॉफिआ इंडिका पु. ३ पृष्ठसंख्या ४०१ ते ४६०.	प्रिन्सिपॉल, कॉलेज ऑफ् इंजीनियरिंग, पुणें
कवींद्र परमानंद	श्रीशिवभारतम्	आनंदाश्रम, पुणें
कार्ष्णि नारायणदास	श्रीसाधुबेलातीर्थ	उदासी हरिनामदासजी
गुप्ते य. रा.	आमची परळीची (सज्जनगडची) यात्रा	गुप्ते य. रा.

Original from

जयस्वाल के. पी.	दि ॲड्रेस ऑफ वेलकम् टु दि सिक्स्थ ओरिएन्टल् कान्फरन्स	पोतदार द. वा.
टिकेकर श्रीपाद रामचंद्र	मुसलमानी मुलुखांतील मुशाफरी	टिकेकर श्रीपाद रामचंद्र
टिकेकर श्री. रा.	सिंहाला शह	" " "
टिळक ना. वा.	प्रातःस्मरण	टिळक ब्रदर्स
धर्मकोशकार्यालय	धर्मकोशः (विवाहकालः)	धर्मकोशकार्यालय, वाई.
पेशवे दप्तर	दि लीग ऑफ् बारभाइज	गव्हर्नमेंट ऑफ बाँबे.
"	रिपोर्टस् अबाउट् आनंदीबाई.	"
"	शाहूज् कँपेन अगेन्स्ट दि सिद्दीज ऑफ् जंजीरा	"
"	रामराजाज् स्ट्रगल् फॉर पॉवर	"
प्रिन्स ऑफ् वेल्स म्युझियम ऑफ् वेस्टर्न इंडिया	रिपोर्ट १९२८-२९	क्युरेटर, प्रिन्स् ऑफ् वेल्स म्युझियम, मुंबई.
बळवंत मोफत वाचनालय, औरंगाबाद.	वार्षिक अहवाल श. १८५१–५२	ब. मो. वा. औरंगाबाद.
बाँबे ब्रँच ऑफ् दि रॉयल् एशियाटिक सोसायटी.	जर्नल नंबर्स ३६, ३९, ४०, ४७, ४८, ५०	प्रिन्सिपॉल, कॉलेज ऑफ् इंजीनियरिंग, पुणें
श्री. बाळासाहेब पंत प्रतिनिधि.	शिवकथा कुसुमगुच्छ (बाजीप्रभु आख्यान)	श्री. बाळासाहेब पंत-प्रतिनिधि.
" "	सचित्र शिवचरित्र भाग १–३	"
भागवत अ. ना. व मेहेंदळे वा. प.	सातारच्या प्रतिनिधि घराण्याचा इतिहास भा. १ला	आपटे द. वि.
मुनिपरशुरामः	मुनिपरशुरामसूत्रम्	उदासी हरि नामदासजी
राइस्, बी. एल्.	कूर्ग इन्स्क्रिप्शन्स्	प्रिन्सिपॉल, कॉलेज ऑफ् इंजीनियरिंग, पुणें
राय बहादुर हिरालाल	प्रेसिडेन्शियल ॲड्रेस (सिक्स्थ ऑल इंडिया ओरिएन्टल् कान्फरन्स पाटणा)	पोतदार द. वा.
शेषाद्रि पी.	बनारस	बॅरिस्टर पुणतांबेकर

इतर वृत्त.

शुक्रवार वैशाख शुद्ध १४ (ता. १।५।३१) या दिवशीं श्रीमंत नानासा॥ निंबाळकर (फलटण) यांच्या हस्तें, प्रो. पिंपळखरे यांनीं काढलेल्या व श्री. विनायक गंगाधर लेले व त्यांचे बंधू यांनीं आपल्या वडिलांच्या म्हणजे के. गंगाधर बल्लाळ लेले यांच्या स्मरणार्थ मंडळास दिलेल्या, श्रीमंत पहिले बाजीराव पेशवे यांच्या तैलचित्राचें अनावरण करण्याचा समारंभ झाला. त्याची सविस्तर हकीकत पुढील अंकीं देऊं

येथील ट्रेनिंग कॉलेजतर्फे चालू केलेल्या प्राथमिक शाळांचे सुपरवायझर व अनुभविक शिक्षकांच्या वर्गातील शिक्षक मंडळींच्या उपयोगासाठीं प्रि.तावडे यांच्या विनंतीवरून मंडळांतील साधनसंग्रह दाखविण्यांत आला. त्यावेळीं साधनसामुग्रीवरून इतिहास कसा बनतो अशा विषयीं माहिती दिली.

कै. वासुदेवशास्त्री खरे यांचे चरित्रलेखक मिरजचे श्री. दा. मो. भट, कै. राजवाडे यांच्या चरित्राचीं साधनें जुळवीत आहेत. त्यांना राजवाड्यांविषयीं माहिती असलेले सर्व लोक मदत करतील अशी अशा आहे.

Marathi Articles in this issue.

This is the last issue of the Quarterly journal, Vol. XI and contains much that has to be included in order to round off sections opened in the course of the previous year. Thus the title page and general contents of the Quarterly as well as of the 'Miscellaneous Historical Documents' and also the index to the latter, have necessarily been incorporated in this issue.

Interesting accounts of research tours by two members on the permanant staff of the Mandala also find place in this number. Mr. Khare describes several old temples and stone inscriptions in the Poona, Satara and Sholapur Districts, which he visited in the course of his first trip. His second trip covered several places from Barsi to Akkalkot. Mr. Shankarao Joshi gives some interesting information about the Bokils and Divan of Koregaon. He further describes Ner, Khatgun, Khatav, Mandve, Shingnapur.

Source-book of Shivaji part IV is continued. Shivaji's typical letters, testifying to his administrative efficiency and the keen sense of justice with which he was actuated in his relations with his subjects, are continued. A letter containing direct reference to Shahistakhan's rule is another special feature. An Adilshahi Farman, which baffled all attempts at the fixing of its date is described by Mr. Khare, who has now fixed the date, on the strength of the original procured by Mr. S. G. Joshi.

'Miscellaneous Historical Documents' part I. is completed in this number. Mr. Joshi publishes the latter part of his instalment of Nasik papers. Mr. Kale gives a curious document of 1747 A. D., denoting a sale of a child, of 5 months. Mr. Kolhatkar prints a Sanad granted to a Saraswat Dharma Guru.

Google Original from

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

त्रैमासिक.

वर्ष ११ वें.

आषाढ शक १८५१ ते चैत्र शक १८५३

संपादक व प्रकाशक :

दत्तो वामन पोतदार, बी. ए.

गंगाधरराव नारायणराव मुजुमदार, एम्. एल्. सी.

चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

पुणें पेठ भांबुर्डा ९३६।२ येथें आर्यभूषण छापखान्यांत
अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें.

वार्षिक वर्गणी रु. ३ ट. ह. वगैरे निराळें, फुटकळ अंक १२ आणे.

Original from

अनुक्रमणिका (लेखकानुक्रमानें)

	अंक पृ.
प्रो. आळतेकर, अ. स., एम. ए.	१–१०
मध्ययुगीन भारतांतील शुद्धीकरण,	
श्री. ओक, शि. का. व लेले, का. रु.	
मराठ्यांचें माळव्यांतील राजकारण	१–१५
परमारकुलमणी भोजदेवाचें राजकीय महत्त्व	१–३२
श्री. काळे, दि. वि., एम्. ए.	
शाहू महाराजांचें स्वदस्तुरचें संपूर्ण पत्र (सचित्र)	१–४८
तुरुंगांत नकललेला ग्रंथ	३–१६
प्रो. काळे, वा. गो.,	
अर्थशास्त्रीय संशोधनक्षेत्रांतील पहिलें पाऊल	१–२५
पिंपळें सौदागर	२–१
कांहीं जुन्या कागदांवर नवा प्रकाश	३–१
Currency in Shivaji's Kingdom	३–४६
प्रो. कोसांबी, धर्मानंद.	
Pondichery Mortgaged	२–२७
श्री. खरे, ग. ह.	
व्यंकोजीस मिळालेलें एक इनाम	१–४७
मुधोळ येथील तीन महत्त्वाचीं फर्मानें	३–७
संशोधनवृत्त	४–१
श्री. गुप्ते, य. रा., बी. ए. एम्. आर्. ए. एस्.	
सिन्नर व चांदवड	१–१४
श्री. लेले, का. रु. व ओक, शि. का.	
मराठ्यांचें माळव्यांतिल राजकारण	१–१५
परमार कुलमणी भोजदेवाचें राजकीय महत्त्व	१–३२
श्री जोशी, शं. ना.	
संशोधनवृत्त	४–१०
श्री. वाडेकर, रं. द.	
Melick Ambar from the Dutch sources	१–७
श्री. वैद्य, चिं. वि., एम्. ए. एलुएलुबी.	
Sarkars' life of Shivaji. Inaccuracies revealed by recent research	३–२३
मालोजीची जहागीर पुणें नव्हती	३–२३
शिवाजीनें मशिदी पाडल्या काय !	३–२४

श्री. हुद्‌लीकर, स. वा.
मांडवगडाचा इतिहास व भूरचना १–४२
श्री. तळवलकर, वा. दा.
बालविवाहाची प्राचीन परंपरा २– ७
श्री. देशपांडे, य. खु.
माहूरक्षेत्रास भेट २–१३
प्रो. पोतदार, द. वा.
जिवाशिवाचें महाभारत १–२१–५१
विवेकसार २–२४
ज्ञानेश्वरकालीन तेलगू ग्रंथांतील मराठी गाणीं ३–२२
श्री. बेंद्रे, वा. सि.
संभाजी महाराजांची कैद २–१५

चालू प्रकरणें.

ऐतिहासिक संकीर्णसाहित्य खं. १ ला.

अंक १ पृ. १४५ ते १६०; अंक २ पृ. १६१ ते १६८,
अंक ३ पृ. १६९ ते १७६; अंक ४ पृ. १७७ ते २०२,

शिवचरित्र साहित्य खंड ४

अंक २ पृ. १–८; अंक ३ पृ. ९ – १६; अंक ४ पृ.१७– २४

संपादकीय, मंडळवृत्त वगैरे अं. पृ.

अंकांतील इंग्रजी निबंध. २–३४
अनुक्रमणिका मलपृष्ठ
ऐतिहासिक ग्रंथपरिचय १–५४
ऐतिहासिक चर्चा १–५६, २–३५, ३–२५, ४–१९
चिटणिसांचें निवेदन मलपृष्ठ
छायाचित्रें–शाहूमहाराजांच्या स्वदस्तूरचें संपूर्ण पत्र, दर्शनी १–०
दाखल झालेलीं पुस्तकें २–४३, ३–४१, ४–२२
दुरुस्ती खुलासा वगैरे २–५०
नवे सभासद २–४७, ३–४०
पाक्षिकसभावृत्त २–४२, ३–३९, ४–२१
Marathi articles in the issue १–५२, २–३४, ३–४४, ४–२४
मंडळवृत्त १–५८, २–३६, ३–३९, ४–२१
मंडळावरील अभिप्राय १–५९, २–४८, ३–४५, ४–मलपृष्ठ
वृत्तसार १–६०
समारंभवृत्त २–३६
के. रा. ब. नीळकंठ जनार्दन कीर्तने यांच्या तसबिरीचा अनावरण समारंभ ३–२७
राजवाडे–स्मृतिदिन–समारंभ (४ था.) ३–३५

येकून खुर्दा टके ६७५ पाउणेसातसे श्री-देव हरसाला पाठऊन देत जातील तो घेत जाउनू दोही माहाली जमा करीत जाणे आणि दोन्ही माहालीहून राजभाग पैकी तांदुल बारीक खंडी १५ पधरा रास व भात बारीक खडी १५ पंधरा रास व खरीदी अगर येन जिनस जमाईपैकी तूप मार्पी ॥ दाहा मण व पेड वजन खंडी १० दाहा येसे हर साला देत जाणे साल हर साल याच सनदेवरून चालवणे ताजा सनदेचा उजूर करीत न वजणे तालीक लिहून घेउनू असल सनद श्री-पासी पाठउनू देणे व पेस्तर माहाग हो अगर सवंग होत होत ये धारण पावेतो जाले तम्ही याला याच प्रमाणे दिवाणातून देत जाणे अधिक उणे न करणे छ २१ रबिलाखर

[नि] परवानगी हुजूर मोर्तब सूद मोर्तब सूद [ष]मर्या

[पाठीवर] देयं विरा

धार सुरु सुद धार जते

३

तिसरें पत्र म्हणजे ताा कल्याणकडील सुभेदार राजश्री कोनेर रंगनाथ व कारकून यांना अन्नपाण्याचे बाबतींत शिवाजी महाराजांचा हुकूम आहे. याचें धोरण पूर्वीच्या दोन पत्रांप्रमाणेंच आहे. यावरून कांहीं नवी माहिती मिळते ती-

(१) पेण, पनवेल, नागोठणें हीं अलीकडील भिन्न जिल्ह्यांतील ठिकाणें शिवकालीं कल्याण समवेत एकाच सुभेदाराचे अमलांत होतीं.

(३) पेण पनवेल नागोठणें हीं पूर्वीं महत्वाचीं मिठागरें होतीं.

(४) देवांना मिळावयाच्या मालांत सनद करून देतांना फारसा फरक केला नाहीं असें गृहीत धरलें तर तीस बैल चार खंडी मिठाची वाहतूक करीत असें म्हणतां येतें.

(५) इतर धान्याबद्दल पैसा कांहीं सवलतीच्या दरानें देवाकडून कां होईना मिळत असे. परंतु मीठ फुकटच देण्याचा प्रघात होता.

[1]ले. ६८५ मु.चा.सं.	सु. १०७७ रसर २०	श्री	श. १५९८ आषाढ वद्य ७ इ. १६७६ जून २२

मशहुरल हजरत राजश्री कोनेरी रंगनाथ सुबेदार व कारकून सुबा ताा कल्याण प्रति राजश्री शिवाजी राजे दंडवत सुहूर सन सबा सबैन व अलफ श्रीदेव—याचेथे अंनव्यय बहुत आहे त्याकारणे मीठ पाहिजेत आहे त्यास श्री—चे बैल पेण पणवली नागोठणे यास जातात सालामधे अवघे मिलोनु तीस बैल पावेतो मीठ नेतात

१ शिद्धे ले. ६८४ प्रो

त्याचे पैके कोण्ही घेत नाही ऐसे चालिले हाली श्री—ने सागोन पाठविले की सनद पाहिजे म्हणून तरी यामागे ऐते चालिले ते चालिजे याउपरी फुकट मीठ कोण्हापासून घ्यावयास यावया गरज नाही मीठ कैळी दाहा सेरी गल्याचे मापे खंडी ४ च्यार रास देविले असे दिवाणीचे मीठपैकी सालास इतके देत जाणे नागोठाणियास व पणवलीस हे बैल पाठवणार नाहीत पेजेच्याच बंदरास बैल पाठवीत जातील पेणेचेच बंदरीहून यास सदरहू मीठ साल दरसाल देत जाणे सर्च लिहिणे दरसाला ताजा सनदेचा उजूर न करणे तालीक लिहून घेऊन असल कागद श्री—पासी पाठउनू देणे छ २० रबिलाखर परवानगी हुजूर मोर्तब सुद

४

(१) सदर चौथ्या पत्रावरून इनामाचे बाबतींत महाराजांचें नेमस्त धोरण व धर्मविषयक बुद्धी दिसून येईल.

(२) कांहीं गैरसमजानें २९ होन पावत होते ते न देण्याबद्दल महाराजांचा हुकुम पाहिला म्हणजे देवस्थानांच्या बाबतींतही पोकळ कारभार त्यांना खपत नसे असें स्पष्ट दिसतें.

(३) परंतु सरदेशमुखी हा केवळ राजकीय उत्पन्नाचा वाटा, इतर उत्पन्न इनाम दिलें असल्यानें तें तसेंच देवांकडे चालावें याबद्दलचा पण विशेषतः एकदां दिलेला हुकूम नोकरांनीं अक्षरशः पाळला पाहिजे याबद्दचा कटाक्षही या पत्रांत दिसून येतो.

[1]ले. ६८६ | पु.१०७४]	श्री	[श. १५९५ भाद्र.वद्य ११
मू. चा. सं. | जसर २६]	श्रीदेव	[इ. १६७३ सप्टेंबर२८

मशहुरल अनाम राजश्री यसाजी गणेश हवालदार व कारकून पा पुणे प्रती राजश्री शिवाजी राजे शुहूर सन आर्बा सबैन व अलफ तुम्ही लिहिले होते की वेदमूर्ति श्री—देव स्वामी चिंचवड याचा इनाम जमीन घरवाहो करिताती त्याची सरदेसमुखी त्याची त्या सालें पडिली आहे आणि आलाहिदा सरदेसमुखी पा मा पैकीं होनु २९ येकूण-तीस सर्च पडोन पावताती सनद तरी इनामाची नाही येबाबे काये हुकूम ऐसे लिहिले त्यास जबाब हुजरून चालिला असे छ ३ रबिलाखर कीं नवा इनाम सरदेसमुखी देविला नाही जे जमीन देवास इनाम आसे त्यावरी सरदेसमुखी होत होती ते दुयाले केली आसे सरदेसमुखी इनाम देविला नाही सनद येसीच असे तुम्ही एकोणतीस होन सर्च घालून अलाहिदा आदा करायची गरज नाही त्याचा इनाम आहे त्यावरी

१ आरंभीं डाव्या अंगास बदामी आकाराचा अस्पष्ट शिक्का.

सरदेसमुखी जे होईल ते त्याचे नांवे खर्च लिहीत जाणे पेसजी सनदप्रमाणें वर्तणे येसा जथाय सादीर आहे त्यावरून तुम्ही येकुणतीस होनु पाववावया खलेल केले आहे म्हणून कलो आलें तरी नवे खलेल कांहीं न करणे ताा साल गुा पाच साले येकुणतीस होनु सरदेसमुखी पैकी श्री-देवास पावताती तैसेच सालमजकुरापासुनु साल दरसाल सालिमा सदरहूपैकीं श्रीस पाववीत जाणें उजूर न करणे व हरसाला ताजा सनदेचा उजूर न करणे तालीक लिहून घेउनू असल परतोन देणे छ २६ जमादिलाकर परवानगी हुजूर

[पाठीवर] सुरु सुद

[ष] मर्या
देयं विरा
जते

शास्ताखानाचा पुण्यावर अमल[1].

(श्री. दि. वि. काळे, एम्. ए.)

(१) चिंचवड दप्तरांतील कित्येक महत्त्वाच्या पत्रांपैकीं प्रस्तुत पत्र आहे. मोंगल अमलाखालीं पुणें परगणा होता त्यावेळीं कृष्णाजी काळभोर देशमुख यांनीं चिंचवड-कर देवांना हें लिहिलेलें आहे. चिंचवड व रावेत या दोन गांवच्या देशमुखीचा हक्क व गावगन्ना एक खंडी गल्ला पूर्वीप्रमाणेंच देवांना मिळत राहील अशाविषयीं यांत आश्वासन आहे.

(२) शके १५८४ व १५८५ या सालीं ' अमीरुल उमराऊ नवाब शास्ताखान' यांचा सुभेदारी अमल पुणें प्रांतावर होता असा या पत्राचा इत्यर्थ असून तो इतिहासास संमत आहे.

(३) हें नवाब शास्ताखानानें महाराजांपासून मुलूख जिंकून घेतला; ही गोष्ट व तिचा काल कळेल असें अस्सल मराठी पत्र आहे. मोगलांच्या आगमनाचा उल्लेख असलेलीं आणखी कांहीं पत्रें आहेत (पत्रसंग्रह ले. ८७९, ८८० ९०५). या पत्रानें त्यांत जास्त भर पडत आहे.

(४) या पत्रावरून वरील गोष्टींवर प्रकाश पडतो तो असा. (अ) सन सल्लास सितैन अलफ (श. १५८४) मध्यें शास्ताखानानें देशमुखीचें फर्मान दिलें. त्याअर्थीं त्याचे थोडें आधीं किंवा त्याच सालीं त्यानें महाराजांपासून हा मुलूख जिंकून घेतला. शास्ताखानाच्या स्वारीची सुरवात शके १५८२ त झाली हें नक्की आहेच. (आ) ह्या कागदाची मिति शके १५८६ ज्येष्ठांतील आहे. तोंपर्यंत तरी मोंगलांचा अमल पुणें प्रांतावर चालू आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत

१ पा. स. ५।१८५२

नाहीं. (४) पुणें प्रांतावर मोंगलांचा अमल सुमारें दोन वर्षे तरी होता एवढें या पत्रांवरून म्हणतां येतें.

(५) शास्ताखानावर शक १५८५ चैत्र शु. ८ रोजीं छापा घातला. त्या योगानें मोंगलांचा तात्पुरता धीर खचला असला तरी महाराजांच्या सत्तेंत काडीचीही वाढ झाली नाहीं. मोंगलांच्या ताब्यांत हा मुलुख आम्याहून सुटका होईपर्यंत तसाच राहिला होता. ह्या म्हणण्याला या पत्रानें शक १५८६ पर्यंतच्या कालापुरता तरी दुजोरा मिळतो.

(६) मुलुख परकी अधिराज्याखालीं गेला तथापि हिंदु देवस्थानांचे हक्क तसेच कायम राहिलेले दिसतात. ह्याचें एक कारण साहजिकच लक्षांत येतें तें हें कीं अधिराज्य बदललें तरी देशमुख, देशपांडे हे तसेच कायम रहात असत. इकडच्या मुलखांत ते बहुतेक हिंदूच होते. यामुळें त्यांनीं हिंदू देवस्थानांबद्दल सदैव सहानुभूतीच बाळगली. ह्या पत्रांत तरी देवांचें वतन चालू ठेवण्यामध्यें देशमुखाचाच उघड हात दिसतो. शिवाजी महाराजांचा अमल झाल्यावरही मुसलमान देवस्थानांचा परामर्ष घेणें पूर्वापार चालूं राहिलें असल्यास, तें मात्र महाराजांच्या व मराठ्यांच्या परधर्मसहिष्णुतेचेंच चिन्ह समजलें पाहिजे.

(७) देवस्थानांना दिला जाणारा '**देसमुखीचा हक्क** व '**गांवखंडी**' नांवाचा धर्मादाय यांचा खुलासा या पत्रावरून होतो.

पत्र असें—

ले. ६८७ | सु.१०६४ मू.चा.सं. | जिल्काद	श्री	श. १५८५।८६ ज्येष्ठ इ. १६६३।६४ मे–जून

[फारसी शिक्का.]

महाराज राजेश्री चिंतामण गोसावी देव स्वामी
अमीरल उमराऊ नवाब शास्तखान

॥छ श्री अखंडित लक्ष्मी अलंकृतयाविराजित प्रसंन परउपकार गोब्राह्मण प्रतिपाळक भक्तजनासी अधार राजमान्य राजेश्री—देव स्वामीचे सेवेसी विनाति चाणरज कृस्णाजी कालभोर देसमुख पा पुणा दोन्ही कर जोडुनू पायावरी मस्तक ठेउनू दंडवत विनति विनवावया कारण जे स्वामीच्या चरण प्रसादेकरुनू पा मजकुरीची देसमुखी सन सलासामधे [शके१५८४] आपणास प्राप्त जाली हजरती—नवाब साहेबी फर्मानहि करुनू दिधला या दिवसापासुनू आपली देसमुखी चालते येसियास गावगना देसमुखीचा हक आपला मनास आणिता पेसजी कारकीर्दी देसमूख होते या पासुनू देसमुखीचा हक व गाउगना खडीचा गला येसे दो गावी स्वामीचा इनाम चालिला आहे मौजे चिचवड व मौजे रायेवेत येथील देसमुखीचा हकलाजिमा दुमाले पडते अहे तेणेप्रमाणे अपण आपलेहि कारकीर्दीस सहरहूप्रमाणे दो गावीचा हक व गावखडी

दुमाले केली असे तेणेप्रमाणे मौजे चिंचवडच्या मोकदमास व रायेवतीच्या मोकदमास कागद दिल्हे असेती जे पेसजी चालत होते तेणेप्रमाणे हाली सालाबाद चालों देणे दर दर साल कागदाचा उजूर न करणे म्हणउनू कागद दिल्हे आहेती ते येन जिनस स्वामीचे सेवेसी पाठविले आहेती तेणेप्रमाणे घेतले पाहिजे बहुत लिहिले तरी आपण स्वामीचा पुरातन सेवक अहे आपणावरी कृपा अखडित असो दिल्ही पाहिजे हे विनति सुा आर्बा सितैन अलफ तेरीख माहे जिल्काद [वाटोळा शिक्का]

एक महत्त्वाचें आदिलशाही फर्मान.[1]

(श्री. ग. ह. खरे.)

या फर्मानाची हकीकत थोडी मनोरंजक आहे. याची कोणी एकानें केलेल्या भाषांतराची नकल कै० राजवाडे यांनीं 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें' या मालेच्या १७ व्या खंडांत ले. ८ म्हणून छापली आहे. या भाषांतरांत आरंभीं 'शहर सन सी व अलिफ' आणि शेवटीं 'तेरीख अल् मजकूर दुयम शहर जमादिलोवल सन १५' असे दोन कालाचे उल्लेख आहेत. भाषांतरकाराच्या दोषामुळें म्हणा किंवा नकलनवीसाच्या दोषामुळें म्हणा हे दोन्ही उल्लेख चुकले आहेत. पहिल्या उल्लेखाचा अर्थ सुहूर सन १०३० असा होतो. पण त्यांत दोष असा आहे कीं, **सी** हा शब्द फारशी आहे तर **अलिफ** हा शब्द अरबी आहे. सुहूर सनाचा कोणताहि उल्लेख असा फारशी व अरबी भाषांत मिळून आलेला माझ्या पाहण्यांत नाहीं. दुसऱ्या कालोल्लेखांत **सन १५** यानें कोणतें साल विवक्षित आहे हें सांगतां येत नव्हतें. पण तो जुलूसचा म्हणजे राज्याभिषेकाचा उल्लेख असावा असें वाटे. फर्मानाच्या सुरवातीस 'फर्मान...शरफ सुदूर याफ्त' असे शब्द आले आहेत. त्यावरून फर्मान विजापूरच्या बादशहाचें असावें याबद्दल खात्री होती. पण कोणत्या बादशहाच्या वेळचें हा प्रश्न सुटेना. सु. १०३० मध्यें विजापूरच्या गादीवर दुसरा इब्राहीम आदिलशहा होता. पण त्यानें राज्याभिषेकाचें वर्ष लावण्याची पद्धत अंगिकारलेली दिसत नाहीं व अंगिकारली होती असें गृहीत धरलें तरी सु. १०३० मध्यें त्याच्या राज्याचें १५ वें वर्ष येत नाहीं. शिवाय फर्मानांत शिवाजीनें मुलुख काबिज केल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. इब्राहीमच्या कारकीर्दींत शिवाजी जन्मलाच नव्हता तर तो मुलुख कसा काबिज करूं शकेल ? तेव्हां कालाचा पहिला उल्लेख साफ चुकला आहे हें स्पष्ट होतें. शिवाजीच्या हयातींत विजापुरास एकंदर ३ बादशहा झाले. पैकीं पहिला बादशहा मुहम्मद यानें जुलूस सन सुरू केलेला आढळत नाहीं व केला होता असें मानलें तरी त्याच्या राज्याभिषेकाच्या १५ व्या वर्षीं म्हणजे हि. १०५१ (श. १५६३) मध्यें शिवाजीनें पूर्वींचा निजामशाही व इतर मुलूख काबिज करून पुंडावा आरंभिला होता असें मानण्यास इतर आधार सांपडेना. कारण नकलांच्या स्वरूपांत

---

[1] पा. स. १९।१८५२

व शंकित अशी कां असेनात, शिवाजीच्या अगदीं आरंभींच्या हालचाली सांगणारीं पत्रेंही श. १५६७ च्या आरंभींचीं म्हणजे ४ वर्षांनीं नंतरचीं आहेत तेव्हां सन १५ हें साल मुहम्मद आदिलशहाच्या राज्याचें नाहीं हें उघड होतें. शेवटचा बादशहा शिकंदर याच्या जुलूसचा उल्लेख सांपडत नाहीं; त्यानें १५ वर्षे राज्य केलेंही नाहीं व त्याच्या राज्याच्या १५ व्या वर्षी शिवाजी मरूनही गेलेला होता. यामुळें शिकंदरच्या राज्याचें १५ वें वर्ष **सन १५** या शब्दांनीं विवक्षित असणें शक्य नव्हतें. राहतां राहिला मुहम्मदशहाचा मुलगा किंवा शिकंदराचा बाप २ रा अली आदिलशहा. याच्या जुलूस सनाचे उल्लेख सापडतात. हा हिजरी १०६७ मध्यें गादीवर बसला. अर्थात् हि. १०८१ म्हणजे श. १५९२ सालीं याच्या राज्याभिषेकाचें १५ वें वर्ष येतें. पण या वेळीं शिवाजीची शक्ती येवढी वाढली होती कीं, शेंसवारों स्वार बाळगून असणारा एकादा देशमूख शिवाजीचा लचका तोडण्यास धजावला असें मानणें अगदीं अशक्य आहे. शिवाय या फर्मानांत उल्लेखिलेल्या विठोजीचा (सिलिंबकर) व शिवाजीचा अतिशय जिव्हाळ्याचा संबंध यापूर्वीच २ वर्षे जडलेला दिसत आहे. यामुळें हें पत्र श. १५९२ च्या सुमाराचेंही ठरवितां येईना. अशाप्रकारें कालाचा दुसरा उल्लेखही खोटा आहे असें वाटूं लागलें. एवंच लेख महत्त्वाचा असूनही कालाचे उल्लेख चुकीचे असल्यानें पत्राचा यथायोग्य उपयोग कोणासच करतां येईना. शेवटीं मंडळाचे सभासद व उत्साही संशोधक श्री. स. ग. जोशी हे प्रस्तुत फर्मान घेऊन आले. वाचून पहातां फर्मानांतील मजकूर उपर्युक्त लेखाशीं जुळूं लागला व सर्वच घोटाळा उलगडला.

प्रस्तुत फर्मानांत आरंभीं कालाचा उल्लेख ' शुहूर सनः सितैन व अल्फ ' असा असून शेवटीं ' सनः १०७० ' असा उल्लेख आहे. **सितैन** बद्दल **सी** असें एकादा नकलनवीस लिहील. पण १०७० ऐवजीं चुकीनें १५ कसे लिहिले गेले हें अजूनही समजत नाहीं. दोन्ही उल्लेख एकमेकांशीं पूर्ण मिळत आहेत हें सांगणें नकोच. याची पूर्ण मिति श. १५८१ माघ शुद्ध ३ (हि. १०७० जमादिलावल २) अशी आहे.

हें श्री. जोशी यांस फर्मानांत उल्लेखिलेल्या विठोजी हैबतरावाच्या म्हणजे सिलिंबकर देशमुखांच्या एका घराण्यांत (तांभाडकर-सिलिंबकर) मिळालें.

हें बादशहानें म्हणजे अली आदिलशहानें रोहिडा किल्याचा देसाई सय्यद अब्दुल्लः बिन सय्यद मुहम्मद याच्या विनंतीवरून मूरबगर म्हणजे राजगड किल्याचा देसाई विठोजी हैबतराव यास दिलें आहे.

सय्यद अब्दुल्लःची विनंति पुढील स्वरूपाची होती:- शाविन शिवाजीनें निजामशाही व इतर मुलुख आपल्या ताब्यांत आणला असून पुंडावा करीत आहे. आम्ही जुने मिरासदार आहों. विठोजीकडे त्याचें जुनें इनाम व इतर कायम ठेवून ऊर्जित

करण्याचें आश्वासनपत्र पाठवाल तर तो कांहीं जमेत घेऊन शिवाजीनें काबिज केलेला तमाम मुलुख बादशाही सत्तेखालीं आणील.

बादशहानें या विनंतीप्रमाणें त्याचें जुनें उत्पन्न वंशपरंपरेनें त्याजकडे चालूं ठेवण्याचें ठरविलें व उपर्युक्त चाकरी बजाविल्यास आणखीही उत्कर्ष घडवून आणूं असें आश्वासन दिलें. सय्यद् अब्दुल्लः मिरासदारीचा हक्क सांगतांना आम्ही (खुद्दहा) असा शब्द वापरून दोघेही जुने मिरासदार असें सांगतो. पण शिवाजीचें पारिपत्य करण्याची जबाबदारी मात्र एकट्या विठोजीवर टाकीत आहे.

बादशहास कबूल केल्याप्रमाणें विठोजीनें कोणत्या हालचाली केल्या हें आज आपणांस माहीत नाहीं. श. १५९० च्या वैशाखांतील ४ पत्रें उपलब्ध आहेत (पत्रसारसंग्रह ले. १२०६,०७,०८,१०). या चारी पत्रांवरून विठोजी हैबतराव श. १५९० च्या पूर्वी जिवाचे दहशतीनें बाहेर होता व शिवाजीनें कौल दिल्यामुळें यावर्षी दोघांचें सख्य झालें असें स्पष्ट होत आहे. पण या दहशतींत विठोजीची किती वर्षें गेलीं व तीं बसण्यास विठोजीचें कोणतें विरुद्धाचरण कारणीभूत झालें हें समजण्यास मार्ग नाहीं.

या वेळीं अफजलखानप्रसंग होऊन गेला होता व शिवाजी महाराजांची कल्पना लोकांस चांगली येऊं लागली होती. पण विठोजीसारखी कांहीं मंडळी मात्र अजून 'शिवाजीस आपण केवळ स्वतःच्या बळावर सहज चिरडून टाकूं' याच घमेंडींत होती असें दिसतें. एरवीं विठोजी केवळ आपला मुलूख आपल्या ताब्यांत ठेवण्याच्या अटीवर शिवाजीस तंबी देऊन त्यानें बळकाविलेला मुलूख बादशहाच्या ताब्यांत परत देण्याची जोखीम अंगावर घेता ना.

येथें आणखीही एक विचार सुचतो. सर जदुनाथ सरकार यांनीं आपल्या शिवचरित्राच्या ३ ऱ्या आवृत्तीच्या ५७ पानावर शेवटीं इ. १६५९ मध्यें शिवाजीच्या ताब्यांत देशावर सातारा जिल्ह्याच्या दक्षिण सरहद्दीपर्यंतचा मुलूख व कोकणांत माहुलीपासून महाडापर्यंतचा मुलूख होता असें विधान केलें आहे. तसेंच ५८ पृष्ठावर 'the greatly expanded Maratha kingdom' असें ह्या प्रदेशाविषयीं म्हटलें आहे. सर सरकार यांच्या कल्पनेप्रमाणें शिवाजीचें राज्य खरोखरीच एवढें वाढलेलें असतें तर शिवाजी फारच बलिष्ठ असावयास पाहिजे होता. मग विठोजी हैबतरावासारख्यानें शिवाजीच्या ताब्यांतील मुलुख परत मिळविण्याचा चंग सहसा बांधला नसता. पण तशी उमेद त्यानें धरली होती त्याअर्थीं शिवाजीचें राज्य या वेळीं विशेष वाढलेलें नसावें व विठोजीस शिवाजीची नीट कल्पनाही आलेली नसावी.

असो. मूळ फर्मान व त्याचा सारांश असाः--

ले. ६८८ | सु. १०६० व | बिस्मिल्लः अर्रहमनुर्रहीम | श. १५८१ माघ शुद्ध १
फो.चा.सं. | हि.१०७० जवल २ | अल्मुल्कोलिल्लः | इ. १६६० जानेवारी ५

(शिक्काः- पिंपळपानी व पुढील मजकुराचा- या अली, मदद मुहर, शाही शद, अज्ञ, मिहर, मुर्तजा बर मिहर व माह, खुस्त्रव, आदिल अली बाद् अज्ञ मुहम्मद् बादशाह, १०६८)

फर्मान हुमायून शर्फ सुदूर याफ्त बजानिब वीथोजी हैबतराव देसाई किलअ मूरबगर आंके अज्ञ शुहूर सनः सितेन व अल्फ दर ई वला सय्यद अब्दुल्लः बिन सय्यद मुहम्मद देसाई किलअ रोहिरा बदर्गाह जहांपनाह इल्तमास नमूद के विलायत निजामशाह व बअजे सीवाए मलऊन दर कब्ज खुद आउर्दः दस्तदराझी मीकुनद खुद्दहा मिरासदार कदीम ईम नजर इनायत फर्मूदः इनआमात व बअजे कदीम मुकर्रर नमूदः बः वीथोजी देसाई सराफ्राज साख्तः कौल आतिफत फिरिस्तः ता चन्द जम्इयत बहम रसानीदः विलायत के मलऊन मझ्कूर काबिज शुदःअस्त बशर्त तमाम दर कब्ज बन्द(?) औलियाही दौलतकाहिरः खाहम आउर्द बिनाबरां बखातिर मुबारक अअला आउर्दः मौजअ तान्भार व मौजअ जान्बली व मौजअ हतवः व मौजअ मोहरी व बअजे किलअ मझ्कूर दरवजः बमूजब साबिक बअवलाद व अहफाद ऊ मुकर्रर व मरहमत फर्मूदः दहानीदः शुदः अस्त मीबायद् के ऊ बहमः अबवाब खातिर जमअ दानिस्तः चन्द जम्इयत बहम रसानीदः विलायत के मलऊन काबिज-शुदः अस्त आं तमाम दर कब्ज औलियाही दौलतकाहिरः आउर्दः दौलतरवाही व नेकूचन्द्गी खुद इजहार नुमायद् बअद अज्ञ इजहार दौलतखाही फराहूर हाल बऊ इस्तकामत मरमहत नमूदः सराफ्राज फर्मूदः खाहद शुद दर इं बाब कौल अस्त तादानद बरहुक्म फर्मान अशूरफ अकदस हुमायून अअला रवद तहरीरा फित्तारीखुल मझ्कूर दुव्वुम शहर जमादी उल् अव्वल सनः १०७०

सारांशः- अली आदिल शाह- विठोजी हैबतराव देसाई किले मूरबगर (राजगड) सय्यद अबदुल्लः बिन सय्यद मुहम्मद देसाई किले रोहिडा यानें विनंति केली कीं, निजामशाही व इतर मुलुख शापित शिवाजी स्वतःच्या ताब्यांत आणून जबरदस्ती चालवित आहे. आपण जुने मिरासदार आहों. कृपादृष्टी करून विठोजीकडे त्याचें जुनें इनाम व इतर चालूं ठेवावीं म्हणजे तो जमाव करून शापितानें काबिज केलेली विलायत बादशाही कब्जांत आणून दौलतीशीं निष्ठा दाखवील. विनंति मनास आणतां तांभारें, जांभळी, हतवें, व मोहरी हीं गांवें व इतर इनाम पूर्वीप्रमाणें त्याजकडे व त्याच्या वंशजांकडे चालूं ठेवण्याचा हुकूम दिला आहे. तरी त्यानें सर्व तऱ्हेनें विश्वास ठेवून जमाव करून शापितानें घेतलेला मुलूख बादशाही कबजांत आणावा आणिं बादशाहावरील निष्ठा व सदिच्छा प्रत्ययास आणावी. त्यांची व्यक्तता झाल्यावर शाश्वत कृपा केली जाईल. या बाबतींत कौल आहे.

भारत इतिहास संशोधक मंडळ

स्वीय ग्रंथमाला क्र. ३५

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

खंड १ ला.

प्रकाशकः

दत्तो वामन पोतदार

गंगाधरराव नारायणराव मुजुमदार

चिटणीस भा. इ. सं. मंडळ—पुणें

पुणें पेठ भांबुर्डा घ. नं. ९३६।२ येथें आर्यभूषण छापखान्यांत
अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें.

श. १८५३] किंमत २ रुपये [इ. १९३१

Original from

अनुक्रमणिका.

अनुक्रम	प्रकरणनाम	लेखक	पृष्ठ
०	प्रस्तावना	संपादक	१
१	श्रीरामवरदायिनी देवी	द. वा. पोतदार	३
२	दाभोळकर (अकोलें-अहमदनगर)	——	५
३	पायगुडे देशमुख-आगळंबे	र. ग्या. पायगुडे	१५
४	देशमुख अधिकाऱ्यांचें कुक्कट-दाभोळ !	शं. ग. दाते	२५
५	पवन मावळ	कृ. वा. पुरंदरे	३०
